# तृतिय वर्ष कला

## इतिहास अभ्यासपत्रिका क्रमांक - ७

# मराठ्यांचा इतिहास
# (१६०० - १८१८)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. कविता लघाटे**
प्राध्यापक नि प्रभारी संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**पुर्नसंपादन** : **डॉ. प्रकाश मसराम**
सहाय्यक प्राध्यापक इतिहास विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **प्रा. जी. एस. भुजबळ**
विभाग प्रमुख, इतिहास विभाग, कला वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, शिवळे, ता. मुरबाड, जि. ठाणे

**लेखक**

**प्रा. सौ. विद्या प्रभू**
विभागप्रमुख, इतिहास विभाग,
ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे

**प्रा. सौ. मानसी भागवत**
विभागप्रमुख, इतिहास विभाग,
प्रगती महाविद्यालय, डोंबिवली (पू.)

**प्रा. टी. पी. मोकळ**
विभागप्रमुख, इतिहास विभाग,
चिंतामणराव देशमुख कला महाविद्यालय,
रोहा, जि. रायगड

**डॉ. सुवर्णा जाधव**
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग, बिर्ला कॉलेज,
कल्याण (प.), जि. ठाणे

**प्रा. सांगळे बी. के**
इतिहास विभाग प्रमुख
आण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर जि. पुणे

**मे २०२०, तृतिय वर्ष कला, इतिहास - अभ्यासपत्रिका क्रमांक - ७,**

**मराठ्यांचा इतिहास (१६०० - १८१८)**

**प्रकाशक :** प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी :** अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण :**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मराठ-यांच्या इतिहासाची साधने | ०१ |
| २. | सतराव्या शतकाच्या सुरवातीचा दख्खन : भौगोलिक, राजकिय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थीती | १६ |
| ३. | मराठा सत्तेचा उद-य आणि विजापूर सत्तेशी संघर्ष | २६ |
| ४. | मराठेशाहीचा उदय- मुघल मराठे संघर्ष | ३५ |
| ५. | अ) शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम १६७७-७८<br>ब) मराठे आणि युरोपियन सत्ता | ५० |
| ६ | छत्रपती शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखालील स्वराज्य :<br>I महाराष्ट्र धर्म, II शिव राज्याभिषेक आणि त्याचे महत्त्व | ६३ |
| ७. | संघर्षाचा कालखंड (१६८० ते १७०७)<br>अ) मुगल मराठा संघर्ष : संभाजी महाराज, राजाराम महाराज,<br>महाराणी ताराबाई | ७४ |
| ८. | छत्रपती शाहू महाराज - महाराणी ताराबाई संघर्ष व पेशवाईचा उदय | ८५ |
| ९. | पेशवा पहिला बाजीराव | १०९ |
| १०. | पानिपतचे तिसरे युद्ध | ११८ |
| ११. | पेशवा माधवराव व मराठा सत्तेचे पुनरूज्जीवन | १२५ |
| १२. | पानिपत युद्धानंतरचा कालखंड<br>अ) बारभाई मंडळ, ब) महादजी शिंदे | १३८ |
| १३. | मल्हारराव होळकर, नाना फडणीस यांचे कार्य व मराठा सत्तेचा ऱ्हास | १४७ |
| १४. | शिवकालीन प्रशासन | १६२ |
| १५. | पेशवेकालीन प्रशासन व्यवस्था | १७५ |
| १६. | मराठेकालीन सामाजिक व आर्थिक जीवन | १८९ |
| १७. | मराठेकालीन सांस्कृतिक जीवन | २०१ |


❖❖❖❖

**REVISED SYLLABUS**
**T. Y. B. A.**
**History Paper VII (Option A)**

# HISTORY OF THE MARATHAS (1600-1818)

1. Main Literacy Sources:
   (i) Marathi
   (ii) Persian
   (iii) European

2. Deccan in the early 17th Century : Geo – Political, Social, Economic and Cultural conditions.

3. Rise of the Marathas Power under Shivaji:
   a) Struggle with Bijapur and Mughals.
   b) Shivaji's Karnatak expendition.
   c) Shivaji's relations with European Power.

4. Swarajya under Shivaji.
   a) Maharashtra Dharma
   b) Coronation and its significance.

5. Period of Crisis : 1680 - 1707
   a) The Mughal-Maratha Conflict : Sambhaji, Rajaram, Tarabai,
   b) Civil War : Shahu and Tarabai.

6. Expansion and Consolidation of the Maratha Power 1708-1761

7. Post – Panipat era
   a) Peshwa Madhav Rao I and the retrieval of Maratha Fortunes.
   b) Barbhai Council
   c) Role of Mahadji Shinde Malharrao Holkar and Nana Phadnis.
   d) Downfall of the Maratha Power.

8. Maratha Administration under Royal & Peshwa Period : Civil, Revenue Juduicial and Military.

9. Socio-Economic and Cultural developments under the Marathas:
   a) Society : Religion, Caste, Untouchability, Position of Women.
   b) Economy : Village Communities, Watan system, agriculture, industries trade and commerce.

c) Cultural Developments : Literature & Learning, Art & Architecture.

**Books for Study**

1. R.G. Deshmukh, *History of Maratha, Nimesh Agencies, Mumbai 1993.*

2. K.N. Chitnis, *Glimpse of Medeival Indian Ideas and Institutions, Second Edition, 1981 Published by Mrs. R. K. Chitnis Pune.*

3. B.D. Gaikwad, *B.B. Sardesai, D.B. Thorat, V.N. Hanmane, Marathekalin Sanstha Va Vichar, Phadke Bookdellers, Kolhapur, 1987.*

4. A.R. Kulkarni, *Maharashtra in the age of Shivaji, Rekha Prakashan, 2nd Revised Ed., Pune 2002.*

5. R.V. Nadkarni, *The Rise and Fall of Maratha Empire, Popular Prakashan, 1966.*

6. Pagadi, Setu Madhav Rao, Chatrapati Shivaji, Continental Prakashan, Poona 1974.

7. Patwardhan R.P. and Rawlinson, H.G. Source Book of Maratha History, Reprint with a new introduction by P.M. Joshi and A.R. Kulkarni, K.P. Bagchi & Co. Calcutta, 1978.

8. M.G. Ranade, *Rise of the Maratha Power and Other Essay, University of Mumbai, 1961.*

9. Govind Sakharam Sardesai, *The Main Currents of Maratha History, Phoenix Publications, Mumbai 1959.*

10. Govind Sakharam Sardesai, *New History of The Marathas, 3 Volumes, Phoenix Publications, Mumbai.*

VOl I : Shivaji and his Time (1600-1700), Third Impression, 1971.
VOL II : The Expansion of The Maratha Power, (1707-1772), 1958.
VOL III : Sunset Over Maharashtra, 1772-1848. Second Impression.

❖❖❖❖

# १

# मराठयांच्या इतिहासाची साधने

**अनुक्रमाणिका :**

१.० उद्दिष्टये
१.१ प्रास्ताविक
१.२ मराठ्यांचा इतिहासाची साधने
१.३ मराठी साधने
१.४ संस्कृत साधने
१.५ फारसी साधने
१.६ युरोपियन साधने
१.७ समारोप
१.८ प्रश्न
१.९ संदर्भ

## १.० उद्दिष्टये

१. मराठ्यांच्या इतिहासाच्या लिखीत साधनांची ओळख करुन घेणे.
२. मराठी व फारसी भाषेतील साधनांचे महत्त्व समजून घेणे.
३. युरोपियन भाषेतील विविध साधने जाणून घेणे.

## १.१ प्रास्ताविक

१७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठी सत्तेचा उदय झाला. शिवाजी महाराजांच्या मृत्यू नंतर संभाजी, राजाराम व ताराबाई यांनी मोगली आक्रमण रोखून धरले. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत पेशव्यांनी मराठा सत्तेच्या विस्ताराला सुरुवात केली. अठरावे शतक मराठयांच्या विस्ताराचे ठरले. मराठी सत्ता अखिल भारतीय स्वरुपाची बनली. मराठयांचा इतिहास हा फक्त मराठयांचा किंवा महाराष्ट्राचा प्रादेशिक इतिहास नाही. तर हा भारतीय उपखंडाचा इतिहास बनलेला आहे.

इ.स.१२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर प्रथम आक्रमण केले व इस्लामने दक्षिणेत प्रवेश केला. त्यानंतर महाराष्ट्रात बहामनी सुलतानाची सत्ता १३४७ ते १५१० पर्यंत होती. नंतर आदिलशाही व निजामशाहीची सत्ता होती. या राजवटींच्या काळात अनेक

मराठयांनी स्वकर्तृत्व व पराक्रम यांच्या जोरावर मानाच्या जागा मिळवल्या. परंतु स्वतंत्र राज्य स्थापन करण्याचा विचार करण्यास कोणी धजावले नाही.

परकीय सत्तेच्या दडपशाहीचा वरंवटा फिरत असताना शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली व त्यामुळे भारतीय इतिहासातील एक महान पर्वाला सुरुवात झाली.

## १.२ मराठयांच्या इतिहासाची साधने

ज्यांच्या आधारे किंवा ज्याच्या सहाय्याने इतिहास लिहिला जातो, त्यांना इतिहासाची साधने म्हणतात. ही साधने लिखित व पुरातत्वीय स्वरुपाची असतात. मराठयांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे अनेक ग्रंथ बखर रुपाने उपलब्ध आहेत. इतिहास लेखन हा साहित्यप्रकार महराठेशाहीतही अस्तित्वात होता. परंतु इतिहासाकडे व ऐतिहासिक व्यक्तिकडे बघण्याची दृष्टी शास्त्रीय नव्हती. बखरकारांवर पुराणांची फार मोठी छाप पडलेली दिसते. पुरावे गोळा करावेत, त्यांचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करावा, त्याची विश्वसनीयता पडताळून पाहणे व त्यातून निष्कर्ष काढून इतिहास लिहावा, हा शास्त्रीय दृष्टिकोन बखरकारांत दिसत नाही. इतिहास लेखन एक शास्त्रशुध्द प्रक्रिया असते. उपलब्ध साधनांच्या साहाय्याने इतिहासाचा मागोवा घ्यावा लागतो ह्याचे भान बखरकारांना असल्याने जाणवत नाही.

मराठेशाहीचा इतिहास शास्त्रीय दृष्टीने युरोपियनांनीच लिहिला. मराठेशाहीच्या अस्तापूर्वीच इ.स.१८१० साली स्कॉट वेअरिग या इंग्रज इतिहासकाराने मराठयांचा इतिहास प्रसिध्द केला. पुढे मराठयांची सत्ता इ.स.१८१८ साली नष्ट झाली. साता-याच्या छत्रपतीच्या गादीचे इंग्रजांनी पुनरुज्जीवन केल्यावर ग्रँट डफची रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. ग्रँट डफ हा चौकस, जिज्ञासू व इतिहासाचा अभ्यासू होता. ज्यांचे राज्य नष्ट करुन हिंदुस्थानातील सत्ता हाती घेतली, त्या मराठयांच्या सत्तेच्या इतिहासाचे आपण आकलन केले पाहिजे, असे त्यास वाटून त्याने मराठी कागदपत्रे जमविण्यास व त्यांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. साता-याचा राजाने अनेक कागदपत्रे उपलब्ध करुन दिली. त्याच्या अविश्रांत परिश्रमातून व चिकाटीतून ''मराठयांचा इतिहास'' हा ग्रंथ १८२६ साली तीन खंडात प्रकाशित झाला.

पुढे बरीच वर्षे ग्रॅट डफचा इतिहास प्रमाण मानला जात होता. पुढे इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर महाराष्ट्रात जनजागृती झाली. युरोपियन इतिहासकारांनी आपला इतिहास लिहिताना केलेल्या चुका भारतीयांच्या लक्षात येऊ लागल्या. सर्व प्रथम रावबहादूर नीळकंठ जनार्दन किर्तने यांनी सन १८६७ साली एक लेख लिहून ग्रॅट डफच्या इतिहासातील चुका उडघकीस आणल्या. या नंतर अनेक विचारवंतांच्या नजरा मराठयांच्या इतिहासाकडे वळल्या. मराठयांच्या इतिहासाला उपयुक्त असणारी कागदपत्रे शोधून, त्यांना छापण्याचे काम जिनसीवाले, कीर्तने, चिपळूणकर, साने, मोडक यांनी केले. 'विविध ज्ञान विस्तार, 'काव्येतिहाससंग्रह', 'भारत वर्ष' या मासिकांतून शेकडो कागदपत्रे प्रसिध्द झाली.

परंतु कागदपत्रे शोधून ती संकलित करुन आपल्या भाष्यासह प्रसिध्द करण्याचे महान कार्य इतिहासाचार्य राजवाडे यांनी केले. राजवाडयांनी अनेक संकटे सोसून, हजारो कागदपत्रे जमा केली व 'मराठयांच्या इतिहासाची साधने' या मालेचे २२ खंड प्रकाशित केले. हजारो कागदपत्रे प्रकाशात आणली. पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधान मंडळा'ची स्थापना त्यांनीच

केली (सन १९१०). इतिहासाचार्य राजवाडयांशिवाय महाराष्ट्रात राव.ब.द.ब.पारसनीस, ग.चि.वाड, वासुदेवशास्त्री खरे इत्यादी पंडितांनी मराठयांच्या इतिहासाची बहूमोल साधने प्रसिध्द केली. या नंतरच्या पिढीत रियासतकर सरदेसाई, वा.सि.बेंद्रे, मा. वि.गुजर, ग.ह.खरे, न.र. फाटक, अप्पासाहेब पवार, सेतूमाधवराव पगडी, स.मा.गर्गे, स.श.देसाई इत्यादी संशोधकांनी मागील पिढीचे कार्य पुढे चालवून अनेक प्रकारची ऐतिहासिक साधने प्रसिध्द केली आहेत.

**उपलब्ध साधनांच्या दृष्टीने मराठयांच्या इतिहासाचे दोन भाग करता येतात.**
१) शिवकाल (१६३०-१७०७) या भागात स्वतः छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम व महाराणी ताराबाई यांच्या कारकिर्दीचा समावेश होतो.

२) पेशवेकाळ (१७०७-१८१८) या भागात बाळाजी विश्वनाथ ते दुसरा बाजीराव हा अखेरचा पेशवा यांच्या कारकीर्दीचा समावेश होतो. या पैकी पेशवे काळाविषयी विपुल साधने उपलब्ध आहेत.

शिवकाळाचा इतिहास लिहिताना मात्र साधनांचा अपुरेपणा प्रकर्षाने जाणवतो. शिवकाळाविषयीच्या साधनांच्या तुटवडयाची कारणे पुढीलप्रमाणे देण्यता येतात-

अ) शिवकाळ हा मराठयांच्या इतिहासातील धामधुमीचा व पूर्वतयारीचा काळ होता. या काळात सरकारी कागदपत्रे तयार करणे, त्यांच्या नकला करणे किंवा त्यांची योग्य देखभाल करणे शक्य नव्हते. ब) इ.स.१६८९ मध्ये मराठयांची राजधानी रायगडहून दूरवर जींजी येथे हलवण्यात आली. त्यावेळेस अनेक सरकारी कागदपत्र नष्ट झाली. क) तत्कालीन समाज इतिहासाच्या शास्त्रशुध्द अभ्यासाविषयी फारसा जागरुक नव्हता. ड) दानपत्रे, निवाडा पत्रे, अन्य खाजगी कागदपत्र व दस्तऐवज उपलब्ध आहेत, परंतु शिवकाळाचा विश्वसनीय इतिहास लिहिण्यासाठी त्यांचा फारसा उपयोग होत नाही.

मराठयांच्या इतिहासाची साधने मराठी, संस्कृत, फारसी, हिंदी, कानडी, इंग्रजी, फ्रेंच, डच व पोर्तुगीज भाषेत आहेत.

## १.३ मराठी साधने

मराठी साधनांमध्ये प्रामुख्याने मराठी कागदपत्रे, बखरी, शकावल्या, आज्ञापत्रासारखे ग्रंथ, पोवाडे इत्यादी साधनांचा समावेश होतो.

**१.३.१ आज्ञापत्र** - आज्ञापत्र हा ग्रंथ शिवशाहीमधील प्रधान रामचंद्रपंडीत अमात्य याने सन १७१५ च्या सुमारास लिहिला. रामचंद्रपंत अमात्य शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील एक प्रधान होते. महाराजांची राजनीती त्यास पूर्ण समजली होती. ही राजनीती त्यांच्या वारसांना मार्गदर्शक ठरावी, म्हणून रामचंद्रपंताने हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात राजा, त्याचे प्रधानमंडळ, किल्ले, आरमार इत्यादी विषयांवर अमात्याने आपले विचार मांडले आहेत. हे विचार म्हणजे शिवाजी महाराजांची राजनीतीच आहे.

**१.३.२ जेधे शकावली** - शिवकाळात काही प्रसिध्द घराण्यांत ऐतिहासिक घटना लिहून ठेवण्याची पध्दत होती. त्यानुसार काही घराण्यांनी लिहून ठेवलेल्या नोंदी इतिहास संशोधकांना सापडल्या आहेत. अशा एकत्रित नोंदी असणा-या कागदास 'शकावली' असे म्हणतात. कारीचे (पुणे जवळ) जेधे देशमुख यांच्या घराण्याची अशीच एक शकावली महत्वाची आहे. कान्होजी नाईक जेधे, बाजी सर्जेराव या जेधे मंडळीनी शिवाजी महाराज, संभाजी महाराज इत्यादींची सेवा केली होती. शकावलीतील नोंदी व तारखा अचूक आहेत. मराठयांचा इतिहास समजून घेण्याचे हे उत्कृष्ट साधन आहे.

**१.३.३ बखरी** - बखर या शब्दाची उत्पती अरबी शब्द खबर (बातमी, वृत्तांत) पासून झालेली आहे. मराठयांच्या काळात बखर हा शब्द माहिती देणे या अर्थाने रुढ झाला आहे. अशी माहिती अर्थातच ऐतिहासिक व्यक्ती व घटना यांच्याविषयी असते. अनेक वेळा चरित्रनायकाच्या हुकूमावरुन बखरकाराकडून लिहून घेण्यात येत असे. तथापि बखरकार एका विशिष्ट पक्षाचे असल्याने त्यांचा इतिहास पक्षपतीपणे लिहिला जात असे. स्वकियांची स्तुती व परकीयांची निंदा असे. तरीही राजकीय स्वरुपाच्या इतिहास लेखनाची परंपरा या दृष्टीने त्यांचे महत्व आहे. शालीवाहन बखर ही सर्वांत जुनी बखर आहे. वि.का.राजवाडे यांच्या मते १८१८ पर्यंत सुमारे अडीचशे बखरी लिहिल्या गेल्या. इतिहासाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या ७० बखरी प्रसिध्द झाल्या आहेत.

**मराठी बखरींची वैशिष्टये**

१) बखरी मोडी लिपीत लिहिलेल्या आहेत.

२) अनेक वेळा बखरी राजा किंवा अनेक लहान मोठया सरदारांच्या सांगण्यावरुन लिहिल्या जात.

३) अनेक बखरींचा विषय राजकीय असला तरी कालानुक्रम इतिहास लिहिला जात नसे.

४) बखरीमध्ये राजकीय घडामोडींच्या तुलनेत सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे उल्लेख कमी आढळतात.

५) दंतकथा आणि परंपरागत दाखले देऊन बखर वाचनीय करण्याचा प्रयत्न केला जात असे.

६) बखरकार स्वकियाची स्तूती करत असे, चमत्कार, अवताराच्या कल्पनांचाही मोठया प्रमाणात समावेश असे.

७) बखरींचे निवेदन पौराणिक पध्दतीचे असे.

इतिहासाचार्य राजवाडे यांनी बखरींचे वर्गीकरण तीन भागात केले आहे.

**१) समकालीन बखरी** - समकालीन बखरकारांनी लिहिलेल्या बखरी -

**२) ऐकीव माहितीवर आधारलेल्या बखरी** - घटना घडल्या नंतर काही काळाने आपल्या आठवणींवर किंवा ऐकीव माहितीवर विसंबून बखरकाराने अशी बखर लिहिलेली असते.

**३) जुन्या बखरीवर आधारित असलेल्या बखरी** - काही वेळा या बखरी म्हणजे जुन्या बखरींच्या नकला असत. त्यामध्ये मूळ बखरीतील सर्व चुकांच्या बरोबर नकलकाराने नक्कल करताना केलेल्या चुकांचाही समावेश असतो आणि म्हणूनच त्या पूर्णपणे अविश्वसनीय असून त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येते.

डॉ. र.वि.हेरवाडकर यांनी मराठी बखरींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

१) चरित्रात्मक बखर - या बखरीत चरित्र्य नायकाच्या चरित्राचे वर्णन असते.
उदा. कृष्णाजी अनंत सभासद यांचे शिवचरित्र

२) विशिष्ट घराण्याचा इतिहास -एखाद्या घराण्याची हकिगत. उदा. पेशव्यांची बखर, भोसले वंशचरित्र.

३) आत्मचरित्रात्मक बखर - उदा. नाना फडणिसाचे आत्मचरित्र

४) प्रसंगात्मक बखर - या बखरीत एखाद्या महत्वाच्या प्रसंगाचे वर्णन असते.
उदा. पानिपतची बखर

५) विशिष्ट काळाचा इतिहास - उदा. पेशवाईच्या अखेरची बखर

६) विशिष्ट पक्षाची बाजू मांडणारी बखर. उदा - होळकरांची कैफियत

७) सांप्रदायिक बखर - उदा. समर्थांची बखर

८) भाषांतरित बखर - उदा. बुंदेल्यांची बखर

९) स्थळवर्णनात्मक बखर - उदा. महाबळेश्वरची जुनी माहिती

१०) उत्पन्नाविषयीची बखर - सरकारला सादर केलेल्या कैफियती

**बखरींची विश्वसनीयता** - बखरींची विश्वसनीयता हा एक अत्यंत वादाचा विषय आहे. सुप्रसिध्द इतिहासकार जदुनाथ सरकार यांच्या मते इतिहास लेखनाच्या दृष्टीने मराठी बखरी कुचकामी आहेत. राजवाडे यांच्या मते मराठी बखरी साधारणपणे तीन प्रकारचे दोष आढळतात १) स्थळविपर्यास २) काळविपर्यास ३) व्यक्तिविपर्यास, बखरीतील हे दोष सर्वमान्य असून कोणालाही हे नाकारता येत नाहीत.

परंतु बखर हा शास्त्रशुध्द इतिहास नसला तरी इतिहासाचे एक साधन आहे हे मान्य करावेच लागते.

**आपली प्रगती तपासा**

अ) बखर म्हणजे काय ? बखरीची वैशिष्टये सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

### १.३.४ शिवकालीन बखरी

**१) सभासद बखर** - ही शिवाजी महाराजांवरील सर्वात जुनी व शिवकालात लिहिली गेलेली बखर आहे. हिचा कर्ता कृष्णाजी अनंत सभासद हा असून त्याने शिवाजी महाराजांचा पराक्रम स्वतः पाहिलेला व ऐकिलेला आहे. राजाराम महाराजांच्या आज्ञेने ही बखर इ.स. १६९४ मध्ये लिहिण्यात आली. मराठी इतिहासाच्या अभ्यासूंच्या दुर्देवाने सभासदाने ही बखर फार संक्षिप्त अशी लिहिली आहे. तरीही शिवाजी महाराजाच्या काळातील ही बखर असल्याने तिला अनन्यसाधारण महत्व आहे. या बखरीत महाराजांची राज्यकारभार व्यवस्था, लष्कर व्यवस्था, किल्ले, खजिना, सरदार इत्यादी अनेक बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

**२) ९१ कलमी बखर -** ही बखर '९१ कलमी बखर' या नावाने प्रसिध्द आहे. कारण यात ९१ कलमे असून मालोजी राजे भोसले यांच्यापासून ते शिवाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंतचा इतिहास कथन केला आहे. ही बखर प्रसिध्द करण्याचे श्रेय संशोधक वि.स.वाकसकर यांच्याकडे जाते (इ.स.१९३०) वाकसकरांच्या मते, ही बखर मंत्री दत्ताजी त्रिमळ वाकेनिविस यांनी तयार केली. तिचा लेखनकाल १६८५ ते १७०७ या दरम्यानचा असावा.

**३) चिटणीस बखर -** मल्हारराव रामराव चिटणीस याने इ.स.१८११ मध्ये दुस-या शाहू महाराजाच्या आज्ञेवरुन ही बखर लिहिली. बखरकाराचे आजोबा बाळाजी आवजी चिटणीस शिवाजी महाराजांचे समकालीन होते. या बखरीत एकूण सात प्रकरणे आहेत. ही बखर प्रथम 'विविध ज्ञानविस्तार' या मासिकात इ.स. १८७७ मध्ये प्रसिध्द झाली. बखरकाराकडे साधनाची अनुकूलता असली तरी साधनसामग्रीचा पध्दतशीर उपयोग करण्याचे ज्ञान त्याला नव्हते. बखरीतील घटना कालानुक्रमाने दिलेल्या नाहीत.

**४) चित्रगुप्त बखर -** ही बखर सभासद बखरीवर आधारित आहे. हिचा कर्ता रघुनाथ यादव चित्रगुप्त (चित्रे) हा असून बखरींच्या मजकूरात अधूनमधून त्याने आपल्या कविता घातल्या आहेत. हा बखरकारही बाळाजी आवजी चिटणीस यांच्याच घराण्यातील होता. सभासद बखरीत ज्या पुरुषांची आडनावे दिली नाहीत. त्यांची आडनावे चित्रगुप्त लिहिण्याच्या ओघात सहजासहज देऊन जातो. ही बखर १७६५ च्या सुमारास लिहिली गेली असावी.

**५) दलपतरायाची बखर -** शिवाजी महाराजांच्या विरोधी पक्षात असणा-या लेखकाने ही बखर लिहिली आहे. त्यामुळे महाराजांच्या विरोधात असणा-या तत्कालीन मंडळींचे त्यांच्या कार्याविषयी काय मत होते, हे अजमाविण्यासाठी या बखरींचा उपयोग होते.

**६) शिवदिग्विजय -** ही बखर सन १८१८ साली लिहली गेली आहे. हिचा कर्ता अज्ञात आहे. इतिहास संशोधक नंदुरबारकर व दांडेकर यांनी तिचे संपादन केले व ती सन १८९५ साली प्रसिध्द केली. इतिहासाचार्य राजवाडयांच्या मते या बखरीचा मजकूर एखाद्या जुन्या बखरीवरुन घेतला असावा. राजाराम महाराजांना राजपद मिळावे म्हणून राणी सोयराबाईने केलेल्या कृत्यांचे वर्णन या बखरकाराने केले आहे.

**७) मराठी साम्राज्याची छोटी बखर -** या बखरीचा रचना इ.स.१८१७ साली झाली असावी. इतिहासकार बाळाजी जनार्दन मोडक यांनी ती 'काव्येतिहासंग्रह' या मासिकात प्रसिध्द केली. स्थल, व्यक्ती व काल यांचा बराच विपर्यास या बखरीत आहे. तरीही शिवचरित्रामधील काही नव्या बाबी या बखरीतून पुढे येतात.

**८) चिटणीसकृत संभाजी महाराजांची बखर व राजाराम महाराजांची बखर** - मल्हार रामराव चिटणीसानेच या दोन बखरी लिहिल्या आहेत. मराठयांच्या बाजूकडून संभाजी महाराज व राजाराम महाराज यांची चरित्रे कळण्यासाठी याच बखरींचा उपयोग होतो. हा बखरकार संभाजी महाराजांच्या विरोधात लिहितो व राजारामच्या संबंधी प्रशंसेचे उद्गार काढतो.

याशिवाय श्री. शिवप्रताप, शेडगावकर बखर, शहान्नव कलमी बखर, शिवाजी प्रताप इत्यादी बखरी शिवकालावर उपलब्ध आहेत. परंतुत्याचे ऐतिहासिक मूल्य फारच थोडे आहे.

**आपली प्रगती तपासा**

अ) शिवकालीन बखरींवर प्रकाश टाका.

---

**१.३.५ पेशवेकालीन बखरी** - इ.स.१७०७ मधील शाहूचे दक्षिणेतील आगमन ते इ.स.१८१८ मध्ये झालेला मराठी राज्याचा अस्त या पेशवे काळाविषयीही अनेक बखरी लिहिल्या गेल्या आहेत. त्यापैकी काही महत्वाच्या बखरी खालीलप्रमाणे आहेत.

**१) साष्टीची बखर** - उत्तर कोकणातील साष्टी व वसई प्रांतावर इ.स.१७३७ ते ३९ या काळात मराठयांनी स्वारी केली व ते प्रांत जिंकून घेतले. या विजयाची माहिती या बखरीत दिली आहे. ही बखर इ.स. १७४२ मध्ये लिहिली गेली आहे. वसईच्या संग्रामाचे खरे श्रेय गंगाजी नाईक यांचे असून यांच्या तुलनेत चिमाजी अप्पाचे या संग्रामातील योगदान गौण असल्याचे प्रतिपादन या बखरीत करण्यात आले आहे.

**२) श्री. शाहू महाराज यांची बखर** - या बखरीचा कर्ता गोविंदराव खंडेराव चिटणीस आहे. या बखरीत शाहू महाराजांचा जन्म ते मृत्युपर्यंतची माहिती विस्ताराने दिली आहे. मुघलांच्या कैदेतील शाहू महाराजांच्या परिस्थितीचे तपशीलवार वर्णन बखरकाराने केले आहे.

**३) पेशव्यांची बखर** - या बखरीचा कर्ता कृष्णाजी सोहीनी आहे. इ.स.१७१३ ते १८१८ या काळातील सर्व घडामोडींचा तपशीलवार उल्लेख या बखरीत आढळतो. ही बखर पेशव्यांच्या पराक्रमाची गाथा आहे. मराठयांच्या इतिहासातील विविध प्रसंगाचे वर्णन त्यामध्ये केले आहे.

**४) पानिपत बखर** - इ.स.१७६३ मध्ये रघुनाथ यादव याने पेशवा नानासाहेब यांची विधवा पत्नी गोपिकाबाई हिच्या आज्ञेवरुन ही बखर लिहिली होती. रघुनाथ यादव हा पेशव्यांच्या पदरी कारकून होता. पानिपतच्या संग्रामात वीरगती प्राप्त झालेल्या महत्वाच्या व्यक्तींची यादी हे या बखरीचे विशेष वैशिष्टये आहे. पानिपतच्या संग्रामानंतर लगेचच ही बखर लिहिली गेली असल्याने त्यातील हकीगत खरी असावी ही सर्वसाधारण अपेक्षा मात्र खोटी ठरते. जदुनाथ सरकार तर या बखरीचे वर्णन 'अफीमबाजाचे लेखन' असे करतात.

**५) भाऊसाहेबांची बखर** - पत्ररुपातील या बखरीचा लेखक शिंद्यांच्या पदरी एक सेवक असावा. या बखरीत इ.स.१७६१ च्या पानिपतच्या संग्रामाविषयीचे तपशीलवार वर्णन करण्यात आले आहे. मात्र त्याच्या विश्वसनीयतेची खात्री देता येत नाही. बखरीतील मजकूरावरुन काही तत्कालीन चालीरीतीवर प्रकाश पडतो. सतीची पध्दत, पाठीवर जखम झालेल्या सैनिकाची समाजात होणारी हेटाळणी यांचा उल्लेख बखरकाराने केला आहे.

**६) काशीराजाची बखर** -

काशीराज हा मराठी ब्राम्हण अवधचा नवाब शूजाउद-दौलाच्या सेवेत होता. त्याने फारसी भाषेत पानिपतच्या लढाईचा वृतांत लिहिला आहे. पानिपतच्या लढाईच्या तपशिलाविषयक हा वृतांत महत्वाचे साधन आहे.

वरीलप्रमाणे मराठयांच्या इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या काही महत्वाच्या बखरी आहेत. या बखरींमध्ये अनेक दोष असले तरी बखरकारांनी काही जुनी कागदपत्रे अभ्यासली होती जी आता सापडत नाहीत. तेव्हा त्यासाठी बखरींवर विसंबून राहणे, आवश्यक ठरले. इतिहासात जेथे त्रूटी आहेत, तेथे बखरी आपल्या साहाय्यस येऊ शकतात.

**आपली प्रगती तपासा**

अ) पेशवेकालीन बखरींची माहिती द्या.

---

---

---

---

---

**१.३.६सरकारी व खाजगी पत्रे**

सरकारी पत्रात तहनामे, करार, कायदेकानून, सनदा, रोखे, वतन पत्रे, राजा, प्रधान यांनी अधिकाऱ्यांना उद्देशून काढलेले हुकूम, कारखान्यांना दिलेल्या सूचना यांचा समावेश होतो. पेशवेकाळात मराठा राज्याचा विस्तार झाला. परमुलखात बातमीदार नेमले जात असत. तसेच मराठा सरदारांचे बातमीदार पुणे दरबारात असत. त्यांची बातमीपत्रे इतिहास लेखनाची महत्वाची साधने आहेत.

खाजगी पत्रांमध्ये राज्यकारभार, व्यवहार, व घरगुती अशा तिन्ही प्रकारचा प्रत्यक्ष पुरावा आढळतो.

## १.४ संस्कृत साधने

प्रामुख्याने महाराष्ट्रातून आणि भारतातील इतर ठिकाणावरुन अनेक संस्कृत पंडित छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात येत असत. यापैकी काही पंडितांनी शिवकाळाविषयी संस्कृत भाषेत काव्यरचना वा प्रशस्ती केलेली आहे. हे साहित्य काव्याच्या स्वरुपात असल्यामुळे त्यात अतिशयोक्ती असू शकते. मराठांच्या इतिहासाच्या दृष्टीने काही संस्कृत साधने महत्वाचे आहेत. त्यातील काही महत्वाचे साधने पुढीलप्रमाणे

**१.४.१ विश्वगुणांदर्शचंपू** - या काव्यग्रंथाची रचना कवी वेंकटाश्वरी यांनी केलेली आहे. हा कवी उत्तर भारतातील असावा. या काव्यामध्ये शिवकालीन मराठे आणि ब्राम्हण यांच्याविषयी बोधप्रद लिखान आलेले आहे. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत तो महाराष्ट्रात आलेला असल्यामुळे महाराजांच्या जिवनातील काही घटनांवर या काव्याद्वारे प्रकाश पडतो. शिवाजीच्या कार्याचे समर्थन करणारे हे काव्य होय.

**१.४.२ सुर्यवंशम किंवा अनुपूराण** - हा काव्यग्रंथ कवी परमानंद यांनी लिहिलेला आहे. हे काव्य १०० सर्गांचे करण्याची त्याची इच्छा होती. परंतुपहिले ३१ सर्ग त्याने १६८० पर्यंत रचले. त्यानंतरच्या काळात त्याने १९ सर्ग रचले तर शेवटी त्याने १३ सर्ग रचले आहे. या काव्यग्रंथात शहाजी राजे, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयीचे वर्णन

आलेले आहे. राणी सोयराबाइच्या सौंदर्याला प्रभावाखाली शिवाजी महाराजांनी संभाजी राज्यांचा गादीवरील हक्क नाकारला व राजारामाला आपले उत्तराधिकारी नेमले, असा युक्तीवाद या ग्रंथात आलेला आहे. यावरुन छत्रपती शिवाजीच्या नंतर हा ग्रंथ तयार झाला असावा किंवा कोणाच्यातरी प्रभावाखाली या ग्रंथात काही भागांचे लिखाण झाले आहे असे वाटते.

**१.४.३ शिवभारत** - हा ग्रंथसुध्दा कवि परमानंद यानेच लिहिलेला आहे. या ग्रंथामध्ये थेट मालोजीराव भोसले, शहाजीराजे भोसले यांच्या कारकिर्दिचा आढावा घेण्यात आलेला आहे. यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकण विजयापर्यंतचा इतिहास आलेला आहे. यातील वृत्तांत सुध्दा काव्यरुपानेच लिहिण्यात आलेला आहे.

**१.४.४ अशावतारम्** - या काव्यग्रथांचा कर्ता गोविंद हा असुन हा कवी परमानंदचा नातू होय. याला 'कविंद्र' हा किताब देण्यात आला होता. या काव्यग्रंथाची रचना छत्रपती शाहुमहाराजांच्या आज्ञेवरुन करण्यात आली. साधारणपणे या ग्रंथाची रचना इ. स. १७४० ते १७५४ या कालावधीमध्ये झाली असे मानले जाते.

**१.४.५ शिवराज्याभिषेक कल्पतरु** - या काव्यग्रथांचा मुख्य विषय शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा आहे. या काव्यग्रथांचा कर्ता अनिरुध्द सरस्वती असून हा उत्तर हिंदुस्थानातील आहे. अनिरुध्द सरस्वती शिवराज्याभिषेकाच्या वेळी रायगडावर उपस्थित होता. गोविंद आणि निश्चलपूरी या दोन ब्राम्हणांच्या संवादरुपाने राज्याभिषकाचे वर्णन यात आढळते. गागाभट्टाने केलेला वेदोक्त राज्याभिषेक कसा चुकिचा होता यावर या काव्यग्रंथात चर्चा आलेली आहे.

**१.४.६ राधा माधव विलासचंपू** - हा काव्यग्रंथ जयराम पिंडे यांनी रचला आहे. याचा निवास बागलान प्रातांतील सप्तषृंगी डोंगराच्या पायथ्याशी होता. त्या ठिकाणी तो पिंड पाडण्याचे काम करित असे म्हणून त्याला पिण्डे असे आडनाव मिळाले. काही ठिकाणी त्याचा नामोल्लेख जयराम पंडीत असाही होतो. या काव्यग्रंथात प्रामुख्याने शहाजीराजांची माहिती आलेली आहे. जयराम पिंडे हे शहाजीराज्यांच्या दरबारात ही होते त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांच्या दरबारातही होते.

**१.४.७ पर्णाल पर्वत ग्रहणाख्यानम्** - हा काव्यग्रंथच असुन, तो जयराम पिंडे (पंडीत) यानेच रचला आहे. इ. स. १६७३ साली शिवाजी महाराजांनी (अण्णाजी दत्तो व कोंडाजी फर्जंद) पन्हाळा किल्ला जिकंला हा या काव्याचा मुख्य विषय आहे यावरुन पन्हाळा दुसऱ्यांदा कसा घेतला याची माहिती मिळते. या काव्याची रचना इ. स. १६७४ साली झाली असावी, असे संशोधक स. म. दिवेकर यांचे मत आहे. शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रकाश टाकणारा हा महत्त्वपूर्ण साधन ग्रंथ मानावयास हरकत नाही.

**१.४.८ राजाराम चरितम्** - राजारामाच्या दरबारी पंडीत केशवपंडीत यांनी हा ग्रंथ रचला आहे. या ग्रंथामध्ये राजाराम महाराजांच्या काळातील परिस्थीतीचे वर्णन आलेले आहे. हा ग्रंथ तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात श्री. वा. सी. बेन्द्रे यांनी शोधून काढला व तो इ. स. १९३१ ला प्रसिद्ध केला. या ग्रंथात विशेषतः राजाराम महाराजांचा जिंजीचा प्रवास वर्णिलेला आहे.

**आपली प्रगती तपासा**

अ) मराठ्यांच्या संस्कृत साधनांची माहिती द्या.

## १.५ फारसी साधने

मध्ययुगीन भारतातील विविध राज्यकर्त्यांची फारसी ही प्रशासकीय भाषा होती. या राज्यकर्त्यांचा आणि मराठयांचा जो संबंध आला त्याविषयीचे अनेक उल्लेख फारसी भाषेतील सरकारी कागदपत्रे व दस्तऐवज यामध्ये सापडतात. तसेच मोगल इतिहासकारांनी लिहिलेले मोगल साम्राज्याचे इतिहास, बादशाहाची चरित्रे, मोगल दरबारची बातमीपत्रे मराठा इतिहासाची महत्वाची साधने आहेत.

**१. मासिरे आलमगिरी (आलमगिरचे कतृत्त्व) : -** साकी मुस्तैदखान याने हा ग्रंथ १७०९ मध्ये लिहीला आहे. औरंगजेबाच्या खास तैनातीमधील अधिकारी असल्याने मोगल-मराठा संघर्ष त्याने प्रत्यक्ष डोळयांनी पाहिला होता. साकीने आपल्या चरित्रात बादशाहाच्या राज्यारोहणाच्या वर्षांपासूनच्या घडामोडी व घटना दिल्या आहेत. बहुतेक ठिकाणी तो अचूक तारखा देतो. त्यामुळे मोगल-मराठा संघर्षाचा अभ्यास करणा-यास बहुमोल मदत होते. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई यांच्या कारकीर्दीचा अभ्यास या ग्रंथाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही.

सन १८७१ साली हा ग्रंथ रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेने प्रथम प्रसिध्द केला. त्याचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी केले आहे. तर मराठी भाषांतर श्री. सेतु माधवराव पगडी यांनी ‘मराठे व औरंगजेब’ या नावाने प्रसिध्द केले.

**२. मुन्तखवुल लुबाब-ए-महंमदशाही (तारीखे खाफीखान) :-** महंमद हाशिम खाफीखान याने हा ग्रंथ १७३४ मध्ये लिहिला. १८७४ मध्ये रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल या संस्थेने तो प्रकाशित केला. मराठी भाषांतर श्री. ग.ह.खरे व श्री. पगडी यांनी प्रसिध्द केले आहे. मोगलांचा एक अधिकारी या नात्याने खाफीखान औरंगजेब बादशाहाच्या मोहिमेत दक्षिणेत हजर होता. त्याने स्वतः मोगल-मराठा संघर्ष पाहिला होता. खाफीखानाने मोगल-मराठयांच्या अनेक लढाया वर्णिलेल्या आहेत. त्यावरुन मोगल व मराठा यांची लढण्याची पध्दती व रणनीती यासंबंधी खूप माहिती मिळते. जदुनाथ सरकाराच्या मते हे लिखाण अत्यंत विश्वसनीय असल्याने विशेष महत्वाचे आहे.

**३. तारीखे दिल्कुशा :-** औरंगजेब बादशाहाच्या पदरी असणा-या भीमसेन सक्सेना याचे हे आत्मचरित्र आहे. औरंगजेबाबरोबर तो दक्षिणेच्या मोहिमेत हाता व सन १७०१ साली जुल्फिकार खानाने पन्हाळयास वेढा दिला, त्यावेळी हा तेथे हजर होता. भीमसेन सक्सेनाने आपल्या या आत्मचरित्रात मोगल साम्राज्याच्या सन १६५६ सालापासून १७०९ पर्यंतचा इतिहास कथन

केला आहे. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज व महाराणी ताराबाई या मराठा राज्यकर्त्यांनी औरंगजेबांशी दिलेल्या संघर्षाची प्रथम दर्जाची माहिती भीमसेन आपणास सादर करतो. महाराणी ताराबाईचे नेतृत्व गुण याविषयी विस्तृत माहिती मिळते. या ग्रंथाचा प्रथम अनुवाद इंग्रजीत कॅ. जोनाथन स्कॉट यांनी इ. स. १७९४ मध्ये केला. इ. स. १९६३ साली श्री. सेतू माधव पगडी यांनी हा ग्रंथ 'मोगल आणि मराठे' या ग्रंथरूपाने मराठीत प्रकाशित केला.

**४. फुतूहाते आलमगिरी :-** फुतूहाते आलमगिरी म्हणजे आलमगीर औरंगजेब बादशाहाच्या विजयाची कथा. हा ग्रंथ ईश्वरदास नागर याने लिहिला. बादशाहाच्या मुख्य न्यायाधीशाचा ईश्वरदास नागर हा कारकून होता. आपल्या ग्रंथास ईश्वरदासने मोगलांचा शाहिस्तेखानाच्या मोहिमेपासून (सन १६६०) ते साता-याच्या वेढयापर्यंत (सन १७००) हकीगत दिली आहे. संभाजी महाराज, कवि कलश, दुर्गादास राठोड, अकबर, राजाराम महाराज, संताजी व बादशाही सरदार यांच्याविषयीची बरीच नवी माहिती ईश्वरदास नागरच्या या ग्रंथात मिळते. संभाजी राजांनी औरंगजेबापुढे मान लवविली नाही व डोळे काढले गेल्यावर अन्नत्याग केला, ही संभाजी महाराजांच्या शेवटच्या दिवसांची हकीगत ईश्वरदासानेच दिली आहे. अशा अनेक नव्या माहितीमुळे हा ग्रंथ मराठयांच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरला आहे.

**५. खुतूते शिवाजी :-** खुतूते शिवाजी म्हणजे शिवाजी महाराजांची पत्रे या ग्रंथात केवळ महाराजांचीच पत्रे नाहीत तर औरंगजेब बादशाहा, शहजादा अकबर, जुल्फिकार खान, जयसिंह, शाहू महाराज यांची ही पत्रे या ग्रंथात आहेत. या पत्रांचा इंग्रजी अनुवाद 'मोगल-मराठा संघर्ष' या पुस्तकात श्री सेतू माधवराव पगडी यांनी प्रसिध्द केला आहे. शिवाजी महाराजांनी जिजियाच्या निषेधार्थ औरंगजेबाला लिहिलेले पत्राचा समावेश या ग्रंथात आहे.

**६) हफ्त अंजुमन :-** मिर्जा राजा जयसिंग यांच्या पत्रांचा हा संग्रह आहे. जयसिंग हा शिवाजी महाराजांचा पराभव करण्यासाठी दक्षिणेत आला होता. या मोहिमेत जयसिंगने औरंगजेबास वेळावेळी जी पत्रे पाठवली ती या संग्रहात आहे. जयसिंगाचा चिटणीस उदयराज याने हा संग्रह एकत्रित करुन त्यास 'हफ्त अंजुमन' असे नाव दिले. या पत्रांवरुन जयसिंगाच्या दक्षिणेतील मोहिमेवर, त्याच्या डावपेचावर प्रकाश पडतो. शिवचरित्राचे हे एक महत्वाचे साधन आहे.

**७. लुत्फुल्लाखानाची पत्रे :-** लुत्फुल्लाखान हा औरंगजेबाचा सरदार होता. सन १६९० च्या सुमारास तो खटावचा ठाणेदार होता. त्यावेळी त्याच्या संताजी व धनाजी यांच्याशी अनेक लढाया झाल्या. या लढायांच्या वृत्तांत त्यांच्या पत्रांतूनच आपणास समजतो. सन १६९९ नंतर तो विजापूर, औरंगाबाद व वऱ्हाड येथे मोगल सुभेदार म्हणून होता. श्री सेतू माधवराव पगडी यांनी लुत्फुल्लाखानाचा ४० पत्राचा अनुवाद 'मोगल मराठा संघर्ष' या पुस्तकात दिला आहे. ही पत्रे मोगल-मराठा संघर्षावर प्रकाश टाकणारी आहेत.

**८. मातबरखानाची पत्रे :-** मातबरखान हा मोगलांचा सरदार होता. संभाजी महाराजांच्या कालाच्या शेवटी नाशिक, बागलाण, उत्तर कोकण येथील किल्ले घेण्यात त्याने मोठा पराक्रम गाजवला. त्याने बादशाहाला व इतर मोगल सेनाधिका-यांना लिहिलेली काही पत्रे उपलब्ध आहेत. मातबरखानाचा चिटणीस जेठमल याने ही पत्रे व खानाच्या पराक्रमाची हकीगत एकत्रित करुन 'कारनामा' नावाचा ग्रंथ लिहिला. या पत्रांपैकी काही पत्रांचा अनुवाद श्री. पगडी यांनी मराठीतील 'नवभारत' या मासिकात प्रसिध्द केला आहे. संभाजी महाराज व राजाराम महाराज यांच्या कालातील मोगल-मराठा संघर्ष समजून घेण्यासाठी या पत्रांचा उपयोग होतो.

**९. बुसातिन-उस्-सलातीन :-** विजापूरच्या आदिलशाहीचा हा इतिहास आहे. हा इतिहास महंमद इब्राहिम अली जूबैरी याने १८२४ साली लिहिला. या ग्रंथाचा अनुवाद मोडक व वझे यांनी प्रथम प्रसिध्द केला. श्री. ग. ह. खरे व श्री. वा. सी. बेंद्रे यांनीही याचे अनुवाद 'विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास' या नावाने केले आहेत. शिवाजी-आदिलशाही संबंधाचा अभ्यासासाठी हे महत्वाचे साधन आहे.

**१०. सियाल-उल-मुंतखरीन :-** या ग्रंथाचा लेखक सय्यद गुलाम हुसेन तबतबी हा मुघल सरदार होता. त्याचे बहुतेक आयुष्य बंगाल प्रांतामध्ये गेले होते. शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांच्यातील यादवी युध्द, मराठे निजाम संबंधावर तो प्रकाश टाकतो.

**११. अखबारात :-** बादशाहाच्या दरबारात दररोज होणाऱ्या घडामोडींचा वृत्तांत सरकारी अधिकाऱ्यांकडून लिहिला जाई. तसेच मोठया सरदारांचे हस्तकही दरबारात असत. ते दरबाराच्या वार्ता आपल्या धन्यास कळवीत असत. या वार्तापत्रांना 'अखबारात' असे म्हणतात. कालाच्या ओघात या अखबारातांपैकी बरीच नष्ट झाली. त्यापैकी काही भाग लंडन, जयपूर, कलकत्ता येथील दप्तरखान्यांत आहेत. श्री. ग.ह.खरे व श्री. पगडी यांनी या अखबारातांचे भाषांतर मराठीत केले आहे. दक्षिणेतील मोगल मराठा संघर्ष, त्याची लष्करी व राजकीय कारभार व्यवस्था, इत्यादी अनेक बाबींवर हे अखबारात प्रकाश टाकतात. त्यांच्या आधारे मराठयांचा तारीखवार इतिहास लिहिणे सुलभ झाले आहे.

**आपली प्रगती तपासा**

अ) मराठ्यांच्या इतिहासाची फारशी साधने स्पष्ट करा.

## १.६ युरोपियन साधने

सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली व याच दरम्यान पोर्तुगीज वगळता युरोपियन सत्ता व्यापाराच्या उद्देशाने हिंदूस्थानात आल्या. इंग्रजांनी पौरात्य देशांबरोबर व्यापार करण्याच्या प्रमुख उद्देशाने ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली. त्यानंतर लवकरच हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यांवर सुरत, मुंबई, राजापूर, कारवार या बंदरांमध्ये वखारी स्थापन केल्या. लवकरच या युरोपियन सत्तांची राजकीय महत्वाकांक्षा वाढू लागली. नव्याने निर्माण झालेल्या मराठी सत्तेकडे ते संशयाने पाहू लागले. मराठयांच्या सर्व हालचालींवर त्यांची बारीक नजर होती. १६५९ मध्ये शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या केलेल्या वधानंतर युरोपियन साधनांमध्ये शिवाजी महाराजांविषयीच्या उल्लेखात वाढ झाली. भविष्यात मराठा सत्तेबरोबर आपला संघर्ष अटळ आहे, या जाणिवेतून मराठा राज्याविषयी इत्यंभूत माहिती इंग्रज मिळवत असत. त्याचे विस्तृत वर्णन त्यांच्या दस्तऐवजात आढळते.

**१.६.१ इंग्लिश साधने** - इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत, मुंबई, राजापूर, कारवार, मद्रास, कलकत्ता इत्यादी ठिकाणी अनेक वखारी होत्या. प्रथम सुरत व नंतर मुंबई येथे इंग्रजाची

प्रमुख वखार होती. या वखारी ज्या प्रांतात असत, त्या प्रांतातील राजकीय व व्यापारी घडामोडी, त्या आपल्या प्रमुख वखारीला कळवीत असत व भारतामधील प्रमुख वखार भारतातील सर्व वृत्तांत इंग्लंडमधील आपल्या डायरेक्टरांना कळवीत असे. सुरत, मुंबई, राजापूर, कारवार व मद्रास या ठिकाणच्या वखारींच्या वृत्तांतात व त्यांच्या मंडळाच्या बैठकीच्या ठरावांत मराठयांच्या हालचाली, मोहिमा, राजकारण याविषयी अत्यंत मोलाची माहिती मिळते. हे इंग्रज व्यापारी स्वतः माहिती गोळा करत. तसेच हेरांच्याकडून बातम्या गोळा करत. त्यांच्या व्यापाराच्या संरक्षणासाठी हे करणे त्यांना आवश्यक होते. त्यांच्या या कागदपत्रांत मराठयांचा तारीखवार इतिहास लिहिण्यास मदत झाली आहे.

लंडन, कलकत्ता, मद्रास, मुंबई इत्यादी ठिकाणी सरकारी दप्तरखान्यात कंपनीची लक्षावधी कागदपत्रे आहेत. इ. स. १९३१ साली शिवाजी महाराजांचा संबंध असलेली इंग्लिश कागदपत्र 'English Records on Shivaji' या ग्रंथाच्या रुपाने एकत्रित छापली आहेत. लंडनमधील 'इंडिया ऑफीस'मधील शेकडो कागपत्रांची नकल करुन श्री.वा.सी.बेंद्रे यांनी आणली आहेत. सुप्रसिध्द इतिहास संशोधक व लेखक डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी सन १९२७ साली 'फारेन बायॉग्रॉफीज ऑफ शिवाजी' हा ग्रंथ संपादन करुन मराठयांच्या इतिहासाच्या साधन ग्रंथात मोलाची भर टाकली आहे, या ग्रंथात इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज इत्यादी तत्कालीन लेखकांनी शिवाजी महाराजांसंबधी केलेल्या लिखाणांचा इंग्रजी अनुवाद डॉ. सेन यांनी प्रसिध्द केला आहे. या परकीय लेखकांमध्ये जीन-द-थेवेनो, बार्थिलेमी कॅरे, फ्रॅन्सिस मार्टिन यांचा समावेश आहे. त्याशिवाय डॉ. सेन यांनी शिवाजी महाराजांसंबधीची डच कागदपत्रेही इंग्रजीत अनुवादित करुन ती ग्रंथात दिली आहेत. शिवाजी महाराजांशी इंग्रज व्यापाऱ्यांनी केलेले करारनामे, त्यांच्या वकिलांचे वृत्तांत यांचाही समावेश येथे करण्यात आला आहे.

**१.६.२ पोर्तुगीज साधने** - पोर्तुगीज हे मराठयांचे जवळचे शेजारी होते. हिंदुस्थानच्या राजकारणात भाग घेणारे ते पहिले युरोपियन होते. त्यामुळे त्यांच्या कागदपत्रांमध्ये मराठयांचे उल्लेख आपल्याला सापडतात. हिंदुस्थानात गोवा व पोर्तुगालमध्ये लिस्बन येथे असणाऱ्या दप्तरखान्यांत मराठयांच्या इतिहासाशी संबंध असणारी हजारो कागदपत्रे आहेत. पोर्तुगीज व्हाइसरॉयने आपल्या राजास लिहिलेली पत्रे, मराठी व मोगल सरदार यांना लिहिलेली पत्रे, आपल्या मंडळातील ठराव इत्यादींचा या साधनात समावेश होतो. इतिहास संशोधक डॉ. पांडुरंगराव पिसुर्लेकर यांनी 'पोर्तुगीज-मराठा संबंध' या ग्रंथ लेखनात पोर्तुगीज साधनांचा उपयोग केला आहे. श्री. स.शं. देसाई यांनी पोर्तुगीज साधनांचा मराठीत अनुवाद केला आहे.

**१.६.३ फ्रेंच साधने** - फ्रेंच साधने पॅरिस, लंडन इत्यादी ठिकाणच्या दप्तरखान्यांत आहेत. या कागदपत्रांमध्ये हिंदुस्थानातील फ्रेंच वखारवाल्यांनी मायदेशी लिहिलेली पत्रे, हिंदी राजांना लिहिलेली पत्रे यांचा समावेश आहे. सर्वात मराठयांच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे साधने म्हणजे फ्रेंच गर्व्हनर मार्टिन याने लिहिलेली रोजनिशी. या रोजनिशीचे इंग्रजी भाषांतर सर जदुनाथ सरकार यांनी प्रसिध्द केले आहे. मार्टिनचे वास्तव्य पाँडेचरीला असल्या कारणाने मराठयांच्या कर्नाटकातील हालचालींचा अभ्यास करण्यासाठी मार्टिनची ही रोजनिशी अत्यंत महत्वाची आहे. शिवाजी महाराजांची कर्नाटकाची स्वारी व राजाराम कालातील जीजींचा वेढा या संबंधी महत्वाची माहिती आपल्याला फ्रेंच कागदपत्रांमध्ये सापडते.

इतिहास संशोधक डॉ. हाताळकर यांनी फ्रेंच कागदपत्रांचा वापर करुन Relations between the French and the Marathas (1668-1815) हा उत्कृष्ट ग्रंथ तयार केला आहे.

**१.६.४ डच साधने** - हेग, बटाव्हिया, लंडन इत्यादी शहरांच्या पुराभिलेखागारातील डच रेकॉर्डमध्ये मराठयांसंबंधी बरीच महत्वाची माहिती आढळते. या डच रेकॉर्डचा उपयोग डॉ. बाळकृष्ण यांनी आपल्या ``Shivaji the Great" या ग्रंथाच्या ४ खंडात पुरेपुर केलेला आहे. रेव्ह हेरास यांनी त्याचा इंग्लिश अनुवाद केलेला आहे.

### १.६.५. परकीय प्रवाशांनी लिहिलेले वृत्तांत

१) जॉन फ्रायर :- जॉन फ्रायर हा ईस्ट इंडिया कंपनीचा सर्जन होता. इ.स.१६७२-१६८१ या काळात तो हिंदुस्थानात काम पाहत होता. त्याने महाराष्ट्रातील मुंबई, रायगड, जुन्नर, कारवार, गोवा, वेंगुर्ला इत्यादी ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. त्याने लिहिलेला प्रवास वृत्तांत सन १८७३ साली 'Travels in India in the Seventeenth Century' या पुस्तकात प्रसिध्द करण्यात आला आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या चरित्रास उपयुक्त संदर्भ या प्रवास-वृत्तांतात आढळतात.

**२) निकोलस् मनुची :-** हा इटालियन प्रवासी होय. आपल्या वयाच्या १७ व्या वर्षी म्हणजे इ.स.१६५६ मध्ये तो हिंदुस्थानात आला. त्याचा मृत्यू १७१७ मध्ये हिंदुस्थानातच झाला. जवळ जवळ सर्व हिंदुस्थानभर हा गृहस्थ फिरला व त्याने दारा शुको, जयसिंग, औरंगजेब, शहा अलम, गोव्याचे पोर्तुगीज, मद्रासचे इंग्रज यांच्या पदरी नोकरी केली. हिंदुस्थानात त्याने जे पाहिले, ऐकले व अनुभवले त्याचा वृत्तांत त्याने 'Storia Do Mogor' (मोगलांचा इतिहास) या नावाने प्रसिध्द केला. हा ग्रंथ मनुचीने फ्रेंच व पोर्तुगीज अशा दोन भाषांतून वेगवेगळा लिहिला होता.

मराठयांच्या इतिहासाच्या संदर्भात मनुचीचा ग्रंथ अनेक संदर्भ पुरवितो. शिवाजी, संभाजी, राजाराम व ताराबाई यांच्या संबंधीच्या अनेक हकीगती मनुचीने आपल्या ग्रंथात दिल्या आहेत.

**३) जीन द थेवेनो :-** थेवेनो सन १६६६ मध्ये हिंदुस्थानांत आला. तो आपल्या प्रवास वृत्तांतामध्ये सुरतेची लूट, शिवाजी महाराजांची आग्रा भेट या विषयी माहिती देतो. परंतु त्याने दिलेली माहिती विश्वसनीय नाही.

**४) फ्रॅकॉय बर्नियर :-** बर्नियर हा फ्रेंच प्रवासी व वैद्य हिंदुस्थानात येऊन गेला. त्याने आपल्या प्रवास वर्णनात शिवाजी महाराजांच्या विविध पराक्रमाविषयी माहिती लिहून ठेवली आहे. बर्नियरने आग्रा, दिल्ली, सुरत व काश्मीरला भेट दिली होती.

**५) ॲबे बार्थलेमी कॅरे :-** इ.स.१६८८ च्या सुमारास शिवकालात हिंदुस्थानात येऊन गेलेला फ्रेंच प्रवासी होय. सुरत, दमण, चौल, राजापूर, इत्यादी ठिकाणी तो गेला होता. त्याने आपल्या भेटीचा वृत्तांत इ.स.१६९९ मध्ये प्रसिध्द केला. या व्दिखंडी वृत्तांतामध्ये शिवाजी महाराजांच्या कार्याविषयीचे अनेक उल्लेख आढळतात. महाराजांच्या सुरतेवरील दोन्ही स्वाऱ्या, आग्रा भेट, त्यांची बारदेसवरील मोहिम, युरोपियन व्यापाऱ्यांविषयीचे त्यांचे धोरण याविषयी कॅरेने दिलेली माहिती साधारणपणे विश्वसनीय आहे. कॅरे हा शिवाजीमहाराजांचा एक चाहता होता. त्याच्या लिखाणात महाराजांविषयीचा आदर स्पष्टपणे जाणवतो.

**६) विल्यम नॉरीस :-** सन १७०० च्या सुमारास इंग्लंडच्या राजाने जुनी ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त करुन नवी कंपनी निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार इंग्लिश राजाने नव्या कंपनीस हिंदुस्थानात व्यापारी सवलती मिळाव्यात, म्हणून विल्यम नॉरिस यास मोगल बादशाहाकडे धाडले. जानेवारी १७०१ मध्ये नॉरिस सुरत बंदरात उतरला. तेथून औरंगाबाद, शहागड, ब्रम्हपुरी, मिरज असा प्रवास करीत तो बादशाह पन्हाळगडास वेढा घालून बसला होता, तिथे पोहोचला. तेथे त्याने बादशाहाची भेट घेतली व नंतर तो मायदेशी निघून गेला. त्याने जो आपला प्रवास वृत्तांत लिहिला आहे, त्यामध्ये बादशाहाच्या छावण्या, त्यांची संरक्षण व्यवस्था, सरदारांचे हेवेदावे, भष्टाचार व मराठयांचा पराक्रम याविषयी माहिती मिळते. पन्हाळगडच्या वेढयाची त्याने स्वतः डोळयानं पाहिलेली हकीगत अत्यंत महत्वाची आहे.

**७) हेन्री ऑक्झींडेन :-** सन १६७४ मध्ये राज्याभिषेकाच्या प्रसंगी ईस्ट इंडिया कंपनीचा प्रतिनिधी या नात्याने हेन्री ऑक्झींडेन रायगडावर हजर होता. शिवराज्याभिषेकाचे विश्वसनीय व तपशीलवार वर्णन त्याच्या लिखाणात सापडते.

## १.७ समारोप

अशाप्रकारे मराठयांच्या इतिहासाची साधने विविध भारतीय तसेच परकीय भाषांतून आढळतात. परंतुत्यापैकी कोणत्याही एकाच भाषेतील साधने अचूक व पूर्णतः विश्वसनीय नाहीत. परंतु अनेक माहिती आपल्याला नव्याने सापडते. ही माहिती पडताळून पाहावी लागतात. अनेक प्रवासी समकालीन असल्याने त्यांनी दिलेली माहिती महत्वाची ठरते.

## १.८ प्रश्न

१) मराठ्यांचा इतिहासाचा मराठी साधनांचा परामर्श द्या.
२) मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून पर्शियन साधनांचे महत्व विशद करा.
३) मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असलेल्या युरोपियन साधनांचे महत्व स्पष्ट करा.
३) बखर म्हणजे काय ? मराठांचा इतिहासाचे साधन म्हणून ती कितपत विश्वसनीय आहेत ?

## १.८ संदर्भ

१. डॉ. कुलकर्णी, अ.रा.,ग.ह.खरे (संपादक) 'मराठयांचा इतिहास', खंड १, खंड २ व खंड ३ महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०.
२. डॉ. श.गो.कोलारकर, मराठयांचा इतिहास, नागपूर
३. डॉ. देव प्रभाकर, 'मराठयांचा इतिहास', विद्या प्रकाशन.
४. डॉ. पवार जयसिंग व 'मराठा साम्राज्याचा उदय आणि अस्त, कोल्हापूर.

❖❖❖❖

# २

# सतराव्या शतकाच्या सुरुवातीचा दख्खन : भौगोलिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थिती

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रास्ताविक
२.२ भौगोलिक परिस्थिती
२.३ राजकीय परिस्थिती
२.४ सामाजिक परिस्थिती
२.५. आर्थिक परिस्थिती
२.६ धार्मिक व सांस्कृतिक परिस्थिती
२.७ सारांश
२.८ दिर्घोत्तरी प्रश्न
२.९ संदर्भ


## २.० उद्दिष्टे

मराठ्यांच्या उदयापूर्वीची म्हणजेच सतराव्या शतकाच्या सुरुवातीची महाराष्ट्रातील परिस्थिती कशी होती ते समजुन घेणे या प्रकारणाचे उद्दिष्ट आहे. या परिस्थितीतूनच आपल्याला मराठेशाहीची निर्मिती कशी झाली असावी याची कारणे दिसतात. तत्कालीन राजकीय प्रशासन, समाज, आर्थिक स्थिती निश्चितच अशा वळणावर येऊन पोहचली होती की जिथे एखादे राजकीय परिवर्तन घडून येणे आवश्यकच होते. म्हणूनच मराठेशाहीच्या निर्मितीला कारणीभूत ठरलेली परिस्थिती ज्ञात करून घेणे आवश्यक आहे.

## २.१ प्रास्ताविक

१७व्या शतकात शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठी सत्तेचा उदय झाला. शिवाजी ने स्वराज्याची स्थापना केली आणि संभाजी, राजाराम ताराबाई यांनी मराठी राज्याचे विजापूर व मोगली हल्यापासून संरक्षण केले. त्यानंतरच्या काळात तर मराठी सत्ता अखिल भारतीय स्वरूपाची बनली. इ.स. १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने

महाराष्ट्रातील रामचंद्रदेव यादव याचा पराभव केला. आणि महाराष्ट्रात मुस्लीम राजवट सुरू झाली. त्यानंतर बहामनी सुलतान व नंतर आदिलशहा व निजामशहा यांच्या सत्ता निर्माण झाल्या. जवळजवळ ३०० वर्षे महाराष्ट्रावर इस्लामी सत्ता असल्याने हिंदू धर्माची पिछेहाट झाली होती. अशा पार्श्वभूमीवर शिवाजी महाराज सुरूवातीस जहागिरदार असले तरी नंतर स्वतंत्र छत्रपती म्हणून उदयास आले. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठ्यांचा इतिहास हे एक गौरवशाली पर्व आहे.

## २.२ भौगोलिक परिस्थिती

महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३,०६,३४५ चौ.कि.मी. आहे. उत्तरेला गुजराथ आणि मध्यप्रदेश, पूर्वेला मध्यप्रदेश आणि आंध्र प्रदेश आणि दक्षिणेला आंध्र व कर्नाटक ही राज्ये आहेत. महाराष्ट्राचे ठळक भूरचनात्मक वैशिष्ट्य म्हणजे पश्चिमेकडे असणारी उत्तर दक्षिण सह्याद्री पर्वताची रांग जीची एकूण लांबी ६४० कि.मी. असून समुद्रसपाटीपासून साधारण उंची ८०० ते १००० मीटर आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेला कोकण किनारपट्टी तर पूर्वेला विस्तीर्ण पठार पसरलेले आहे. तापी, गोदावरी, भीमा या प्रमुख नद्या आहेत.

### २.२.१ भौगोलिक परिस्थिती व मराठ्यांचा उदय

मराठ्यांच्या उदयाच्या कारणांचा अभ्यास करताना येथील भौगोलिक परिस्थितीचा खूप मोठा वाटा असल्याचे दिसते. सह्याद्रीच्या घाट माथ्यावर व त्याच्या थोडेसे पश्चिमेकडे महाराष्ट्रातील बरेच गिरिदुर्ग आहे. गिरीदुर्गावर जो नियंत्रण ठेऊ शकेल तोच या प्रदेशाचा राज्यकर्ता होऊ शकणार होता. महाराष्ट्राच्या पठारी भागात वारंवार दुष्काळ, सुपीक जमीनीची कमतरता उपयुक्त खनिजांची कमतरता यामुळे येथिल लोकही साधे, किरकोळ शरीरयष्टीचे व सावळे होते. तर कोकणच्या प्रदेशातही दुर्गमता, मुसळधार पाऊस, डोंगराळ भूरचना अशा कारणांमुळे सहजपणे कोणालाही राज्य स्थापन करता आले नाही. यामुळे येथील माणूस देशाच्या मूळ प्रवाहापासून वेगळा राहीला. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांना आपले जीवन चालवण्यासाठी अत्यंत कष्ट करावे लागत. त्यामुळे काटकपणा, कष्टाळू वृत्ती, निसर्गाच्या सान्निध्यातील स्वतंत्र अस्तित्व याचीच सवय त्यांच्यात निर्माण झाली म्हणूनच जेव्हा मुघल किंवा इतर मुसलमान सत्तांनी या भागात राज्य विस्तारण्याचा प्रयत्न केला, तेव्हा येथील लोकांनी त्यांना विरोध केला व शिवाजी राजांच्या प्रयत्नांना साथ दिली. मराठ्यांच्या अस्तासही उत्तरेकडील भौगोलिक परिस्थिती काही प्रमाणात कारणीभूत ठरली म्हणूनच मराठ्यांचा उदय व ऱ्हास या दोन्ही घटनांवर भौगोलिक परिस्थितीचा निश्चितपणे परिणाम झाला असे म्हणता येते.

## २.३. राजकीय परिस्थिती

सतराव्या शतकाच्या पहिल्या अर्धशतकात मराठ्यांचा उदय होणे ही एक मोठी ऐतिहासिक घटना मानली जाते. कोणत्याही ऐतिहासिक घटनेला तशी अनुरूप पार्श्वभूमी तयार होणे आवश्यक असते. मराठ्यांच्या उदयाला कारणीभूत ठरणाऱ्या राजकीय परिस्थितीचा मागोवा घेताना अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण दिग्विजयाच्या काळापासून म्हणजेच १२९४ पासूनच घटनांचा आढावा घेता येतो.

### २.३.१ अल्लाउद्दीन खिलजीची देवगिरीवरील स्वारी १२९४ :-

इसवी सनाच्या तेराव्या शतकात दिल्लीवर तूर्कीवंशाच्या सुलतानांचा अंमल प्रस्थापित झाला, उत्तरेकडे साम्राज्याचा विस्तार होऊ लागल्यावर त्यांचे दक्षिणेकडे लक्ष वेधणे स्वाभाविक होते. यादवांची राजधानी देवगिरीवर इ.स.१२९४ मध्ये झालेले आक्रमण हे मुसलमानी सत्ताधिशांचे दक्षिणेवरील पहिले पाऊल होय. अल्लाउद्दीन खिलजी घराण्याच्या कार्यकाळात अल्लाउद्दीनचा सेनापती मलिक काफूर याने दक्षिणेकडे तीनवेळा मोहिमा काढल्या व दक्षिणेकडील मोठ्या प्रदेशावर राज्य प्रस्थापित केले. खिलजी घराण्याचे राज्य पुढे १३२० पर्यंत उत्तरेत सत्तेवर राहिले इ.स. १३४७ साली दक्षिणेत बहामनी राज्याची स्थापना झाली.

### २.३.२ विजयनगर व बहामनी राज्यांची स्थापना:-

खिलजीनंतर सुलतान मुहम्मद बीन तुघलकाच्या काळात तुंगभद्रेच्या दक्षिणेकडे विजयनगर राज्याची स्थापना झाली. हरीहर व बुक्क यांनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगरचा हिंदू राज्याची स्थापना केली. अकरा वर्षानंतर १३४७ मध्ये बहामनी राज्याचाही उदय झाला. बहामनी सुलतान व विजयनगरचे राज्यकर्ते यांच्यात सतत संघर्ष सुरू होते. दरम्यान बहामनी सल्तनतीचे ५ तुकडे झाले व त्यातून १४९० मध्ये वऱ्हाडाची इमादशाही, विजापूरची आदिलशाही १४९० मध्ये, अहमदनगरची निजामशाही १४९०, आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही १५१८ तर विदर्भातील बरीदशाही १४९२ मध्ये स्थापन झाली. या पाचपैकी विजापूर, गोवळकोंडा व अहमदनगर या तीनच सुलतानशाह्या मराठ्यांच्या स्वराज्य निर्मितीच्या काळात अस्तित्वात होत्या. याच सुलतानांच्या चाकरीत पुढे अनेक मराठा घराणी निर्माण झाली, यात प्रामुख्याने वेरूळचे भोसले, सिंदखेडचे जाधव, मुधोळचे घोरपडे, जावळीचे मोरे, फलटणचे निंबाळकर अशा अनेक घराण्यांचा समावेश होतो. या व इतर अनेक घराण्यातील पराक्रमी पुरूषांनी सुलतानांच्या दरबारात आपले वजन निर्माण केले. पण त्यांच्यातील वैमनस्य मात्र कायम राहून पुढे मराठेशाहीच्या अस्ताला कारणीभूत ठरले. दक्षिणेतील सल्तनतीने या प्रदेशातील प्रशासनव्यवस्थेत फारसे बदल न करता कुलकर्णी, देशमुख, देशपांडे हीच रचना कायम ठेवली. त्यामुळे मराठ्यांना प्रशासनाचे प्रशिक्षण मिळू लागले. त्याचा उपयोग पुढे शिवाजी महाराजांना करून घेता आला.

### २.३.३ पोर्तुगीज :-

१४९८ मध्ये भारतात येणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपियन होते. त्यांनी पुढील पन्नास वर्षात आपल्या वसाहतींची निर्मिती केली. बारदेश, साष्ठी, गोवा हे प्रदेश जिंकून खिस्ती धर्माचा प्रसारही सुरू केला. सत्ता विस्ताराचे त्यांचे धोरण स्थानिक लोकांच्या हिताच्या विरोधात होते. त्यामुळे स्थानिक लोकांशी संघर्ष सुरू होऊन त्यांना आदिलशहा, मुघल व पुढे मराठ्यांशाही सामना करावा लागला. आपल्या प्रदेशातील मंदीरे नाहिशी करून लोकांचे सक्तीने धर्मांतर करून घेतल्यामुळे समाजातून त्यांना विरोध होऊ लागला. पुढे दीव, दमण आणि मुंबई हे प्रदेशही त्यांनी काबीज केले. नौदल उभारण्याचा प्रयत्न मराठ्यांनी सुरू केल्यावर मराठे व पोर्तुगीज संघर्ष येऊ लागला. पोर्तुगीजांच्या काळात लिहिलेले अनेक वृत्तांत या संदर्भात उपयोगी पडतात.

### २.३.४ जंजिऱ्यांचे सिद्दी :-

पश्चिम किनारपट्टीवर नियंत्रण निर्माण करणारी एक सत्ता म्हणजे जंजिऱ्याचे सिद्दी अफ्रिकेतील ॲबिसिनियामधुन आलेले हे दक्षिणी मुसलमान होय. अत्यंत खडतर समुद्रमार्गाने प्रवास करून आलेले हे लोक पुन्हा परत गेले नाहीत. कोकण किनारपट्टीवर आपले वर्चस्व ठेवून

सिद्दीनीही निजामशहा व आदिलशहाकडे चाकरी केली. म्हणूनच जेव्हा शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा प्रयत्न सुरू केला. तेव्हा सिद्दीकडून सातत्याने विरोध झाला.

### २.३.५ विजयनगर राज्याचा अस्त :-१५६५

दक्षिणेत स्थापन झालेले विजयनगरच्या हिंदु राज्याने विस्तृत सत्ता निर्माण केली. राजकीय व आर्थिक बाबतीत आपल्याशी स्पर्धा करणाऱ्या विजयनगरला कायमस्वरूपी नष्ट करण्याच्या हेतुने हुसेन निजामशहाच्या पुढाकाराने चारही इतर सुलतानशाह्यांना आपल्या मदतीस घेऊन विजयनगरच्या विरोधात युद्धात उतरला. यातून २२ जानेवारी १५६५ रोजी तालिकोटचे मोठे युद्ध घडले. यात युद्धात विजयनगरचा पराभव झाला. आणि त्या साम्राज्याचा मोठा प्रदेश सुलतानांच्या ताब्यात गेला. या घटनेमुळे दक्षिणेतील प्रशासन व्यवस्था कोलमडली. सुलतानांचे अत्याचार या प्रदेशात सुरू झाले. मोडकळीस आलेल्या विजयनगरने आपला धर्म, संस्कृती व भाषेचे संरक्षण करण्याचा प्रयत्न आपल्या अधिकाऱ्यांच्या मदतीने केला. त्यामुळे पाळेगार व नायक या अधिकाऱ्याचे मार्फत बंगलोर, तंजावर, मदुरा, या ठिकाणी त्यांचे अस्तित्व कायम राहिले. यांच्याशी पुढील काळात संपर्क निर्माण करून शिवाजी महाराजांनी कर्नाटक येथे दुसरे मराठा राज्य निर्माण केले.

### २.३.६ उत्तरेतील मुघलः-

इ.स.१५२६ मध्ये बाबर, या मुघल राज्यकर्त्याने उत्तर भारतात मुघल सत्तेची स्थापना केली. पुढे हुमायुन व अकबर यांनी मुघल राज्याचा उत्तरेत विस्तार केला. अकबराच्या काळात दक्षिण भारतात सत्ता विस्तारासाठी आक्रमक धोरण स्वीकारले गेले. बादशहा जहांगीर व शहाजहान यांच्या काळात मुघलांचे विजापूर व अहमदनगर या दक्षिणी सत्तांशी संघर्ष सुरु झाले. शिवाजी महाराजांच्या जन्मानंतर काही वर्षातच निजामशाही संपली. पुढे शहाजहान बादशहा झाल्यावर त्याने आपला मुलगा औरंगजेब यास दक्षिणेची सुभेदारी दिली. शहाजहानने निजामशाही विरुध्द उघडलेल्या मोहिमेच्या काळात मुघल व निजामशहा यांच्यात झालेल्या युध्दात त्याचा लखुजी जाधव, मलिक अंबर व शहाजी भोसले यांच्याशी संपर्क आला. निजामशाही वाचविण्यासाठी शहाजीराजांनी अत्यंत अवघड परिस्थितीत लढा दिला. त्यामुळे शिवाजीराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या काळात मुघल सत्तेच्या क्षमतेची पूर्ण जाणिव मराठ्यांनी होती.

### २.३.७ मलिक अंबरचे योगदानः-

जहांगिर व शहाजहानने निजामशाहीवर केलेल्या आक्रमणाचा चांदबिबी व मालिक अंबरने प्रतिकार केला होता. तरीही पुढे कार्यक्षम राज्यकर्त्यांच्या अभावाने निजामशाही संपली. खानदेश हा प्रदेश ही मुघलांनी आपल्या साम्रज्यात विलीन केला. निजामशाहीचेही विलिनिकरण तात्काळ करता आले असते. परंतु मालिक अंबर या हबशी सरदाराने निजामशाहीच्या बचावासाठी मोठा लढा दिला. मुर्तजा निजामशाह दुसरा (१६०३) याच्याकाळात निजामशहाची राजधानी दौलताबाद येथे हलविण्यात आली. मालिक अंबरने आपले प्रशासकीय कौशल्य पणाला लावून अनेक महसूल विषयक आणि लष्करी सुधारणा घडवून आणल्या. यामुळे निजामशाही बुडविणे मुघलांना कठिण झाले. याच कालखंडात शहाजी भोसले निजामशाहीत होते. मलिक अंबरकडून गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी चांगलेच आत्मसात केले. थोडक्यात लष्करी डावपेच व प्रशासनाचे तंत्र त्यांनी आत्मसात केले. मालिक अंबर यांनी शहानवाज खान या मुघली सुभेदाराला रोशन गावच्या लढाईत पराभूत करण्याचा अपयशी प्रयत्न केला होता तेव्हा पासूनच मिळावलेले लढाईचे व प्रशासनाचे तंत्र मराठेशाहीच्या उदयाला फायदेशीर ठरले.

### २.३.८ भोसल्यांचा उदय :-

दक्षिण भारतात बहामनी सुलतानांच्या काळापासून स्थानिक मराठ्यांना लष्करी सेवेच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यातूनच वेगवेगळ्या घराण्यांचा उदय होत गेला. भोसले हे असेच एक घराणे या घराण्याचा उदयपूरच्या सिसोदे घराण्याशी जवळचा संबंध होता अशी माहिती अनेक बखरीत आली आहे. वेरूळ येथील धृष्णेश्वराच्या मंदिरातील शिलालेख व कागदपत्रावरून बाबाजी भोसले हे भोसले घराण्यातील पहिले नाव सापडते. तर **शीवभारत मालोजींपासून** माहिती देते. वेरूळची अनुवंशिक पाटीलकी त्यांच्याकडे होती. पुणे जिल्ह्यातील हिंगणी बिराडी आणि दिवळगाव या प्रदेशांची पाटीलकी बाबाजींकडे होती. त्यांनी मालोजी व विठोजीस सैन्यात भरती केले. कालांतराने या दोघांचाही प्रभाव निर्माण झाला.

मालोजींना झालेला ज्येष्ठ पूत्र म्हणजे शहाजी, बिकानेर येथील ग्रंथालयात सापडणाऱ्या जन्मतिथीप्रमाणे शहाजी राजांचा जन्म १८ मार्च १५९४ मध्ये झालेला दिसतो. त्यांच्या ५ वर्षांच्या वयातच मालोजीरावांचा मृत्यु झाला. त्यामुळे त्यांचे पालनपोषण आई उमाबाई आणि चुलते विठोजी यांनीच केले. वयाच्या १०व्या वर्षी लखुजी जाधवांची मुलगी जिजाबाई हिच्याशी शहाजींचा विवाह झाला.

### २.३.९ शहाजी भोसल्यांचा उदय :-

१७व्या शतकाच्या सुरूवातीला दक्षिण भारतात निजामशाही व आदिलशाही यांच्यात सतत संघर्ष सुरू होते. त्यातच मुघल बादशहा शहाजहान दक्षिणेत राज्य विस्तार करण्याचा प्रयत्नात होता. अहमदनगरचा वजीर मलिक अंबर याने बराचकाळ मुघलांना प्रतिकार केला. तरीही मुघल बादशहाने आपला निर्धार सोडला नाही. त्यातूनच दि.३१ ऑक्टोबर १६२४ या दिवशी अहमदनगर जवळच्या भातवडी याठिकाणी निजामशाही व मुघल यांच्यात मोठी लढाई झाली. या लढाईत मोगलांचा पराभव झाला या विजयाचे बरेचसे श्रेय शहाजी भोसले यांस मिळाले.

भातवडीच्या युद्धानंतर शहाजीचे निजामशाहीतील वजन वाढू लागले. ही गोष्ट दरबारातील अनेकांना खटकू लागली. प्रत्यक्ष मलिक अंबरलाही शहाजीचा वाढता प्रभाव सहन झाला नाही. त्यामुळे निजामशाही सोडून शहाजी आदिलशाहीत सामील झाला. त्यांस सर लष्कर हा किताब देऊन जहांगिरी ही देण्यात आली. इ.स. १६२६ मध्ये मलिक अंबरचा मृत्यु झाल्याने त्याचा मुलगा फतेहखान निजामशाहीतील वजीर बनला. परंतु फतेहखान वडिलांप्रमाणे कर्तबगार नव्हता. आदिलशहीत १६२७ मध्ये इब्राहीम आदिलशहाचा मृत्यू झाला. त्यानंतर महम्मद आदिलशहा सत्तेवर आला. परंतु शहाजीला योग्य वागणूक मिळणार नाही असे वाटल्याने आदिलशाही सोडून १६२८ मध्ये शहाजी निजामशाहीत परत आले. यास सुमारास लखुजी जाधव मुगलांचा पक्ष सोडून पुन्हा निजामशाहीत दाखल झाले. परंतु परत आल्यावर त्यांच्या निष्ठेवर शंका घेऊन त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेमुळे शहाजी राजे निजामशाही सोडून मुघलांच्या सेवेत रूजू झाले. तेथे त्यांना फक्त पंचहजारी मनसब मिळाली. शहाजी सारख्या महत्त्कांक्षी व्यक्तीला त्यातून समाधान मिळाले नाही. म्हणून ती मनसबदारी सोडून ते पुन्हा एकदा निजामशाहीत परतले. तेव्हापासून पुढे निजामशाहीच्या अस्तापर्यंत त्यांनी मुघलांना लढा दिला. या काळात मुर्तजा निजामशहा या छोट्या सुलतानला बरोबर घेऊन माहूलीच्या किल्ल्यात त्यांनी आश्रय घेतला. परंतु मुघलांनी वेढा देऊन १६३६ मध्ये निजामशाही संपवली. निजामशाहीच्या अस्तानंतर शहाजी राजे पुन्हा एकदा अदिलशहाकडे चाकरी करू लागले. ते शेवटी १६६४ पर्यंत आदिलशहीतच राहिले. १६३७ पासूनच रणदूल्ला खान आणि अफजलखान यांच्याशी

शहाजींचे शत्रूत्व कर्नाटकात हळूहळू वाढू लागले. त्यांच्या कर्तृत्वाने बंगळूर, मदुराई, कावेरी पट्टम, वेल्लारी, श्रीरंगपट्टणम् इ. आदिलशहाच्या अधिपत्याखाली आले. या विजयामुळे शहाजींना नावलैकीका बरोबर बंगळुरची जहागीरी मिळाली.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः मराठ्यांच्या उदयापूर्वीची राजकीय परिस्थिती सांगा.

## २.४ सामाजिक परिस्थिती

इतिहासकार न्या. महादेव रानडे यांच्यामते १७व्या शतकातील ''मराठ्यांचा इतिहास हा उत्तर भारतातील आर्यवंशीय आणि दक्षिण भारतातील द्रविड लोकांच्या मिश्रणातून तयार झालेल्या दोन्ही वंशीयांचे गुणधर्म असलेल्या लोकांनी घडविलेल्या घटनांचा इतिहास आहे.'' मराठी सत्तेचा उदय या आपल्या ग्रंथात त्यांनी हे मत मांडले आहे. १७व्या शतकातील महाराष्ट्रातील समाज जाती व्यवस्थेचा प्रभाव असणारा होता. ब्राह्मण हे समाजात सर्वोच्च स्तरावर मानले जात असत त्यानंतर क्षत्रिय तर पुढे शेती करणाऱ्या कुणबी लोकांचा समावेश होता. बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. मुसलमानी आक्रमणानंतर मात्र जाती भेदाची तीव्रता कमी होऊ लागली. ब्राह्मण व क्षत्रिय यांचे समाजातील प्रस्थ कमी झाले. परकीय आक्रमणाचा रेटा त्यांना थांबवता आला नाही. यामुळे क्षत्रिय समाजावरील विश्वास कमी होऊ लागला. व्यापारावरही परिणाम होऊन शेती हाच मुख्य व्यवसाय बनला एकूणच महाराष्ट्रातील सुलतानी राजवटींकडे चाकरी पत्करून अनेक कुटुंबांनी उत्पन्नाचे नविन साधन शोधले.

### २.४.१ सर यदुनाथ सरकार यांचे महाराष्ट्रातील समाजिक समानतेच्या संदर्भातील मत

मराठ्यांच्या इतिहासाचे प्रसिद्ध अभ्यासक सर जदुनाथ सरकार यांनी “Shivaji and his times” या ग्रंथात मराठ्यांच्या सामाजिक स्थितीचे संदर्भ दिले आहेत. त्यांच्या मते, ''१७व्या शतकातील महाराष्ट्रात सामाजिक भेदांची तीव्रता कमी होती. कोणतीही श्रीमंत व्यक्ती अत्यंत श्रीमंत होऊ शकली नाही. तसेच प्रत्येक गरीब माणूस कष्ट करणारा, नितीमत्ता जपणारा, आणि स्वाभिमानी होता. गरीबी हा एक सार्वत्रिक घटक असून त्यामुळे समाजात संघटितपणा निर्माण झालेला दिसतो. महाराष्ट्रातील स्त्रिया कधीच पडद्यामागे राहिल्या नाहीत. कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी महाराष्ट्रीयन स्त्री पुरूषांच्या बरोबरीने शेतीवरील कामात सहभागी होत होती. त्यामुळे समाजात एक मोकळेपणा आलेला दिसतो. भारतातील इतर ठिकाणांच्या तुलनेत महाराष्ट्रातील ही स्थिती निश्चितच वेगळी होती.''

समाजात समानता धार्मिक परिवर्तनामुळे निर्माण झालेली दिसते. याकाळात महाराष्ट्रात भक्ती चळवळीचा प्रसार झाल्यामुळे जातीभेदातील तीव्रता कमी होऊन समाजातील विविध स्तरांमध्ये संघटितपणा येऊ लागला होता. या संदर्भात महाराष्ट्रातील संतांचे योगदान निश्चितच मोठे होते. निरनिराळ्या जमातींमधून आणि व्यवसायातून पुढे झालेले ज्ञानेश्वर व एकनाथ ब्राह्मण,

नामदेव शिंपी, तुकाराम कुणबी, नरहरी सोनार, नामदेव शिंपी, गोरोबा, कुंभार, तर रोहिदास चांभार अशा विविध स्तरांतून आलेल्या संतांनी 'देशातील परिस्थितीनुसार आचारधर्म असला पाहिजे' असे विचार मांडुन लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. यवनी राज्यापासून आपल्या धर्माचे रक्षण केले पाहिजे, याची जाणीव त्यांनी करून दिली. स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृती विषयी समाजातील स्वाभिमान त्यांनी पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भागवतधर्माचा उदय झाल्यामुळे एकेश्वरवाद, बंधुभाव व परमेश्वराची भक्ती यातून 'पंढरपुर' हे क्षेत्र भक्ती चळवळीचे केंद्र बनले. त्यातून निर्माण झालेल्या वारकरी संप्रदायामुळे महाराष्ट्रातील धार्मिक प्रबोधनाला सार्वत्रिक स्वरूप प्राप्त झाले. यामुळे सहाजिकच सर्वसामान्य लोक हिंदु धर्माचे रक्षण करून संघटित होण्याकडे वळले. अशा समाजाच्या मानसिकतेचा उपयोग शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेसाठी निश्चितच खूप मोठा झाला.

### २.४.२ महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन :-

महाराष्ट्रातील समाज मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातच राहणारा होता. प्रत्येक खेडे हा स्वयंपूर्ण घटक होता. बलुतेदारी पद्धत असल्याने बहुतेकदा कुंभार, सुतार, सोनार असे १२ बलुतेदार असत. वस्तुविनियम पद्धती असल्यामुळे अन्नधान्य व वस्तु यांची देवाण घेवाण करून गरजा भागवल्या जात. गावातील दिवाणी व फौजदारी तंटे, 'गोतसभा' या गावातील ज्येष्ठ व्यक्तींकडून सोडवले जात. याशिवाय महसुल वसुली आणि प्रशासनाचे काम पाटील, कुलकर्णी तसेच देशमुख व देशपांडे यांच्या मार्फत केले जात असे. त्यामुळे सुलतानांच्या दरबारातील सत्ताबदलांचा फारसा प्रभाव ग्रामीण जीवनावर होत नसे. मुसलमानी सत्तेचा प्रभाव बहुतेकदा राजधानीची ठिकाणे, शासकीय कचेऱ्या आणि लष्करी तळांवरच होत असे. तुर्की, हबशी, पठाण इराणी तसेच धर्मातंरीत मुसलमान येथील समाजात सहभागी होण्याचा प्रयत्न करत असत. त्यांच्या हाती सत्ता एकवटलेली असे.

### २.४.३ स्त्रियांची परिस्थिती :-

महाराष्ट्रातील स्त्रियांची परिस्थिती देशातील इतर ठिकाणापेक्षा फारशी वेगळी नव्हती. आपल्या अधिकारांची जाणीव त्यांना कधीच नव्हती. परकीय आक्रमणांमुळे समाजात वावरण्याचे त्यांचे स्वातंत्र्यही कमी होत गेलेले दिसते. सरदारांच्या तसेच उच्च कुलातील स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अधिक निर्बंध होते. त्यामुळे समाजाचा मुख्य प्रवाहापासून त्यांना नेहमीच अलिप्त ठेवले जात असे. तरीही मराठा सरदारांच्या घरातील काही स्त्रियांनी महत्वाच्या भूमिका पार पाडलेल्या दिसतात. जसे की, जिजाबाईंनी शिवाजीराजांच्या मनात राष्ट्राभिमान व धर्मरक्षणाचे बीज पेरले. पुढे येसुबाई व ताराबाई यांनीही कठीण प्रसंगातून मराठ्यांच्या राज्याचे रक्षण केले.

## २.५ आर्थिक परिस्थिती :

विजयनगर व बहामनी साम्राज्याच्या काळात दक्षिणेतील आर्थिक स्थिती समृद्ध होती. अनेक परकीय प्रवाशांच्या लेखनातून विजयनगर व बहामनी यांच्या दरबारातील संपन्नतेचे वर्णन आढळते. अब्दुल रजाक याने विजयनगरचे साम्राज्य प्रचंड मोठे आणि समृद्ध असल्याचे नोंदवले आहे. बारबोझा या पोर्तुगीज प्रवाश्याने बहामनी राज्यात गहु, तांदुळ, बाजरी यांचे उत्पादन मुबलक असल्याचे वर्णन करून चौल मार्गे, परदेशातही निर्यात केल्याची नोंद केली आहे. पण नंतर मात्र सुलतानशाह्यांच्या काळात महाराष्ट्रात आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याचे दिसते. महाराष्ट्राचा प्रदेश एकूणच नापीक व डोंगराळ असल्याने येथील शेतकऱ्यांना अपार कष्ट करून

जेमतेम कुटुंबाची गुजराण करण्याइतके धान्य प्राप्त होत होते. उदयोग धंद्याच्या संदर्भात शेतीला पूरक तेवढेच उद्योगधंदे वाढले. अशा परिस्थितीत आपली उपजिविका चालवण्यासाठी मुलुखगिरी शिवाय पर्याय नव्हता. महाराष्ट्रातील समाजात जमीनीच्या मालकीला विशेष महत्त्व दिले जात असे. प्रत्येक मराठा सरदाराला स्वतःची जहागीर देसाई/देशपांडे/पाटील असे पद मिळवण्याचा नेहमीच अभिमान असे. सुलतानांच्या लष्करात मोठ्या पदावर काम करणे सामाजिक प्रतिष्ठेच्या दृष्टीने मोठी गोष्ट असे, तर त्याहीपेक्षा वतन श्रेष्ठ मानले जाऊन आपल्या वतनासाठी कोणताही त्याग करण्यास मराठे तयार असत. यासंदर्भात जदुनाथ सरकार म्हणतात. ''शिवाजीच्या उदयापूर्वी महाराष्ट्रातील वतनदारांमध्ये संतत संघर्ष असून शेतकरी मात्र त्यांच्या पिळवणुकीला बळी पडले. नागरी व न्याय प्रशासन खालावले. पुणे जिल्ह्यातील या स्थितीप्रमाणे महाराष्ट्रातील अन्य ठिकाणीही अशीच परिस्थिती होती.''

१६व्या शतकातील महाराष्ट्रात रयतवारी पद्धती अस्तित्वात होती. अशा पद्धतीत जमिनीची मालकी लहान शेतकऱ्यांकडेच रहात असे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कष्टाळूपणा बरोबरच स्वातंत्र्याची भावना वाढीस लागली.

### २.५.१ दुष्काळ (१६३०-३२) :-

१७व्या शतकाच्या सुरूवातीला दक्षिण भारतातील आर्थिक जिवनावर नैसर्गिक आपत्तींचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. १६३० मध्ये महाराष्ट्र व गुजरात या प्रदेशात सतत २ वर्षे पावसाच्या अभावाने दुष्काळ पडला. अन्न धान्याच्या प्रचंड तुटवडा निर्माण झाला. त्यातच मोगली आक्रमणे सुरू राहिली. दक्षिणाचा सुभेदार म्हणून राजपुत्र औरंगजेब सुमारे ८ वर्षे दक्षिणेत राहिला. आपला महसुल अधिकारी मुर्शिद कुली खान याच्या मदतीने काही सुधारणा करण्याचा प्रयत्न औरंगजेबाने केला. लोकांना कर्जे देऊन शेतीसाठी प्रोत्साहन दिले होते. पण तरीही सर्व सामान्य शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय होती. संत रामदासांनाही त्या काळातील दुष्काळाचे वर्णन केलेले दिसते. एकूणच महाराष्ट्रातील शेती, उदयोगधंदे आणि व्यापार शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी अत्यंत खडतर प्रकारचेच होते.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : मराठ्यांच्या उदयापूर्वीची आर्थिक स्थिती स्पष्ट करा?

## २.६ धार्मिक स्थिती आणि सांस्कृतिक स्थिती

अल्लाउद्दीन खिलजीच्या कारकिर्दीपासून म्हणजे इ.स. १२९४ पासून दक्षिणेत मुसलमानांचा प्रवेश झाला. तोपर्यंत हिंदूच्या संस्कृतीला आणि हिंदूच्या आत्मसन्मानाला कोणताही धक्का लागला नव्हता. परंतु अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणापासून सर्व परिस्थिती बदलली. अल्लाउद्दीनचा प्रमुख सरदार मलिक कफूर याने ठिकठिकाणी मंदिरे पाडण्याला आणि हिंदूना

जबरदस्तीने धर्मांतर करण्यास प्रारंभ केला. दक्षिणेतील हिंदू राज्यांनी या मुसलमानी आक्रमणाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण या प्रयत्नात त्यांना यश लाभले नाही. विजयनगर सारखे महाबलाढ्य साम्राज्य सुद्धा या मुसलमानी आक्रमणा समोर टिकू शकले नाही. मुसलमानी आक्रमक धोरणांचा परिणाम म्हणून दक्षिणेतील भव्य मंदिरे, सुंदरनगरे आणि उत्कृष्ट कलाकृती याचा विध्वंस झाला. जशी दक्षिणेची तशीच महाराष्ट्राची सुद्धा अवस्था झाली. शिवाजी महाराजांचा उदय होण्यापूर्वी धार्मिक अत्याचारांनी परिसिमा गाठली होती. मुस्लिम अत्याचारांपासून या समाजाची सुटका व्हावी. याकरिता प्रयत्न करीत असलेल्या शिवाजी महाराजांनी या परिस्थितीचा पूर्ण अभ्यास केला, मगच त्यांनी आपले पुढील पाऊल उचलले.

### २.६.१ संतांची कामगिरी :-

मुसलमानी अत्याचारांनी पिडित झालेल्या समाजाला जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य महाराष्ट्रातील संतांनी केले. संतांची कामगिरी पाहत असताना आपल्याला ३ कालखंड दिसून येतात.

१. ज्ञानेश्वर आणि नामदेवाचा कालखंड (१३ ते १४ वे शतक)
२. एकनाथ आणि तुकाराम यांचा कालखंड (१६ ते १७ वे शतक)
३. रामदासांचा कालखंड (१६०८ ते १६८१)

या ३ कालखंडातील संत हे अंधश्रद्धे विरूद्ध लढणारे होते. या संतांनी भक्ती पंथाचा पुरस्कार केला. महाराष्ट्रात त्यांनी सांस्कृतिक जागृती घडवून आणली. १७व्या शतकातील राजकीय जागृती घडवून हिंदू धर्माच्या तत्वज्ञानाला पुनःरूज्जीवन देण्याचे कार्य या काळात निर्माण झालेल्या महानुभाव, वारकरी आणि नाथसंप्रदायाने केले. १५व्या शतकाच्या शेवटी बहामनी साम्राज्याची शकले झाली व ५ मुस्लीम सत्ता निर्माण झाल्या. या काळात महाराष्ट्रातील धर्म, भाषा, कला आणि साहित्य या सर्वत्र क्षेत्रात मुसलमानी विचारांचा प्रभाव निर्माण झाला. १६व्या शतकाच्या उत्तरार्धात या संबंधात लोक जागृती होऊ लागली आणि तत्कालीन संतांनी सामान्य लोकांना समजतील अशा शब्दांत हिंदू धर्मातील तत्वज्ञानाचा प्रसार सुरू केला. यातूनच भागवत धर्माचा उदय झाला. सामान्य माणसांमध्ये झालेल्या या सांस्कृतिक जागृरूकतेमुळे लोकांमध्ये स्वाभिमान निर्माण झाला. जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि वर्ण व्यवस्थेला दिल्या जाणाऱ्या अवाजवी महत्त्वाविरूद्ध वैचारिक जागृती घडवून ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, सावतामाळी, नरहरी सोनार अशा समाजाच्या विविध स्तरांमधून आलेल्या संतांनी वैचारिक व सांस्कृतिक जागरूकता निर्माण केली. भक्ती मार्ग हा सर्वश्रेष्ठ असल्याचे मत तुकाराम व रामदास अशा संतांनी व्यक्त करून समाजाला नवी दिशा दिली. संत रामदासांनी अध्यात्मापेक्षा सामाजिक आणि राजकीय अन्यायाकडे लक्ष पुरवून अशा अन्यायाविरूद्ध बहुसंख्य हिंदु समाजाने ठामपणे उभे राहिले पाहिजे अशी शिकवण दिली. शिवाजी महाराजांनी आपल्या कार्याची स्फूर्ती रामदासांपासूनच घेतली व स्वराज्यनिर्मितीचा आग्रह धरला.

१६व्या शतकातील संतांनी हे जे मोठे कार्य करून दाखवले त्यास अन्यनसाधारण महत्त्व आहे. अनेक विचारवंतांनी आणि इतिहासकारांनी या चळवळीचे मुल्यमापन करण्याचा प्रयत्न केलेला आपल्याला आढळून येतो. त्यात न्या. रानडे, आणि दांडेकर यांची मते आपल्याला महत्वाची वाटतात. न्यायमूर्ती रानड्यांनी या चळवळीची तुलना युरोपातील प्रोटेस्टंट धर्मसुधारणा चळवळींशी केलेली आपल्याला आढळते. त्यांच्यामते दक्षिण हिंदुस्थानात ही जी पुनरूज्जीवनाची चळवळ निर्माण झाली ती केवळ वरिष्ठ वर्गापुरतीच मर्यादित नव्हती. या चळवळीचे नेतृत्व संतांनी केले, आणि हे संत न्हावी, सुतार, महार यासारख्या तळाशी असलेल्या

जातीतून आणि व्यवसायातून आलेले होते ही विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. प्रा. दांडेकरांनी या संतांच्या कामगिरीची तुलना १७८९ मध्ये फ्रान्स मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. त्यावेळी रूसो, डिडरो यासारख्या विचारवंतांनी जी वैचारिक जागृती घडवून आणली त्यांच्याशी केलेली आढळते. फ्रेंच विचारवंतांनी क्रांतीकरिता जशी अनुकूल भूमिका तयार केली. तशीच अनुकूल भूमिका या महाराष्ट्रातील संतांनी केली. महाराष्ट्रात नवीन विचारांचे बीज त्यांनी पेरले आणि पलिकडे त्याला अमाप पीक आले. संतांनी ही जी अनुकूल भूमिका तयार केली. त्यामुळेच शिवजींना आपले स्वराज्य स्थापन करता आले एकूणच महाराष्ट्राच्या इतिहासात संतांची कामगिरी अजोड अशीच समजली पाहिजे.

## २.७ सारांश

महाराष्ट्रातील राजकीय आर्थिक, सामाजिक परिस्थिती गोंधळाची व अन्यायाची होती अशा पार्श्वभूमिवर समाजाची मानसिकता स्वातंत्र्याकडे वळविण्याची सुरुवात संत मंजळींनी केली व त्या बदलत्या मानसिकतेचा उपयोग स्वराज्य स्थापनेसाठी करण्याचा बाणेदार व यशस्वी प्रयोग शिवाजी महाराजांनी केला व महाराष्ट्रात स्वराज्य निर्मिती शक्य झाली.

## २.८ दिर्घोत्तरी प्रश्न

१. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातील दख्खनच्या राजकीय आणि सामाजिक जिवनाचे वर्णन करा.
२. मराठी राज्यनिर्मिती पूर्वीच्या महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक - सांस्कृतिक परिस्थितीचे वर्णन करा.
३. १७व्या शतकातील दख्खनच्या भौगोलिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घ्या.
४. सतराव्या शतकाच्या पूर्वार्धातील दख्खनच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीची चर्चा करा.
५. महाराष्ट्रात १७व्या शतकाच्या सुरूवातीस संतांची कामगिरी आणि राजकीय अव्यवस्था मराठ्यांच्या उदयास कशी कारणीभूत ठरली ते सांगा.

## २.९ संदर्भ

१. कुलकर्णी अ.रा., ग.ह.खरे (संपादक), 'मराठ्यांचा इतिहास', खंड१, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०.
२. कोलारकर, शं.गो., 'मराठ्यांचा इतिहास' (शिवकाळापासून मराठ्यांच्या पाडावापर्यंत) (इ.स. १६०० ते १८१८), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर १०.
३. देशपांडे, प्र. नं. 'मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष', स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे.

❖❖❖❖

# ३

# मराठा सत्तेचा उदय आणि विजापूर सत्तेशी संघर्ष

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ शिवाजी राजांचे पूर्वायुष्य
३.३ शिवाजी राजांच्या स्वराज्याला प्रारंभ
३.४ जावळीवर आक्रमण
३.५ कोकणवरील आक्रमण
३.६ अफजलखान प्रकरण
३.७ शिवाजी आणि सिद्दी जोहर
३.८ मराठे विजापूर संघर्ष - १६७२
३.९ सारांश
३.१० प्रश्न
३.११ संदर्भ

## ३.० उद्दिष्टे

या घटकात शिवाजी राजाच्या नेतृत्वाखाली मराठा सत्तेचा उदय कसा झाला या विषयी माहिती असून त्यांच्या विविध मोहिमा आणि संघर्ष या बद्दलची माहिती मिळते. विजापूरच्या आदिलशहाने अफझलखान, सिद्दि जोहर यासारख्या सरदारांना नव्याने निर्माण झालेल्या स्वराज्यावर पाठवून अवघड आक्रमणे घडवून आणली. या प्रकरणात शिवाजी महाराजांचा कोकणवर विजय, जावळी प्रांतावरील मोहीम, अफजलखानाचा वध, पन्हाळगडचा वेढा अशा विविध घटनांमधून स्वराज्य निर्मिती कशी झाली याचा आपण अभ्यास करणार आहोत.

## ३.१ प्रास्ताविक

शहाजी राजांची पहिली पत्नी जिजाबाई हिला संभाजी व शिवाजी अशी दोन अपत्ये झाली. संभाजीचा जन्म १६२३ मध्ये आणि शिवाजीचा जन्म १६३० मध्ये झाला. शिवजन्माच्या निश्चित तारखेबद्दल अजूनही मतभेद आहेत. इतिहासकारांनी अनेक साधनांचा अभ्यास करूनही निश्चित तारीख शोधून काढता आलेली नाही. ९१ कलमी बखर, चिटणीस बखर, शिवदिग्वजय, शिवप्रताप या समकालीन साधनांमध्ये १६२७ हे शिवजन्माचे वर्ष दिले आहे. तसेच इतिहासकार वि. का. राजवाडे, सरदेसाई, सर जदुनाथ सरकार १० एप्रिल १६२७ ही शिवजन्माची तारीख

मानतात. मात्र शेजवलकर, वा. सी. बेंद्रे, आपटे, महामहोपाध्याय पोतदार यांच्यामते मात्र १९ फेब्रुवारी १६३०, फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ मध्ये पुणे जिल्ह्यातील शिवनेरी येथे शिव जन्म झाल्याचे मानतात. त्यानंतर पुढे काहीकाळाने स्वराज्य निर्मितीचा विचार शिवाजी महाराजांनी केलेला दिसतो.

## ३.२ शिवाजी राजांचे पूर्वायुष्य

शिवाजीचे बालपण अतिशय अस्थिरतेत आणि धामधुमीत गेले. शिवाजीच्या जन्माच्यावेळी शहाजीच्या जीवनात मोठ्या राजकीय घडामोडी घडून येत होत्या. आदिलशाहीतील कारस्थानांना कंटाळून शहाजींनी निजामशाहीची नोकरी पुन्हा पत्करली होती. शिवाजींच्या जन्माच्यावेळी शहाजी निजामशहाच्या वतीने खानदेशात लढण्यात गुंतलेले होते. याचा फायदा घेऊन आदिलशाही फौजांनी पुण्याच्या जहांगिरीत मोठ्या प्रमाणात लुटालुट केली. त्यानंतर राजकीय स्थिती बदलली आणि त्यात शहाजीने मोगलांचा पक्ष उचलून धरला पण शहाजी मोगलांकडेही जास्त दिवस टिकले नाही. ज्यावेळी फतेखानाने निजामशाही मोगलांच्या घशात घातल्याचे कारस्थान हाणून पाडले आणि नवीन निजामशहास गादीवर बसवले. १६३६ मध्ये शहाजीने मोगल आणि आदिलशाही फौजांसमोर शरणागती स्विकारली. त्यावेळी जिजाबाई आणि शिवाजी यांचा मुक्काम माहुली किल्ल्यावर होता. पुढे शहाजीला आदिलशहाने भीमा आणि निरा या दोन नद्यांच्या दरम्यान जी जहांगिर दिली त्यात पुणे, सुपे, इंदापूर, चाकण असे चार परगणे मोडत होते. ज्यावेळी शहाजी कर्नाटकात गेले त्यावेळी शहाजीने जिजाबाई आणि शिवाजीला पुण्याच्या जहांगिरीत ठेवले. पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्याकरीता म्हणून दादोजी कोंडदेव, कुलकर्णी या चोख आणि दक्ष कारभाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या पालकत्वाखाली शिवाजींचे बालपण गेले.

### ३.२.१ जिजाबाईंचा प्रभाव

शिवाजी राजांचे चरित्र घडविण्यात त्यांची आई जिजाबाई आणि दादोजी कोंडदेव यांचा मोठा वाटा होता. जिजाबाई ही स्वाभिमानी आणि धार्मिक संस्काराने घडलेली स्त्री होती. तिच्या जाणत्या वयापासून तिने पाहिलेल्या सुलतानशाहीच्या विध्वंसक वृत्तीमुळे महाराष्ट्रातील लोकांना गुलामगिरी, अन्याय, अत्याचार स्वीकारावे लागले, असे जिजाबाईंचे मत होते. हिंदू धर्मीयांची अनेक तिर्थक्षेत्र शत्रूच्या हाती पडून नष्ट झाली व अनेक स्त्रियांचाही अपमान झाला. या स्थितीमुळे लहान वयापासूनच त्यांच्या मनात मुसलमानी सत्तांविषयी अढी निर्माण झाली. जिजाबाईंच्या वडीलांचा आदिलशाही दरबारात विश्वासघाताचे वध झाल्यानंतर तिच्या मनातील सुल्तानशाहीविरूद्धची चीड खूपच वाढली. तेव्हापासून मराठ्यांच्या प्रदेशाला स्वतंत्र करण्याची प्रेरणा तिच्यात निर्माण झाली. हिच प्रेरणा शिवाजीमध्ये निर्माण करून रामायण, महाभारतातील अनेक स्फुर्तीदायी घटना सांगत शिवाजींच्या मनात स्वातंत्र्य व न्यायप्रियता निर्माण केली. इतिहासकार रानडे यांच्या मते, जिजाबाईंचा प्रभाव शिवाजीराजांची कारकिर्द निर्माण करण्यासाठी कारणीभूत असणारी सर्वात मोठी घटना आहे.

## ३.३ शिवाजी राजांच्या स्वराज्याला प्रारंभ

शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यस्थापनेला प्रारंभ करताना आपल्या जहागीरीच्या आसपासच्या मावळ प्रदेश मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केला. मावळच्या प्रदेशावर आदिलशाही

सुल्तानाची नाममात्र सत्ता होती. मात्र खरी सत्ता तेथील देशमुखाची होती. अशा अनेक देशमुखांना आपल्या वर्चस्वाखाली आणून शिवाजी महाराजांनी मावळचा प्रदेश ताब्यात आणला. याच काळात येसाजी कंक, बाजी पासलकर, सुर्याजी काकडे, तानाजी मालुसरे असे अनुयायी शिवाजी महाराजांना मिळाले. १६४६ मध्ये तोरणा, १६४७ मध्ये राजगड आणि पुरंदर जिंकून शिवाजी महाराजांनी स्वराज्य कार्याचा प्रारंभ केला. सह्याद्रीच्या प्रदेशातील किल्ले जिंकणे स्वराज्यासाठी गरजेचे आहे, या विचाराने विजापुरच्या ताब्यात असलेल्या किल्ल्यांवर आक्रमणे करून त्यातूनच स्वतंत्र राज्य निर्माण करणे हा पर्याय त्यांनी स्वीकारला. तोरणा व राजगडाच्या मोहिमेनंतर कोंढाणा किल्ल्याकडे वळून शिवाजी राजांनी तोही किल्ला जिंकला. कोंढाण्यानंतर पुरंदर हा किल्ला जिंकण्याचे शिवाजी राजांनी ठरवले. तेथील किल्लेदार निळकंठ नाईक ह्यांच्या मृत्युनंतर त्यांची मुले पिलाजी व शंकराजी यात संघर्ष सुरू झाला. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन पुरंदरावर स्वारी करून शिवाजी राजांनी किल्ला ताब्यात घेतला यानंतर ग्रँड डफ च्या माहितीन्वये तिकोणा आणि राजमाची हे किल्लेही शिवाजीने जिंकले. या घटनानंतर आदिलशाही दरबारात शिवाजीच्या वतुर्णूकीमुळे अस्थिर वातावरण निर्माण झाले. शिवाजींच्या हालचालींना शहाजींचा गुप्त पाठिंबा असणार या विचाराने आदिलशहाने शहाजीला कैद करण्याचा हुकूम दिला.

२५ जुलै १६४८ रोजी शहाजी राजांना कैद झाल्यावर महाराष्ट्रातील परिस्थितीत बदल झाला. फत्तेखान या सरदाराला आदिलशहाने पुणे जहागीरीवर स्वारी करण्याचे आदेश दिले. शिरवळ या ठिकाणी फत्तेखानाचा पराभव करून मराठ्यांनी पहिला विजय संपादन केला. परंतु त्यानंतर मात्र शहाजी राजांच्या सुटकेसाठी शिवाजी राजांना स्वतंत्र प्रयत्न करावे लागले. शहाजींच्या सुटकेसाठी आदिलशहाने कोंढाणा व कर्नाटकातील बंगलोर हे प्रदेश मागितले. हे आदिलशास देऊन शहाजी राजांची सुटका करून घेण्यात आली. त्यानंतर मात्र १६५२ पर्यंत शिवाजी महाराजांनी पुणे, सुपे, चाकण, इंदापूर या जहागीरी सह नव्याने मिळवलेल्या प्रदेश स्थिर प्रशासनाखाली आणला. १६५५ नंतर पुन्हा एकदा स्वराज्य निर्मितीचा प्रयत्न सुरू झाला.

## ३.४ जावळीवर आक्रमण

शहाजी राजांच्या सुटकेनंतर सातारा जिल्ह्यातील जावळी या प्रदेशाकडे शिवाजी राजांनी लक्ष दिले. मोरे घराण्यातील दौलतराव मोरे यांचा तेथे अंमल होता. मोरे घराण्यातील कर्त्या पुरूषांना 'चंद्रराव' हा किताब दिला होता. त्यामुळे त्यांना चंद्रराव मोरे याच नावाने ओळखले जात असे. शिवाजीच्या स्वराज्य कार्याच्या सुरूवातीस दौलतराव मोऱ्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीने यशवंतराव या नातलगास दत्तक घेऊन जहागीरीचा ताबा दिला. या प्रकरणात शिवाजीने यशवंतरावास पाठिंबा दिला होता. पण याचा विसर पडून यशवंतराव पुढे शिवाजीच्या मार्गात अडचणी आणू लागला. त्याला धडा शिकवणे आवश्यक होते. या व्यतिरिक्त जावळी मार्गे कोकण व देश या दोन्ही भागात जाण्याची संधी होती. त्यामुळे जावळी ताब्यात आल्यास स्वराज्यात मोठी भर पडणार होती.

जावळीवर आक्रमणाची योजना आखून शिवाजी राजांनी जेधे, बांदल, सिलीमकर अशा देशमुखांना आपल्या हाताशी धरले आणि जावळीच्या प्रदेशावर हल्ला केला. १५ जानेवारी १६५६ रोजी झालेल्या हल्ल्यात ६ तासांच्या घनघोर युद्धानंतर तो प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आला. परंतु यशवंतराव मोरे जवळच असलेल्या रायरी किल्ल्यावर पळून गेला. त्यामुळे रायरीला

वेढा देऊन सुमारे ३ महिने हा वेढा चालवला. मे १६५६ मध्ये चंद्रराव शरण आला व त्याने शिवाजीचे वर्चस्व स्वीकारल्याचे नाटक केले. पण दरम्यानच्या काळात घोरपड्यांशी शिवाजी विरूद्ध संधान बांधण्याने आता चंद्ररावास क्षमा करणे घातक ठरेल या विचाराने २७ ऑगस्ट १६५६ रोजी चंद्ररावाला ठार करण्यात आले. आणि लवकरच रायरीचा किल्ला व संपूर्ण जावळी खोरे शिवाजीच्या ताब्यात आले.

**मोऱ्यांचा पाडाव आणि जावळीचे परिणाम**

स्वराज्य प्राप्तीचे ध्येय आपल्या डोळ्यांसमोर शिवाजी राजांनी ठेवले होते. त्यादृष्टीने जावळी विजय अतिशय महत्त्वाचा ठरला. चंद्रराव मोरे सारख्या प्रतिष्ठित व पराक्रमी सरदाराचा पाडाव केल्यामुळे शिवजींच्या प्रतिष्ठेत भर पडून आजूबाजूच्या परिसरावर त्यांचा वचक निर्माण झाला. आदिलशाही दरबारातही शिवाजीच्या या पराक्रमाचे पडसाद उमटले. आणि पुढे महमद आदिलशाहाच्या मृत्युनंतर अफजलखानासारख्या सरदाराला शिवाजीचे पारिपत्य करण्यासाठी पाठवण्याची आदिलशाही पुढे गरज निर्माण झाली.

जावळीचा मुलुख ताब्यात आल्याने घाटमाथ्याप्रमाणेच कोकणपट्टीचा काही भाग स्वराज्यात सामाविष्ट झाला. पश्चिम किनाऱ्यांवर जंजिऱ्याचे सिद्दी व गोव्याचे पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. शिवाजीचा राज्यविस्तार समुद्रापर्यंत झाल्याने व परकीय व्यापाऱ्यांशी त्यांचा पहिल्यांदाच संपर्क आला. रायरी, चंद्रगड, सोनगड यासारखे किल्ले स्वराज्यात सामिल झाले. मोऱ्यांच्या पराभवानंतर त्यांचा खजिन्यातील संपत्ती शिवाजीच्या ताब्यात आली. याच संपत्तीच्या सहाय्याने प्रतापगड नावाचा भक्कम किल्ला त्यांनी बांधला.

जावळी विजय हा शिवाजीचा पहिला मोठा लष्करी विजय होता. या विजयामुळे त्यांच्या जहागीरला एका राज्याचे स्वरूप आले. शिवाजीला आव्हान देणे ही फार सोपी गोष्ट नाही याची जाणीव त्या प्रदेशातील इतर देशमुख व वतनदारांना झाली. जावळी विजयानंतर शिवाजी राजांनी १६५७-५९ या काळात कर्नाटकावर स्वाऱ्या केल्या. दरम्यानच्या काळात रोहिडा किल्ला जिंकून आपल्या जहांगीरीतील बंडखोरासाठी बंदोबस्त केला.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : जावळीवरील आक्रमणाचे परिणाम सांगा ?

## ३.५ कोकणवरील आक्रमण

४ नोव्हेंबर १६५६ रोजी महंमद आदिलशहाचा मृत्यु झाला. याच काळात दिल्लीचा बादशहा शहाजहान आजारी झाल्यामुळे त्याचा मुलगा दक्षिणचा सुभेदार औरंगजेब उत्तरेकडे निघून गेला. यामुळे मधल्या काळात कोकण प्रदेश जिंकून घेण्याची संधी शिवाजी महाराजांना

मिळाली. जुलै १६५७ मध्ये शिवाजीने रघुनाथपंत या सरदारास कल्याण, भिवंडी व आसपासचा प्रदेश जिंकण्यासाठी पाठविले. १६५८ च्या सुमारास माहुलीचा किल्ला जिंकून एकूण जिंकलेल्या प्रदेशावर आबाजी सोनदेव या कार्यक्षम अधिकाऱ्याची सुभेदार म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानंतर सुरगड, घोसाळगड यासारखे किल्ले ही शिवाजी राजांनी जिंकले. यामुळे लवकरच कोकण किनारपट्टीपर्यंत पोहचून आरपार बांधण्याचा विचार शिवाजी राजांनी सुरू केला. स्वराज्याची अशी सुरूवात निश्चितपणे यशस्वी स्वरूपाची होती असे म्हणता येते.

**मराठे विजापूर संघर्ष**

१६५५-५९ या काळातील घटनांवरून शिवाजी महाराजांचा स्वराज्य निर्माण करण्याचा ध्यास आणि नियोजन किती निश्चित स्वरूपाचे होते ते लक्षात येते. परंतु त्याच्या यशामुळे आदिलशाही दरबारात अस्वस्थता निर्माण झाली. आदिलशाहीचा कारभार बडी बेगम साहिबा हिच्या हातात आला. अली आदिलशहा या आपल्या अल्पवयीन मुलाच्या नावाने ती राज्य चालवू लागली. तिने शहाजीस सूचना देऊन शिवाजी महाराजांच्या कारवायांवर नियंत्रण घालण्याचे सुचविले. परंतु शिवाजी महाराजांवर माझे नियंत्रण नसून आदिलशाही दरबाराने त्याच्या विरूद्ध कोणती कारवाई करावयाची याचा निर्णय स्वतंत्रपणे घ्यावा असे मत त्यांनी व्यक्त केले. परिणामी आदिलशाही दरबाराने पूर्वीच्या काळातील वाईचा सुभेदार अफझलखान याची नियुक्ती करून शिवाजी महाराजां विरूद्ध मोठी मोहिम उघडली.

## ३.६ अफजलखान प्रकरण

शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचारीवर प्रतिबंध करण्यासाठी विजापूर दरबाराने बलाढ्य सरदार अफझलखान यास पाठविण्याचे ठरविले. विजापूर दरबाराने अफझलखानाची शिवाजी महाराजांवर हेतू पुर्वक नेमणूक केली. त्या काळात आदिलशाहीत नाव घेण्यासारखे जे चार-दोन पराक्रमी सरदार उरले होते. त्यामध्ये अफझलखानाचा क्रमांक वरचा होता. शिवाय खान शिवाजी महाराजांचा पूर्वीपासून मत्सर करीत होता. चंद्रराव मोरे प्रकरणात शिवाजींने जावळीमध्ये जे वर्चस्व निर्माण केले होते, ते खानाच्या मनात सलत होते. संपूर्ण भोसले घराणेच वैरी आहे, अशी खानाची धारणा होती. म्हणूनच शहाजीला कर्नाटकातून पायात बेड्या घातलेल्या अवस्थेत विजापूरला आणण्यामध्ये खानाने पुढाकार घेतला होता. कनकगिरीच्या लढाईत शिवाजींचा भाऊ संभाजी मारला गेला. या दुर्घटनेला खानाची कारवाई कारणीभूत होती. शिवाजीने कर्नाटकात तेरदळ पर्यंत स्वारी केली. हा तेरदळ प्रदेश खानाच्या अंमलाखाली होता. शिवाजींच्या हालचाली शेवटी महागात पडतील याची खानाला खात्री पटली होती. म्हणूनच शिवाजीला पकडून आणण्याचा विडा त्याने उचलला.

आदिलशहाने कान्होजी जेधे यांना लिहिलेले फर्मान तसेच तारीख-ए-अली या ग्रंथातील वर्णन, डच पत्रव्यवहार अशा समकालीन साधनांच्या आधारे विजापूर दरबार व अफझलखानाचा अंतस्थ हेतू शिवाजी राजांना कायमस्वरूपी नष्ट करणे हाच होता हे स्पष्ट होते. शिवाजींचे पारिपत्य करण्यासाठी विजापूरहून निघालेला अफझलखान तुळजापूर व पंढरपूर मार्गे वाईकडे आला व धर्म क्षेत्रांना उपद्रव दिला, असा उल्लेख आहे. परंतु सेतू माधवराव पगडी यांच्यामते तुळजापूर हे मार्गात नसल्यामुळे या मोहिमेच्या पूर्वीच खानाने त्यावर हल्ला केला असावा असे मत व्यक्त केले आहे. शिवाजी महाराजांच्या राज्यात दहशत निर्माण करणे याच उद्देशाने खानाने तिर्थक्षेत्रावर हल्ले केले असावे, असे म्हटले जाते. वाईकडे जात असताना

फलटण जवळ बजाजी निंबाळकर यास पकडून खानाने मोठी खंडणी वसुल केली अशा परिस्थितीत मावळ प्रांतातील आपल्या किल्ल्यांची व्यवस्था लावून शिवाजी महारजांनी जावळी खोऱ्यात आपला मुक्काम हलवला. जावळीचा प्रदेश हा जंगलमय असून लष्करी हालचालीच्या दृष्टीने वैशिष्ट पूर्ण होता. प्रतापगडावर येऊन शिवाजी महाराजांनी या भौगोलिक स्थितीचा फायदा करून घेण्याचे ठरविले. त्यावेळेस शिवाजी महाराजांजवळ १० हजार पायदळ असावे व १० हजार घोडदळ असावे असा उल्लेख सभासद बखरीत आहे. खानाजवळ १२ हजार स्वार व १० हजार पायदळ असावे. याशिवाय मोठ्या व लहान पहाडी तोफाही असाव्यात असा अंदाज आहे. जावळीचा प्रदेश किती कठीण आहे याची जाणीव खानालाही होती. म्हणूनच कृष्णाजी भास्कर कुलकर्णी या आपल्या वकिलाला शिवाजी कडे पाठवून त्यास वाईला भेटीस बोलवावे, असे खानाने ठरविले. तसा निरोप घेऊन आपला वकिल त्याने शिवाजी महाराजांकडे पाठविला. खानाच्या विनंतीस मान्यता देऊन पंतोजी गोपीनाथ बोकील या आपल्या वकिलाला शिवाजी महाराजांने निरोप घेऊन खानाकडे पाठविले शिवाजीला अफझलखानाची भेट घेण्याची भिती वाटत आहे अशी माहिती मराठ्यांच्या वकिलाने खानाला दिली. वाईस येण्याऐवजी आपणच जावळीस येऊन भेटल्यास तर बरे होईल, असा प्रस्ताव खानासमोर ठेवण्यात आला. तो स्विकारून खानाने गुरूवार १० नोव्हेंबर यादिवशी प्रतापगडाच्या माचीवर शिवाजीची भेट घेण्याचे निश्चित केले.

## अ- भेटीची पूर्वतयारी आणि ऐतिहासिक भेट

अफझलखानाने प्रस्ताव ठरवल्यावर भेटीचा दिवस आणि अटी ठरवण्यात आल्या १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या माचीवर मध्यान्ह वेळी भेटीसाठी ठरवलेल्या मंडपात दोघांनीही भेटावे. दोनपेक्षा अधिक अंगरक्षक बरोबर आणू नयेत दोघांचे प्रत्येकी दहा अंगरक्षक बाणाच्या टप्प्यात उभे राहतील असे ठरविले. दोन्ही नेत्यांना सशस्त्र येण्याची परवानगी दिली. प्रतापगडाच्या माचीवर अलीशान मंडप घालण्यात आला तो उत्तमरित्या सुशोभित करून आतमध्ये गालीचा टाकून बैठक व्यवस्था करण्यात आली. वाईपासून प्रतापगड पर्यतच्या रस्त्यावर दोन्ही बाजूला असलेल्या घनदाट जंगलात शिवाजीने नियोजितपणे सैन्य लपवून ठेवले. तोफांच्या आवाजाची निशाणी ठरविण्यात आली. खान दगा करणार याची कल्पना असल्यामुळे शिवाजीने स्वरक्षणासाठी चिलखत आणि शिरस्त्राण घातले. हातात पट्टा आणि दुसऱ्या हातात कृपाण म्हणजे लहान तलवार शिवाजी महाराजांनी घेतली. सभासद म्हणतो, हातात एक बिचवा आणि वाघनखे चढविले. जिवा महाला आणि संभाजी कावजी हे दोन हुद्देकरी बरोबर घेतले खानाच्या बरोबर ही हुद्देकरी कृष्णाजी भास्कर आणि सय्यद बंडा हा धारकरी होता. शिवाजीने हरकत घेतल्यानंतर सय्यद बंडाला सदरेबाहेर पाठविण्यात आले.

शिवाजी महाराज सदरेत प्रवेशताच खानाने आलिंगन देण्यासाठी हात पसरले. संकट पुढे उभे राहिल्याची खात्री शिवाजींना पटली. ग. ह. खरे म्हणतात त्याप्रमाणे या भेटीत दोघांपैकी कुणाचातरी निकाल लागणार हे ठरलेलेच होते. शिवाजीला बाहुपाशात घेऊन त्याचे मस्तक खानाने दाबून धरले. त्यानंतर खानाने शिवाजीच्या डाव्या कुशीत खंजीर खुपसले यावेळी सावध चित्त असलेल्या शिवाजीने मोठ्या चपळाईने आपली मान सोडवून घेतली. अंगात चिलखत असल्यामुळे खानाने केलेला वार निष्फळ ठरला. शिवाजीने आपल्या हातातील तिक्ष्ण तलवार खानाच्या पोटात खुपसून त्याची आतडी बाहेर काढली. 'मारिले! मारिले! दगा दिधला बेगी धावा' असा खानाने आक्रोश केला. खानाचा सेवक कृष्णाजी भास्कर याने शिवाजीवर वार करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो चुकवून शिवाजी महाराजाने त्या सेवकाला ठार केले. खान पडल्याचे

लक्षात येताच अंगरक्षक धावून आले. सय्यद बंडा शिवाजींवर चवताळून धावून गेला. परंतु जिवामहालाने बंडाला ठार मारले.

प्रतापगडावर गेल्यानंतर शिवाजीने इशारकीचा आवाज करविला. वेगवेगळ्या टापूत मराठ्यांची सेना पूर्व नियोजित संकेतानुसार विखुरलेले होती. इशारकीचा आवाज येताच मराठी सेना सैन्यावर तुटून पडली. कान्होजी जेधे, बाजी सर्जेराव, सिलिंमकर सरदेशमुख, कमळोजी साळूंखे, रामजी पांगेरा यांनी अतुल्य पराक्रम गाजविला. विजापूरी फौज सैरावैरा धावत सुटली. खानाचा मुलगा फाजलखान व मुसेखान प्रतापराव मोऱ्यांच्या साहाय्याने जावळीतून कसेबसे बाहेर पडले.

**ब- अफझलखान प्रसंगाचे महत्त्व**

मराठ्यांच्या इतिहासात अफझल प्रसंगाला अनन्य साधारण महत्व आहे. पगडी म्हणतात 'महाराष्ट्राचे राज्य १० नोव्हेंबर १६५९ रोजी खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले'. खानाच्या वधानंतर युद्धात शिवाजी महाराजांच्या बाजूने पराक्रम गाजविणाऱ्या देशमुखांचा बक्षिसी देऊन गौरव करण्यात आला. त्यांची इनामे त्यांच्याकडेच राहतील असा दिलासा देण्यात आला. खंडोजी खोपड्यांसारख्या विश्वास घातक्यास शासन करून मावळ भागात शिवाजी महाराजाने जरब निर्माण केली. सारा मावळ प्रांत शिवाजीकडे आदराने पाहू लागला. खानासारख्या बलाढ्य सरदार बळी पडल्याचे वृत्त ऐकून विजापूर दरबाराची झोप उडाली. मोगलांनाही शिवाजीच्या सामर्थ्याची कल्पना आली. मराठ्यांमध्ये तर इतका आत्मविश्वास निर्माण झाला की खानाचा वध करून १८ दिवस लोटतात न तोच त्यांनी पन्हाळ्यासारखा दुर्गम दुर्ग २८ नोव्हेंबर १६५९ रोजी जिंकून घेतला. त्यानंतर विजापूरकरां तर्फे रुस्तुमजमा, फाजलखान आणि अन्य काही सरदार मराठ्यांवर चालुन आले. पण डिसेंबर १६५९ मध्ये त्यांचाही पराभव करण्यात आला.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : अफझलखान प्रसंगावर टिप लिहा.

---

---

---

---

---

## ३.७ शिवाजी महाराज आणि सिद्दी जौहर

सिद्दी जोहर या आदिलशाही सरदाराने २ मार्च १६६० रोजी पन्हाळ्याला वेढा दिला. त्याच्याबरोबर फाजलखान, बाजी घोरपडे, भाईखान, सिद्दी मसऊद इत्यादी सेनानी होते. सिद्दी जौहर बरोबर १५००० सैन्य असल्याचा उल्लेख इंग्रजी पत्रांतून सापडतो. राजापूरच्या इंग्रज वखारवाल्यांनी जौहरच्या मदतीस हेन्री रेव्हिंग्टन यास १ तोफ व दारूगोळा बरोबर देऊन पाठविले होते. सिद्दीचा वेढा पावसाळ्यात ढिला होईल व आपणास त्याच्याशी सलोखा करता येईल हा महाराजांचा अंदाज असावा, पण तो खरा ठरला नाही. याच काळात मुघल सरदार

शायिस्तेखान प्रचंड फौज घेऊन मे १६६० मध्ये पुण्यात येऊन दाखल झाला. या घटनेमुळे चिंताग्रस्त झालेल्या शिवाजी महाराजांनी वेढ्यातून निसटण्याचा विचार सुरू केला. जिजाबाईच्या आदेशानुसार नेताजी पालकर व सिद्दी हिलाल यांनी बाहेरून वेढा मोडून काढण्याची शिकस्त केली. परंतु त्यात त्यांना यश आले नाही, असा उल्लेख शिवभारतात सापडतो. अखेरीस जून १६६० मध्ये शिवाजीराजांनी जौहरशी तहाचे बोलणे सुरू केले. त्यामुळे वेढ्याला शिथिलता प्राप्त झाली. मुसळधार पावसाच्या जुलै महिन्यात गुरूवार दि. १२ जुलै १६६० च्या रात्री शिवाजी निवडक लोकांसह पन्हाळ्यातून बाहेर पडले.

वादळी हवा, मुसळधार पाऊस अशा परिस्थित शिवाजी राजांना ४० मैल अंतर कापून विशाळगडाकडे जायचे होते. राजांनी गड सोडल्यावर काही वेळातच सिद्दी च्या लक्षात आले व त्यांनी पाठलाग सुरू केला. गजापूरच्या खिंडीपर्यंत शिवाजी महाराज पोचले. परंतु ५,६ मैलांचे अंतर तोडावयाचे होते. त्यातही आणखी एका संकटाची चाहूल त्यांना लागली. विजापूर दरबारने जसवंतराव दळवी व सूर्यराव  सूर्वे या मराठे सरदारांना अधिच विशाळगडाला वेढा घालण्याचा हुकूम केला होता. हा वेढा मोडून गडावर प्रवेश करावा लागणार होता. सिद्दी मसुउदची फौज चपळाईने मागावर होती. अखेरी बाजीप्रभू देशपांडे यांनी गजापूरच्या खिंडीत मसउद ची फैाज रोखून धरण्याचा निर्धार केला त्यानुसार सैन्यास अडविण्यात आले. बाजी प्रभुने पराक्रमाची शिकस्त केली. सुमारे ‘प्रहर दीड प्रहर पावेतो फौज खिंड चढो दिली नाही’ (९१ कलमी बखर) विशाल गडाचा वेढा फोडून शिवाजी महाराज गडावर पोहचले व इशाऱ्याच्या तोफा वाजवल्या, या आवाजाबरोबरच बाजीप्रभुने प्राण सोडले.

सिद्दी मसऊद ने नंतर विशाळगडासही वेढा दिला. परंतु मराठ्यांनी किल्ला लढवल्यामुळे तो परत फिरला. पुढे २२ सप्टेंबर १६६० रोजी सिद्दी जौहरशी तह करून पन्हाळगड विजापूरच्या स्वाधीन केला. अफझलखान व पाठोपाठ सिद्दी जौहर या दोन बलाढ्य विजापूरी सरदारांना धडाडीने लढा देऊन शिवाजींनी राजापूरच्या इंग्रजांनाही धडा शिकवला. शिवाजी राजांचे हे अभूतपूर्व यश पाहून विजापूर दरबारने मे १६६१ मध्ये मराठ्यांशी तह करून तात्पुरत्या काळासाठी मराठ्यांशी संघर्ष थांबविला.

## ३.८ मराठे विजापूर संघर्ष १६७२ व नंतर

शायिस्तेखानाच्या आगमनापासून मराठ्यांचा मुघल सत्तेशी संघर्ष सुरू झाला. तो सातत्याने पुढील दहा वर्ष सुरू राहिला या संघर्षातील सरशीमुळे मराठ्यांमधील आत्मविश्वास वाढून त्याने आदीलशाही परिसरात पुन्हा हल्ले करण्याचे सत्र सुरू केले. इ.स. १६७२ मध्ये अली आदीलशहाचा मृत्यू आणि रूस्तुम झमनचे बंड यामुळे विजापूर दरबारात अस्थिरता निर्माण झाली अशाच परिस्थितीत पन्हाळा पुन्हा मिळवावा म्हणून १६७३ मध्ये मराठ्यांनी पन्हाळ्यावर हल्ला करून तो जिंकला व पुढील काही महिन्यात परळी, सातारा, हुबळी बालघाट अश्या सर्व प्रदेशांवर आपला वचक बसविला.

विजापूर दरबारचा पठाण बहलोलखान याने दरबारावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले व मराठ्यांना लढा देण्यास सुरूवात केली. यातूनच प्रतापराव गुजर आणी बहलोल खान यांच्यात १६७३ मध्ये विजापूर पासून  ३६ मैलांवर असलेल्या उमराणी या ठिकाणी युद्ध झाले. या युद्धात बहलोलच्या माघरीनंतर प्रतापरावांनी तह करून त्याची सुटका केली. या घटनेमुळे शिवाजी

राजांनी प्रतापरावांच्या चुकीच्या निर्णयावर त्यांची निर्भत्सना केली. अपमान व दु:ख या संमिश्र भावनांमधून प्रतापरावांनी २४ फेब्रु. १६७४ रोजी केवळ सहा सहकार्यांना बरोबर घेऊन कोल्हापूर जवळील नेसरी येथे बहलोल च्या छावणीवर हल्ला केला. या हल्ल्यात ते धारातीर्थी पडले. या घटनेने मराठा सत्तेची मोठी हानी झाली व शिवाजी महाराजांनाही दु:ख झाले. हंबीरराव मोहीते यांस सेनापती पद देऊन त्यांनी विजापूर विरूद्धचा लढा सुरू ठेवला. पुढे मुघल व विजापूर यांच्यात संघर्ष सुरू झाल्यामुळे मराठे व विजापूर संघर्ष संपुष्टात आला.

## ३.९ सारांश

मराठ्यांच्या राज्यनिर्मितीच्या कार्याची सुरुवात आदिलशाही प्रदेशांतून झाल्यामुळे पहिला संघर्षही आदिलशाही विरुध्द झाला. या संघर्षात तुटपुंज्या सामुग्री व सैन्यासह अत्यंत नियोजन पूर्वक धाडसी पध्दतीने आदिलशाही विरुध्द मराठ्यांनी विजय मिळवला. मराठेशाहीचा उदय होण्यास या धाडसी विजयांचा मोठा परिणाम झालेला दिसतो. आदिलशाहीच्या आक्रमतेला शिवाजी महाराजांनी धाडसाने तोंड देऊन मराठेशाहीचे अस्तित्व टिकवले.

## ३.१० प्रश्न

१) शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील जावळी प्रकरणाचे महत्त्व सांगा.

२) जावळी प्रकरणाच्या विशेष संदर्भात मराठे - विजापूर संबंधाचे परिक्षण करा.

३) अफझलखान प्रसंगाच्या विशेष संदर्भासह मराठे व विजापूर यांच्यातील संघर्षाची माहिती द्या.

४) इ.स.१६४८-१६६० या कालखंडातील मराठे व विजापूर यांच्या संबंधांचा आढावा घ्या.

## ३.११ संदर्भ

१. डॉ. देशपांडे प्र. न. 'मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष' स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००१.

२. डॉ. देव प्रभाकर, 'मराठ्यांचा इतिहास' विद्याप्रकाशन

३. डॉ. पवार जयसिंगराव, 'मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

४. डॉ. कोलारकर शं. गो. 'मराठ्यांचा इतिहास'

❖❖❖❖

# ४

# मराठेशाहीचा उदय - मुघल मराठे संघर्ष

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये -

४.१ प्रास्ताविक

४.२ मुघल मराठे संबंध १६६०

४.३ शिवाजी महाराज व शायिस्तेखान

४.४ सुरतेची लुट - १६६४

४.५ मिर्झा राजे जयसिंग व शिवाजी महाराज

४.६ आग्रा भेट व सुटका - १६६६

४.७ मुघल मराठा संघर्ष - १६६७-७०

४.८ मुघल मराठा संघर्ष - १६७१-७४

४.९ शिवाजी महाराज : एक अलौकिक व्यक्तीमत्व

४.१० सारांश

४.११ प्रश्न

४.१२ संदर्भ


## ४.० उद्दिष्टे

मराठेशाहीचे स्थानिक तसेच दिल्लीच्या मुघल सत्तेशी अनेक संघर्ष झाले. या संघर्षातून मराठ्यांचे स्वराज्य निर्माण झाले. सुरूवातीपासून विजापूरच्या आदिलशाहाशी संघर्ष करून मराठ्यांनी जहांगिरी व्यतिरिक्त काही प्रदेश मिळवला होता. परंतु तो वाढवणे गरजेचे असल्याने दक्षिणेत उतरलेल्या मोगल सत्तेशीही संघर्ष करणे अटळ होते. या संघर्षाचा आढावा घेऊन त्यातून स्वराज्यनिर्मिती छ. शिवाजींनी कशी केली हे समजून घेणे गरजेचे आहे. जावळीवरील आक्रमण व अफजलखान प्रकरणानंतर शिवाजी स्वराज्य निर्मिती करून शकेल, असा विश्वास सगळ्यांच्यात निर्माण झाला. इ.स. १६४९ पासून शिवाजी राजांच्या कारकिर्दीच्या अखेरीपर्यंत मुघल व मराठे यांच्यातील संबंध तणावाचे राहिले. या संबंधीचे परिक्षण आपण या पाठात करणार आहोत.

## ४.१ प्रास्ताविक

दक्षिणेत सुभेदार म्हणून आल्यावर औरंगजेबाने आदिलशाही मुलुखावर हल्ले करण्याचे धोरण स्वीकारले. त्याच्या सुभेदारीच्या पहिल्या काही वर्षात मुघलांना दुखवायचे नाही हे धोरण शिवाजी महाराजांनी स्वीकारले. त्यामुळे १६५७ मध्ये मुघल सैन्य औरंगजेबाच्या नेतृत्वाखाली बिदर, कल्याण व कोकणातील निजामशाही किल्ले घेण्यासाठी आले होते, त्यावेळेस शिवाजी राजांनी आपला प्रदेश सुरक्षित कसा राहिल, यावर अधिक लक्ष दिले. याच वर्षी मोगल बादशाह शहाजहान आजारी पडल्याचे वृत्त समजल्यामुळे औरंगजेब हाती घेतलेली मोहिम लवकर उरकून उत्तरेकडे निघून गेला. याच दरम्यान मुघल व मराठे यांचा पहिला संघर्ष ३० एप्रिल १६५७ या दिवशी झाला. जुन्नरच्या मुगल ठाण्यावर हल्ला करून शिवाजीने येथील छावणीची लूट केली. तर जून मध्ये अहमदनगरच्या किल्ल्यावर हल्ला करून औरंगजेबाला आश्चर्यकारक धक्का दिला. पुढे ५ जून १६५९ रोजी औरंगजेबाने स्वतःस 'बादशहा' म्हणून जाहीर करून घेतले. या काळात औरंगजेबाचे अभिनंदन करण्यासाठी शिवाजी राजांनी आपला वकील सोपानजीपंत यास दिल्लीकडे पाठवले. बादशहानेही शिवाजीसाठी मानाची वस्त्रे पाठवून सख्य जोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीही शिवाजी महाराजांनी उत्तर कोकणची स्वारी केल्यामुळे हा सलोखा बादशहा औरंगजेबाबरोबर फार काळ टिकला नाही.

## ४.२ मुघल - मराठे संबंध १६६०-६६

१६५९ मध्ये शायिस्तेखान यांस दक्षिणेची सुभेदारी देण्यात आली. मुघल दरबारात बादशहाचा मामा म्हणून त्यांस विशेष प्रतिष्ठा होती. बादशहा म्हणून सत्तेवर आल्यावर औरंगजेबाने शायिस्तेखानची दक्षिणेकडे नेमणूक करण्याची काही विशिष्ट कारणे होती. अफजलखानासारख्या बलाढ्य सरदाराविरूद्ध प्रचंड विजय मिळवल्याने शिवाजीचे नेतृत्व सामर्थ्यशाली बनत जाईल व काही काळाने तो मुघल साम्राज्यालाही जड होईल, अशी भिती औरंगजेबाला वाटत होती. तेव्हा त्याचा बंदोबस्त करण्यासाठी मातब्बर सरदाराची नेमणूक करणे गरजेचे होते. दिल्लीची सत्ता मिळवण्याआधी शिवाजीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य औरंगजेबाने आदिलशहाकडे सोपवले होते, परंतु त्यास ते जमले नाही. दक्षिणेतील ही नाजूक परिस्थिती हाताळण्यासाठी अनुभवी सरदाराची गरज आहे, हे जाणवल्याने औरंगजेबाकडून शायिस्तेखानची नियुक्ती करण्यात आली. पूर्वी शायिस्तेखानाने औरंगजेबास गोवळकोंड्याच्या स्वारीत सहाय्य केले होते. त्यामुळे शायिस्तेखानास दक्षिणेकडील राजकारणाचाही अनुभव होता. शायिस्तेखान हा शूर सेनापती, अनुभवी शासक आणि मोठा मुत्सद्दी होता. म्हणूनच त्याची नेमणूक शिवाजी राजांच्या विरुद्ध करण्यात आली.

## ४.३ शिवाजी महाराज व शायिस्तेखान :-

२८ जानेवारी १६६० रोजी शायिस्तेखान मोठ्या सैन्यासह अहमदनगरकडे निघाला. सुमारे १४ दिवसानंतर तो अहमदनगर येथे पोहचला. या वेळेला शिवाजी राजे मिरज येथे होते. सूपे, बारामती या प्रदेशांमार्गे खानाचे सैन्य शिरवळ पर्यंत येवून पोहचले. आपल्या सैन्याचे दळणवळण तुटु नये म्हणून सैन्याच्या तुकड्या ठिकठिकाणावर ठेवण्याची खबरदारी खानाने घेतली होती. शिरवळहून सासवड मार्गे मे १६६० मध्ये शायिस्तेखान पुण्यात आला. परंतु

पुण्याच्या भोवतालचा प्रदेश ओसाड झाल्यामुळे मुघली सैनिकांना व जनावरांना आवश्यक असणाऱ्या साहित्याचा तुटवडा निर्माण होऊ लागला. परिणामी शायिस्तेखानाने जून महिन्यात पुण्यातील तळ हलवून जवळच असणाऱ्या चाकण येथे मुख्य तळ प्रस्थापित केला.

२१ जून १६६० ला शायिस्तेखानाने चाकणच्या किल्यास वेढा दिला. हा किल्ला लहान गढी प्रमाणे असून त्याचा आकार चौकोनी होता. चार टोकांवर चार आणि मध्ये १ असे भक्कम बुरूज होते. किल्याभोवती सुमारे ३० फुट खोल व १५ फूट रूंद असा खंदक होता. खंदकाच्या बाहेर संरक्षक भिंत होती. तर प्रत्येक बुरूजावर तोफा होता. फिरंगोजी नरसाळा हा या भक्कम किल्ल्याचा किल्लेदार होता. वेढा घातल्यानंतर पुढील दोन महिने पावसाळ्यामुळे फारसे यश मिळाले नाही. पण नंतर मात्र तटाच्या भिंती सुरूंगाने उडवून मुघलांनी किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. तेव्हा झालेल्या लढाईत फिरंगोजीने आपल्या सहकाऱ्यांसह पराक्रमाची शर्थ केली. त्याने प्रभावीत झालेल्या शाहिस्तेखानाने फिरंगोजीला मुघलांची चाकरी देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यास प्रतिसाद न देता फिरंगोजीने किल्ला लढवला. एक किल्ला जिंकण्यासाठी लागलेले ३-४ महिने पाहून शाहिस्तेखान आश्चर्यचकित झाला.

**कारतलबखानचा पराभव :-**

शाहिस्तेखानाच्या या मोहिमेच्या दरम्यान पन्हाळगडाच्या वेढ्यांतून सुटून शिवाजी महाराजांनी आपले लक्ष मुघलांच्या ताब्यात असलेल्या कल्याण प्रांताकडे वळवले. उत्तर कोकणातील कल्याण व भिवंडी हे महत्त्वाचे प्रदेश होते. शाहिस्तेखानानेही हा प्रदेश जिंकण्यासाठी कारतलबखान या सरदारची नियुक्ती केली होती. कारतलब खान हा शूर सेनानी असून त्याला या प्रदेशाची माहिती होती. त्यांच्याबरोबर काही रजपूत सरदारही होते. या मोहिमेची बातमी शिवाजी राजांना राजगडावर असताना मिळाली. त्यावेळेस कारतलबखानला या प्रदेशात येण्यापासून थांबवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पुण्याहून निघालेले मुघली सैन्य लोहगडमार्गे बोर घाटातून कोकणात उतरू लागले. ही वाट डोंगर दऱ्यांची असल्याने तेथेच मुघलांना अडवण्याची योजना शिवाजी राजांनी आखली. दाट जंगल, खडतर रस्ते पार करीत हे सैन्य उमराखिंडीत आले. अशावेळी पूर्वी ठरवल्याप्रमाणे नेताजी पालकरने मुघली सैन्याची वाट अडवली. तसेच मागे फिरण्याचा मार्गही रोखून धरला. अवघड ठिकाणी मुघलांना अडकवून मराठे सैनिकांनी हल्ला केला. त्यावेळेस शरणागती पत्करल्याशिवाय दूसरा मार्ग नव्हता म्हणून कारतलबखानाने आपल्या जवळील युद्ध साहित्य, मौल्यवान समानसुमान हत्ती व घोडे देऊन आपली सुटका करून घेतली. या घटनेनंतर त्याला पुण्यात परत यावे लागले. खानाचा हा पराभव खूप मोठा होता. या घटनेमुळे आत्मविश्वास वाढलेल्या मराठ्यांनी उत्तर व दक्षिण कोकणात आपले नियंत्रण वाढवण्याचा प्रयत्न केला.

**शाहिस्तेखानावरील छापा:-**

चाकणच्या विजयानंतर सुमारे २ वर्ष शाहिस्तेखान पुण्यात तळ ठोकून होता. परंतु त्याच्यावर हल्ला करून पराभूत करणे मराठ्यांना शक्य नव्हते. लाल महालात मुक्काम ठोकून खानाने आपल्या फौजा विविध प्रदेशात पाठविल्या होत्या. मराठी प्रदेशांची लूट कडून सामान्यांवर अत्याचार सुरू होते. शाहिस्तेखान स्वतः पुणे सोडून जाईल याची अपेक्षा नव्हती. त्यामुळे लाल महालात शिरून रात्रीच्यावेळी शाहिस्तेखानावर हल्ला करून त्याला ठार करून मुघली सैन्यात गोंधळ उडवून द्यायचा असे शिवाजी महाराजाने ठरविले. आपल्यातील योजकता, चपळाई आणि धाडस दाखवून शाहिस्तेखानाच्या छावणीवर छापा घालण्याची तयारी मराठ्यांनी केली.

सिंहगडावरून ४०० निवडक सैनिक घेऊन ६ एप्रिल १६६३ या दिवशी हल्ला करण्याचे निश्चित केले. मराठा सैन्य ५ एप्रिलला सिंहगडावरून निघाले. एक दिवसाचा प्रवास करून रात्रीच्या वेळी पुण्यात आले. आपण पाहऱ्यासाठी गेलो असून आता परत येत आहोत, असे सांगून पुण्यात प्रवेश केला. लाल महालाची बारीक सारीक माहिती असल्यामुळे योग्य ठिकाणावरून प्रवेश करणे कठीण गेले नाही. तो रमजानचा महिना असल्यामुळे उपास सोडून सर्व सैनिक विश्रांती घेत होते. महालाच्या मागील बाजूस पाकगृह होते. तेथील बंद केलेला कच्चा दरवाजा मराठ्यांनी फोडण्यास सुरूवात केली. त्याच मार्गाने आत शिरून स्वयंपाकगृहातील आचाऱ्यांना ठार करून चिमणजी देशपांडे आणि बापूजी यांच्या पाठोपाठ आणखी २०० लोक आत घुसले. शिवाजी महाराज थेट खानाच्या खोलीपर्यंत पोहचले. तोपर्यंत सुरू झालेल्या आरडा ओरड्यामुळे खान सावध झाला होता. त्यांने आपली तलवार उचलून पुढे जाईपर्यंत शिवाजीच्या हल्ल्याने त्याची बोटे तुटली. तेवढ्यात मेणबत्त्या विझवून अंधार झाला आणि खान निसटला. मराठे सरसकट कत्तल करत सुटले. यात शाहिस्तेखानचा मुलगा अबुल फतेहखान व काही स्त्रीया मृत्युमुखी पडल्या. मराठ्यांचेही १६ लोक मृत्यु पावले तर ४० जखमी झाले. इतर सैनिकांना या घटनेचा पत्ता लागेपर्यंत शिवाजी महाराज आपल्या सैन्यासह बाहेर पडले. या घटनेचा मोठा धक्का शाहिस्तेखानला बसला व त्याने ८ एप्रिलला पुणे सोडण्याचा निर्णय घेतला. यातूनच शिवाजींच्या कर्तृत्वाचा मोठेपणा दिसून येतो. यानंतर ताबडतोब शाहिस्तेखानची बंगाल मध्ये बदली करुन औरंगजेबाने शहजादा मुअज्जम यांस दक्षिणाच्या सुभेदारीवर नेमले.

## ४.४ सुरतेची लूट (१६६४)

शाहिस्तेखानाच्या घटनेनंतर शिवाजी राजांनी आणखी एक धाडसी योजना आखली. या योजनेनुसार सुरत ही मुघल साम्राज्यातील महत्त्वाची व्यापारी पेठ लुटून संपत्ती मिळवणे हा हेतू होता. सुरत हे गेल्या ३ वर्षात मुघली साम्राज्यातील वाहतुकीचे मोठे बंदर होते. तसेच इंग्रज व डच यांसारखे परकीय व्यापारी ही तेथे होते. मुघलांच्या आश्रयामुळे हे पाश्चात्य वखारवाले उन्मतपणे वागत असत. या संपन्न शहराला संरक्षण अवस्था मात्र अपुरी होती. म्हणूनच येथील व्यापारी पेठ लुटण्याचे धाडस मराठ्यांनी केले. आपल्या सैन्यासह राजगडाहून निघून सुमारे ३०० मैलाचा प्रवास करून ५ जानेवारी १६६४ रोजी शिवाजी आपल्या सैन्यासह सूरतेजवळ आले. ही बातमी तेथील सुभेदार इनायत खान यांस मिळाली. सुरतेत आल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपला दूत इनायत खानाकडे व व्यापाऱ्याकडे पाठविले. परंतु शिवाजी महाराजांची मागणीकडे इनायत खानाने पूर्णतः दुर्लक्ष केल्यामुळे मराठा सैनिकांनी सुरतेवर आक्रमण करण्याचे ठरविले. शहराचा बंदोबस्त करण्याची क्षमता नसलेला इनायत खान स्वतः किल्ल्याच्या आश्रयाला गेला. त्यामुळे मराठ्यांना शहर लुटणे सहज शक्य झाले.

दि.६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता सुरतेत प्रवेश करून शिवाजींनी हाजी सईद बेग, हाजी कासीम आणि बहरजी बोहरा या धनाढ्य व्यापाऱ्यांना भेटीस बोलावून खंडणीची मागणी केली ती न स्वीकारल्यामुळे मराठी सैनिकांनी लुटालुटीस सुरूवात केली. दिनांक ६ ते १० जानेवारी पर्यंत मराठा सैन्य धनिकांच्या हवेल्या खणून काढून धन गोळा करत होते. यात २८ शेर मोती, हिरेमाणके इ. मिळाले ते किती प्रमाणात मिळाले याची तर मोजदादच होऊ शकली नाही. याचवेळी इनायत खनाने कपटाने शिवाजी राजांवर मारेकरी पाठवला. पण त्याचा कट यशस्वी होऊ शकला नाही. औरगांबादहून मुघलांचे सैन्य सूरतच्या संरक्षणासाठी येत असल्याची बातमी मिळाल्यानंतर १० जानेवारीला मराठे सुरतेतून बाहेर पडले. याकाळात इंग्रज आणि डच वखारवाल्यांनी मात्र स्वसंरक्षणासाठी प्रतिकार केला. त्यामुळे त्यांना न दुखवता

शिवाजी महाराज सुरत मधून बाहेर पडले. ही बातमी औरंगजेबाला लाहोर येथे समजली. त्यानंतर शिवाजीचा पक्का बंदोबस्त करणे आवश्यक आहे. या विचाराने औरंगजेबाने मिर्झा राजा जयसिंग या थोर सेनापतीची नियुक्ती केली.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : १६६१ पासून पुरंदरच्या तहाची मुघल मराठे संबंधांचे परिक्षण करा.

## ४.५ मिर्झा राजे जयसिंग व शिवाजी महाराज -

शिवाजी महाराजांच्या वाढत्या सामर्थ्याचा बंदोबस्त करण्यासाठी जयसिंग व दिलेरखान या आपल्या दोन विश्वासू अनुभवी व पराक्रमी सरदाराची औरंगजेबाने शिवाजीविरूद्ध नेमणूक केली. दाउदखान, कुतूबुद्दिन, सृजनसिंग तोफखान्यासाठी निकोलास् मनुची तसेच इतर सेनानाही मिर्झा राजे जयसिंग यांच्याबरोबर पाठवण्यात आले जयपुरच्या कच्छवा रजपूत कुलातील मिर्झा राजा जयसिंग हा थोर सेनापती होता. गंभीर, कुशाग्र बुद्धीमत्ता असणारा प्रचंड अनुभवी आणि अत्यंत पराक्रमी असलेल्या कोणत्याही प्रकारच्या लढ्यात हमखास विजय प्राप्त करून देणारा हा बादशहा औरंगजेबाचा अत्यंत निष्ठावंत सेवक होता. युद्धकलेत निपुण तितकाच राजकारणातही प्रविण होता. त्याच्या या गुणांमुळेच औरंगाजेबाने पूर्ण विश्वासाने दक्षिणेच्या स्वारीची जबाबदारी त्याच्याकडे दिली.

प्रचंड फौज, मातब्बर हिंदू व मुसलमान सरदार व अद्यावत शस्त्रास्त्रे घेऊन जयसिंग ९ जानेवारी १६६५ रोजी नर्मदा नदी ओलांडून १० फेब्रुवारी रोजी औरंगाबाद येथे पोहचला. आपली स्वारी करण्यासाठी त्याने औरंगजेबाकडून तीन मागण्या मान्य करून घेतल्या. दक्षिणेच्या सुभ्यातून लागतील तेवढे पैसे खर्च करण्यासाठी मुभा त्याने मागून घेतली. दुसरी मागणी म्हणजे दक्षिणेतील मोगल किल्लेदारांनी जयसिंगाचे हुकूम पाळले पाहिजे व कैद्यांची व्यवस्था केली पाहिजे. मोगल फौजेतील अधिकाऱ्यांच्या रजा वगैरे मंजूर करण्याचा अधिकार आपल्याला मिळाला पाहिजे, ही जयसिंगाची तिसरी मागणी होती. औरंगजेबाने या मागण्या मान्य केल्या. अशा प्रकारे दक्षिणेच्या स्वारीचे तिन्ही संपूर्ण अधिकार प्राप्त करून घेऊन जयसिंगाने शिवाजी महाराज विरूद्ध काळजीपूर्वक हालचाली करण्यासाठी सुरूवात केली.

### अ) मोहिमेची सुरूवात :-

शिवाजी महाराजाच्या स्वराज्याची भौगोलिक माहिती काळजीपूर्वक जमा करून दक्षिणेतील राजकारणाचा जयसिंगाने बारकाईने अभ्यास केला. शिवाजी महाराजांचे शत्रू ओळखून त्यांच्याशी संधान बांधण्याचीही सुरूवात झाली. जावळीचे मोरे, जव्हारचा राजा यांना जयसिंगाने आपल्या गोटात ओढले. पोर्तुगीज, डच व इंग्रज वखारवाल्यांनी शिवाजी महाराजाला

कोणतेही साहाय्य करू नये म्हणून खास आदेश पाठवले त्यानंतर विजापुरच्या आदिलशहावर नजर ठेवण्यासाठी काही अफगाणांना तेथे पाठवून दिले. कल्याणच्या उत्तरेकडील कोळी वतनदार तसेच अफजलखानाचा मुलगा फझलखान अशा सर्वांना एकत्र आणून शिवाजी महाराजाला एकटे पाडण्याचे राजकारण जयसिंग याने यशस्वीपणे केले. या संदर्भातील तपशील त्याने औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रांमधून मिळतो. या पत्रांचा संग्रह 'हफ्ता अंजुमन' या नावाने प्रसिद्ध आहे. दि.३ मार्च रोजी पुणे या ठिकाणी येऊन पुढील ३ महिने युद्धाची तयारी व प्रत्येक हालचालीची बारकाईने आखणी जयसिंगाने केली. पुण्याला आल्यानंतर जयसिंगाने आपली ठाणी मजबूत करण्यावर प्रथम भर दिला. शिवाजींच्या स्वराज्यात या सुमारास पुणे, कोल्हापूर, सातारा, कुलाबा या जिल्ह्यातील काही परगणे होते. महत्वाचे किल्लेही शिवाजींच्या ताब्यात नव्हते. पन्हाळा विजापूरकरांना परत दयावा लागणार होता. या लहान स्वराज्याची नाकेबंदी करण्यासाठी जयसिंगाने ठिकठिकाणी मोगल सरदार पाठवून कडे निर्माण केले. काही तुकड्या शिवाजींच्या मुख्य किल्ल्याकडे पाठवून त्यांनी आजूबाजूचा प्रदेश बेचिराख करावा असा आदेश दिला. औरंगजेबाने जयसिंगास कोकण भागात प्रथम चाल करावी अशी सूचना दिली. परंतु ती नाकारून पुण्याजवळच छावणी करणे कसे हितावह आहे, हे त्याने बादशहाला कळविले आणि सासवड याठिकाणी त्याने तळ ठोकला. त्याची कारण मिमांसा करताना जयसिंग बादशहा औरंगजेबास लिहितो 'सासवड हे शिवाजीचे पुरंदर आणि इतर इलाखे यांना लागून आहे. विजापूरच्या प्रदेशालाही ते जवळ पडते.' सर्व बाजूने कडेकोट बंदोबस्त झाल्यानंतर मोगलांनी पुरंदरवर वेढा दिला. वेढ्याचे अधिपत्य दिलेरखान यांच्याकडे देण्यात आले.

दिलेरखानचा पुरंदरचा वेढा चालू असताना मोगल फौजेच्या तुकड्यांनी साऱ्या स्वराज्यात धुमाकूळ घालण्यास सुरूवात केली. रोहिडा, तुंग, तिकोणा, लोहगड आणि शिवाजी महाराजांची राजधानी असलेला राजगड या किल्याभोवतीचा मुलूख जाळून उदध्वस्त करण्याचा उपक्रम मोगलांनी सुरू केला. मराठ्यांना दहशत बसावी आणि त्याचप्रमाणे पुरंदरच्या किल्ल्यात अडकून पडलेल्यांना कोठूनही रसद मिळू नये, असा दुहेरी हेतू मोगलांच्या या हालचाली मागे होता.

**ब) मराठ्यांचा प्रतिकार :-**

पुरंदर गड हा समुद्र सपाटीपासून ४५६४ फूट उंच असून त्याचे दोन भाग आहेत. एक भाग म्हणजे बालेकिल्ला आणि दुसरी म्हणजे माची पुरंदर या माचीतून सरळ वर जो डोंगर आला आहे, त्यालाच बालेकिल्ला म्हणतात. यास बळकट तटबंदी असून एकच मुख्य दरवाजा होता. पुरंदरला लागूनच दुसरा किल्ला आहे. त्याला वज्रगड अथवा रूद्रमाळा म्हणत याची उंची देखील पुरंदर इतकीच आहे. दोन्ही गडांमध्ये फक्त एक खिंड आहे. तिला भैरवखिंड म्हणत. वज्रगडाहून माची प्रदेशावर ताबा ठेवता येतो. पुरंदरचा मराठा किल्लेदार कोण होता हे ज्ञात नाही परंतु शिवाजीने मुरारबाजी प्रभू यांस यावेळी गडाच्या संरक्षणासाठी पाठविले होते.

दिलेरखानास या वेढ्यातील वज्रगडाचे महत्त्व समजले होते. वज्रगड आणि पुरंदरच्या दरम्यान उत्तरेच्या बाजूने दिलेरखानाने आपले अफगाण सैन्य ३००० सैन्यासह कीरतसिंह त्याच्या उजव्या बाजूस राजा नरसिंग गौर, करण राठोड, जगतसिंह, सय्यद मुकबूल, नीर आतीश, आतीश खान, दिलेरचे पुतणे गैरत आणि मुजफर हे होते आणि याशिवाय जातीने जयसिंग आणि दिलेरखान मोर्च्यावर उभे होते. गडाची मोर्चेबंदी करून गडावर चढाई करण्यामध्ये बहालिया पठाण, रजपूत बुंदले आणि मुघल सैनिक भाग घेत होते. गडावरील मराठे सैनिक देखिल प्रखर प्रतिकार करत होते. तोफा, बंदूक आणि मोठेमोठे दगड यांच्या साहाय्याने

गडकरी हल्ले परतवीत होते. दिलेरखानाची धडपड चालली होती. मुघलांच्या तीन प्रचंड तोफा अब्दुलला खान, फतह लष्कर आणि हाहेली (माहेली) या जास्तीत जास्त उंच ठिकाणावर चढवून वज्रगडाच्या व तटबंदीवर मारा करण्याची परंतु मराठ्यांच्या किल्ल्यावरून होणाऱ्या माऱ्या पुढे हे काम जवळ-जवळ अशक्य होते. काही काळाने मुघली तोफांच्या माऱ्याने बुरुज कोसळला. आणि तटाच्या खिंडारावर मुघली सैनिक घुसले. मराठी सैनिकांनी चांगलीच झुंज दिली. दुसरे दिवशी मुघली फौजांनी शिड्यांच्या साहाय्याने किल्ल्याच्या आतील बाजूस घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मोठा निकराचा संग्राम घडून आला. मराठे सैनिकांना शरण जाण्याशिवाय गत्यंतर उरले नव्हते. वज्रगडांवर मुघली निशाण चढले.

एप्रिलच्या मध्यास दिलेरखानाने पुरंदरच्या माचीस वेढा घातला. खंदक आणि मोर्चे खडकाळ भागापर्यंत नेले. मराठी सैनिकांनी कीरतसिंहाच्या मोर्च्यावर रात्रीचा हल्ला केला. परंतु तो त्याने परतवून लावला. पुरंदरचा वेढा तीव्रतेने लढवला जात होता. जयसिंगाने माचीलगतच्या डोंगरावर धमधमे बांधून तोफा वरती चढवून मारा करण्याची योजना आखली, माचीवरील दोन बुरूजांपैकी एकास काळा बुरूज आणि दुसऱ्यास सफेद बुरूज म्हणत. मुघल सैनिकांनी बांधलेल्या धमधम्यावरून या प्रचंड बुरूजावर हल्ला करण्याचे ठरविले. परंतु मराठ्यांनी त्यांचा पहिला प्रयत्न हाणून पाडला. बरेच मुघल सैनिक कामास आले. जयसिंहाचा लष्करी अधिकारी भूपत सिंह हाही कामास आला. तेव्हा दिलेरखानाने सफेद बुरूजाखाली सुरूंग लावण्यासाठी खंदक खोदण्यास सुरूवात केली. मराठे सफेद बुरूजावरून त्याचा प्रतिकार करीत होते. तेव्हा अचानक तटावरती साठवलेल्या दारूगोळ्याचा स्फोट झाला आणि सफेद बुरूजाला मोठे खिंडार पडले. ८० मराठी सैनिक त्यात ठार झाले. मुघली मोर्चे, सफेद बुरूजापर्यंत सरकले. त्यानंतरच्या दोन दिवसांत मुघली तोफांच्या माऱ्यापुढे काळा बुरूजही मराठ्यांना सोडावा लागला. अशा तऱ्हेने पुरंदरची माची दिलेरखानाच्या ताब्यात गेली.

**क) मुरारबाजीचा पराक्रम :-**

माची घेतल्यानंतर दिलेरखान बालेकिल्ल्याच्या सर दरवाज्यावर चढाई करण्याचा तयारीत होता. तेव्हा मुरारबाजीने ७०० निवडक लोकांचे पथक घेऊन दिलेरखानाच्या पाच हजार पठाण सैनिकांवर हल्ला चढविला. मराठ्यांनी ५०० पठाणांना कठस्थान घातले. शिवाय बहलिया पायदळाचे कित्येक लोक मारले. लढत लढत तो दिलेरखानाच्या छावणी जवळ आला. त्याचे हे अद्वितीय शौर्य पाहून खानने त्यास जीवदान आणि मुघली चाकरी देण्याचे वचन दिले परंतु त्याने स्पष्टपणे नाकारले आणि तो आता दिलेरखानावरच घाव घालणार एवढ्यात दिलेरखानाच्या एका बाणाने त्याचे शिर धडावेगळे झाले. मुरारबाजी पडला.

मुरारबाजीच्या मृत्युनंतर मुघल सैन्याचा संचार स्वराज्याच्या विविध भागात होऊ लागला व लुटालूट सुरू झाली. तसेच कोढाणा घेण्याचा पुढचा प्रयत्नही सुरू झाला. अशा वेळेस शिवाजी राजांनी आपल्या मुत्सद्यांशी चर्चा करून मिर्झाराजे जयसिंह यांच्याशी तह करण्याचा निर्णय घेतला यातूनच १३ जून १६६५ या दिवशी पुरंदरच्या पायथ्याशी मराठ्यांनी मुघलांशी तह केला.

**ड) पुरंदरचा तह व त्यातील अटी पुढीलप्रमाणे :-**

१. पुरंदरचा तहान्वये शिवाजींनी औरंगजेबाला २३ किल्ले व त्या किल्ल्याखालील ४ होनांचा लाख वार्षिक उत्पन्न देणारा मुलुख द्यावा. या २३ किल्ल्यात स्वरांज्यातील प्रमुख किल्ल्यांचा समाावेश होतो. पुरंदर, व्रजगड, लोहगड, कोंढाणा, माहुलीगड इ.

२. शिवाजीकडे १२ किल्ले आणि त्याखालील १ लाख होन उत्पन्न असणारा प्रदेश रहावा.

३. शिवाजीने आपला मुलगा संभाजीला ५,००० स्वरांनिशी मोघलांची सेवा करण्याकरीता मुघल दरबारात पाठवावे.

४. विजापूरचा प्रदेश शिवाजीने जिंकून घेतल्यास शिवाजी महाराजाने मोगल बादशहाला तीन लाखाच्या वार्षिक हप्त्यात मुघलांना ४० लाख होन द्यावे.

५. दक्षिणेकडील युद्धात मोघलांनी शिवाजींना काही कामगिरी सांगितल्यास ती शिवाजीने प्रामाणिकपणे करावी.

**पुरंदरच्या तहाचे महत्त्व :-**

शिवाजी महाराजांच्या मोघलांशी असलेल्या संबंधात 'पुरंदरचा तह' या घटनेला ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व आहे. मिर्झा राजे जयसिंग यांनी औरंगजेबाला सुचनेनुसार शिवाजीला पराभूत करून पकडण्याची आवश्यकता होती. पण प्रत्यक्षात शिवाजींना पुरंदरचा तह स्वीकारण्यास लावून आग्राला भेट देण्याचा प्रस्ताव जयसिंगाने का दिला, याबाबत इतिहासकारांचे मत भिन्न आहे. या मोहिमेपूर्वी अफजलखान व शाहिस्तेखान यांना जे शक्य झाले नाही ते जयसिंगाला शक्य झाले. त्यामुळे त्याच्या या मोहिमेला महत्त्व आहे. जयसिंगाच्या प्रचंड सामर्थ्यासमोर शिवाजी महाराजांना माघार घ्यावी लागली, ही वस्तुस्थिती आहे. पुरंदरच्या तहामुळे मोठा असा प्रदेश शिवाजींना मोगलांना द्यावा लागला. यामुळे या तहाला महत्त्व आहे. मुघल-मराठा संघर्ष हा शायिस्तेखानाच्या मोहिमेपासून सुरू झाला होता. या मुघल मराठा संघर्षाच्या काळात जयसिंगाची स्वारी झाली व शिवाजींना पराभव स्वीकारावा लागला आणि मुघलांचे स्वामीत्व काही काळ मान्य करावा लागले. पण याही परिस्थितीत शिवाजी महाराजाने मोघलांची मनसबदारी स्वतः स्वीकारण्याचे टाळले व आपल्या ऐवजी राजपुत्र संभाजीला मुघल मनसबदार बनवले. पुरंदराच्या तहात मांडलेल्या विविध मुद्यांवरून जयसिंगाची मुत्सद्देगिरी दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्न : पुरंदर तहावर टिप लिहा.

**विजापूर मोहिम :-**

मराठ्यांच्या शरणागतीनंतर जयसिंगाने आदिलशाही विरूद्ध मोहिम हाती घेतली. तहातील अटींप्रमाणे शिवाजी महाराजास विजापूरी आक्रमणात सहभागी होणे आवश्यक होते. पुरंदरच्या लढ्याच्यावेळी शिवाजी महाराजास मदत करून दक्षिण मुघलांपासून वाचविणे शक्य आहे, ही दूरदृष्टी आदिलशाही मुत्सद्यांमध्ये नव्हती उलट या अवघड परिस्थितीत आदिलशाही वजीर इखलासखान याने लखम सावंताला हाताशी धरून कुडाळवर आक्रमण केले व मराठ्यांना राजापूर पर्यंत मागे हटवले. पुरंदरच्या तहानंतर मराठ्यांनी तो प्रदेश परत मिळवला.

आदिशाही वरील आक्रमणापूर्वी जयसिंगाने अनेक आदिलशाही सरदारांना फितवले व मोहिम सुरू केली. फलटण, ताथवडा हे विजापूरी किल्ले मराठ्यांनी मुघलांना मिळवून दिले. परंतु विजापूरवर आक्रमणाच्या तयारीत असता आदिल शाहाने निकराचा लढा सुरू केला. विजापूर परिसरातील ४ ते ५ मैलांचा प्रदेश उद्ध्वस्त करून शस्त्रुला जेरिस आणले व मुघल फौजांचा दणदणीत पराभव केला. या मोहिमेतील अपयश नजरेत येताच शिवाजी महाराजास पन्हाळगडाच्या मोहिमेतील पाठवून मुघल सरदरांमधील शिवाजी महाराज विरूद्धचा असंतोष कमी करण्याचा प्रयत्न जयसिंगने केला. परंतु पन्हाळगडाची मोहिम यशस्वी होवू शकली नाही. याच काळात नेताजी पालकर आदिलशहाला जावून मिळाला. फेब्रुवारी मार्च १६६६ दरम्यान विजापूरी सरदारांनी फोंडा, कुडाळ, बांदा हे प्रदेश जिंकून शत्रुंना हतबल केले.

या मोहिमेच्या दरम्यान शिवाजी राजांना औरंगजेबाची भेट घेण्यासाठी जयसिंगाने उत्तरेत पाठविण्याचा विचार केला व त्यानुसार औरंगजेबास पत्रही पाठविले. औरंगजेबाच्या संमतीने दि.५ मार्च १६६६ रोजी शिवाजीराजे संभाजीसह आग्रास निघाले.

## ४.६ शिवाजी महाराजांची आग्रा भेट व सुटका

शिवजीमागे आग्रा भेटीस निघाल्यावर त्यांच्या अनुपस्थितीत मातोश्री जिजाबाई या व्यवस्था पाहणार होत्या. १२ मे १६६६ मध्ये बादशहाचा ५० वा वाढदिवस होता. त्या निमित्ताने आग्र्याला उपस्थित राहून संभाजीसाठी शिवाजी मनसबदारी स्वीकारणार होते. शिवाजीं ११ मे रोजी आग्रा येथे पोहचले. आग्रा भेट सुरूवातीपासूनच विचित्र घटना घडल्याने बरीच गाजली. शिवाजी ठरलेल्या वेळेच्या अगोदर आग्राच्या वेशीवर येवून पोहचले. साहजिकच शिवाजींचे स्वागत करायला तेथे रामसिंग नव्हता. तेव्हा शिवाजींच्या राहण्याची आणि उतरवण्याची व्यवस्था कुठे केली आहे, हे कळु न शकल्याने गोंधळास सुरूवात झाली. दुसऱ्या दिवशीही रामसिंग व शिवाजी महाराज यांची भेट झाली नाही व त्याने आपल्या मुन्शीस शिवाजी महाराजास आणण्यासाठी पाठविले. दिवाण ए आम मधिल दरबार संपून दिवाण खासच्या दरबाराची सुरूवात झाली होती. गडबडीत शिवाजी राजांना दरबारात उपस्थित राहण्यासाठी उशीर झाला. रामसिंग शिवाजींना घेऊन दरबारात आला. रिवाजाप्रमाणे शिवाजी महाराज व संभाजीने बादशहा औरंगजेबला नजराणे दिले. परंतु त्यांनी शिवाजी महाराजाला ५ हजारी मनसबदार जसवंतसिंगच्या मागच्या पंक्तीत उभे केले. तसेच ‘खिलत’ वाटप करत असतानाही शिवाजींना वगळण्यात आले, ही गोष्ट शिवाजी राजांना अपमानास्पद वाटली. त्यामुळे त्यांचा संताप अनावर झाला. नंतर रामसिंगाने जेव्हा शिवाजी महाराजाला बादशहासाठी कुर्निसात करायला खुणावले तेव्हा शिवाजी महाराजाने मोठ्या आवाजात आपली नाराजी व्यक्त केली. दरबारातील सर्व उपस्थितांचे लक्ष शिवाजींच्या हालचालींनी वेधून घेतले. बादशहाने मुद्दाम आपला अपमान केला आहे असा समज होऊन रागाने शिवाजी महाराज दरबार सोडून गेले. ही गोष्ट बादशहाला आवडणे शक्य नव्हते म्हणून औरंगजेबाने शिवाजीला नजरकैद केले आणि त्यांच्या निवासस्थानी चौकी व पहारे बसवले.

**शिवाजींची आगऱ्याहून सुटका :-**

‘‘बादशहा आपल्याला सोडणार नाही’’ हे लक्षात आल्यावर शिवाजी राजांनी आगऱ्याहून सुटण्याचा बेत निश्चित केला. यासाठी आपल्या सहकार्याच्या मदतीने बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करून त्यांनी एक योजना आखली ही योजना अत्यंत धाडसी व तितकीच

धोक्याची होती. आजारी असल्याचे सोंग घेऊन शिवाजींनी दानधर्म करण्याची इच्छा व्यक्त केली. दररोज मिठाई व इतर चीज वस्तुंनी भरलेले पटारे त्यांच्या निवास स्थानातून बाहेर पडू लागले. सुरूवातीचे काही दिवस या पेटाऱ्यांची कसून तपासणी होऊ लागली. पण मिठाई शिवाय येथून काही दिले जात नाही, अशी खात्री पटल्यावर पहारेकऱ्यांची नजर कमी झाली. याच संधीची वाट पाहणाऱ्या शिवाजींनी संभाजीसह पेटाऱ्यातून दि. १९ ऑगस्ट १६६६ रोजी सुटका करून घेतली.

पूर्वी ठरवलेल्या योजनेनुसार निराजी रावजी आग्ऱ्याच्या वेशीवर शिवाजींना आपल्या सहकार्यासमवेत भेटले व लवकरच तुफानी वेगाने २४ तासात २०० मैलांचे अंतर संपवून आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने अग्ऱ्यातून बाहेर पडले. पुढे मथुरा, वाराणसी, प्रयाग, गोंडवन, हैद्राबादच्या मार्गाने शिवाजी महाराज दक्षिणेत उतरले. २० नोव्हें १६६६ मध्ये ते रायगडावर येऊन पोहचले.

**शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेचा परिणाम :-**

मराठ्यांच्या इतिहासात शिवाजींची आगऱ्याहून सुटका ही एक फार महत्त्वाची घटना समजली जाते. शिवाजींच्या स्वराज्याला त्यामुळे जीवनदान मिळाले. खुद्द औरंगजेबाच्या डोळ्यादेखत मोगलांच्या राजधानीतून सर्वांच्या डोळ्यात धूळ फेकून शिवाजी महाराज निसटल्यामुळे शिवाजीची व मराठ्यांची प्रतिष्ठा एकदमच आकाशापर्यंत पोहचली. त्यामुळे मराठ्यांची शत्रुंना स्वाभाविकच मोठा वचक निर्माण झाला. आणि औरंगजेबाच्या फजितिला आता पारावार राहिला नाही. शिवाजी महाराजाला कैद करून त्यांना ठार मारण्याचा औरंगजेबाचा डाव अशी रितीने पार उधळला गेला. मराठ्यांच्या इतिहासातील ही क्रांतीकारी घटना होती असे म्हटले जाते. शिवाजी महाराजांची आग्रा भेट ही मुघलांची कुटिलराजनिती, रजपुतांचा राजकीय दृष्टीतील कमकुवतपणा व दूरदृष्टीचा आभाव दाखविते.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः शिवाजी महाराजांची आग्रा भेट यावर टिप लिहा.

## ४.७ मोगल मराठा संघर्ष (१६६७-७०)

जयसिंगाच्या सामर्थ्यामुळे शिवाजी महाराजांना मोघलांसमोर शरणागती पत्करावी लागली. पुरंदरच्या तहानंतर शिवाजी महाराज औरंगजेबाच्या भेटीकरिता आग्ऱ्याला गेले आणि तेथून अत्यंत धाडसाने स्वतःची सुटका करून घेतली. स्वराज्यात आल्यानंतर मुघलांशी युद्ध करण्याची शक्ती मराठ्यांकडे नव्हती हे ओळखून शिवाजींनी मोघलांशी मित्रत्वाचे धोरण स्वीकारले. कारण स्वराज्यातील शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीमुळे त्यांना सवड हवी होती. त्याचप्रमाणे विजापूर आणि जंजिऱ्यांच्या सिद्दीला नामोहरम् करून आपली सत्ता बळकट

करण्याची संधी त्यांना हवी होती. मुघल बादशहा औरंगजेब याची शिवाजीमुळे जयसिंगावर गैरमर्जी झाली होती. म्हणून दक्षिणेचा सुभेदार म्हणून बादशहाने जयसिंगाच्या जागी शहजादा मुअज्जम याची सुभेदार म्हणून नेमणूक केली. पुरदंरच्या कराराप्रमाणे शिवाजीने ४ नोव्हें. १६६७ रोजी संभाजीला मनसबदार म्हणून पाठवले. औरंगजेबाला मुअज्जमच्या वर्तणूकीवर शंका येऊन तो मराठ्यांना जाऊन मिळाला. असे त्याला वाटत होते. त्यामुळे मोघलांच्या मराठ्यांशी संघर्ष होणार हे अटळ होते. औरंगजेबाचे धार्मिक धोरण, लष्कराची कपात, आर्थिक प्रश्न यामुळे समस्या निर्माण झाल्या होत्या. त्याचा फायदा घेण्याचे मराठ्यांनी ठरवले व पुरंदराच्या तहान्वये जे २३ किल्ले मोगलांना द्यावे लागले होते, ते परत घेण्याच्या दृष्टीने शिवाजींनी आपल्या हालचालींना प्रारंभ केला.

## कोंढाणा जिंकून घेतला

कोंढाणा किल्ला अतिशय अवघड व लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा किल्ला होता. पण कोंढाणा जिंकणे ही सोपी गोष्ट नव्हती. हा किल्ला जिंकण्याची कामगिरी शिवाजी महाराजांनी तानाजी मालुसरे व त्याचा भाऊ सूर्याजी यांच्यावर सोपवली ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजीने साहाय्याने ३०० सैनिकांसह किल्ल्यात प्रवेश केला व किल्ला जिंकून घेतला. पण या लढाईत दुर्दैवाने तानाजी ठार मारला गेला. उदयभान राठोड या मुघल सरदाराने कडवा प्रतिकार केला परंतु दोन्ही पराक्रमी सरदारांचा अंत झाला.

कोंढाणा जिंकल्यानंतर ८ मार्च रोजी निळोपंताने पुरंदरचा किल्ला जिंकून घेतला. तसेच उत्तर कोकणातील कल्याण, भिवंडी, माहुली, लोहगड, कर्नाळा, रोहिडा इ. प्रदेश मे व जून १६७० मध्ये लागोपाठ जिंकून घेतले.

## सुरतेची दुसरी लूट १६७० :-

३ व ४ ऑक्टोबर १६७० रोजी शिवाजी महाराजांनी दुसऱ्यांदा सुरत लुटली. दख्खनचा सुभेदार मुअज्जम आणि मातबर सरदार दिलेरखान यांच्यात निर्माण झालेल्या बेबनावाच्या फायदा घेऊन मराठ्यांनी सुरतेवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला. कल्याणहून १५,००० ची फौज घेऊन शिवाजी महाराज सुरत येथे आले. शहराच्या रक्षणास केवळ ३००ची कुमक होती. इंग्रज, डच, फ्रेंच वरवारवाल्यांनी आपल्या मालाच्या सुरक्षिततेची योजना आधीच आखली होती. त्यांचा प्रदेश वगळून शिवाजी राजांनी मोठमोठे वाडे व बाजारपेठ लुटली. नवल शाहू व हरिसाहू या धनिकांकडून सुमारे १३ लाखांची संपत्ती मिळाली. एकूण ६६ लाखांची लूट करून शिवाजी ५ ऑक्टोबर रोजी दुपारी सुरत सोडून बागलाणच्या मार्गे परत निघाले. या लूटी नंतर सुमारे महिनाभर सुरतेतील व्यवहार सुरळीत होऊ शकले नाहीत. व पुढे १६७२, १६७३, १६७९ इतक्या वेळा सुरतेमध्ये मराठ्यांच्या स्वारीच्या अफवा पसरल्या व व्यापाऱ्यांनी पळापळ केली. या सर्वांचा परिणाम म्हणजे भरभराटीस आलेले हे व्यापारी शहर हळूहळू रिकामे होऊ लागले.

बागलाणमार्गे मराठे परत येतानाचे वृत्त कळताच मुअज्जमने दाऊदखानास शिवाजी महाराजांच्या पाठलागावर पाठविले. इखलास खान हा दाउदखानाच्या सैन्यात आघाडीवर होता. त्याने मराठ्यांचा पाठलाग करून मराठा सैन्याला गाठले. दहा हजार मराठा सैन्यावर वणी जवळ दिंडोरी येथे हल्ला केला. मोठे युद्ध झाले. इखलासखान व संग्रामखान घोरी जखमी होऊन पडले. तेवढ्यात दाउदखान त्याच्या मदतीस आला. मराठ्यांच्या बाजूने प्रतापराव गुजर,

व्यंकोजी दत्तो लढत होते. मराठ्यांनी मुघलांच्या तोफखान्यावर हल्ला केला व त्यांचा प्रमुख अब्दुल माबदला पराभूत करून तोफखान्याचे निशाण व घोडे काबीज केले. १७ ऑक्टोबरला दाउदखानाने माघार घेतली. तर मराठे कोकणकडे निघून गेले. पुढील आठवड्यात मोरोपंतांनी त्याच परिसरातील त्र्यंबकगड जिंकला.

## ४.८ मुघल - मराठा संघर्ष १९७१-७४

इ.स. १६७० व्या डिसेंबर महिन्यात शिवाजीराजांनी खानदेश व वऱ्हाडची लूट केली. तसेच बऱ्हाणपूर पासून ८ मैलांवरील बहादुरपुरा हे ठिकाण लुटले. मोरोपंत व शिवाजी राजांनी मिळून साल्हेरच्या किल्ल्याला वेढा घातला. मुघली किल्लेदार फतहउल्लाखान हा पहिल्याच दिवशीच्या हल्ल्यात ठार झाला. ५ जानेवारी १६७१ रोजी मराठ्यांनी किल्ला जिंकला. औरंगजेबाने दाऊदच्या मदतीस महाबतखान या सरदारालाही पाठविले. बागलणचा पूर्ण प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली गेला होता. दाऊदखान मुल्हेरकडे वळला. त्याचा पाठलाग करून मुल्हेर, चौरगड व होलगड ही ठिकाणेही मराठ्यांनी काबीज केली. सुरत लुटीनंतरच्या या घटना औरंगजेबाच्या दृष्टीने चिंताजनक होत्या. म्हणून त्याने गुजरातच्या सुभेदार बहादूरखानास दक्षिणेकडील व्यवस्थेसाठी पाठविले. तसेच महाबत खानास मुख्य सेनापती म्हणून नेमले. परंतु दोघांमध्ये मतभेद निर्माण झाल्यामुळे दाऊद खानास उत्तरेस बोलविण्यात आले.

अ) साल्हेरचा लढा १६७१च्या ऑक्टोबर मध्ये बहादूरखान व दिलेरखानाने साल्हेरच्या किल्ल्याला वेढा दिला. अमरसिंह चंद्रावत यास किल्ला जिंकण्याची कामगिरी देऊन दिलेरखान खळगड घेण्यास तर बहादूरखान दक्षिणेकडे निघाला. शिवाजीराजांनी मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांना मुघलांविरूद्ध पाठविले. मुघल - मराठे सैन्यात मोठी लढाई झाली. इरवलासखानाचा पाडाव, अमरसिंहाचा मृत्यु झाला. सूर्यराव काकडे हा मराठ्यांचा मोठा सरदार युद्धात मृत्यूमुखी पडला. मुघलांचा पराभव झाला. फेब्रुवारी १६७२ मध्ये प्रतापरावाने मुल्हेरचा किल्लाही जिंकून घेतला. मुघलांवर लागोपाठ मिळवलेल्या मोठ्या विजयामुळे मराठ्यांच्यातील आत्मविश्वास वाढला. या घटनेनंतर बहादूरखान यास दक्षिणचा सुभेदार म्हणून नियुक्त करण्यात आले तर दिलेरखान पुणे परिसराकडे वळला. दरम्यानच्या काळात मराठ्यांनी शिवनेरी किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी ठरला नाही. याच काळात मराठ्यांचा विजापूरशी संघर्ष सुरू झाला. या परिस्थितीत बहादूरखानाने वऱ्हाड तर दिलेरखानाने कोकणात उतरण्याचा प्रयत्न केला. परंतु तोही सफल ठरला नाही. यानंतर औरंगजेबानी दिलेरखानास उत्तरेत बोलावून घेतले. तर बहादुर खानानेही मराठ्यांशी लढाई करण्याचे धोरण तात्पुरते बाजूले ठेवले.

### मुघल मराठा संघर्षाचे अंतिम पर्व १६७४-८०

अनेकवर्षे संघर्ष होऊनही मराठे मुघलांचे वर्चस्व मान्य करण्यास तयार नव्हते. उलट मुघलांच्या नवीन नवीन मोहीमांना धाडसाने प्रतिकार करून शिवाजी महाराजांच्या प्रभावी नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुघलांशी संघर्ष करून स्वराज्याचे स्वातंत्र्य टिकवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. असे असले तरीही बादशहा औरंगजेबही मराठ्यांचे स्वराज्य स्वीकारण्यास व शिवाजी राजांना स्वतंत्र प्रशासक मानण्यास तयार नव्हता. याच अधिकृत छत्रपतीपदासाठी शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी राज्यभिषेक करून घेतला व मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याची घोषणा केली. सर्वत्र राजा म्हणून शिवाजीराजांना मान्यता मिळाली होती. परंतु मुघलांशी संघर्ष करण्याचे धोरण मात्र पक्के होते. राज्यभिषेकानंतर झालेल्या खर्चाची भरपाई करण्यासाठी

सात हजार सैन्यासह मराठ्यांनी पेडगांव येथे असणाऱ्या बहादुरखानच्या तळावर हल्ला करून सुमारे १ कोटी रूपयांची व २०० घोड्यांची लूट आणली याचवेळी औरंगजेबाने दिलेरखानास परत दक्षिणेत पाठविले. ऑक्टोबरमध्ये धरणगाव लुटले तर १६७५ मध्ये मुघलांनी कल्याणची लूट केली.

मराठ्यांशी झालेल्या आजपर्यंतच्या मोहिमांमध्ये अपयश आल्यामुळे बहादूरखानाने मराठ्यांशी तह करण्याचे ठरविले. अटींवर विचारही सुरू झाला. परंतु जुलै १६७५ मध्ये शिवाजी महाराजांनी फोड्यांचा किल्ला जिंकून घेतल्यामुळे त्यांना बहादूरखानशी तहाची आवश्यकता वाटली नाही. यामुळे निर्माण झालेल्या तणावातून विजापूर दरबारातील वजिर खवासखान यास हाताशी धरून बहादूर खानाने शिवाजी महाराजा विरूद्ध मोहिम सुरू करण्याचे ठरविले. परंतु याच काळात खवासखानाचे उच्चाटन झाल्यामुळे हा प्रयत्नच फसला. उत्तर कोकणात उतरून मराठ्यांची नाकेबंदी करण्याचा प्रयत्नही बहादूरखानाने करून पाहिला. परंतु तोही फसला औरंगजेबाने खानाची चांगलीच कानउघडणी केली.

**संभाजी राजांचे मुघलांशी संगनमत :-**

दिलेरखानाने विजापूरशी राजकारणात भाग घेऊन तेथील मत अनुकूल करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यास यश आले नाही. या दरम्यान विजापूरवर आक्रमण करण्याच्या तयारीत असतानाच मुघलांच्या दृष्टीने एक उत्साहवर्धक घटना घडून आली. छ. शिवाजी महाराजांचे पूत्र संभाजी दिलेरखानास येऊन मिळाला (१३ डिसेंबर १६७८) दिलेरखानाने त्याचे स्वागत केले. बादशहाने सात हजारांची मनसब आणि राजा हा किताब संभाजी राजास पाठविला.

संभाजीच्या मदतीने दिलेरखानाने साताऱ्याजवळच्या भूपाळगडची मोहिम काढली व गड जिंकला. भूपाळगडाच्या बचावासाठी शिवाजी महाराजांनी १४००० ची कुमक पाठविली पण त्यापूर्वी किल्ला मुघलांच्या ताब्यात गेला. यानंतर विजापूरची मोहिम सुरू करण्यात आली. परंतु त्यात अपयश येऊ लागल्यामुळे त्याने मिरज व पन्हाळ्याकडे मोहिम वळविली. तिकोटा व अथणी येथे दिलेरखानाने प्रजेवर भयंकर अत्याचार केले. त्याचा परिणाम संभाजींच्या मनावर झाला तसेच आपणास कैद करण्याचा हुकूम बादशहा कडून आल्याने संभाजी राजास समजले. त्यातूनच २० नोव्हेंबर रोजी संभाजी राजे मुघलांचा पक्ष सोडून पन्हाळ्यास परत आला व शिवाजी राजांची भेट घेतली. दरम्यानच्या काळात मराठ्यांच्या लुटालुटींच्या मोहिमा सुरूच होत्या या घटने नंतर दिलेरखानाने पन्हाळगडावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी ठरला नाही. अशा तऱ्हेने संभाजी राजाला स्वतःच्या बाजूने वळवून मराठ्यांची नाकेबंदी करण्याचा दिलेरखानाचा प्रयत्न फसला. मराठ्यांच्या विविध सरदारांनी नाशीक, बागलाण, धरणगाव या सगळ्या प्रदेशावर पुन्हा आपले वर्चस्व निर्माण करून मुघलांना औरंगबाद पर्यंत माघार घेण्यास लावून जेरिस आणले. अखेरीस १६७८च्या अखेरीस मुघल बादशहाने मुअज्जम व दिलेरखानास उत्तरेस बोलावून घेतले.

शायिस्तेखानापासून बहादूरखानपर्यंत औरंगजेबाने पाठविलेल्या अनेक मुघल सरदारांना मराठ्यांनी पराभूत करून पाठविले होते. आपला प्रदेश, आपली संपत्ती, लोक व धर्म यांचे संरक्षण करून अखेरपर्यंत शिवाजी महाराजांनी मुघलांशी लढा दिला. त्यामुळे मराठ्यांचे पारिपत्य ही मुघल बादशहा औरंगजेबाची कायमस्वरूपी महत्त्वाकांक्षा होती. ती पूर्ण करण्यासाठीच तो अखेरपर्यंत प्रयत्न करत राहीला. परंतु त्यास यश आले नाही. सततच्या मोहिमा, दगदग,

कोटुंबिक कलह यामुळे आजारपण येऊन छ. शिवाजी महाराजांचा ४ एप्रिल १६८० रोजी रायगडावर मृत्यू झाला.

## ४.९ शिवाजी महाराज :- एक अलौकिक व्यक्तीमत्व

भारतीय इतिहासात १७व्या शतकातील मराठ्यांचा उदय ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी छ. शिवाजी राजांनी स्वराज्य स्थापनेचा संकल्प केला. तेव्हापासून अविरतपणे पुढील ३५ वर्षे त्यांनी स्वराज्याची स्थापना, दृढीकरण व विस्तार या ध्येयांना वास्तवात आणण्यासाठी खर्च केली. स्वराज्यनिर्माण केल्याशिवाय आपल्या प्रदेशातील लोकांना स्वतंत्रपणे जगता येणार नाही, याची त्यांना खात्री होती. म्हणूनच धर्म, पंथ, जाति यांचे भेद न मानता प्रत्येकाने स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सहभागी झाले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. आपल्या समवयस्क आणि समध्येयी लोकांतून अनेक गुणी माणसे अचूकपणे हेरून त्यांच्यात स्वराज्याची प्रेरणा छ. शिवाजी महाराजांनी निर्माण केली. स्वतःच्या विचारांमधून आणि वर्तनातून आपल्या बद्दल लोकांच्यात विश्वास निर्माण करून एका समान ध्येयाने समाजाला त्यांनी प्रेरित केले. जातिभेद, पंथभेद व आर्थिक विषमता यापेक्षाही राष्ट्रकार्य मोठे आहे, याची जाणीव त्यांनी समाजाला करून दिली. त्यासाठी समर्थ लष्कर, घोडदळ, शिस्तबद्ध सैनिक नौदल याची निर्मिती त्यांनी आपल्या हिंमतीवर केली. किल्ल्यांचे महत्त्व ओळखून किल्ल्यांचे बांधकाम, डागडूजी व संवर्धन करण्यावर त्यांचा भर असे.

किल्ले व प्रदेश मिळवल्यावर त्याचे प्रशासन करण्याचे प्रशिक्षण त्यांना लहानपणापासून मिळाले होते. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील छ. शिवाजी महाराज एक कुशल प्रशासक होते. एखादा मुलुख काबीज केला की तेथील प्रशासन व्यवस्था लावून आपल्या राजवटीची वैशिष्ट्ये ते दाखवून देत असत. राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी कार्यक्षम प्रशासकांची गरज असते, या विचाराने प्रशासनात नेमणूका करताना गुण व निष्ठा हाच प्रमुख निकष लावला जात असे.

छ. शिवाजी महाराजांचे समकालीन इतर राजांमध्ये न सापडणारे वैशिष्ट म्हणजे धार्मिक सहिष्णुता, नियुक्ती करताना, अधिकार पद देताना किंवा दान धर्म करताना आचरणातील सचोटीला ते महत्व देत असत. मशीद, कुराण व स्त्रीया यांचा अवमान आपल्या सैनिकांनीही कधी करता कामा नये, या बद्दल ते जागरूक असत.

शिवकाळाचे वेगळेपण ज्याप्रमाणे पराक्रम, प्रशासन, शिस्त, सहिष्णुता न्याय यात दिसते. तसेच बौद्धिक प्रगतीतही दिसते 'शिवभारत', 'राधामाधव विलास चंपू', 'दंडनिती' 'राज्यव्यवहार कोष' 'आज्ञपत्रे' इ. समकालीन लेखन यांचे साक्षीदार आहे. कलेच्या क्षेत्रात फार प्रगती झाली नसली तरीही स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा हा राजा दीर्घकाळ टिकणारे एतद्देशियांचे असे राज्य निर्माण करणारा ठरला की, ज्यामुळे त्यांची तुलना नेपोलियनशी केली जाते. म्हणूनच जदुनाथ सरकार म्हणतात. त्याप्रमाणे साम्राज्याचे विघटन होते, राजघराणी नष्ट होतात, पण लोकनेत्या शिवाजी महाराज सारख्या एखाद्या राजाची आठवण मात्र मानवजातीला चिरंतन प्रेरणा देत रहाते.

## ४.१० सारांश

मुघल साम्राज्यासारख्या मध्यवर्ती सत्तेशी निकराचा लढा देऊन निर्माण केलेल्या छोट्या स्वराज्याचे रक्षण करुन छ. शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. त्यांच्या जीवनकाळातच हे राज्य दृढ प्रशासनाच्या पायावर स्थिर झाले. छ. शिवाजी महारांज्यांच्या मृत्युनंतरही मराठ्यांचे राज्य स्थिर राहीले व खुद्द मुघल बादशहा औरंगजेबाने अथक प्रयत्न करुनही पुढील शतकभर मराठेशाही टिकून राहिली.

## ४.११ प्रश्न :

१) खालील गोष्टीचे शिवाजी महाराजांच्या जीवनात असलेले महत्त्व स्पष्ट करा.
   १. शायिस्तेखान प्रकरण
   २. शिवाजी महाराजांची आग्रा भेट
२) शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीच्या विशेष संदर्भासह मुघल संबंधाची सविस्तर माहिती द्या.
३) पुरंदरच्या तहाच्या विशेष संदर्भात मुघल मराठा संबंधाची चर्चा करा.
४) १६६०-७० या कालखंडातील मुघल मराठे संबंधाचा आढावा घ्या.

## ४.१२ अधिक वाचनासाठी संदर्भ -

१) कुलकर्णी, अ.रा., खरे ग.ह., 'मराठ्यांचा इतिहास' खंड पहिला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे, २००६.
२) डॉ. देशपांडे, प. नं. 'मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष' 'स्नेहवर्धन पब्लिशिंग हाउस, पुणे द्वितीय आवृत्ती २००१.'

❖❖❖❖

# ५

# अ) शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम १६७७-७८
# ब) मराठे आणि युरोपियन सत्ता

**अनुक्रमणिका :**


५.० उद्दिष्ट

५.१ प्रास्ताविक

५.२ मोहिमेची पूर्व - पिठीका

५.३ कर्नाटक मोहिमेची कारणे

५.४ मोहिमेच्या काळातील घटना

५.५ मोहिमेचे परिणाम

५.६ समालोचन

५.७ शिवाजी महाराज व पोर्तुगीज

५.९ मराठे आणि इंग्रज

५.१० शिवाजी महाराज आणि डच

५.११ मराठे आणि फ्रेंच

५.१२ सारांश

५.१३ प्रश्न

५.१४ संदर्भ


## ५.० उद्दिष्टे

१) कर्नाटक मोहिमेची कारणे व स्वरुप अभ्यासणे

२) मोहिमेतील घटना व परिणाम समजुन घेणे.

३) शिवाजी महाराज व युरोपियन सत्ता यांच्यातील संबंधाचे परिक्षण करणे

## ५.१ प्रास्ताविक

इ.स. १६७४ च्या राज्यभिषेकानंतर मराठ्यांच्या तिजोरीवर बराच ताण पडला होता. परिणामी मराठा फौजेच्या फलटणींनी विविध ठिकाणी हल्ले सुरू केले होते. आदिलशाही कोकण परिसरात संघर्ष सुरू होतेच. अशा परिस्थितीत दक्षिण भारतातील सत्तेच्या समिकरणांमध्ये बदल सुरू झाले. आदिलशाही दरबारातील कलह, उत्तरेतून मुघली आक्रमणाचे संकट, कुतुबशाहीत

वाढणारे हिंदू कारभाऱ्याचे वर्चस्व यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय हालचालींना वेग आला व त्यांनी कुतुबशाहीकडून आलेला मैत्रीचा प्रस्ताव मान्य केला. समकालीन पत्र संग्रहावरून कर्नाटक स्वारी मागे बरीच कारणे समजून घेता येतात. मुघलांच्या भीतीने मराठ्यांबरोबर उघड तह किंवा मैत्री करणे शक्य नव्हते. त्यामुळे वेगळ्या मार्गाने आदिलशाही प्रदेशातील कुतुबशाहीचा मुलुख आपण परत मिळवित आहोत, व शिवाजी महाराजास महसुलाच्या रूपाने पैसा गोळा करण्याची संमती देत आहोत असे कुतुबशहाने भासविले. शिवाजी महाराजांनी मालोजी घोरपडे यांना लिहिलेल्या पत्रावरून आदिलशाहीतील पठाणांचा बंदोबस्त करणे हा स्वारीचा एक प्रमुख हेतु असल्याचे दिसते.

राज्यभिषेकानंतर छ. शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिमेची योजना आखली. यामागे त्यांचे बरेच हेतू होते. या मोहिमेतून पुन्हा एकदा त्यांच्या राजकीय व लष्करी कौशल्याचा प्रत्यय येतो. दक्षिण भारतातील सर्वाधिक यशस्वी राजा म्हणून त्यांचा लौकिक सार्थ ठरला. छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील पुन्हा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून कर्नाटक मोहिमे बद्दल सांगता येते. मराठा राज्याच्या भावी दृढीकरणाच्या दृष्टीने टाकलेले हे पाऊल कसे यशस्वी झाले, ते समजुन घेणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

शिवज्याभिषेकानंतर दिग्विजयी मोहीम आखण्याची गरज भासली. आर्थिक समस्या हा नेहमीचा प्रश्न असला तरी राजकीय परिस्थिती, लष्करी सिध्दता तेवढीच महत्त्वाची होती. दक्षिणेतील राजकीय स्थिती, कुतुबशाहीचा सत्ता विस्ताराचा प्रयत्न छ. शिवाजी महाराजांची किर्ती व वाढणारा प्रभाव या सर्व कारणांमुळे कर्नाटक मोहिमेची आखणी झाली.

महाराष्ट्रात समुद्र किनारा असल्यामुळे परकीय सत्तांचा येथील प्रभाव वाढू लागला. प्रथम व्यापार नंतर धर्म प्रसार व पुढे राजकीय हस्तक्षेप या सर्व गोष्टींमुळे शिवाजी महाराजांना त्यांच्या संदर्भातील धोरण ठरवावे लागले. या संदर्भातील माहिती आपण या प्रकरणात घेणार आहोत

## ५.२ मोहिमेची पूर्वपिठीका

कर्नाटकची भूमी नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असणारी सुवर्णभूमी म्हणून ओळखली जात असे. तर पूर्व किनाऱ्यावरील मद्रासचा प्रदेश अनेक शतकांपासून व्यापार केंद्र असणारा होता. येथील धार्मिक संस्थाने अत्यंत श्रीमंत परंतु राजकीय सत्ता तितकीच दुर्बल होती. अशा भूमीचा प्रदेश सामर्थ सत्ताधिशाच्या हातात असावा, या हेतूने आदिलशाही दरबारातील पठाण व दक्षिणी मुसलमान त्यांच्यातील संघर्ष आणि कुतुबशाही समोर असणारे मुघली आक्रमणाचे संकट या दोन्हींचा फायदा कर्नाटकवर नियंत्रण स्थापन करण्यासाठी करावा हा छ. शिवाजी राजांचा प्रयत्न होता.

विजयनगरच्या अस्तानंतर अनेक छोटे मोठे संस्थानिक निर्माण झाले होते. त्यांना पाळेगार व नायक असे म्हटले जात असे. तंजावर, मदुरा, म्हैसुर व वेल्लोर येथील नायक एकमेकांशी सतत संघर्ष करित असत. आदिलशहानेही उत्तरेत सत्ता विस्तार करण्याची संधी न मिळाल्यामुळे दक्षिणेत अर्कोट, कर्नूल, वेल्लोर अशाच ठिकाणी आपले नियंत्रण निर्माण केले. १२ जानेवारी १६७६ मध्ये व्यंकोजीने तंजावर जिंकले आणि तेथे स्वतःचे स्वतंत्र राज्य स्थापन

केले. त्याचे व मदुरेच्या नायकाचे संबंध तणावाचे होते. शेरखान लोदी हा वालिगंडपूर वर नियंत्रण ठेवून होता. विजापूरी सुभेदार नासिर मुहम्मद हा जिंजींचा प्रशासक असून फ्रेंचांकडून पराभूत झाला होता.

शेरखान लोदी आणि नासिर मुहम्मद यांच्यातील संघर्षामुळे कुतुबशाहीने शेरखानाच्या विरोधात नासिर मुहम्मदशी सख्य निर्माण केले. मादण्णा या गोवळकोंड्याच्या प्रधानाच्या डोक्यात मात्र छ. शिवाजी राजांच्या मदतीने कर्नाटक जिंकण्याचा विचार होता. दक्षिणचा प्रदेश पठाणांच्या व मुघल सुभेदारांच्या नियंत्रणातून मुक्त करण्याचा त्याचा विचार होता.

## ५.३ कर्नाटक मोहिमेची कारणे :-

दक्षिणेतील राजकीय अस्थिरता हे जरीही छ. शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमचे एक महत्त्वाचे कारण असले तरीही त्या व्यतिरिक्त पुढील गोष्टीही त्यांच्या स्वारीस कारणीभूत होत्या.

१) आदिलशाही दरबारातील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत होती. दक्षिणी मुसलमान आणि अफगाणी पठाण यांच्यातील वाढता संघर्ष खवासखानाच्या हत्येस जबाबदार ठरला. पुढे खिज्रखान या अल्पवयीन आदिलशहाच्या समर्थकासही दरबारी कारस्थानांना बळी पडावे लागले. बहालोलखान आणि मुघल सुभेदार बहादूरखान यांच्यातील संघर्षामुळे मोडकळीस आलेल्या आदिलशाहीवर अधिकच कठीण प्रसंग आला या संकटातून छ. शिवाजी राजांच्या मोहिमांकडे लक्ष देणे आदिलशहास अशक्य होते.

२) दक्षिणचा मुघल सुभेदार बहादूरखान यांच्याशी छ. शिवाजी महाराजांचा संपर्क येऊन राजांनी हुशारीने त्याच्याशी संधान बांधून संभाजीसाठी ६००० ची मनसब मिळविली. या दरम्यान मुघलांचा आदिलशाही संपविण्याचा प्रयत्न होता व त्या पासून त्यांना छ. शिवाजी महाराजास लांब ठेवायचे होते. कर्नाटक मोहिमेसाठी हा योग्य काळ होता. या जाणीवेने छ. शिवाजी राजांनी निराजी रावजी या आपल्या वकिलास बहादूरखानाकडे पाठविले आणि आपले तटस्थतेचे धोरण कायम ठेवण्याचा निर्णय कळविला.

३) राज्याभिषेक आणि इतर मोहिमांमुळे मराठ्यांना खजिना रिक्त झाला होता. याच दरम्यान कर्नाटकच्या समृद्ध प्रदेशाची माहितीही मिळत होती. मराठ्यांच्या मोहिमेसाठी एक अनुकूल घटना या काळात घडली. ती म्हणजे रघुनाथपंत हणमंते हा व्यंकोजीचा सल्लागार शिवाजीराजांना येऊन मिळाला. उत्तरेत सुरत किंवा इतर कोणताही प्रदेश तेवढा समृद्ध नव्हता, म्हणूनच कर्नाटककडे लक्ष वळले.

४) व्यंकोजी, छ. शिवाजीराजांचा सावत्र भाऊ शहाजीराजांच्या कर्नाटक येथील जहागिरीत वास्तव्यास असून आदिलशहाच्या दरबारातील सरदार होता. आपल्या वडीलांच्या जहागिरीतील काही हिस्सा आपणही घेऊन नवीन किल्ले बांधून उत्तरेतील शत्रुविरूद्ध भक्कम मोर्चे बांधणी करावी, हा स्वारीमागचा एक महत्त्वाचा हेतू होता.

५) मादण्णा पंडित, कुतुबशहा अबुल हसन याचा चतुर वजीर असून त्यांच्याच सल्ल्याने कुतुबशहाने छ. शिवाजी राजांची भेट घेऊन कर्नाटक प्रांतातील विविध प्रदेश जिंकून आपल्या राज्यात समाविष्ट करण्याची व त्यासाठी छ. शिवाजी राजांची मदत घेण्याची योजना आखली. मराठ्यांच्या दृष्टीने या मोहिमेचा सर्व खर्च कुतुबशहाकडून मिळणार असल्याने मिळालेल्या प्रदेशाचा ताबा कुतुबशहाकडे देण्याची त्यांची तयारी होती.

**आपली प्रगती तपासा**

प्रश्नः कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

___

___

___

___

___

## ५.४ मोहिमेच्या काळातील घटना :

प्रल्हाद निराजी या आपल्या वकिलास कुतुबशहाकडे पाठवून त्याच्यामार्फत मादण्णा व कुतुबशहा यांच्याशी बोलणी छ. शिवाजी राजांनी प्रत्यक्ष भेटीपूर्वीच केली. जानेवारी १६७७ मध्ये रायगड सोडण्याआधी शिवाजीराजांनी आपल्या प्रदेशाच्या प्रशासनाची घडी नीट बसवली. मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, दत्ताजी त्रिबंक आणि युवराज संभाजी यांच्यावर जबाबदारी सोपविली. या सर्व कर्तबगार कारभाऱ्यांनी चोख प्रशासनाचे अश्वासन दिल्यावरच मोहिमेची सुरूवात झाली.

**गोवळकोंड्यात प्रवेश :**

फेब्रुवारी १६७७ मध्ये मराठा सैन्याने हैदराबादमध्ये प्रवेश केला. मादण्णा अकण्णा आणि राज्यातल्या काही ज्येष्ठ लोकांनी छत्रपती शिवाजी राजांचे स्वागत केले. शहरात उत्तम सजावट करण्यात आली होती. रस्त्यावर दुतर्फा छ. शिवाजी राजांच्या दर्शनासाठी लोकांनी गर्दी केली होती. मराठ्यांचे सुमारे ५०,००० सैन्य शिस्तबद्ध पद्धतीने नगरात प्रवेशले. छ. शिवाजी राजांवर पुष्पवृष्टी करून लोकांनी आपले प्रेम व आदर व्यक्त केला. स्त्रीयांनी पंचारती ओवाळून शुभेच्छा दिल्या, छ. शिवाजी राजांनीही जमलेल्या लोकांवर सोन्या चांदीची फुले उधळली आणि महत्त्वाच्या नागरिकांचा गौरव केला. कुतुबशहाच्या राजधानीत झालेला हा यशस्वी प्रवेश पुढील मोहिमेच्या दृष्टीने निश्चित खूप महत्त्वाचा ठरला.

**शिवाजी महाराज व कुतुबशहा :**

छत्रपती शिवाजी महाराज व कुतुबशहा यांच्या बैठकीतून तहाची कलमे ठरविण्यात आली. ती पुढीलप्रमाणे -

१) कुतुबशहाने मराठ्यांना मोहिमेचा खर्च म्हणून ३००० होन रोज किंवा साडेचार लाख रूपये महिना, ५००० सैन्य आणि त्यांचा सेनापती बरोबर द्यावा.

२) मराठ्यांना आवश्यक ती तोफखान्याची मदत करावी.

३) या बदल्यात शहाजीराजांचा प्रदेश वगळता ठरलेले सर्व प्रदेश मराठ्यांनी कुतुबशहास द्यावेत.

४) मुघल व विजापूर या शत्रुंविरूद्ध मराठ्यांनी कुतुबशहास मदत करावी व त्याबदल्यात शहाने दरवर्षी १ लाख होनांची रक्कम द्यावी. मराठ्यांनी आपला एक वकिल कुतुबशहाच्या दरबारी ठेवावा. तहातील ही कलमे मान्य करून मार्च १६७७ मध्ये शिवाजीराजांनी पुढील मोहिमेची सुरूवात केली. कर्नूलवर पहिली स्वारी करून त्यांनी पाच लाख होनांची वसुली केली. बारा ज्योर्तिलिंगांपैकी एक श्री शैल्य मल्लिकार्जुनाचे दर्शन घेऊन जिंजी व वेल्लोरची मोहिम सुरू केली.

**जिंजी व वेल्लोर मोहिम :**

तिरूपती, पेड्डापोलम व मद्रास मार्गे, मराठा सैन्य जिंजी पर्यंत पोहचले. नासिर मुहम्मद खान जिंजीचा मुघल सुभेदार होता. त्याने अर्धा लाख वार्षिक उत्पन्नाच्या जहागिरीच्या बदल्यात १३ मे १६७७ रोजी किल्ला मराठ्यांच्या ताब्यात दिला. फारसे परिश्रम न घेता एक महत्वाचा किल्ला छ. शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. रायाजी नलगे यास जिंजीचा कारभारी नियुक्त करून २३ मे रोजी ते वेल्लोर कडे निघले. अब्दुला खान हा हबशी सरदार वेलोरचा किल्लेदार होता. अत्यंत अभेदय असा हा किल्ला त्याने सुमारे चौदा महिने लढविला. किल्ल्याचे वर्णन करताना सभासद म्हणतात. 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही. कोटात जीत पाणियाचा खंदक, पाणियास अंत नाही. असे उदकात दहा हजार सुसरी, कोटाचे फांजिया वरून दोन गाडिया जोडून जावे ऐशी मजबुती, पडकोट तरी चार चार फेरियावरी फेरे, ये जातीचा कोट" या किल्ल्याची जबाबदारी रघुनाथपंत आणि आनंदराव यांच्यावर सोपवून छ. शिवाजी महाराज शेरखान लोदीच्या पाठलागावर निघले. अकलनाथक जंगलाचा आश्रय घेतलेल्या शेरखानाने मराठ्यांना प्रतिकार केला. परंतु मराठ्यांनी त्यास पराभूत करून बरीच लूट मिळविली. २० हजार होनांची खंडणी देण्याचेही मान्य केली. अशा मोहिमांच्या काळात जिंकलेला प्रदेश व किल्ले कुतुबशहाला देणे आवश्यक होते. परंतु त्याकडे मराठ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे गोवळकोंड्यातून दिला जाणारा खर्च थांबला. यामुळे आर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे मराठ्यांनी किनारपट्टीच प्रदेशातून वसूलीची सुरूवात केली.

**शिवाजी महाराज व व्यंकोजी राजा :**

जुलै, १६७७ मध्ये तिरूमलवाडी जवळ शिवाजी महाराज व व्यंकोजी यांची भेट झाली. सुरूवातीचे दिवस एकमेकांना भेटी व मेजवन्या देण्यामध्ये गेले. त्यानंतर छ. शिवाजी राजांनी मुख्य विषय मांडला. शहाजी राजांच्या दक्षिणेकडील संपत्तीचा वाटा, पैसे, जडजवाहीर किंवा प्रदेशाची निम्मी वाटणी मागितली. त्यानंतर व्यंकोजीनेही महाराष्ट्रातील प्रदेशाची मागणी केली. परंतु वडिलांची जहागीर केवळ ४०,००० होन वार्षिक उत्पन्न देणारी होती व आता जे काही आहे ते शिवाजीराजांनी स्वतः निर्माण केले आहे. त्यामुळे त्यावर व्यंकोजीचा हक्क असण्याचा प्रश्नच येत नाही, असे उत्तर त्यांनी दिले. व्यंकोजी राजांनीही तंजावरही प्राप्ती वडिलांच्या मृत्युनंतर झाली असून त्यावर शिवाजीचा अधिकार नाही, असे उत्तर दिले. या परिस्थितीतून संघर्षाशिवाय पर्याय नसल्याचे लक्षात आल्याने एका पहाटे व्यंकोजी छ. शिवाजी राजांच्या छावणीतून निसटले. तंजावरचे चार मंत्री व एका व्यापाऱ्याला ओलीस ठेवून छ. शिवाजी राजांनी जनार्दन हणमंते यांस तंजावरच्या मोहिमेवर पाठविले. दरम्यान बंगलोर, होस्कोट आणि कोलार हे प्रदेश जिंकले.

म्हैसूर व मदुरेच्या नायकाच्या मदतीने व्यंकोजीने मराठ्यांच्या सैन्यावर हल्ला करण्याचे ठरविले. १६ नोव्हेंबर १६७७ रोजी त्यांने संताजी भोसलेच्या नेतृत्वाखालील मराठ्यांवर हल्ला

करून त्यांचा पराभव केला. परंतु नंतर वलीगंडपूर येथे व्यंकोजीच्या सैन्याला अचानक गाठून संताजीने त्यास पराभूत केले. हंबीरराव मोहिते यांनीही व्यंकोजीला पराभूत केल्यामुळे रघुनाथपंत हणमंते यांच्यामार्फत संपर्क साधून व्यंकोजीने तह केला. या तहातील अटी पुढीलप्रमाणे -

१) जिंजी, इतर किल्ले व म्हैसुर छ. शिवाजीराजांकडे राहील.

२) तंजावर व आसपासचा ७ लक्ष होनांचा मुलुख व्यंकोजीच्या ताब्यात राहील. त्या बदल्यात सहा लक्ष होन मराठ्यांना देण्याचे त्याने मान्य केले.

३) बंगलोर, होस्कोट हे प्रदेश व्यंकोजीची पत्नी दिपाबाई हिस जहांगिरी म्हणून देण्यात येतील.

या तहानंतर मराठ्यांनी पार्टो नोव्हा व अर्काट आपल्या वर्चस्वाखाली आणले. जानेवारी १६७८ मध्ये म्हैसुर मार्गे परत येताना कोप्पळ, गदग, बंकापूर इत्यादी ठिकाणे काबीज केली. त्यातच श्रीरंगापट्टणवरही आक्रमण करून तेथिल लूट केली. वेळगांव जिल्ह्यातून परत येताना बेलवली या ठिकाणी स्थानिक देसाई सावित्रीबाईचा विरोध दडपून तिचा पराभव करून करून एप्रिल १६७८ मध्ये छ. शिवाजीराजे पन्हाळगडास परत आले व तेथून रायगडवर पोहचले. अशा पद्धतीने कर्नाटक मोहिमेची सांगता झाली.

कर्नाटकची स्वारी एकूणच यशस्वी झाल्यामुळे महाराजांची किर्ती सर्वदूर पसरली. बराच मोठा प्रदेश किल्ले आणि संपत्तीची प्राप्ती झाल्यामुळे दक्षिणेकडील ही मोहिम दिग्विजय ठरली. जिंकलेल्या प्रदेशांची योग्य व्यवस्था लावून संताजी भोसले यास सुभेदार तर रघुनाथपंत हणमंते यांना सल्लागार म्हणून नियुक्त करून दक्षिणेत एक नवीन राज्यचं महाराजांनी निर्माण केले. सुरतच्या कागदपत्रात पुढील उल्लेख सापडतो, 'अगदी अल्पकाळात विनाविरोध सुरतेपासून कन्याकुमारी पर्यंतच्या मुलखाचा स्वामी होण्यास वेळ लागणार नाही.' कर्नाटक मोहिमेबाबत आणखी एका इंग्रजी पत्रातील उल्लेख पहा, 'स्पेनमध्ये सिझर ज्याप्रमाणे आला, त्याने पाहिले आणि जिंकले त्याप्रमाणे कर्नाटकात छ. शिवाजी आला, त्याने पाहिले आणि जिंकले'. थोडक्यात राज्याभिषेकानंतर दक्षिण हिन्दूस्थानात मोठा विस्तार करुन शिवाजीने आपल्या स्वराज्याची इमारत पक्की केली.

## ५.५ मोहिमेचे परिणाम:

छ. शिवाजी महाराज व कुतुबशहा यांच्यातील सलोखा संपुष्टात येऊन बराच मोठा खर्च, दारूगोळा व सैन्य पाठवूनही त्यास कोणतीच विशेष प्राप्ती झाली नाही यामुळे संतापलेल्या कुतुबशहाने विजापूरशी संधी करण्याचा निर्णय घेतला. या दरम्यान मुघल बादशहा औरंगजेबानेही आदिलशहा व छ. शिवाजी महाराजास आपल्या प्रदेशातून जाण्याची अनुमती दिल्यामुळे कुतुबशहाच्या विरोधात मोहिम उघडली. दिलेरखान यास दक्षिणेकडे पाठविण्यात आले. मराठ्यांच्या दृष्टीने प्रदेश व संपत्तीची प्राप्ती जिंजी सारख्या अभेद्य किल्ल्यावर नियंत्रण, फ्रेंच, नायक व पाळेगारांवरील नियंत्रण आणि सर्वात मोठे म्हणजे मराठ्यांच्या मुत्सदेगिरीचा प्रचंड विजय, स्वतंत्र सत्ताधीश म्हणून छ. शिवाजी राजांचा सन्मान, विरोधकांवर नियंत्रण अशा अनेक गोष्टी साध्य करण्यात यश मिळाले. या मोहिमेनंतर काही काळातच राजपुत्र संभाजी दिलेरखानाला जावून मिळाल्यामुळे मुघलांचा उत्साह काही काळ वाढला, परंतु त्यांचा फारसा

उपयोग झाला नाही. अंतर्गत दुहीने ग्रस्त झालेल्या आदिलशाहीकडे मुघलांचा मोर्चा वळला. छ. शिवाजीराजे व संभाजी राजे यांच्यात पुन्हा एकदा दिलजमाई झाली. छ. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील ही शेवटची सर्वांत मोठी व यशस्वी मोहिम मराठ्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करणारी ठरली.

## ५.८ मराठे व पोर्तुगिज संबंध

मराठ्यांच्या स्वराज्य स्थापनेच्या सुरूवातीस पोर्तुगिज गोव्याचे राज्यकर्ते असल्यामुळे त्यांचे धोरण स्वतंत्रपणे आखलेले होते आणि त्यांचा मराठ्यांच्या राज्य स्थापनेला तसेच विस्तारालाही पोर्तुगिजांचा पहिल्यापासूनच विरोध होता. परंतु इतर युरोपीयनांशी राजकारण साधण्यासाठी त्यांनी मराठ्यांशी मैत्रीचे संबंध जोडण्याासाठीचे दिखाऊ धोरण स्वीकारले. पोर्तुगिजांचे वसईवरील नियंत्रण तसेच मराठ्यांशी मैत्रीचे संबंध जोडण्यासाठीचे दिखाऊ धोरण स्वीकारले. पोर्तुगिजांचे वसईवरील नियंत्रण तसेच मराठ्यांच्या विरोधात सिद्दिंना मदत करण्याचे धोरण, तळकोकणातील मराठ्यांविरोधी कारवाया करणाऱ्या देसायांना आश्रय, आदिलशहास गुप्तपणे मदत, ख्रिस्तिधर्माची धर्मांतरे करून सुरू केलेला प्रचार तसेच मराठ्यांच्या दमण व रामनगरच्या कोळी राजाकडून केलेल्या चौथ वसुलीला विरोध या सर्व कारणांमुळे मराठे व पोर्तुगिज यांच्यात फारसे सामजंस्य निर्माण होऊ शकले नाही. तरी मुघल मराठे संघर्षाच्या काळात पोर्तुगिजांकडून मिळालेली मदत तसेच अरमारांच्या बांधकामासाठी चे मिळालेले तंत्रज्ञान यामुळे छ. शिवाजी महाराजांच्या काळात मराठे पोर्तुगीज संबंध काहीवेळा तणावाचे तर  तर काही वेळा मैत्री अशा आवर्तनातून गेलेले दिसतात.

**मराठे व पोर्तुगीज १६५९-१६७० :**

मराठ्यांचा भिवंडी व कल्याणवरील विजय त्यानंतर सुरू झालेले जहाजांचे बांधकाम यामुळे वसईचे संरक्षण करण्याची गरज पोर्तुगिजांसमोर निर्माण झाली. मराठ्यांचे नव्याने निर्माण झालेले स्वराज्य अनेक बाजुंनी शत्रूंनी वेढलेले असल्यामुळे अशा काळात नवीन शत्रुत्व ओढावून न घेता पोर्तुगिजांना तटस्थ कसे ठेवता येईल, याचाच विचार शिवाजींनी केला. १६५९ मध्ये मराठ्यांनी आरमाराची मुहुर्तमेढ रोवली त्यावेळी पोर्तुगिज तंत्रज्ञांची मदत मिळाली. परंतु गोव्याच्या व्हॉइसरॉयने या तंत्राज्ञांवर दडपण आणून त्यांना शिवाजी महाराजापासून फोडले. १६६९ मध्ये मराठ्यांनी दंडराजपुरीस वेढा घातला त्यावेळी पोर्तुगिजांनी सिद्दीस धान्य व दारूगोळा पूरविला. या संदर्भात डॉ. पिसुर्लेकर लिहितात, ‘सिद्दी व शिवाजी यांच्यामधील संघर्षात पोर्तुगिजांचा ओढा जसा सिद्धिकडे होता, त्याचप्रमाणे आदिलशहा व शिवाजी महाराज यांच्या लढ्यात पोर्तुगीज आदिलशहास गुप्तपणे मदत करीत किंवा शिवाजी महाराजांच्या भितीमुळे निदान तटस्थ तरी राहत पण शिवाजींची बाजू घेत नसत, सत्तेचा तोल राखण्यासाठी पोर्तुगिजास असे करणे भाग पडे’.

मुघल आणि शिवाजी महाराज यांच्या संघर्षात मात्र पोर्तुगिजांनी मराठ्यांना गुप्तपणे मदत केलेली दिसते. पोर्तुगालच्या व्हॉइसरॉयने केलेल्या नोंदीनुसार सुरत लुटीनंतर परत येताना शिवाजी राजांनी वेळ आली तर पोर्तुगीजांच्या प्रदेशाचा आश्रय घेता येईल असा मार्ग निवडला होता. तसेच पोर्तुगिजांचा मराठ्यांना पाठिंबा असल्याचे लक्षात येताच मुघल सरदार लोदीखान यांने वसई परिसरावर हल्ले चढविले. तेव्हा त्यांना मुघलांशी तह करावा लागला. १६६५ च्या मिर्झा राजांच्या मोहिमेच्या काळात पोर्तुगिजांना त्यांच्याशी सलोख्याचा तह केला. तसेच

आग्र्याहून सुटकेच्या घटनेनंतर मात्र शिवाजी राजांच्या साहसाची बातमी पोर्तुगालच्या राजास कळवताना त्यांनी शिवाजी महाराजाची तुलना सीझर व अलेक्झांडरशी केलेली आढळते.

काही काळानंतर शिवाजी राजांचे विरोधक लखम सावंत व केशव नाईक यांना पोतुगिजांनी आश्रय दिल्यानंतर मराठ्यांनी त्यांना धडा शिकविण्यासाठी १६६७ मध्ये बारदेशवर स्वारी केली. १९ मे ते २२ नोव्हेंबर १६६७ या काळात बारदेश मधील अनेक गावे लुटून ख्रिस्ती धर्मोपदेशकांवर हल्ला केल्याची नोंद डचांनी केली आहे. पुढे पोर्तुगीजांनी मराठ्यांशी तह केला. त्या तहातील तरतूदी पुढीलप्रमाणे

१) पोर्तुगिजांनी कोणत्याही बंडखोर देसायांना आश्रय देऊ नये.
२) लखम सावंत व केशव नाईक या बंडखोरांना गोव्याबाहेर घालून द्यावे. नोव्हेंबर १६६८ मध्ये गोव्यात जाऊन उठाव घडवून पोर्तुगिजांची सत्ता संपुष्टात आणण्याची धाडसी योजना मराठ्यांनी आखली परंतु ती यशस्वी झाली नाही. मुघलांशी या काळात अटीतटीचा संघर्ष सुरू झाल्यामुळे मराठ्यांनी १६७० मध्ये पोर्तुगिजांशी तह केला त्यानुसार

१) मराठे व पोर्तुगिज यांनी परस्परांच्या लुटलेल्या जहाजांची नुकसान भरपाई द्यावी.
२) मुघलांच्या जहाजांप्रमाणे मराठ्यांच्या जहाजांनाही सवलती द्याव्यात.
३) सरहद्दी जवळील भागात किल्ले बांधू नयेत.
४) मराठे आणि सिद्धी यांच्या संघर्षात मराठ्यांच्या बाजूने सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

या तहानंतरही मराठे व पोर्तुगिज यांच्यात मैत्री निर्माण झाली नाही. राज्याभिषेकानंतर १६७४ मध्ये रामनगरच्या कोळी राज्यावर आक्रमण करून बराच भाग आपल्या राज्यात सामिल करून घेतला व काही भागातील चौथाई वसुलीचा हक्क पोर्तुगीजांकडे मागितला जो काही काळानी मराठ्यांना देण्यात आला. पुढे १६८० च्या सुमारास पुन्हा गोव्यावर मोहिमेची बातमी पसरली परंतु त्यापूर्वीच शिवाजी महाराजांचा मृत्यु झाला. या बातमीमुळे गोव्यातील तत्कालीन गव्हर्नरने सुस्कारा सोडला. तो म्हणतो, ''शिवाजीच्या मृत्युमुळे हे राज्य आता काळजीतून मुक्त झाले. युद्धापेक्षा शांततेच्या प्रसंगी तो अधिक भीतिदायक होता.'' या उद्‌गारावरून छत्रपती शिवाजी राज्यांच्या काळात पोर्तुगीजांवर असलेल्या दडपणाची कल्पना येते.

**आपली प्रगती तपसा**

प्रश्नः शिवकाळातील मराठे व पोर्तुगिज यांच्या संबंधाचा आढावा घ्या.

## ५.९ इंग्रज - मराठे संबंध

अफजलखानाच्या वधानंतर छत्रपती शिवाजी राजांचा कोकणातील इंग्रजांशी पहिला संबंध आला. अफझलखानाच्या मालकीची तीन जहाजे दाभोळ बंदरात माल घेऊन आली होती. परंतु अफझलखानाच्या घटनेपूर्वीच दाभोळ मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आले होते. त्यामुळे ही जहाजे दाभोळ सोडून राजापूरला गेली. राजापूर येथे इंग्रजांची वखार होती. अफझलखानाने तेथील विजापूरी सुभेदार अब्दुल करीम यास जहाजे ताब्यात घेण्याची सूचना केली. परंतु त्यातील एक जहाज इंग्रजांनी बळकावले. खानच्या वधानंतर मराठ्यांनी जानेवारी १६६० मध्ये राजापूरवर हल्ला केला व इंग्रजांकडे खानाच्या जहाजाची मागणी केली. काहीतरी निमित्त सांगून इंग्रजांनी टाळाटाळ सुरू केली. इतकेच नव्हे तर जहाजावरील उरलेल्या लोकांना मराठ्यांविरूद्ध फितवले. तेव्हा चिडून दोरोजी या मराठा सरदाराने इंग्रजांचा दलाल बाबाजी व प्रतिनिधी गिफर्ड यांना कैद केले पुढे महिनाभराने गिफर्डची मुक्तता झाली.

पुढे शिवाजी महाराज पन्हाळगडाच्या वेढ्यात अडकले व सिद्धी जौहरने वेढा सुरू ठेवला. तेव्हा पुन्हा एकदा मराठे व इंग्रज यांच्यात तणाव निर्माण झाला. पन्हाळगढाला वेढा पडलेला असताना विजापूरी सैन्याला दारूगोळा पुरविण्यासाठी राजापूरच्या इंग्रज वखारीचा अधिकारी रेव्हिंग्टन स्वतः आला होता. दारूगोळा कसा उडवावा याचे प्रत्यक्षिकही दाखविले. तोफांवर इंग्रजी निशाण फडफडवत त्याने मराठ्यांचा रोष पत्करला. परंतु त्या परिस्थितीत सुटकेच्या विचाराला प्राधान्य असल्यामुळे शिवाजीराजांनी या घटनेची मनात नोंद ठेवली व पुढे संधी मिळताच १६६१ मध्ये राजापूर वखारीवर हल्ला केला.

### इंग्रज - मराठे संबंध १६६१-१६७३ :-

३ मार्च १६६१ या दिवशी राजापूरच्या वखारीवर हल्ला करून हेन्री रेव्हिंग्टन, रिचर्ड टेलर, रॅन्डॉल्फ टेलर आणि फिलीप गिफर्ड या अधिकाऱ्यांना मराठ्यांनी पकडले. पुढील एकवर्ष त्यांना अटकेत ठेऊन सिद्धी विरूद्ध मदत करण्याची अट सुटकेसाठी घालण्यात आली. सुरत वखारीतील अधिकाऱ्यांनी त्यांच्या सुटकेचा प्रयत्न केला. परंतु त्याचा फायदा झाला नाही. पुढे फेब्रुवारी १६६३ मध्ये त्यांची सुटका झाली.

पहिल्या सुरत लुटीच्या (१६६४) वेळेस इंग्रजांनी वखारीच्या संरक्षणाची तयारी केली. परंतु त्यांच्या वखारीवर हल्ला करणे हा हेतू नसल्यामुळे इंग्रजांना किंवा इतर युरोपियांना त्रास होणार नाही, याची खबरदारी मराठ्यांनी घेतली होती. दुसऱ्या सुरत लुटीच्या काळातही (१६७०) इंग्रज अधिकाऱ्यांनी आपले साहित्य बंदरातील जहाजांवर हालवून आपल्या संपत्तीचे रक्षण केले. या काळातही त्यांना आपल्या योजनेपासून लांब ठेऊन मराठ्यांनी राजनैतिक चतुराई दाखविली. या घटनेनंतर शिवाजी महाराजांशी प्रत्यक्ष बोलून सवलती मिळवण्याचा विचार तसेच राजापूरची वखार लुटल्याबद्दलची नुकसान भरपाई मागावी व पुन्हा राजापूरला वखार उघडण्याची परवानगी मिळावी या हेतूने स्टीक उस्टीक यास इंग्रजांनी शिवाजी राजांकडे पाठविले. या तहात मुंबई हातात आल्यामुळे तेथे स्वतंत्र बस्तान बसवण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी सुरू केला होता.

६ मार्च १६७२ रोजी उस्टीक शिवाजींच्या भेटीसाठी निघाला त्याच्याबरोबर राम शेणवी हा दुभाषी होता. राजांना नजराणा देऊन उस्टीकने राजापूरचा प्रश्न मांडला. परंतु नुकसान भरपाई म्हणून ५००० होन व राजापूरला वखार उघडण्यास सहानुभूती दाखऊ, या

अश्वासनांखेरीज काहीच फायदेशीर निष्पन्न झाले नाही. शिवाजी राजांनी दारूगोळा व शस्त्रे पुरविण्याचा पुर्नउच्चार केला. परंतु इंग्रजांनी मात्र त्याला फारसे महत्त्व दिले नाही. सिद्धीच्या विरोधात मराठ्यांना मदत करण्याच्या मराठ्यांच्या प्रस्तावाची इंग्रजांनी नेहमीच टाळाटाळ केल्याचे दिसते. मराठ्यांच्या मालकीच्या प्रदेशात २% टक्के दराने व्यापार करण्याचा मानसही इंग्रजांनी व्यक्त केला. परंतु नुकसान भरपाईच्या प्रश्नावरून एकूणच या शिष्टाईचा उपयोग इंग्रजांना झाला नाही.

थॉमस निकोलस या दुसऱ्या अधिकाऱ्यास मुंबईकर इंग्रजांनी शिवाजी महाराजाशी बोलणी करण्यास मे १६७३ मध्ये पाठविले. दरम्यान मराठ्यांनी इंग्रजांची हुबळी येथील वखार लुटली होती. ३ जून रोजी निकोलस याने राजांची भेट घेतली. हुबळीच्या लुटीचा विषय काढताच या लूटी बद्दल कोणतीच माहिती नसल्याचे सांगून त्याच्या नुकसान भरपाईचा प्रश्नच येत नसल्याचे त्यांनी सांगितले. मीठ व लाकूडफाटा पुरविण्याचे मात्र आश्वासन शिवाजी राजांनी दिले. यानंतर भीमाजी पंडित या आपल्या वकिलास मुंबईत पाठवून चर्चा करून १०,००० होन नुकसान भरपाई देण्याचे त्यांनी मान्य केले. पुढे १६७४ मध्ये राज्यभिषेक समारंभाच्या निमित्ताने नव्याने तह करण्यासाठी हेन्री ऑक्झिंडन यास नजराणा घेऊन रायगडावर पाठविण्यात आले. यावेळी झालेल्या तहात काही व्यापारी सवलती आणि राजापूर वखार पुन्हा उघडण्यासाठी परवानगी इंग्रजांना मिळाली.तसेच २.५ टक्यांपेक्षा अधिक कर असणार नाही, असे ठरले. चौल, दाभोळ व कल्याण येथे वखार उघडण्याची परवानगी मिळाली.

**इंग्रज-मराठे संबंध १६७४ नंतर :-**

इ.स. १६७५ मध्ये राजापूर वखारीची पुर्नस्थापना झाली. परंतु खानदेशातील धरणगांव येथील इंग्रजांची वखार मराठ्यांनी लुटल्यामुळे मराठे व इंग्रज संबंधात पुन्हा तणाव निर्माण झाला. सॅम्युअल ऑस्टीन (धरणगांव वखारीचा प्रमुख) १६७५ मध्ये पुन्हा शिवाजी महाराजांच्या भेटीस आला. प्रल्हाद निराजीच्या मध्यस्थीने भेट झाली. परंतु पुन्हा एकदा आपल्या सेनापतींकडून या संदर्भात कोणतीही माहिती न मिळाल्याने सांगून शिवाजी राजांनी नुकसान भरपाई नाकारली. पुढे शिवाजी राजांनी तोफा व बंदूकांची मागणी इंग्रजांकडे केली. परंतु औरंगजेबाचा रोष टाळण्यासाठी त्यांनी विनम्रतेने नकार दिला येथे एकूणच मराठे व इंग्रज या दोघांच्याही मुत्सदेगिरीची कल्पना येते.

पन्हाळगडच्या वेढा, तोफा बंदूक पुरविण्यास दिलेले नकार, सिद्दीच्या संदर्भात मदत नाकारणे व सिद्धींना आश्रय देणे या घटनांमधून शिवाजी महाराजांना इंग्रजांच्या धूर्तपणाची कल्पना आली होती. त्यामुळे इंग्रजांविषयी त्यांच्या मनात संशय होता. त्यांचे वर्तन दुटप्पी असल्यामुळे सावध भूमिका मराठ्यांनी घेतली. त्याचाच एक भाग म्हणून मुंबई बंदरासमोर असलेल्या खांदेरी बेटावर तट बांधण्याचे काम शिवाजी महाराजांनी सुरू केले. त्यांचा अधिकारी मायनाक भंडारी याच्या देखरेखीखाली काम सुरू होते. इंग्रजांनी रसद बंद करून चढाई करण्याचाही प्रयत्न केला. मराठ्यांचा आरमार प्रमुख दौलतखान याने तयारी सुरू केली व संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसू लागली. मुंबईहून केग्विनच्या नेतृत्वाखाली रिव्हेंज फ्रिगेट हे मोठे जहाज व ७ गलबते निघाली तर दौलतखानाकडे २० गुराबांचे आरमार होते. त्याशिवाय ४० ते ५० गलबते नागावच्या खाडीतून मदतीसाठी निघाली. इंग्रजी व मराठा आरमारामध्ये चकमकी सुरू झाल्या. मराठ्यांची काही गलबते बुडवली लोकही मृत्युमुखी पडले. परंतु संघर्ष सुरूच राहिला. अशा परिस्थितीत संख्याबळ कमी असल्यामुळे इंग्रजांची दमछाक होऊ लागली. कल्याणमार्गे मराठ्यांचे

सैन्य निघाल्याचे कळताच इंग्रजांनी जानेवारी १६८० मध्ये खांदेरीहून आपले आरमार काढून घेतले. सिद्दीचा इंग्रजांना मदत करण्याचा प्रयत्न मराठ्यांनी हाणून पाडला.

वरील अनेक घटनांमधून इंग्रज व मराठे यांचे परस्पर संबंध अविश्वास व संशयावर आधारित असल्याने मित्रत्वाचे झालेले दिसत नाहीत. परकीय सत्तेला आपल्या अंतर्गत घडामोडीत हस्तक्षेप करू न देणे, मर्यादित व्यापारास मान्यता देणे, त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे व अत्यंत सावधपणे संधी करणे, या शिवाजी महाराजांच्या धोरणामुळे आपल्या कार्यकाळात इंग्रजांसारख्या धूर्त, व्यापारी आर्थिक व लष्करी सत्तेला दूर ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केला. पुढे संभाजींच्या कारकिर्दीतही ब्रिटिशांशी तशाच प्रकारचे संबंध त्यांनी निर्माण केले.

**आपली प्रगती तपसा**

प्रश्नः इंग्रज मराठे संबंधावर भाष्य करा.

## ५.१० मराठे व डच संबंध

पोर्तुगीजानंतर भारतात आलेले पुढचे युरोपियन म्हणून डचांची ओळख आहे. १६३७ मध्ये त्यांनी वेर्गुर्ले या ठिकाणी एक किल्ला बांधला आणि १६४९ मध्ये आपली वखार स्थापन केली. शिवाजी राजांनी पुढे सिद्दींच्या विरोधात डचांची मदत घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा फारसा उपयोग झाला नाही. कोकणातील मराठ्यांच्या सततच्या मोहिमांमुळे डचांचा व्यापार स्थिर होऊ शकला नाही. शिवाजी राजांनी वेंगुर्ल्यातून डचांना हाकलून द्यावे यासाठी पोर्तुगिजांनी प्रयत्न केला. परंतु मराठ्यांना सिद्दी विरूद्ध डचांची मदत हवी असल्याने शिवाजींनी तो मान्य केला नाही. सुरत लुटींच्या वेळेस डचांनी खंडणी देणे शक्य नसल्याचे म्हटल्यामुळे मराठ्यांनी इतर युरोपियनांप्रमाणे त्यांना अभय दिले. तसेच सुरतच्या मुघल सुभेदाराने १६६५ मध्ये मराठ्यांच्याआरमाराविरूद्ध डचांची मदत मागितली असता त्यांनीही नकार दिला. मराठ्यांच्या बारदेशवरील मोहिमेच्या वेळी डचांनी मराठ्यांना पाठिंबा दिला. डच व पोर्तुगिज युरोपातील शत्रू असल्यामुळे डचांनी या संधीचा लाभ घेण्याचे ठरविले परंतु त्याचा फारसा फायदा त्यांना घेता आला नाही. दुसऱ्या सुरत लुटीच्या दरम्यान डचांनी मराठ्यांना नजराणा पाठविला. पण मराठे-डच संबंधात त्यामुळे बदल झाला नाही. १६६८-६९ मध्ये सिद्धींचा दंडराजपुरी हा किल्ला जिंकण्यासाठी डचांनी शिवाजीला मदत करण्याची तयारी दाखविली. पण मुंबईतून इंग्रजांना काढून टाकण्यासाठी शिवाजी राजांनी आपल्याला मदत करावी अशी अट त्यांनी घातली ही अट मराठ्यांना मान्य झाली नाही. परकीय सत्तांशी संबंध ठेवताना शिवाजी राजांनी केलेला चौफेर विचार दुरदृष्टीचा फायदा मराठ्यांना सत्तेचा विस्तार, संरक्षण व दृढीकरणासाठी झाला, असे म्हणता येईल. मराठ्यांच्या कर्नाटक स्वारीच्या काळात पोर्टो नोव्हो आणि तेगेनापट्टम या ठिकाणच्या डच वखारी धोक्यात आल्या, त्यावेळेस शिवाजीराजांकडे मौल्यवान भेटींचे नजराणे पाठवून डचांनी त्या परिसरातील व्यापाराच्या सवलती मिळवल्या. त्या प्रदेशातील फ्रेंच व डच

वसाहतींमध्ये सतत कुरबुरी व संघर्ष सुरू असत. पुढे राजाराम महाराजांच्या काळात पाँडेचरीवर हल्ला करून डचांनी तो प्रदेश जिंकला.

एकूणच शिवाजी राजांच्या कारकिर्दीत मराठ्यांची जमीन व समुद्रावरील वाढती सत्ता लक्षात घेता इतर युरोपियनांनी स्वीकारलेल्या नमत्या धोरणाचाच पुरस्कार डचांनीही केलेला दिसतो.

## ५.११ मराठे व फ्रेंच :-

भारतात येणारे शेवटचे युरोपियन म्हणजे फ्रेंच राजापूर मध्ये १६६८ मध्ये पहिली वखार फ्रेंचांनी उघडली. त्यानंतर मिरज, तेलीचरी आणि मसुलीपट्टम येथे फ्रेचांच्या वखारी उघडण्यात आल्या. मराठे व फ्रेंच यांचे संबंध येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मराठ्यांना सातत्याने भासणारी तोफा व बंदूकांची कमतरता यामुळेच सिद्दीना जिंकणे मराठ्यांसाठी दुरापास्त होऊन बसले. बाँरा व ब्लो ह राजापूर येथिल प्रमुख अधिकारी सुरत लुटींच्या वेळेस इतर युरोपियांप्रमाणे फ्रेंचांनाही मराठ्यांनी दुखवले नाही. उलट दुसऱ्या लुटीच्या वेळेस फ्रेंचांच्या मदतीने काशगरच्या राजाच्या वाड्यात प्रवेश मिळून मराठ्यांना मोठी संपत्ती मिळाली. १६७२ मध्ये बाँराने चौल बंदर मिळण्यासाठी बोलणी केली मात्र ती यशस्वी झाली नाहीत. याच काळात राजापूर येथे असणाऱ्या बाँराने विजापूरी सरदार बहलोलखान आणि शिवाजी यांच्यातील मतभेद मिटवण्याचा प्रयत्न केला.

कर्नाटक मोहिमेच्या काळात पाँडेचरीचा गर्व्हनर फ्रँकॉय मार्टिन याने वखार उघडण्याच्या परवानगी बरोबरच संरक्षणाचे आश्वासन शिवाजी महाराजांकडून मिळवले. फ्रेंच अधिकारी बाँरा आणि शिवाजी महाराज यांच्यात असणाऱ्या मैत्रीमुळे पाँडेचरीचा परवाना मराठ्यांनी फ्रेंचांना दिला. असे असले तरी फ्रेंच अधिकाऱ्यांच्या राजाविषयीच्या संकल्पनेत शिवाजी राजे बसत नव्हते. तरीही व्यापार व राजनैतिक संबंध लक्षात घेऊन त्यांनी मराठ्यांशी मैत्रीचे धोरण कायम ठेवले.

कर्नाटकातील विजयानंतर कारो मंडल किनाऱ्यावरील इतर ठाण्यांबरोबर पाँडेचरीही मराठ्यांच्या अंमलाखाली आली. फ्रेंच वखारीला परवाना देताना शिवाजी महाराजांनी मराठ्यांतर्फे दैनंदिन व्यवहारावर देखरेख ठेवण्यासाठी आपले दोन अधिकारी पाँडेचरी येथे पाठविले. मराठे कर्नाटकात येण्यापूर्वी शेरखान लोदी व नासिरउद्दीन मुहंमद यांच्या संघर्षात हस्तक्षेप करून शेरखानची बाजू घेऊन फ्रेंचांनी देशातील अंतर्गत घडामोडीत हस्तक्षेप केला होता. परंतु मोहिमेनंतर मात्र आपला व्यापार व संपत्ती सुरक्षित ठेवणे हेच त्यांचे उद्दिष्ट राहिले. म्हणूनच परकीय सत्तांशी संपर्क निर्माण करताना त्यांच्याशी व्यापार याच तत्वावर संबंध प्रस्थापित करण्यात शिवाजी महाराजांचा प्रयत्न पूर्णतः योग्य असून यशस्वीही झाला.

संभाजीच्या कारकिर्दीत मराठ्यांच्या सिद्धी, पोर्तुगिज व मुघल यांच्याबरोबर सतत संघर्ष सुरू होता. त्यामुळे फ्रेंचांच्या राजापूरच्या वखारीचा व्यापार व संपुष्टात येऊन ती वखार १६८८ साली बंद करावी लागली. इ.स. १६८१ मध्ये फ्रेंच प्रदेशातून वसुली केली जावू लागली.

## ५.१२ सारांश:-

कर्नाटक मोहीम ही राज्याभिषेकानंतर दिग्विजयासाठी काढलेली मोहिम असून त्यात अनेक उद्धिष्टे पूर्ण झाली. शिवाजी महाराजांच्या काळातील ही अखेरची मोठी मोहीम होती. परंतु यामुळे संपूर्ण दक्षिण भारतात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. मराठा स्वराज्य स्थापन करण्याचा उद्देश पूर्ण झाला. मुघल, आदिलशहा व इतर शत्रुंचा पाडाव करुन मराठा राज्य एका निश्चित पायावर उभे राहिले. अशा पद्धतीने मराठ्यांनी नेहमीच परकीय सत्तांना आपल्या स्वराज्यातील अंतर्गत बाबींपासून दूर ठेवलेले दिसते. युरोपियन सत्तांशी शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले संबंध हे त्यांच्यातील स्वाभिमान, धाडस, ध्येय, निष्ठा आणि मुत्स्सदेगिरी अशा अनेक व्यक्तिगत गुणांतून निर्माण झालेले दिसतात.

## ५.१३ प्रश्न :-

१) कर्नाटक मोहिमेची पार्श्वभूमी सांगून मराठ्यांच्या दृष्टीने मोहिमेचे फलित स्पष्ट करा.

२) खालील घटनेचे शिवाजीराजांच्या जीवनात असलेले महत्त्व स्पष्ट करा. १) कर्नाटक मोहिम

३) टिप लिहा : मराठ्यांची कर्नाटक स्वारी

४) मराठे व परकीय सत्ता यांच्यातील संबंधाचा आढावा घ्या.

५) इंग्रज व मराठे यांच्या संबंधावर टीप लिहा.

६) शिवाजी महाराजांच्या काळातील मराठे व युरोपियन सत्ता यांच्यातील संबंधावर माहिती द्या.

## ५.१४ अधिक वाचनासाठी संदर्भ :-

१) कुलकर्णी, अ.रा. खरे, ग.ह. मराठ्यांचा इतिहास खंड पहिला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००६.

२) कोलारकर, शं.गो. 'मराठ्यांचा इतिहास', श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर १०.

३) सरदेसाई, गो. स., 'मराठी रिसायत' खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४. नवीन संदर्भासह संपादित केलेली आवृत्ती '' १९८८.

४) डॉ. देव प्रभाकर, 'मराठ्यांचा इतिहास' विद्या प्रकाशन.

५) कुलकर्णी, अ. रा., खरे ग. ह. 'मराठ्यांचा इतिहास' खंड पहिला शिवाजी आणि शिवकाल (१६००-१७०७), महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०.

६) कोलारकर, शं. गो. 'मराठ्यांचा इतिहास'.

७) पिसुर्लेकर, पां. स. पोर्तुगेज - मराठे संबंध अर्थात पोर्तुगिजांच्या दप्तरातील मराठ्यांचा इतिहास, पुणे विद्यापीठ, पुणे १०६०.

८) Hatalkar V. G. Relations between the Freach and Marathas (1668-1815), Bombay 1969.

❖❖❖❖

# ६

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या अधिपत्याखालील स्वराज्य :

# । महाराष्ट्र धर्म

# ।। शिवराज्याभिषेक आणि त्याचे महत्त्व

**अनुक्रमणिका**

६.० उद्दिष्ट्ये
६.१ प्रस्तावना
६.२ महाराष्ट्र धर्माचा अर्थ
६.३ महाराष्ट्र धर्माची तत्वे
६.४ महाराष्ट्र धर्माचा मराठ्यांच्या इतिहासावर झालेला परिणाम
६.५ मराठा स्वराज्यासाठी संतांचे योगदान
६.६ राज्याभिषेक
६.७ राज्याभिषेकाची कारणे
६.८ राज्याभिषेकाचा सोहळा
६.९ राज्याभिषेकाचे महत्त्व
६.१० छ. शिवाजी महाराजांचा दुसरा राज्याभिषेक
६.११ सारांश
६.१२ प्रश्न
६.१३ संदर्भ ग्रंथ

## ६.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण पुढील गोष्टींना महत्त्व देणार आहोत.

१) महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा अर्थ
२) शिवराज्याभिषेकाचे महत्त्व

## ६.१ प्रस्तावना

महाराष्ट्र धर्माची कल्पना ओळखीची वाटत असली तरी त्याची नेमकी व्याख्या करण्याचा प्रयत्न करताना अनेक अडचणी उभ्या राहतात. १०० वर्षांच्या काळात महाराष्ट्र धर्माची कल्पना एक वादाचा विषय बनला आहे. ऐतिहासिक संदर्भात मात्र याचा अर्थ वेळोवेळी कसा बदलत गेला, हे मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करताना लक्षात येते.

## ६.२ महाराष्ट्र धर्माचा अर्थ

केशवचार्यांच्या कल्पनेतील महाराष्ट्राच्या भौगोलिक सिमा शिवकालीन किंवा सद्यकालीन महाराष्ट्रापेक्षा अजिबातच वेगळ्या होत्या. महिकावती (माहिमची देवी) बखरीनुसार, महाराष्ट्रामध्ये काशी ते रामेश्वर, द्वारका ते तुळजापूर असा प्रदेश मोडतो. अर्थात महाराष्ट्राचे हे भौगोलिक वर्णन चुकीचे असून ते मान्य करता येत नाही. शंकराचार्य प्रणित पुनरूज्जीवन हिंदू धर्माचा प्रसार या प्रदेशात झाला होता. आणि बखरकारालाही महाराष्ट्राचा हाच अर्थ अभिप्रेत असावा. यावरुन तत्कालीन महाराष्ट्राच्या सिमा निश्चित करता येत नाहीत. महाराष्ट्राबाहेरच्या अनेक मुसलमानी राज्यात अनेक शूर व कर्तबगार मराठ्यांनी सैन्यात दाखल होऊन पराक्रम दाखवणे पसंत केले होते. त्यामुळे शिवकालीन महाराष्ट्राच्या राजकीय सिमा निश्चित करणे अवघड आहे. त्याचप्रमाणे रामदास स्वामींनीही आपला 'महाराष्ट्र धर्म' परंपरागत सिमांपुरता मर्यादित ठेवला नव्हता.

महाराष्ट्र धर्म म्हणजे परंपरागत हिंदु धर्माचे स्थानिक स्वरूप निश्चितच नाही. अन्यथा गुजरात धर्म, कर्नाटक धर्म व आंध्रधर्म अशी हिंदु धर्माची स्थानिक स्वरूपे विविध प्रदेशात अस्तित्वात असायला पाहिजे होते. म्हणून या कल्पनेचा संकुचित वा प्रादेशिक अर्थ लावणे इष्ट नव्हे. भारतात वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या मुसलमान राज्यकर्त्यांच्या विरूद्ध स्थानिक जनसामान्यांच्या राजकीय उठावासाठी केलेले आव्हान असाही या कल्पनेचा अर्थ लावता येत नाही. स्वधर्माचे खऱ्या अर्थाने रक्षण करण्यासाठी राजकीय सार्वभौम सत्ता आवश्यक आहे, असा विश्वास असणाऱ्यांनी ठोस कारवाई करावी, यासाठी करण्यात आलेले उच्चाटन असा मात्र या कल्पनेचा अर्थ लावता येईल. कर्तबगार व शूर मराठा सरदारांनी जुलमी राज्यकर्त्या विरूद्ध एकत्र यावे, यासाठी मराठी संतांनी जे कार्य केले त्याचे प्रतिक म्हणजे महाराष्ट्र धर्म असाही एक अर्थ या संकल्पनेचा लावता येतो. या कर्तबगार व शूर मराठा सरदारांना शिवाजी महाराजांचे अत्यंत सुयोग्य नेतृत्व लाभल्याने महाराष्ट्र धर्मांची कल्पना महाराष्ट्रात रूजु शकली.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, जी. एस. सरदेसाई, सेतू माधवराव पगडी, जदूनाथ सरकार यांनी आपल्या ग्रंथात महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा एक वेगळाच व राजकीय स्वरूपाचा अर्थ दिला आहे. स्वकर्तुत्वाची जाणीव व देशभक्तीची प्रखर भावना म्हणजेच महाराष्ट्र धर्म, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. आपल्या मताला दुजोरा देण्यासाठी त्यांनी मल्हारराव रामराव चिटणिस कृत शिवचरित्रामधील एका विधानाचा आधार घेतला आहे.

''हे राज्य साधुन म्लेछांचे पारिपत्य करून, महाराष्ट्र रक्षणे, तेव्हा ज्यास जसे आपले होतील तसे करावे । विपरीत दिसल्यास पारिपत्य करणे हे, ते विधान आहे.''

यावरून महाराष्ट्र धर्माचा अर्थ खालीलप्रमाणे लावता येतो.

१) स्वराज्याची स्थापना
२) मुसलमान राज्यकर्त्यांचे पारिपत्य
३) सर्व मराठ्यांची एकी
४) आपल्या विरोधकांचा समाचार

या विधानाचा व्यापक अर्थ लावून वि. का. राजवाडे म्हणतात, की शत्रू हतबल किंवा नष्ट न झाला तरी चित्याचे युद्ध करावे, हा प्रकारही महाराष्ट्र धर्माच्या पालनात अभिप्रेत आहे. पर्यायाने चित्याचे युद्ध करणे हा प्रकारही महाराष्ट्र धर्म पाळण्यास अभिप्रेत आहे. अखंड सावधानता, चपळाई व झडप म्हणजे महाराष्ट्र धर्म असे विवेचन त्यांनी केले आहे. याशिवाय महाराष्ट्र धर्माच्या कल्पनेत स्वराज्याची पूर्ण निष्ठा, स्त्रियांना सन्मानाची वागणूक आणि जमिनदार आणि त्यांची खंडकरी कुळे यांच्यातील सलोख्याचे संबंध याचाही समावेश होता. आपल्याला असेही लक्षात येते की प्रचलित भक्ती मार्गाच्या चळवळीपेक्षा महाराष्ट्र धर्माची कल्पना अतिशय वेगळी होती.

रामदास स्वामींनी या कल्पनेचा त्यावेळच्या परिस्थितीनुसार अत्यंत गतिशील व क्रांतीकारक अर्थ लावला आहे. रामदास स्वामी जरी संत असले तरी ते अन्य मराठी संतांपेक्षा वेगळ्या प्रकारचे संत होते. हे त्यांनी म्हटलेले शब्द पाहिल्या नंतर स्पष्ट होते. रामदास स्वामी म्हणतात.

मराठा तितुका मेळवावा। आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा।।
ये विषयी न करता तकवा । पुर्वज हासती ।।
आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मेळवावे।।
महाराष्ट्र धर्म वाढवावे । जिकडे तिकडे ।।

रामदास स्वामींच्या या काव्यपंक्तींवरून महाराष्ट्र धर्माचा अर्थ स्पष्ट होतो. मराठ्यांची एकी करून महाराष्ट्र धर्म वाढवावा. याविषयी सातत्याने प्रयत्न करावेत. अन्यथा पूर्वज आपल्याला हसतील. असलेले राज्य जतन करावे आणि ते चोहीकडे वाढवावे, असे करण्यानेच महाराष्ट्र धर्माचे पालन होईल. रामदास स्वामींचे हे मत वि. का. राजवाडे पूर्णपणे मान्य करतात.

तथापि न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे यांनी महाराष्ट्र धर्माचा लावलेला अर्थ वि. का. राजवाडे मान्य करीत नाहीत. भक्तीमार्ग व धर्मसुधारणेची चळवळ म्हणजे महाराष्ट्र धर्म या न्यायमूर्तींच्या मताशी ते सहमत होत नाहीत. शिवकालीन धार्मिक जागृती हा एक उठाव होता किंवा भक्ती मार्ग म्हणजेच महाराष्ट्र धर्म हे समीकरण मान्य करणे म्हणजेच तत्कालीन वास्तव परिस्थितीचा विपर्यास करणे असे प्रतिपादन ते करतात. वि. का. राजवाडे अत्यंत कडक शब्दात लिहितात की, संतांनी मराठी मनाला दुबळे केले. त्यांनी महाराष्ट्रातील जनसामान्यांना अधिक जीवनाविषयी त्यातील सुखसोयीविषयी उदासीन राहण्यास प्रवृत्त केले. राजकीय पारतंत्र्याची त्यांनी फिकीर केली नाही. त्यांनी पलायन वादाचा पुरस्कार केला. त्यांच्या या शिकवणीमुळे समाजाची अधोगती होऊन तो अस्थिर बनला, अशा स्वरूपाचा आरोप राजवाड्यांनी या मराठी संतांवर केला आहे. रामदास स्वामींनी अधिक जीवनाविषयीचा नकारात्मक व पलायनवादी दृष्टीकोन साफ नाकारला असला तरी त्यांची सनासत हिंदू धर्मावर अढळ श्रद्धा व विश्वास होता. रामदास स्वामी आदी व मराठी प्रजाजनांवर परकीय राज्यकर्त्यांनी केलेला धार्मिक अन्याय व जुलूम जबरदस्तीविषयी त्यांच्या मनात तीव्र घृणा निर्माण झाली. अशा परिस्थितीत महाराष्ट्र धर्म

म्हणजे स्वाभीमानी देशभक्तीची भावना. राष्ट्रीय संस्कृती व व्यक्तिगत सुख समाधानाबरोबरच सामाजिक संविधान हे नवे समीकरण रूढ झाले.

वि. का. राजवाडे यांनी मांडलेले महाराष्ट्र धर्माविषयीचे समीकरण खालील प्रमाणे आहे. महाराष्ट्र व अन्य प्रदेशातील

१) हिंदू धर्माची स्थापना व रक्षण
२) गो ब्राह्मणांचे रक्षण
३) स्वराज्याची स्थापना
४) ऐक्याची भावना आणि
५) सुयोग्य नेतृत्व

**आपली प्रगती तपासा**

१) महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करा.

---

---

---

---

---

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

महाराष्ट्र धर्म ह्या संकल्पनेचा वापर न्यायमूर्ती रानडे यांनी आपल्या ''मराठा सत्तेचा उदय'' या पुस्तकात केलेला आहे. राष्ट्राची निर्मिती हा त्यामागचा त्यांचा उद्देश होता. परंतु महाराष्ट्र धर्म हा शब्द प्रयोग पहिल्या प्रथम ज्या लेखकाने केलेला आहे तो मराठी मधील अतिशय प्रसिद्ध ग्रंथ 'गुरूचरित्र' यात आढळतो. हा ग्रंथ साधारणपणे १५व्या शतकाच्या मध्यात लिहिला गेला. महाराष्ट्रातील याच्याही आधी महाराष्ट्र धर्म या संकल्पनेचा उल्लेख केलेला आढळतो. याची दोन महत्त्वाची वैशिष्ट्ये आपल्याला लक्षात येतात जी राष्ट्रव्यापी आहेत.

१) राजकीय सत्ता प्रस्थापित करणे.
२) आध्यात्मिक जडणघडण

या दोन्ही गोष्टींबाबत शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील संतांचे विचारही प्रसारीत केले.

**आपली प्रगती तपासा**

१) महाराष्ट्र धर्माची ऐतिहासिक पार्श्वभूमि काय आहे ?

---

---

---

---

---

## ६.३ महाराष्ट्र धर्माची तत्त्वे :

महाराष्ट्र धर्माच्या तत्वांचे विभाजन चार प्रकारे करता येईल.

१) देवाची पूजा अर्चा करणे म्हणजे देवशास्त्र आचार
२) आजुबाजूच्या लोकांची सेवा करणे म्हणजेच देशाचार
३) कुटुंबासाठी सेवा करणे म्हणजेच कुळाचार
४) जातीसाठी सेवा करणे म्हणजेच जातीचार

महाराष्ट्रातील समाजाला या सगळ्या गोष्टी नित्यनियमाने पाळणे, हे त्यांचे कर्तव्य होते. या सगळ्यांमुळे शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीपासून म्हणजेच ३०० वर्षापूर्वी चालत आलेल्या प्रत्येक धर्माचे पालन करणे. संपूर्ण भारतातील जनता व खासकरून महाराष्ट्रातील जनता या महान विचाराने प्रवृत्त झालेले होते. महाराष्ट्र धर्म हे स्वधर्माचे पुनरूज्जीवन होते.

## ६.४ महाराष्ट्र धर्माचा मराठ्यांच्या इतिहासावर झालेला परिणामः

महाराष्ट्रामध्ये मराठ्यांचा उदय होण्यास कारणीभूत असलेली अतिशय महत्त्वाची चळवळ म्हणून महाराष्ट्र धर्माच्या चळवळीचा आपण विचार करू शकतो. या चळवळीच्या अनेक टप्प्यांत आपल्याला अनेक संतांचे नेतृत्व लक्षात येते. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली म्हणजेच मराठी भाषिक माणूस सहजपणे भगवत गीतेचा अभ्यास करू लागला. तुकारामांनी आपल्या अभंगातून आपले जीवन विषयक तत्व मांडले तर रामदास स्वामींनी आपल्या क्रांतीकारी तत्वांचा प्रचार महाराष्ट्र धर्म प्रसारित करण्यास केला. मुस्लीम अत्याचारांनी गर्भगळीत झालेल्या या महाराष्ट्रीयन समाजात नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य या संतानी केले. तसेच समाजात स्वधर्माची शिकवण त्यांनी पसरवली. त्यांनी भावनात्मक व वैचारिक पद्धतीने स्वराज्याच्या संकल्पनेची उभारणी केली.

**आपली प्रगती तपासा :**

१) महाराष्ट्र धर्माची तत्वे व त्याच्या परिणामांचे संक्षिप्त परिक्षण करा.

## ६.५ मराठा स्वराज्यासाठी संतांचे योगदान :

### १) संत ज्ञानेश्वर : (इ.स. १२७५ - १२९६)

महाराष्ट्रामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ सुरू करणारे संत म्हणजे संत ज्ञानेश्वर. ज्ञानेश्वरांनी 'भावार्थ दिपीका' या नावाने भगवदगीतेचे मराठी भाषांत्तर केले. हा ग्रंथ आपण ज्ञानेश्वरी या नावाने ओळखतो. त्यांनी मराठी भाषेचा पुरस्कार केला. त्यांनी

सर्वसामान्यांना भक्तीचा मार्ग दाखवला. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी समाधी घेतली. त्यानी महाराष्ट्रातील जनतेत स्वधर्माविषयी व स्वराष्ट्राविषयी प्रेम निर्माण केले.

### २) संत नामदेव (इ.स. १२६९-१३५०) :

संत नामदेव हे ज्ञानेश्वरांचे समकालीन होते. नामदेवांनी देखील भक्ती मार्गाचा प्रचार केला. त्यांनी संपूर्ण भारतभर भ्रमण केले व पंजाबमध्ये प्रस्थापित झालेल्या पंजाबी धर्मग्रंथामध्ये म्हणजेच गुरू ग्रंथसाहेबमध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख आढळतो. संत नामदेवानीही सामाजिक समतेचा व अभंगाचा पुरस्कार करुन जाती व्यवस्थेचा निषेध केला. त्यामुळे मुसलमानी अत्याचाराला तोंड देण्यासाठी या पीडीत समाजाला मोठे सामर्थ्य प्राप्त झाले.

### ३) संत एकनाथ (इ.स. १५३३-१५९९) :

संत एकनाथ  हे उच्च जातीतील होते. परंतु त्यांनी भागवत संप्रदायातील विचारांचा पुरस्कार केला. त्यांनी वारकरी सांप्रदायाला आधारस्तंभ देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. आपल्या भारुडातून, अभंगातून समाजातील अनिष्ट प्रवृत्तीवर प्रहार केला.

**आपली प्रगती तपासा :**

१) महाराष्ट्र धर्माच्या प्रसारामध्ये  संत रामदासांनी बजावलेल्या भूमिकेचे परिक्षण करा.

२) मराठा स्वराज्यासाठी संतांच्या योगदानाचे परीक्षण करा.

## ६.६ राज्याभिषेक :

शिवाजी महाराजांनी अतुल पराक्रम करून अविश्रांत मेहनत घेऊन स्वराज्याचे स्वप्न साकार केले. त्यांच्या या उज्ज्वल कामगिरीवर शिक्कामोर्तब करण्यासाठी राज्याभिषेकाची आवश्यकता होती. मराठी स्वराज्य अस्तित्वात आले, हे जरी खरे असले तरी त्याला स्वातंत्र्य, सार्वभौम सत्तेचे स्वरूप अजून मिळाले नव्हते. राज्याभिषेकामुळे राज्यात सुराज्य अवतरले होते. मध्ययुगीन सनातनी सरंजामशाही, राज्याची जुलमी चौकट मोडून पडली होती. अत्याचार थांबले होते.

मोगल दरबार आणि अदिलशाही दरबार शिवाजी महाराजांना राजा मानायला तयार नव्हते. इतकेच काय मोगल दरबारी आणि आदिलशाही दरबारी असलेले मराठी सरदारही, शिवाजी महाराजांना राजा मानायला तयार नव्हते. मराठी मुलखातील रयतेने मात्र शिवाजी महाराजाला केव्हाच आपला राजा मानले होते. रीतसर विधिवत राज्याभिषेक झाल्याखेरीज एखाद्याला 'राजा' म्हणून संबोधले जात नाही, यात सत्यता होती. कौटिल्याचे अर्थशास्त्र या राजनीतीवरच्या ग्रंथामधून 'राजा' 'राज्य' या संकल्पनांची चर्चा झालेली होती. स्वतंत्र राज्य

अस्तित्वात येऊन उपयोगास नव्हते. त्यास सार्वभौमत्व रीतसर, विधिवत घोषित होणे आवश्यक होते.

## ६.७ राज्याभिषेकाची गरज :

लोकांनी राजा म्हणून ज्याला स्वीकारलेले होते, त्या ''छत्रपती शिवाजींनीही'' आता रीतसर राज्याभिषेक समारंभ साजरा करावा व राज्याभिषिस्त राजा बनावे, अशी मागणी होऊ लागली. राजकीयदृष्ट्या स्वराज्याचे स्वतंत्र अस्तित्व घोषित करणे आवश्यक होते. मुख्यतः शिवाजी राजांनी राज्याभिषेक समारंभास संमती दिली. या राज्याभिषेकानंतर महाराष्ट्रातील वतनदार, जहागीरदार, सरंजामदारांनी लोकांच्या या राजाला 'राजा' म्हणून मान्यता दिली नव्हती. परंतु त्यांना या सार्वभौम सत्तेचे श्रेष्ठत्व मानावे लागणार होते. प्रचलित धार्मिक परंपरेनुसार राजा हा अभिषिक्त असावा लागतो. राज्याभिषेकामुळे मराठी स्वराज्याच्या अस्तित्वाला तसेच न्यायव्यवस्थेला, प्रशासनाला, प्रशासनाने केलेल्या करारांना मान्यता प्राप्त होणार होती. मराठी सैन्याला एक वेगळा अर्थ प्राप्त होणार होता.

### ६.७.१ स्वतंत्र राजेपणाची गरज :

मराठी माणसाच्या मनात केवळ स्वराज्य, स्वधर्म व संस्कृती याबद्दल जिद्द निर्माण करणे आवश्यक होतेच, परंतु त्याचबरोबर देवगिरीच्या यादवानंतर मराठ्यांना राजा राहिला नव्हता. सर्व मराठे नावाचे राजे होते. प्रत्यक्षात शहाजी राजे भोसले हे मुसलमानांचे पाईक होते. असे राज्य अथवा राज्यपद महाराजांना नको होते. त्यामुळेच त्यांनी स्वतःला राज्याभिषेक करून घेण्याचे ठरविले.

### ६.७.२ बंडखोर जहागिरदार या कल्पनेस विरोध :

शिवाजी महाराज हे शहाजी राजांच्या जहांगिरीचे वारसदार असून त्यांनी निर्माण केलेल्या राज्यास आदिलशाही, कुतुबशाही, मोगलशाही, पोर्तुगीज, इंग्रज हे मान्य करण्यास तयार नव्हते. तो जहांगिरदारांचा बंडखोर पुत्र आहे. लुटारू आहे असे उल्लेख केले जात. या सर्वांना आळा घालता यावा याकरिता महाराजांनी स्वतःचा राज्याभिषेक करून घेतला.

### ६.७.३ मुस्लीम सत्तांना इशारा :

गेली ३०० वर्ष मुस्लीम सत्ताधीश मराठ्यांवर सत्ता गाजवित होते. या सत्ताधीशांना इशारा द्यावयाचा होता की, आता हिंदूचे राष्ट्र निर्माण झाले व त्यांना राजा मिळाला आहे येथून पुढे त्यांच्यावर जुलूम आणि अन्याय केला जाणार नाही, करणाऱ्यास शासन केले जाईल, असे यातून सिद्ध करायचे होते.

### ६.७.४ न्यायालयीन अडचणीचे निवारण :

शिवाजी राजे राज्याभिक्षिक्त नसल्याने त्यांना ब्राह्मण लोकांचे खटले तसेच न्यायदान, शिक्षा, कर वसुल करणे याचा अधिकार नाही, असे समजले जाई. याकरिता महाराजांना वारंवार ब्राह्मण सभेकडे किंवा पंडितरावांची मदत घ्यावी लागे. या अडचणी दूर करण्यासाठी राज्याभिषेकाची आवश्यकता होती.

### ६.७.५ एक संस्कार म्हणून आवश्यक :

राज्याभिषेक हा प्रामुख्याने धार्मिक सोहळा असून या संस्काराने महाराजांच्या कर्तबगारीला धर्म शास्त्रीय बैठक मिळणार होती. शिवाय असे संस्कार झाल्याशिवाय जनता महाराजांना राजे मानण्यास तयार नव्हती.

### ६.७.६ प्रजाजनांवर छाप :

उत्सव सर्वांनाच आवडतो. या राज्याभिषेक प्रसंगी मोठ्या प्रमाणावर आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन करून सर्व जनतेवर महाराजांना छाप पाडायची होती. शिवाय जनतेचा पाठिंबा त्यांना मिळवायचा होता.

## ६.८ राज्याभिषेकाचा सोहळा :

ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, शनिवार, तारीख ६ जून १६७४ रोजी रायगडावर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्याचे ठरविण्यात आले. जानेवारीतच गांगाभट्टांसह काशीचे काही पुरोहित मंडळी डेरेदाखल झाली. सारा रायगड समारंभाच्या तयारीत गुंतला. अगदी शास्त्रोक्त पद्धतीने आणि धार्मिक परंपरेनुसार संपूर्ण समारंभ करण्याचे ठरले. उपनयन संस्कार, विवाह संस्कार आदि पुन्हा केले गेले. राज्याभिषेकापूर्वी राज्यातील देवस्थानांना विधिवत भेटी दिल्या.

महाराजांनी प्रथम गणेश पूजन व स्वस्तिक पूजन करून मंडपाच्या महादेवीवर पंचामृतांनी भरलेल्या सुवर्णरंजत, कुंभांनी त्यांना स्नान घातले. त्यानंतर वेदीवरील आसनावर त्यांना विधीपूर्वक बसविण्यात आले. कित्येक नवरत्नादि सुवर्णकमळे व नाना सुवर्ण फुले करून सुसज्ज केले. वस्त्रे, महादाने इ. दाने केली गेली. सिंहासनास अष्टखांब सुवर्ण जडित केले. अष्टखांबी अष्टप्रधान मंडळ उभे राहिले. छत्र जडावाचे, मोतीलग झालरीचे करून मस्तकावरी धरिले. छत्रपती नावाने घोषणा चालल्या होत्या. अभिषेक झाल्यानंतर आसनावर महाराज, सोयराबाई, युवराज संभाजी यांना बसविण्यात आले. वाद्यांच्या गजरात, तोफा डागण्यात आल्या व सोळा सुहासिनींनी आणि सोळा कुमारिकांनी महाराजांना सोन्याच्या ताटातून पंचारती केली.

यानंतर महाराज घोड्यावरून गडावरील देवतांचे दर्शन घेण्यासाठी गेले. काही अंतरावर सुवर्ण अलंकारांनी सजविलेल्या गजराजांवर माहुत स्वतः सेनापती हंबीरराव मोहिते तर मोर्चेल धरून मोरोपंत होते. त्यानंतर महाराजांवर फुलांची वृष्टी करण्यात आली. महाराजांनी देवदर्शनानंतर कुलदैवत व मातोश्रींना वंदन केले व राज्याभिषेक संपला.

### आपली प्रगती तपासा

१) छत्रपती शिवाजी महाराजांना स्वतःस राज्याभिषेक करून घेणे गरजेचे का वाटले ? ते स्पष्ट करा.

_______________

_______________

_______________

_______________

_______________

## ६.९ राज्याभिषेकाचे महत्त्व :

### राजकीय महत्त्व

राजकीय दृष्ट्या राज्याभिषेकामुळे सत्तेचे केंद्रीकरण झाले. महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या सत्तेचा उदय झाला व त्यामुळे हिंदवी स्वराज्याची स्थापना खऱ्या अर्थाने झाली.

काही उर्मठ मराठा सरदार अजूनही मुघलांकडे व बिजापूर राज्यकर्त्यांकडे आपली कामगिरी बजावीत होते. त्यामुळे छ. शिवाजी महाराजांना कमी लेखत होते. परंतु राज्याभिषेकामुळे छ. शिवाजी महाराजांना कायदेशीर अधिकार प्राप्त झाले व या सरदारांना त्यांना एक राज्यकर्ता म्हणून महत्त्व द्यावे लागले.

राज्याभिषेकाच्या वेळी, छ. शिवाजींनी स्वतःला देशमुख घराण्यांपेक्षा स्वतःचे श्रेष्ठत्व सिद्ध केले. छ. शिवाजींनी स्वतःला आजूबाजूच्या प्रदेशांच्या राज्यकर्त्यांबरोबर स्वतःची प्रस्थापना केली. १६७७ मध्ये छ. शिवाजींनी बाजी मुधोळकर देखमुखांना पत्र लिहिले ज्यात, त्यांनी स्वतःला स्वतंत्र घोषीत करून कुतुबशहांच्या गोवळकोंड्या बाबत स्वतःच्या समान हक्कांचा शिक्कामोर्तब केला.

राज्याभिषेक झाल्यानंतर लगेचच छ. शिवाजी महाराजांनी भिमा नदीच्या तीरावर असलेल्या मुघलांच्या छावणीवर मोहिम काढली. त्यानंतर त्यांनी खानदेश व बिरार पर्यंत मजल मारली. या मोहिमेवर जाताना धारंगगाव येथे असलेली इंग्रजांची वखार जाळून टाकली.

या सगळ्याचा असा अर्थ स्पष्ट झाला की, एका हिंदू राज्यकर्त्यांने आपले राज्य स्वीकारून धर्माप्रमाणे राज्याला सुरूवात केली व लोकांचे रक्षण केले.

राज्याभिषेक झाल्यानंतर छ. शिवाजी महाराजांना संपूर्ण न्यायालयीन अधिकार प्राप्त होऊन ते योग्य प्रकारे न्यायनिवाडा करू शकले. इतिहासकार जी.एस.सरदेसाईच्या मते, बिजापूरचे सुलतान व गोवळकोंड्याच्या राज्यकर्त्यांनी छ. शिवाजींच्या राजेपदाला मान्यता दिली. कारण त्यामुळे मुघलांच्या दख्खन मोहिमेवर अडथळा निर्माण करणे शक्य झाले.

### सामाजिक महत्त्व :

राज्याभिषेकामुळे समाजात एक योग्य दिशा दाखविणे शक्य झाले. विविध स्तरावरील लोकांच्या मनात एक नव चैतन्य निर्माण झाले. लोकांना आता त्यांचा राजा मिळाला होता. व राजाही आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी निर्भिडपणे कार्य करू शकत होता. राज्याभिषेकाच्या वेळी छ. शिवाजींनी आपण धर्म व न्यायाने राज्य करू असे आश्वासन लोकांना दिले.

### प्रशासकीय व घटनात्मक महत्त्व :

राज्याभिषेकामुळे प्रशासकीय दृष्ट्या शिवाजी महाराजांच्या मराठा स्वराज्याला घटनात्मक, सार्वभौम स्वरूप प्राप्त झाले. छ. शिवाजींनी आपली राज मुद्रा व्यवहारात आणली. अशा प्रकारे राज्याभिषेकामुळे प्रशासकीय व घटनात्मक महत्त्व प्राप्त झाले.

**नव्या कालखंडाची सुरूवात :**

राज्याभिषेकाच्या समारंभाच्या वेळी शिवाजींनी नव्या कालखंडाची व नव्या कालगणणेची घोषणा केली. त्यादिवसापासून ''राज्याभिषेक शक'' अशा नव्या कालगणणेला सुरूवात झाली. शक सुरु करणे म्हणजे नवे युग सुरु करणे. मराठा स्वराज्यात राज्यभिषेकाने नवे युग सुरु झाले होते.

राज्याभिषेकानंतर छ. शिवाजींनी तांबे व सोन्याची नाणी काढली. त्याला ''शिवराई'' म्हणत. छ. शिवाजींच्या आदेशावरून बाळाजी आवजी यांनी ''लेखनप्रशस्ती'' असा ग्रंथ लिहून दरबारातील फारशी शब्दांना मराठी प्रतिशब्द या ग्रंथात दिले होते. यामुळे दरबारी भाषा आता मराठी भाषा झाली होती. याशिवाय त्यांच्या सर्व मंत्र्यांना संस्कृत किताब देण्यात आला होता.

**किताब :**

छ. शिवाजी महाराजांनी स्वतःला किताब धारण केला. तो म्हणजे क्षत्रिय, कुळवंत, सिंहासनादिश्वर, महाराजा छत्रपती, गो-ब्राह्मण प्रतिपालक.

**आपली प्रगती तपासा :**

१) शिवाजींच्या पहिल्या राज्याभिषेकाचे महत्त्व अधोरेखीत करा.

---

---

---

---

---

## ६.१० छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा राज्याभिषेक

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा पार पडत असतानाच जिजाबाईंची प्रकृती बिघडली. शेवटी राज्याभिषेकाच्या १२व्या दिवशी म्हणजेच १८ जून १६७४ या दिवशी त्यांचे देहावसान झाले. रायगडावर दुःखाची छाया पसरली. वातावरण एकदम बदलले. तशातच काशीच्या एका तांत्रिक गोसावींपैकी 'निश्चलपुरी' नावाच्या गोसावीने राज्याभिषेकात अनेक चुकांवर तोंडसुख घेतले. तांत्रिक पद्धतीच्या राज्याभिषेकावर सर्व विधी कसे साग्रसंगीत आणि यथासांग होतात, असे म्हणत वैदिक पद्धतीचा हा राज्याभिषेक राजांनी करून घेतला हे चुकीचे झाले, असेही तो उघडपणे बोलू लागला.

सगळ्याविधी कुयोग व कुमुर्हूर्ते झाल्याने अनेक संकटे येतात असे तो म्हणू लागला. प्रत्यक्ष राज्याभिषेकाच्या तांत्रिक देवदेवतांचे पुजन झाले नाहीच, स्थानदेवता, गृहदेवता, न पुजल्यामुळे त्या नाराज झाल्या व त्यांना संतुष्ट करण्यासाठी पुन्हा एकदा राज्याभिषेकाचा विधी करावा, असे बोलले जाऊ लागले. फेब्रुवारी १६७४ ला प्रतापराव गुजरांचा मृत्यु झाला. तसेच इ.स. मार्च १६७४ ला राणी काशीबाईंचा मृत्यु झाला. तो अपशकून म्हणून राज्याभिषेकाशी जोडला गेला. राज्याभिषेक समारंभातच युवराज संभाजींच्या गळ्यातील मोत्यांच्या कंठातून दोन

मोती निखळले. हा प्रसंग अपशकून मानला गेला. याशिवाय तलवारीची पूजा करताना तलवार म्यानातून पडणे, मंत्री दत्ताजी त्र्यंबक यांचा पाय घसरणे अशा गोष्टींना निश्चलपुरीनी अपशकुन व देवतांचा रोष असे दाखवून दिले.

अशा प्रकारे इ.स. २४ सप्टेंबर १६७४ रोजी दूसरा तांत्रिक राज्याभिषेकाचा विधी झाला. देवतापुजन झाले. कलश स्थापना झाली, मेरूयंत्र चित्रित केले. मंडप व स्तंभ अलंकृत करण्यात आले. सिंहासनावरील सिंह मात्रांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. शिवश जलांनी राजाचा अभिषेक केला. 'शक्ती संजीवनी' व 'राजराजेश्वरी' मंत्राची विद्या राजाला दिली गेली. त्यानंतर राजाने पर्वतप्राय अन्न बलीमंत्राने अभिष्ठित करून ठेवले होते. बलीमंत्राने दान दिले. शेवटी मंत्राच्या उदघोषात राजा सिंहासनाधिष्ठीत झाला. हा विधी एका दिवसातच उरकला. याही वेळी भरपूर दानधर्म केले गेले.

## ६.११ सारांश

राज्याभिषेकामुळे मराठी स्वराज्याच्या अस्तित्वाला न्यायव्यवस्थेला, प्रशासनाला, मराठी सैन्याला, औपचारिक मिळाली. अंदाधुंदी जुलमी राजवट संपली. कायद्याचे राज्य आले.

महाराष्ट्र धर्म चळवळ पुढे वाढत जाऊन इ.स. १६८९-१७०७ या मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या काळात मराठी माणूस झपाटून गेला होता. शर्थीचे प्रयत्न करून व कोणतीही किंमत देऊन स्वराज्याचे रक्षण करण्याचा निश्चय त्यांनी केला. राष्ट्राच्या जीवनात असे अग्नीपरिक्षेचे प्रसंग क्वचितच येतात. परंतु जेव्हा ते येतात, तेव्हा त्यांचे वेगळेपण स्वयंसिद्ध असते.

## ६.१२ प्रश्नः

१. महाराष्ट्र धर्मावर टीप लिहा.
२. शिवाजींच्या राज्याभिषेकावर टीप लिहा.
३. शिवजींच्या राज्याभिषेकास कारणीभूत असलेली कारणे स्पष्ट करा.
४. राज्याभिषेकाचे राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व घटनात्मक महत्त्व विशद करा.
५. शिवाजींच्या पहिल्या राज्याभिषेकाचे टीकात्मक परिक्षण करा.

## ६.१३ संदर्भ ग्रंथ :

१. रानडे, एम.जी., राईज आफ दी मराठा पॉवर ॲन्ड अदर ऐसेस, १९६१.
२. सरकार, जदुनाथ, शिवाजी ॲन्ड हिज टाईम्स, ओरियन्ट लाँगमन, बॉम्बे, १९५२.
३. सरदेसाई, जी.एस., न्यु हिस्टरी ऑफ मराठास, खंड-I, मुन्शीराम मनोहरलाल पब्लिशर्स, बॉम्बे, १९८६.
४. पगडी, सेतू माधवराव, छत्रपती शिवाजी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.

❖❖❖❖

# ७

# संघर्षाचा कालखंड (१६८० ते १७०७)
# अ) मुगल मराठा संघर्ष : संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराबाई

**अनुक्रमणिका :**


७.१ उद्दिष्ट्ये

७.२ प्रस्तावना

७.३ संभाजी मुघल संघर्ष, सिद्दी व पोर्तुगीजां विरूद्ध संघर्ष

७.४ छत्रपती संभाजी महाराजांचा मृत्यू

७.५ छत्रपती राजाराम

७.६ महाराणी ताराबाई (१७००-१७०७)

७.७ सारांश

७.८ प्रश्न

७.९ संदर्भ सूची


## ७.० उद्दिष्ट्ये

इ.स.१६८० ते इ.स. १७०७ हा कालावधी मुघल-मराठा संघर्षाचा महत्त्व पूर्ण काळ मानला जातो. या घटकामध्ये आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यू नंतर मराठेशाहीत अंतर्गत जे वाद निर्माण झाले त्याची चर्चा करणार आहोत. हा संघर्ष बराच काळ म्हणजेच मुघल सम्राट बादशहा औरंगजेबाचा मृत्यू होईपर्यंत चालला. संभाजीच्या मृत्यु नंतर मराठ्यांच्या गादीवर छत्रपती राजाराम आला. परंतु तिथे ही पुन्हा मराठ्यांचे आपसातील तंटे सुरू झाले. या काळाला मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचा काळ असे सुद्धा म्हटले जाते. राजारामनंतर शाहु आणि ताराबाई मध्ये जी यादवी झाली त्याचाही अभ्यास आपण येथे करणार आहोत.

## ७.१ प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराज आणि सईबाई यांचा मुलगा संभाजी व शिवाजी आणि सोयराबाई यांचा मुलगा राजाराम. १४ मे १६५७ रोजी, पुरंदरला संभाजीचा जन्म झाला. १६५९ला सईबाई मरण पावल्या. त्यामुळे संभाजीचे पालन पोषण जिजाबाईंनी केले. संभाजीला शिकविण्यासाठी शिवाजी महाराजाने केशव भट्ट आणि उमाजी पंडीत यांची नेमणूक केली होती.

लहान वयातच संभाजी महाराजांचा राजकारणात प्रवेश झाला. नऊ वर्षांचा असताना इ.स. १६६६ मध्ये तो छ. शिवाजी महाराजां बरोबर आग्रा भेटीस गेला होता. नंतर मोगल-मराठा संबंध चांगले झाले होते.

इ.स. २६ जानेवारी १६७१ ला छ. शिवाजी महाराजाने, संभाजींला राज्याचा मुलकी कारभार पाहायला सांगितले. इ.स.१६७४ पर्यंत संभाजीने सगळे काम व्यवस्थित पाहिले. ६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यावेळेला संभाजीला युवराज म्हणून घोषित केले गेले. १६७५ नंतर शिवाजी महाराजाने संभाजीला विजापूर आणि कोंडाणाच्या स्वारीवर पाठविले. इ.स. १६७६ रोजी शिवाजी कर्नाटकाच्या स्वारीवर गेले. त्यांनी सगळा राज्याकारभार आपल्या मंत्री मंडळाकडे सोपवला. याच दरम्यान संभाजीचे व मंत्रिमंडळातील काही सभासदांमध्ये मत भेद झाले. या मतभेदात छ. शिवाजी महाराज नेहमी मंत्रीमंडळाच्या बाजू घेत असे. हे संभाजी राजाला खटकत होते. अशा परिस्थितीत शिवाजींनी संभाजीला सज्जनगडला रामदासांकडे पाठविले. स्वतःला आपली बाजू नीट मांडू न दिल्यामुळे व सज्जनगडला रामदास स्वामी सुद्धा नसल्यामुळे संभाजी राजाने मुघलांकडे जाण्याचा निर्णय घेतला. १३ डिसेंबर १६७८ रोजी तो दिलेरखानला जाऊन मिळाला. शिवाजी महाराजाने त्याच्या पाठलागावर सैन्य पाठविले. परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही. शिवाजींच्या मृत्यु नंतर सोयाराबाईंशी युद्ध करून संभाजी महाराज मराठ्यांच्या गादीवर आला व त्याने राजाराम व सोयराबाई यांची तुरूंगात रवानगी केली.

## ७.२ संभाजी महाराज व मुघल संघर्ष :

इ.स. १६७९ पासून बादशहा औरंगजेबाने मुघल दरबारातील रजपूत सरदारांविषयी एक व्यापक मोहिम उघडली होती. या मोहीमेची सुत्रे औरंगजेबाने आपला युवराज अकबर याच्याकडे सोपविली. औरंगजेबाच्या अनेक पुत्रांपैकी अकबर हा विशेष कर्तबगार असून आपल्या वडिलांचा लाडका होता. त्याच्या बालपणीच त्याची आई मरण पावल्याने बादशहा औरंगजेबाने त्याचे संगोपन विशेष प्रेमाने व मायेने केले होते. तरुणपणीच त्याच्या कर्तबगारीची व हुशारीची चमक औरंगजेबाच्या लक्षात आली असल्याने, अनेक राजकीय प्रश्नांमध्ये बादशहा औरंगजेब त्यांच्याशी सल्ला मसलत करीत असे. रजपूत सरदारांच्या विरूद्धच्या मोहिमेची जबाबदारी त्याने अकबरावर सोपविली होती. शर्थीचा प्रयत्न करूनही रजपूत मोहिमेत यशस्वी होत नाही असे लक्षात आल्यावर, त्याने रजपूत सरदारांशी समझोता करण्याची कल्पना औरंगजेबापुढे मांडली. बादशहा औरंगजेबाने अकबराची ही कल्पना साफ झुगारून दिली आणि असा विचार केल्याबद्दल त्याची अत्यंत कडक शब्दात निर्भत्सनाही केली. त्यामुळे दुखावलेल्या अकबराने औरंगजेबाविरूद्ध बंडाचा झेंडा उभारला. राजेपद धारण केले. दरम्यान अजमेर येथे तळ ठोकून असलेल्या औरंगजेबाने अकबराचे बंड मोडून काढले आणि त्यानंतर मात्र अकबराने दुर्गादास राठोड याच्यासह मराठ्यांकडे आश्रय घेण्याचे ठरविले. ९ मे १६८१ रोजी नर्मदा नदी ओलांडून उभयता दक्षिणेत आले, त्यानंतर मझज दरमझल करीत जून १६८१च्या सुरूवातीला स्वराज्यातील कोकण प्रांतातील नाघोटणे, पाली या ठिकाणी जाऊन पोहोचले. पाली रायगडाच्या उत्तरेला २५ मैलाच्या अंतरावर आहे. या सुमारास पावसाळा सुरू होऊन कोकण प्रांतात सर्वत्र सतत धार सुरू झाली. अकबर ऐन पावसाळ्यात पाली येथील एका साध्या शेणाने सारवलेल्या झोपडीत राहणे अतिशय अवघड गेले. अकबराच्या पाली येथील वास्तवाची जबाबदारी संभाजी राजे यांनी नेताजी पालकर, हीराजी फर्जंद यांच्यावर सोपवली होती.

संभाजीराजे व युवराज अकबर यांच्या अनेक वेळा भेटी होऊन प्रदीर्घ चर्चा ही झाली असली तरी त्यातून विधायक निष्पन्न काहीच झाले नाही. संभाजी महाराजाला अकबराच्या हेतू विषयी शंका होती, औरंगजेबा मार्फत आपल्या विरूद्ध मुद्दाम पाठविण्यात आलेला अकबर हा एक हेर असल्याचा संशय त्यांना वाटत होता. तसेच संभाजी महाराजांची त्यावेळची परिस्थिती अत्यंत नाजूक होती. अखेरीस जेव्हा अकबराच्या लक्षात आले की आपल्याला पुढे मराठ्यांकडून मदत मिळणे शक्य नाही, तेव्हा त्याने तिथून पळ काढून स्वतःला वाचवित इराणला पोहोचला. तिथेच त्याचा मृत्यु झाला.

जून १६८१ मध्ये बादशहा औरंगजेबाने आपल्या आजमशहा या आपल्या कनिष्ठ पुत्राच्या नेतृत्वाखाली आपले सैन्य दक्षिणेत अकबराच्या मार्गावर रवाना केले. सप्टेंबर १६८१ मध्ये तो स्वतः दक्षिणेत आला. मार्च १६८२ मध्ये त्याने आपला तळ औरंगाबाद येथे ठोकला. पुढील संपूर्ण वर्षात त्याने काहीच सैनिकी हालचाल केली नाही. इ.स.१६८२ ते १६८३ मध्ये औरंगजेबाच्या सैनिकी तळावर किंवा कोकण, गुजरात मार्गे राजपुतानावर स्वारी करण्याची एक चांगली संधी राजांना मिळाला होती. यावेळी बादशहा औरंगजेब अडचणीत होता, शहाआलम या आपल्या आणखी एका पुत्राच्या एकनिष्ठेविषयी त्याला शंका होती. तसेच मराठ्यांकडून आपल्या जिवाला धोका असल्याचाही त्याचा ग्रह झाला होता. मुघल सरदार व सैन्यही मरठ्यांबरोबर संघर्ष करण्यास फारसे तयार नव्हते. अशा निराशा जनक परिस्थितीतूनही त्याने मार्ग काढायचे ठरवले. अकबराला पोर्तुगिजांची मदत असल्याचा संशय आला होता. त्यावरून त्याने पोर्तुगिज व मराठे यांच्याविरूद्ध मोहिम काढण्याचे ठरवले. या मोहिमेची सुत्रे शहा-आलम युवराजाकडे सोपवली. मात्र शहा आलमची मोहिम पूर्ण फसली. त्यानंतर बादशहा औरंगजेबाने स्वतः विजापुरच्या आदिलशाही राजवटी विरूद्ध मोहिम काढण्याचे ठरविले. मार्च १६८५ मध्ये आपल्या सैन्यासह तो विजापूरवर चाल करून गेला. दीड वर्षांच्या सतत प्रयत्नानंतर सप्टेंबर १६८६ मध्ये त्याने विजापूर जिंकून घेतले. ऑक्टोंबर १६८७ मध्ये त्याने गोवळकोंडाचे राज्यही जिंकून घेतले. गोवळकोंड्याचा राजा अब्दूल हसन तानाशहा यास त्याने दौलताबादच्या किल्ल्यात डांबून ठेवले. या काळात अर्थातच बादशहा औरंगजेबाने मराठ्यांविरूद्धची मोहिमेकडे दूर्लक्ष झाले होते.

## ७.३ संभाजीचे सिद्दी व पोर्तुगीजाविरूद्ध संघर्ष

आपल्या विरूद्धच्या कारस्थानाच्या प्रकरणाचे पूर्ण पारिपत्य केल्यानंतर संभाजी राजांनी अनुक्रमे जंजिऱ्याच्या सिद्दीस व गोव्याचे पोर्तुगीज यांचा समाचार घेण्याचे ठरवले. बादशहा औरंगजेबाच्या सांगण्यावरून या दोघांनीही मराठ्यांना उपद्रव करून त्रास देण्याची सुरवात केली होती. इ.स. १६८१ मध्ये तर सिद्दीने आपले सैन्य रायगडाच्या पायथ्याशी पाठवले होते. संभाजी महाराजाने सिद्दीचे आवाहन तात्काळ स्वीकारुन आपल्या आरमाराचा एक गट जंजिऱ्यावर स्वारी करण्यास पाठवला. इ.स.१६८२ च्या सुरूवातीला मराठ्यांचा सेनापती दादाजी रघुनाथ प्रभू महाडकर याने जंजिराच्या प्रदेशावर सतत स्वाऱ्या करून सिद्दीस जेरिस आणले होते. नेमके याच सुमारास आपल्या सैन्यासह बादशहा औरंगजेब दक्षिणेत उतरल्याचे संभाजी राजाला समजल्याने जंजिरा किल्ल्यावरची आपली मोहिम, ताबडतोब उठविण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. परंतु त्यामुळे जंजिऱ्याच्या सिद्दीला जीवनदान मिळाले. गोव्याच्या पोर्तुगिजांनीही मराठ्यांविरूद्ध आघाडी उघडावी यासाठी बादशहा औरंगजेबाने दबाव आणला. मुघल सत्तेची नाराजी पत्करून मराठ्यांविरूद्ध आघाडी उभी न करणे पोर्तुगिजांना शक्य नसल्याने त्यांनी दक्षिणेच्या प्रदेशावर आक्रमण केले. दरम्यान संभाजीराजे व युवराज अकबर

यांना पकडण्यासाठी बादशहा औरंगजेबाने आपल्या सैन्याची एक तुकडी कोकण प्रदेशात रवाना केली. तसेच सुरत व मुंबई येथील इंग्रज व वेंगुर्ला मधील डच बखारवाल्यांनीही मराठ्यांच्या विरूद्ध कारवाई करावी, यासाठी त्यांच्यावर दबाव आणला गेला. परिणामी संभाजी राजांची परिस्थिती अधिक अडचणीची झाली.

या अडचणीतून मार्ग काढण्याच्या उद्देशाने त्यांनी इ.स. १६८३ मध्ये गोव्याच्या पोतुगिजांनावर आक्रमण करण्याचे ठरवले. त्यामुळे एका बाजूला मराठ्यांचे सैन्य तर दुसऱ्या बाजूला मुघलांचे सैन्य अशा कात्रीत पोर्तुगिज सापडले होते. मराठ्यांची गोव्यावरील स्वारी निर्णायक ठरण्याची चिन्हे दिसत असतांना युवराज शहा आलम आपल्या सैन्यानिशी कोकणात उतरल्याची बातमी संभाजी महाराजास समजली. परिणामी गोव्यावरील आपली मोहिम स्थगित करून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी नोव्हेंबर १६८३ मध्ये, त्यांना परत महाराष्ट्रात येणे भाग पडले होते. त्यामुळे गोव्याच्या पोर्तुगिज सत्तेला मात्र आणखी एकदा जीवनदान मिळाले होते. सावंतवाडीच्या सावंतांना ही बादशहा औरंगजेबाने मराठ्यांच्या विरूद्ध चितावून दिले होते. या सामंतांना अद्दल घडेल असा धडा शिकविण्यासाठी त्यांच्यावर स्वारी करून त्याचे राज्य खालसा करण्याची तयारी संभाजी राजांनी केली होती. संभाजी राजांनी कोकणात औरंगजेबाला टक्कर देऊन एक रोमहर्षक इतिहास घडविला. याकाळात कोकण, गुजरातमार्गे राजपुतान्यावर अचानक स्वारी करण्याची सुचना अकबराने अनेकवेळा राजांना केली. परंतु त्यातील व्यावहारिक अडचणी लक्षात घेऊन त्यास प्रतिसाद देत नव्हते. त्यामुळे दिवसेंदिवस संभाजी महाराज आणि अकबर यांच्यात उदासिनता निर्माण होत गेली. शेवटी कंटाळून फेब्रुवारी १६८७ मध्ये युवराज अकबर वेंर्गुल्याच्या बंदरातून एका जहाजातून मस्कतकडे रवाना झाले.

## ७.४ छत्रपती संभाजी महाराजांचा मृत्यू

स्वराज्यातील उत्तर कोकण व बागलान प्रांतामध्ये तेथील प्रजाजनांना उपद्रव देण्यासाठी औरंगजेबाने फिरोज जंग यास रवाना केले. याची प्रतिक्रिया म्हणून संभाजी राजाने इ.स. १६८५ मध्ये मुघलांच्या औरंगाबाद, बऱ्हाणपूर विभागात आघाडी घेण्याचे ठरविले याप्रदेशातील ११ लहान मोठी गावे व शहरे राजांनी उद्ध्वस्त केल्याचे उल्लेख तत्कालीन कागद पत्रात आढळतात. बादशहा औरंगजेब विजापूर व गोवळकोंड्याच्या मोहिमेत गुंतला असताना मुघल सैन्यावर नजर ठेवण्यासाठी राजांनी पन्हाळ्याच्या किल्ल्यावर मुक्काम केला होता. ही दोन्ही राज्ये जिंकून घेतल्याने औरंगजेब विशेष प्रबळ झाला. तसेच मुघल सैन्य प्रचंड प्रमाणात वाढले होते. त्यानंतर औरंगजेबाने आपल्या सर्व शक्तीनिधी संभाजी राजांचा पाठलाग सुरू केला. राजांच्या विरूद्धच्या मोहिमेची सुत्रे त्याने आता आपल्या हाती घेतली व त्यासाठी अकलूज येथे तळ उभारला. संभाजी महाराजांच्या मार्गावरच मोगल सैन्य धावू लागले. अशातच सातारा परिसरात संभाजी महाराजाच्या मराठा सैन्यावर विजापूरच्या सर्जाखानने हल्ला केला. हा हल्ला हंबीरराव मोहित्यांनी यशस्वीपणे परतवला, पण त्यात हंबिरराव स्वतः मारला गेला. संभाजी राजांची परिस्थिती चिंताजनक बनली. मोगलांचा जोर वाढत होता. अनेक मराठा सरदारही संभाजी राजाची साथ सोडून शत्रू पक्षात दाखल होऊ लागले होते. अशा परिस्थितीत संभाजी राजे मात्र धावपळ करीत होते. पन्हाळा, रायगड परिसरात ही मोगल सैन्याच्या तुकड्या दिसू लागल्या. प्रत्येक वेळेला ते संभाजी राजांची हालचाल टिपून ठेवत होते. तरी संभाजी राजे निकराने लढत राहिले. तशातच १६८८च्या नोव्हेंबर महिन्यात कवि कलश आणि शिर्के यांच्यात संघर्ष पेटला. संभाजी राजे स्वतःही आपल्या फौजे सह विशालगडच्या पायथ्याशी येऊन

पोहोचले. संगमेश्वर जवळ त्यांनी शिर्केंवर प्रचंड हल्ला केला. शिर्के हे मराठे शाहीतील मातब्बर सरदार पण त्यांनीच पन्हाळा, खेळणा परिसरात संभाजी राजा विरूद्ध बंडाळी केली. मोघलांना ते जाऊन मिळाले. त्यांना अद्दल घडवणे आवश्यक होते. संभाजी राजांनी शिर्केंना पराभूत केले. आणि ते खेळणा किल्ल्यावर मुक्कामाला आले. त्यांचा हा संघर्ष सतत चालू होता. आपले म्हणणारे दगा देऊन शत्रूला मिळत होते. शिर्के सरदार तसेच प्रल्हाद निराजी सरदारांकडून फितूरी केल्याच्या बातम्या संभाजी राजाच्या कानावर पोहोचल्या. प्रल्हाद निराजीही मराठे शाहीतील सरदार असून, फितूर झाल्यामुळे त्याला अटक करण्यात आली. संभाजी राजे खेळणा मुक्कामी असताना, आजूबाजूच्या परिसरात मोगलांची टेहळणी चालूच होती. औरंगजेबाने आपल्या सरदारांना आज्ञा दिल्या होत्या की, त्यांनी संभाजी राजांवर नजर ठेवावी व संधी मिळताच त्याला पकडावे. मोगल सरदार शेख निजाम हा आपल्या सैन्याची छावणी कोल्हापूरतच ठेवून होता.

१६८९च्या जानेवारी मध्ये संभाजी राजे खेळणा किल्ल्यावरून रायगडाला जाण्यास निघाले. संगमेश्वरावर बरेच दिवस त्यांनी मुक्काम केला. संभाजी राजे, संगमेश्वराला आहेत, ही बातमी मोगलांमार्फत पोहोचली. शेख निजामाने कोल्हापूरातूनच त्यांच्यावर हल्ला करायचे ठरवले. तसा हा परिसर डोंगराळ व अनेक लहान मोठ्या पळवाटा असलेला असा होता. तो अशा आड वाटेने आला की १ फेब्रुवारी १६८९ रोजी त्याचे सैन्य संगमेश्वराला येऊन पोहोचले आणि तरी सुद्धा मराठ्यांना त्यांचा सुगावा लागला नाही. मोगलांनी अशा प्रकारे संभाजी महाराजांवर अचानक छापा घातला. थोडा संघर्ष होऊन शेवटी संभाजी राजांना शेख निजामाने पकडले. कवि कलश ही पकडला गेला. संघर्षात दोन्ही कडून सैनिक मारले गेले. शेख निजामाने तातडीने संभाजी महराज व कवि कलशला इतर काही सैनिकांना अगदी काटेकोर बंदोबस्तात बहादूर गडावरील मोगल छावणीकडे गेले.

छावणीत संभाजी राजांचा व इतर सर्व कैद्यांची खूप विटंबना करण्यात आली. या विषयाच्या अनेक अख्यांकिका तत्कालीन समाजात पसरल्या होत्या. त्याचेच प्रतिबिंब बखर वाङ्मयात आढळते. साम्राज्याची छोटी बखर, मल्हार रामराव चिटणीसांची बखर आणि पंत प्रतिनिधींची बखर, या बखरीतून बऱ्याच विस्ताराने माहिती मिळते. यात अनेक कल्पीक कथा आहेत. त्यानुसार बादशहा औरंगजेब आपल्या फौजेसह तुळजापूर मुक्कामी येऊन राहिला होता. तेथून संभाजी महाराज यांच्यावर फौजखाना करून दिली. महाराज संगमेश्वरच्या किल्ल्यावर होते. अशातच मोगलांनी हल्ला केला. संभाजींना तुळजापूरात नेण्यात आले, असे वर्णन त्यांच्यात आहे.

इश्वरदास नागरांनीही या विषयाची नोंदणी केली आहे. तो ही मोगलांच्या चाकरीत होता. परंतु त्याने संभाजीच्या स्वाभिमानी स्वभावाला दाद दिली.

संभाजीराजे व कवी कलश या उभयंतांचे कैदेमध्ये खुप हाल करण्यात आले. १५ फेब्रुवारी १६८९ रोजी संभाजीराजांचे डोळे काढण्यात आले. कवी कलश यांची जीभ छाटण्यात आली. शेवटी ११ मार्च १६८९ रोजी संभाजी राजांचा वध करण्यात आला. कवी कलशलाही ठार मारण्यात आले. बादशहा औरंगजेबाचा चरित्रकार काफीखान लिहितो की शेवटी त्या दोघांच्याही मृत शरिरात पेंढा भरण्यात आला होता. व ती प्रेते मिरविण्यात आली. संभाजी राजांच्या विषयी अनेक दंतकथा प्रचलित झाल्या. मराठी माणसाचे अंतःकरण पिळवटून निघाले.

समकालीन इतिहासकारांच्या लिखाणातही ह्या बाबतीत बरेच संदर्भ येतात. संभाजी महाराजाने धर्मांतर करावे असा मोगलांचा प्रयत्न होता. परंतु संभाजी राजाने मृत्यूला कवटाळले.

## ७.५ छत्रपती राजाराम :

संभाजी राजांना मोगलांनी कैद केले तेव्हाच मराठी स्वराज्याचा राजा कोण? हा प्रश्न निर्माण झाला. संभाजीला मोगलांच्या कैदेतून मुक्त करण्याचा प्रयत्न सुरू होताच, परंतु मराठ्यांचे स्वराज्यपद रिकामे राहू शकत नव्हते. एप्रिल १६८९ रोजी राजाराम महाराज रायगडावरून निसटला आणि प्रतापगडाला गेला. मुगल सैन्याला जेव्हा हे कळले तेव्हा ते त्याचा पाठलाग करू लागले. प्रतापगडाजवळ दोन्ही सैन्यात युद्ध झाले. एप्रिल १६८९ मध्ये प्रतापगड मोगलांच्या ताब्यात गेला. पण त्या आदीच राजाराम महाराज पन्हाळ्याला पळून गेले. शिवाय राजाराम महाराजाची प्रकृती अशी धावपळ करण्यासारखी नव्हती. मुगलांनी या वेळेला सगळीकडून नाकाबंदी केली. औरंगजेबाने त्याचा पाठलाग करण्यासाठी अब्दुल खानाला पाठवले. अब्दुलखानाने तुंगभद्राजवळ सुभानगडला राजारामांवर छापा घातला. या प्रसंगाच्या वेळेला गुप्तपणे राजाराम महाराज पन्हाळगडावरुन निसटले आणि शेवटी वेगवेगळी वेशांतरे करून ३ नोव्हेंबर १६८९ मध्ये ते जिंजीला पोहोचले. राजाराम महाराज जिंजीला पोहोचल्यानंतर काही दिवसांनी जिंजी हे मराठ्यांचे केंद्र बनले. हळूहळू राजाराम महाराजांचे सर्व मंत्री येथे येऊन पोहोचले.

एप्रिल १६९० मध्ये राजारामाने आपले अष्टप्रधान मंडळ जाहीर केले त्यात.

| | |
|---|---|
| १) निळोपंत पिंगळे | - पेशवा |
| २) शंकरजी नारायण | - सचिव |
| ३) जनार्दन पंत हनमंते | - अमात्य |
| ४) शंकराचार्य कालगावकर | - पंडीतराव |
| ५) रामचंद्र त्रिंबक पुंडे | - मंत्री |
| ६) महादजी गंगाधर | - मंत्री |
| ७) खंडोबल्हाळ | - सुमंत |
| ८) खंडेराव पाणसंबळ /दाभाडे | - सेनापती |

### ७.५.१ रायगडचा पाडाव :

रायगड हा किल्ला कोणत्याही शत्रुला ताब्यात घेणे सोपे नव्हते. परंतु ३ नोव्हेंबर १६८९ रोजी जुल्फीकार व खानाने रायगड किल्ला आपल्या ताब्यात घेतला. मुगलांचा हा लढा आठ महिने सतत चालू होता. रायगड किल्ला ताब्यात घेतला महाराणी येसुबाई, शाहू व छत्रपती घराण्यातील इतर काही लोक सन्मानाने व सुरक्षितरित्या मुगल ठाण्यावर औरंगजेबाच्या तळ्यात नेण्यात आले होते. परंतु मुगलांचा हा उत्साह काही काळापुरता टिकून राहिला. मराठे अशा परिस्थितीत राजाराम महाराजाच्या नेतृत्वाखाली स्वराज्याचा बचाव करण्यास तयार होते. राजारामामध्ये आपल्या पित्याप्रमाणे सगळ्या आघाड्या सांभाळण्याचे गुण नव्हते. तरीही आपल्या सल्ल्यागारांच्या सल्ल्याने सर्व गोष्टी मान्य केल्या. त्याचा प्रमुख सल्लागार प्रल्हाद निराजी निराजी रावजींचा मुलगा होता.

मराठ्यांना या काळात एकत्रित आणण्याचे श्रेय रामचंद्र निळकंठ यांना जाते. मुलघांविरूद्धच्या लढ्यात त्यांनी मराठ्यांना एकत्रित आणले. रामचंद्र पंत सैनिक नव्हते व फार क्वचित ते एखाद्या लष्करी मोहिमांना जात. पण मराठा सरदारांवर त्यांची बारीक नजर असे. दोन अतिशय महत्त्वाचे मराठी प्रमुख, परशुराम त्रिंबक प्रतिनिधी आणि शंकराजी नारायण सचीव यांनी हे किल्ले परत मिळविण्याच्या कामगिरी मध्ये अतिशय महत्त्वाची भुमिका बजावली.

### ७.५.२ मराठ्यांचा जिंजी पर्यंतचा प्रवास :

राजाराम महाराजांची स्थिती पन्हाळगडावरही असुरक्षित झाली होती. त्याकारणाने असे ठरविण्यात आले की, त्यांनी आपली सुटका करून जिंजीला निघून जावे. त्यांनी आपल्या बरोबर आपले काही अधिकारी घेतले. १५ नोव्हेंबर १६८९ रोजी राजाराम जिंजीला पोहोचले. त्यामुळे जिंजी आता मराठ्यांचे केंद्रीय स्थान झाले होते.

मराठ्यांचे हे भविष्य घडविण्याचे श्रेय रामचंद्रपंत अमात्य आणि संताजी घोरपडे यांना जाते. मराठ्यांचा राज्यकारभार आणि त्यांची उद्दिष्ट्ये हे सगळे त्याकाळातील कागदपत्रांमध्ये स्पष्ट केले होते. राजारामांनी बऱ्याचशा मराठा सरदारांना या वेळेला आपल्याकडे वळवले. जे आधी मुघलांना जाऊन मिळाले होते. २२ मार्च १६९० रोजी राजारामांनी कारीच्या बाजी सर्जेराव जेधे देशमुख यांना आपल्या पाठिंब्याविषयीचे जिंजीवरून आश्वासन दिले. त्यांच्या पत्रात त्यांनी स्पष्ट पणे म्हटले होते की, मराठा सरदारांच्या पाठिंब्यामुळे मुघल सत्तेची ताकद वाढत आहे. त्यामुळे आपल्या धर्माचे रक्षण करण्यासाठी त्यांनी ही मदत थांबवावी.

मराठा सैन्य आता दूर-दूरच्या प्रदेशांपर्यंत पसरले होते. खानदेश पासून ते दक्षिण किनारपट्टी वरून गुजरात, बागलान, गोंडवाना आणि कर्नाटकापर्यंत. या सगळ्या प्रदेशांमध्ये त्यांनी मुघलांच्या संपत्तीचा नाश केला. त्यांची जनावरे व त्यांच्या लष्करी तळ्यावरील धान्य लूटले गेले. बादशहा औरंगजेबाला या सगळ्या गोष्टींना एकाच वेळेला तोंड देणे कठीण झाले. याशिवाय रामचंद्रपंतांनीही ज्या मराठे सरदारांनी मुघलांची बाजू घेतली होती त्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्यात यश मिळवले.

### ७.५.३ घेराव घालण्यांवर घेराव

राजाराम महाराज जिंजीला गेल्यामुळे कर्नाटकातील हिंदू जनतेमध्ये उत्साह निर्माण झाला. गोवळकोंड्याचे पूर्वीचे सरदार इस्माईल खान मटवा आणि यच्चपा नाईक व इतर राजारामाला येऊन मिळाले. जिंजी जिंकण्यासाठी औरंगजेबाने जुल्फीकार खानाला पाठविले होते. जिंजाला जाणाऱ्या मुघल सैन्यावर ईस्माईल खान मटवा आणि यच्चपा नाईक यांनी वरचेवर हल्ले केले. पण सप्टेंबर १६९० मध्ये जुल्फीकार खान जिंजीला पोहोचला. जिंजीच्या आजूबाजूच्या प्रदेशात मराठ्यांनी जाळपोळ करून उद्ध्वस्त केला होता. त्यामुळे मुगल सैन्याला रसद मिळणे कठीण झाले. मराठ्यांचा जोर कमी करण्यासाठी जुल्फीकार खानाने औरंगजेबाकडे मदतीसाठी सैन्य व रसद पाठविण्यास सांगितले. औरंगजेबाने लगेचच शहजादा कामबक्श व आसदखानाला पाठविले. याचवेळी मुगलांकडे गेलेले नागोजी पांढरे, हनमंतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, कागलकर, घाडगे हे सरदार राजाराम महाराजाला येऊन मिळाले. जुल्फीकार खानाच्या मदतीला कामबक्श व आसदखान आले म्हणून रामचंद्र पंतांनी १५ हजार सैन्य पाठविले. धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या प्रमुख सरदारांना सैन्याबरोबर पाठविले. मधल्या काळात औरंगजेबाने हल्ला चढविला. धनाजी जिंजीला पोहोचताच त्याने इस्माईल

खानाचा पराभव केला आणि त्याला पकडून नेले. धनाजी पाठोपाठ संताजी येत होता. त्याची गाठ अलीमर्दान खानाशी झाली. संताजीने त्याचा पराभव करून त्याला पकडून कैद केले. जुल्फीकार खानावर मराठ्यांचे छुपे हल्ले होत होते. शेवटी त्याला जिंजीचा वेढा काढावा लागला. जुल्फीकार खानाच्या पत्रामुळे औरंगजेबाने कासीमखान बरोबर सैन्य व रसद पाठवली. संताजीने त्याच्यावर कांजीजवळ हल्ला चढवला आणि त्याचा पराभव केला.

### ७.५.४ संताजीचा शोकाकूल शेवट :

संताजी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत फक्त रामचंद्रपंतांचेच ऐकत असे व त्यांना मान देत असे. या काळातील पत्रव्यवहारातून आपल्याला स्पष्ट पणे कळते की, संताजीला सांभाळणे रामचंद्रपंतांना किती कठीण गेले. संताजीचे सडेतोड बोलणे व त्याचा राग अनेक वेळा राजाराम महाराजाला पचवावा लागला. बऱ्याचशा मुघल सरदारांवर विजय मिळवल्या नंतर संताजी एप्रिल १६९५ला थेट जिंजीला आला, व त्याने राजारामाकडून आपल्या कामगिरी बद्दल योग्य ते बक्षिस व किंमत मागितली. संताजीच्या अशा स्वभावामुळे राजाराम महाराजांचे त्याच्या बरोबरचे संबंध बिघडले होते. त्यामुळे संतापून राजारामाने त्याला सेनापती पदावरून काढून टाकले. व त्याच्या जागी धनाजी जाधवची नेमणूक केली. झालेला हा अपमान संताजी सहन करू शकला नाही. १६९६च्या पावसाळ्याचे दिवस संताजीला फार कठिण गेले. जसे ते संताजीला कठीण गेले तसेच ते राजाराम महाराज व धनाजीलाही कठीण गेले. राजारामाने धनाजीला कैद करून आणण्यास सांगितले. संताजी या वेळेला पळून गेला कारण धनाजीने त्याला भरपूर पैसे देऊन कर्नाटकाहून महाराष्ट्रात आणले. म्हसवडच्या नागोजी मानेने त्याचा पाठलाग केला. म्हसवड हे साताऱ्या जवळचे गाव आहे. जून १६९७ ला भर दुपारच्या उन्हात जेव्हा संताजी नदीवर स्थान करीत होता. त्यावेळेला त्याला पकडून मारण्यात आले. संताजीचा मृत्यु मराठ्यांसाठी मोठा धक्का होता. संताजी त्याच्या गनिमी काव्यासाठी ओळखला जातो. संताजी हा पराक्रमी होताच, शिवाय तो रणनीतिज्ञ होता. प्रति पक्षाला हमखास पेचात पकडून कसे नष्ट करावयाचे हा डावपेच संताजी सारखा इतर कुणालाही फारसा जमला नाही.

### आपली प्रगती तपासून पहा.

१) मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात संताजी घोरपडेच्या कामगिरीचे वर्णन करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

### ७.५.५ जिंजीचा पाडाव

जुल्फीकार खानाने जवळपास ८ वर्ष जिंजीचा वेढा तसाच ठेवला होता. संताजी व धनाजी मुळे मराठे इतका काळ जिंजीला टिकाव धरू शकले. या दोघांनीही मुगलांना कर्नाटक आणि महाराष्ट्रामध्ये अडकवून ठेवले होते. अधिक वेळ न घालवता जुल्फीकार खानाने राजाराम महाराजाला पकडावे असा तगादा बादशहा औरंगजेबाने लावला होता. पण जुल्फीकार खानाने या सगळ्याकडे दुर्लक्ष केले होते. याचे कारण औरंगजेब आता ७१ वर्षांचा झाला होता. जर तो मृत्यू पावला तर आपले वजन दरबारात वाढवण्याचा खानाच्या गुप्त हेतू होता. वरवर औरंगजेबाचे

आदेश पाळण्याचे नाटक तो करीत होता. पण त्यातून मराठ्यांशी सहानुभूतीचे संबंध त्याने प्रस्थापित केले होते. राजाराम महाराज सुद्धा जिंजीच्या बंदीवासाला कंटाळला होता. म्हणून त्याने जुल्फीकार खानाबरोबर तडजोड करण्यासाठी आपला दासीपूत्र कर्ण याला १६८९ मध्ये पाठविले. परंतु औरंगजेबाने त्यांची ही बोलणी फेटाळून लावली. नोव्हेंबर १६८९ मध्ये वेढ्याचे काम पुन्हा सुरू केले. किल्ल्यावर राहणे राजारामाला धोक्याचे वाटू लागले. यावेळेला खंडो बल्हाळ चिटणीसाने जुल्फीकार खानाचे मन वळवले. राजाराम व त्याच्या इतर माणसांना खानाने किल्ल्याबाहेर जाऊ दिले. शेवटी राजाराम विशालगडावर पोहोचला आणि ३ नोव्हेंबर १६८९ रोजी खानाने किल्ला जिंकून घेतला.

त्यानंतर सातारा ही मराठ्यांची राजधानी झाली. औरंगजेबाने रूहुल्ला खानाला पन्हाळा आणि साताऱ्याचा प्रदेश जाळून टाकण्याचा आदेश दिला. डिसेंबर १६९९ ला त्याने सातारा किल्ल्याला वेढा घातला. सुभानजी आणि प्रागजी या किल्ल्याचे अधिकारी होते. त्यांनी अनेक दिवस हा किल्ला लढविला. ह्या वेळेला किल्ल्यावर धनाजी जाधव, राणोजी घोरपडे, हणमंते यांनी बाहेरून छुपे हल्ले केले. त्यांनी मुघलांची रसद मारून त्यांना हैराण केले. हा किल्ला ताब्यात घेण्यात मुघलांना जरी यश मिळाले असले तरी १७०४ मराठ्यांनी पुन्हा हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला.

१६९८ ते १६९९ या काळात राजाराम महाराजाने संपूर्ण स्वराज्याभर दौरा केला. या काळात त्याने अनेक स्थानिक प्रमुखांच्या भेटीगाठी घेतल्या. याशिवाय किल्लेदार व सैनिकांना त्याने आपल्या असे प्रोत्साहन केले. या संपूर्ण दौऱ्यामध्ये त्याला जाणवले की मुघल सत्ता आता ऱ्हास होण्याच्या मार्गावर आहे. बादशहा औरंगजेब आधीच वाढल्या वयामुळे नियंत्रण ठेवण्यास कमी पडत होता. त्यात त्याच्या राज्यकारभारामध्ये अनेक खटके उडत होते. त्याची मुले व मंडळी स्वतःचा स्वार्थ पाहत होती. यावेळेला राजारामाने नेमाजी यांची नियुक्ती केली व त्यांच्या बरोबर इतर काही प्रमुख नेते या सगळ्यांनी खानदेश ते बेरार या प्रदेश तुडवले व या प्रदेशातून चौथाई मिळवली. १६९९च्या सुरूवातीला नेमाजींनी थालनेरचा मुघल सुभेदार हुसेन अलि खान याला अटक केले व त्याच्या कडून दोन लाख रूपयांची खंडणी घेऊन त्या सुटका केली. या बातमी मुळे औरंगजेब हताश झाला.

**आपली प्रगती तपासून पहा.**

१) जिंजीच्या पाडावावर भाष्य करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

### ७.५.६ राजारामाचा मृत्यू

राजारामाची प्रकृती मुळातच नाजूक होती. मागच्या सर्व धावपळी व दगदगीचा ताण त्याला सहन झाला नाही. जानेवारी १७०० मध्ये त्याला अधिकच थकवा वाटू लागला. त्याला

नलज्वर झाला होता. २ मार्च १७०० मध्ये वयाच्या ३०व्या वर्षी त्याच्या मृत्यू झाला. राजारामाचे निधन सिंहगडावर झाले. त्याच्या तीन स्त्रीयांपैकी अंबीकाबाई सती गेली.

**आपली प्रगती तपासून पहा.**

१) छत्रपती राजारामावर थोडक्यात टिप लिहा.

## ७.६ महाराणी ताराबाई

इ.स. १७०० मध्ये राजाराम महाराजाचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूने मोगलांच्या अशा पुन्हा खुलल्या. मराठ्यांना कोणी नेताच राहिला नाही अशी परिस्थिती या वेळी निर्माण झाली. परंतु महाराणी ताराबाईने पुढे येऊन मराठी सेनेचे नेतृत्व आपल्या हाती घेतले तिच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्राम पूर्वीच्याच तडफेने जारी राहिला. या काळात ताराबाईने दाखविलेले शौर्य व प्रकट केलेले नेतृत्वगुण अतुलनीय होते. मराठ्यांचा प्रतिकार व पराक्रम यापुढे मोगलसेना पूर्णपणे हतबल झाली. आपल्या अखेरच्या कालखंडात औरंगजेबाला हे पुरते कळून चुकले की, आपण मराठ्यांना पराभूत करू शकत नाही, त्यामुळे तो अतिशय निराश झाला. मोगल सैन्याला तर महाराष्ट्रातून कधी एकदा आपण आपल्या घरी परततोय असे झाले होते. अशा निराश अवस्थेत इ.स.१७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला.

महाराणी ताराबाईने मात्र ह्या सगळ्या गोष्टी स्वतःचा व राजाराम महाराजाचा मुलगा दुसरा शिवाजी याच्या नावाने राज्यकारभार केला. राजारामांचा मृत्यु झाल्यानंतर लगेचच चार वर्षांच्या आपल्या मुलाला तिने राज्याभिषेक करून घेतला. व त्यांच्या नावाने मराठ्यांचा राज्यकारभार सांभाळला. ताराबाई हंबीरराव मोहित्यांची मुलगी होती. तिचा जन्म १६७५ ला झाला. ताराबाईने राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर स्वतः लष्करी मोहिमा काढल्या. मुघलांविरूद्ध तिने मुत्सद्दीपणाचे धोरण अवलंबिले. परंतु औरंगजेबाने आपले लक्ष आता पन्हाळा आणि विशालगड काबीज करण्याकडे वळविले.

बादशहा औरंगजेबाने भरपूर प्रमाणात पैसे देऊन पन्हाळा, विशालगड, सिंहगड आणि रायगड किल्ले मिळवले. मराठ्यांनी या वेळेला एक नविन धोरण अवलंबिले होते. ते बराच काळ एखादा किल्ला लढवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यानंतर तो किल्ला मोठी खंडणी घेऊन शत्रूला द्यायचा व त्यानंतर औरंगजेबाची पाठ फिरताच तो किल्ला परत घेतला जाई. महाराणी ताराबाईच्या नेतृत्वाखाली मराठ्यांची सत्ता दिवसेंदिवस वाढत होती. १७०७ पर्यंत तर मराठ्यांची मजल महाराष्ट्राच्या बाहेर माळवा, गुजरात येथे पर्यंत गेली. त्यांनी पश्चिम किनाऱ्यावरची बर्हानपूर, सुरत, भरूच व अनेक मोठ्या प्रदेशांमध्ये लूटालूट केली. त्यांनी दक्षिण कर्नाटकात आपली सत्ता प्रस्थापित केली. एका क्षणी औरंगजेब या विचारापर्यंत आला होता की आपण मराठ्यांशी समेट करावा. परंतु लगेचच त्याने आपला विचार बदलला. कारण त्याचे

सरदार आणि मराठे एकमेकांना भेटले होते. त्यातच १७०७ मध्ये अहमदनगर येथे औरंगजेबाचा मृत्यु झाला.

छत्रपती शाहुची सुटका झाल्यानंतर मात्र ताराबाईच्या बऱ्याचशा समर्थकांनी आपला पाठिंबा काढून घेतला.

**आपली प्रगती तपासा**

१) मराठ्यांच्या इतिहासात महाराणी ताराबाईंनी बजावलेल्या भूमिकेचे परिक्षण करा.

## ७.७ सारांश

या स्वातंत्र्य लढ्यात मराठ्यांनी आपली सिद्धता दाखवून दिली. त्याचबरोबर मुघलांचे शक्तीशाली साम्राज्य संपुष्टात आले होते.

## ७.८ प्रश्न

१) 'संघर्षाच्या कालखंडात' (१६८०-१७०७) महाराष्ट्रात घडलेल्या घटनांचे वर्णन करा.
२) १६८९ ते १७०७ या काळामधील मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यावर निबंध लिहा.
३) टीपा लिहा.
   अ) संभाजी ब) राजाराम क) ताराबाई

## ७.९ संदर्भ सूची

१) हाऊस ऑफ शिवाजी, लेखक जदूनाथ सरकार
२) हिस्ट्री ऑफ औरंगजेब, लेखक सर जदूनाथ सरकार खंड III आणि खंड V.
३) औरंगझेबस् लाईफ इन महाराष्ट्र, लेखक ईश्वरदास विद्यासागर
४) राजाराम्स लाईफ, लेखक वी. एन. चिटणीस.

❖❖❖❖

# ८

# छत्रपती शाहू महाराज-महाराणी ताराबाई संघर्ष व पेशवाईचा उदय

**अनुक्रमणिका**


८.० उद्दिष्ट्ये
८.१ प्रस्तावना
८.२ शाहूची सुटका
८.३ शाहू महाराजांचे महाराष्ट्रात आगमन
८.४ शाहू महाराजांना ताराबाईचा विरोध
८.५ शाहू महाराज ताराबाई संघर्ष व खेडची लढाई
८.६ राजपुत्र शाहूचा राज्याभिषेक
८.७ शाहू महाराजा पुढील अडचणी व बंदोबस्त
८.८ कोल्हापूर राज्यातील क्रांती व ताराबाई कैद
८.९ बाळाजी विश्वनाथाचा उदय
८.१० बाळाजी विश्वनाथाची कामगिरी
८.११ बाळाजी विश्वनाथाची योग्यता
८.१२ सनदांचे स्वरूप व महत्त्व
८.१३ सारांश
८.१४ दिर्घोत्तरी प्रश्न
८.१५ इतर संदर्भ ग्रंथसूची


## ८.० उद्दिष्टे

१) औरंगजेबाच्या मृत्युनंतरच्या मराठ्यांच्या परिस्थितीचा अभ्यास करणे.
२) शाहू-ताराबाई संघर्षाचा आढावा घेणे.
३) शाहू पुढील समस्या व त्या सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न समजून घेणे.
४) पेशवाईच्या उदयाची पार्श्वभूमी समजून घेणे.
५) बाळाजी विश्वनाथाची कामगिरी जाणून घेणे.
६) बाळाजी विश्वनाथाची योग्यता समजून घेणे.

## ८.१ प्रास्ताविक

छत्रपती घराण्यातील शेवटचे कर्तबगार पुरूष म्हणून शाहू महाराजांकडे पाहिले जाते. शाहू महाराजांच्या मातोश्री येसूबाई व शाहू महाराज मोगलांच्या कैदेत होते. जवळपास १७-१८ वर्ष त्यांना कैदेत घालवावी लागली. मात्र बादशहा औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगल-मराठा युद्ध संपुष्टात आले. दरम्यानच्या काळात औरंगजेबाचा मुलगा आजमशहा याने १४ मार्च १७०७ मध्ये स्वतःला बादशहा म्हणून घोषित केले व मराठ्यांविरूद्ध सुरू असणारे युद्ध बंद करून आपला भाऊ शहा आलमचा बंदोबस्त करण्यासाठी उत्तरेकडे निघाला. या घटनाक्रमातूनच मोगलांमधील अंतर्गत कलह, मराठ्यामधील अंतर्गत कलहास सुरूवात झाली. पुढे छत्रपतींची परिस्थिती कमजोर बनल्याने पेशवाईचा उदय झाला.

## ८.२ शाहूची सुटका

शाहू महाराज हे छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र होते. त्यांचे जन्म नाव शिवाजी असे होते. त्यांच्या मृदु व सौजन्यशील स्वभावामुळे त्यांना शाहू असे संबोधण्यात येऊ लागले. संभाजी महाराजांच्या वधानंतर मोगलांनी रायगड किल्ल्यास वेढा दिला. स्वराज्यावर अत्यंत दुर्धर प्रसंग कोसळला. अनेक किल्ले, ठाणी मोगलांच्या ताब्यात गेली. छत्रपती राजाराम महाराज यांना संरक्षणासाठी जिंजीला जावे लागले. अशा कठीण परिस्थितीत महाराणी येसूबाईंनी रायगडास वेढा घालून बसलेल्या झुल्फिखारखान या मोगल सेनापतीशी सामोपचाराच्या वाटाघाटी करून रायगड त्यांच्या ताब्यात दिला व आपला मुलगा शाहू व स्वतःस मोगलाची कैद स्वीकारली.

शाहू महाराज राजकैदी असल्यामुळे त्यांना मोगलांच्या छावणीत चांगली वागणूक मिळत होती. त्यांना वार्षिक तनखा ठरवून दिला होता. सन्मानाचा भाग म्हणून मनसबही देण्यात आली होती. घरच्या माणसापैकी एक समजून ममतेने वागणूक दिली जात असे.

२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेब बादशहाचा मृत्यु झाला. औरंगजेबाच्या मृत्युने मोगलांचे मराठ्यांशी चालू असलेले प्रदीर्घ युद्ध संपले. ही बातमी औरंगजेबाचा पुत्र आजमशाहास समजली तो त्वरेने अहमदनगरला आला. व त्यांनी ईदचा मुहूर्त साधून १४ मार्च १७०७ रोजी स्वतःस बादशहा म्हणून घोषित केले.

आपला मोठा भाऊ शाहा आलम याचा विरोध मोडून काढल्याशिवाय आपल्याला निरंकुश सत्ता लाभणार नाही. याची खात्री आजमशाहास होती. म्हणूनच त्यांनी मराठ्यांबरोबर सुरू असणारे युद्ध बंद करून तो घाईघाईने दिल्लीकडे जाण्यास निघाला. याच सुमारास संभाजीचा मुलगा शाहू व त्यांची आई येसूबाई मोगलांच्या कैदेत होती. दिल्लीच्या रोखाने जात असताना

झुल्फिकार खान व काही मुत्सद्यांच्या सल्ल्यानुसार आजमशहाने शाहूची ८ मे १७०७ रोजी सुटका केली. मात्र महाराणी येसूबाई व अन्य कैद्यांची सुटका केली नव्हती.

शाहू महाराजांच्या सुटकेबाबत इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडली आहेत.

काही इतिहासकारांच्या मते, ''झिनतउन्नीसाच्या सल्ल्यावरून शाहूची सुटका करण्यात आली.''

काही इतिहासकारांच्या मते, ''झुल्फिकार खान व शाहू महाराज यांचे घनिष्ठ संबंध होते, तसेच शाहू महाराजांबद्दल त्यांच्या मनात आदर होता. व तो सतत आजमशाहाला शाहूला सोडून देण्यासाठी आग्रह करत होता पुढे आजमशाहनेही समती दर्शविल्याने शाहू महाराजांची सुटका झाली.''

खाफी खान लिहतो. ''शिवाजीचा नातू राजा शाहू यांच्या बरोबर झुल्फिकारखानाचे खास आणि घनिष्ठ संबंध होते. पूर्वीपासूनच तो शाहूच्या सर्व कारभाराकडे आस्थापूर्वक लक्ष देत होता. झुल्फिकारखानाने आजमशहाला विनंती करून शाहू महाराज आणि त्यांचे काही सोबती यांना मुक्त करविले.''

भीमसेन सक्सेना लिहतो, ''संभाजीचा मुलगा राजा शाहू याला आलमगीर बादशहाच्या कारकिर्दीत नजरकैदेत ठेवण्यात आले होते. त्याला नंतर झुल्फिकारखानाच्या हवाली करण्यात आले होते. त्याला उघड उघड निरोप देणे हे इष्ट वाटले नाही म्हणून आजमशहाच्या इशाऱ्याने, राजा शाहू हा काही सहकाऱ्यांना बरोबर घेऊन, दोराजवळ मोगल छावणी होता, तेथून पळाला, त्यांने दक्षिणेची वाट धरली.'' भीमसेन हा औरंगजेबाचा दरबारी लेखक होता.

बुऱ्हाणपूरच्या छावणीत झुल्फिकार खानाने आजमशाहाला असे सांगितले होते की जर शाहू महाराजांची सुटका केली तर मराठ्यांमध्ये दुही निर्माण होईल व त्याचा फायदा मोगलांना होईल. या कारणामुळे सुटका झाली असावी असे काही इतिहासकारांचे मत आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) शाहू महाराजांच्या सुटकेच्या वृत्तांत वर्णन करा.

___

___

___

___

___

## ८.३ शाहू महाराजांचे महाराष्ट्रात आगमन

शाहू महाराजांनी आपली सुटका झाल्या नंतर त्यांच्या आगमनाची वार्ता देणारी पत्रे अनेक मराठा सरदारांना लिहिली. त्यांच्या सुटके नंतर त्यांच्या सोबत सर्वप्रथम मोरोपंत सबनीस, महादजी कृष्ण जोशी ही मोजकी मंडळी होती. त्यांचे महाराष्ट्रात आगमन होताच अनेक मराठा सरदारांनी त्यांचे स्वागत केले. नर्मदा पार करून ब-हाणपूर पासून शाहू महाराज पश्चिम खानदेशातीला बीजगड येथे आले. बीजगड उर्फ बढवाणी हे नर्मदेच्या दक्षिणेस लहानसे संस्थान होते. या लहानशा संस्थानाने मोगलांबरोबर संघर्ष सुरू ठेवला होता. या संस्थानातील मोहनसिंह रावळ ह्यांने शाहू महाराजांचे समर्थन केले. त्याचबरोबर अमृतराव कदमबांडे, सुजनसिंह रावळ, बोकील, पुरंदरे हे सरदारही शाहू महाराजांना येऊन मिळाले. जुलै १७०७ पर्यंत महाराज खानदेशात होते. याच कालावधीत परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, रूस्तुमराव जाधव व चिमणाजी दामोदर हे बलाढ्य सरदार शाहू महाराजांच्या गटात दाखल झाले. या कालावधीत शाहू महाराजांची स्थिती पुष्कळ बरी झाली. त्यानंतर ते अहमदनगरला आले व राज्यावरील आपला हक्क परत मिळावा अशी त्यांनी भूमिका घेतली व आपणच मराठा राजवंशाचे वारसदार आहेत, असे जाहीर केले.

## ८.४ शाहू महाराजांना ताराबाईचा विरोध

शाहू महाराजांचे महाराष्ट्रात आगमन झाल्यानंतर शाहू ताराबाई यांच्यामध्ये वारसा हक्कावर संघर्ष होणार हे निश्चित होते. त्या पाठीमागे पाश्र्वभूमीही तशी होती. ही पार्श्वभूमी समजून घेतानाच आपणास ताराबाई शाहू महाराजांना का विरोध करत होती हे स्पष्ट होते.

महाराणी ताराबाई शाहू महाराजांना का विरोध करत होत्या त्या बाबतीतील विधाने पुढील प्रमाणे आहेत.

१) छत्रपती राजारामाच्या मृत्युनंतर (मार्च १७००) औरंगजेबाच्या मृत्युपर्यंत (फेब्रुवारी १७०७) पर्यंत मराठ्यांची सत्ता मी सांभाळली.
२) औरंगजेबासारख्या सामर्थ्यशाली शत्रूशी झुंज देऊन मराठी सत्तेचे संरक्षण करत मी माझे कर्तृत्व सिद्ध केले.
३) राजारामाच्या मृत्युनंतर माझा मुलगा दुसरा शिवाजी याच्या नावाने साताऱ्याहून मी राज्यकारभार पाहिला.
४) छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर शिवाजी महाराजांनी निर्माण केलेलं राज्य संपुष्टात आले आहे. त्यामुळे माझा मुलगा दुसरा शिवाजी याचाच राजगादीवर हक्क आहे. हा हक्क हिरावून घेण्याचा अधिकार शाहूला नाही.

५) छत्रपती शिवाजी महाराजांची इच्छा संभाजी ऐवजी आपला कनिष्ठ पुत्र राजाराम यालाच स्वराज्याचा वारस नेमण्याची होती. हा ही मुद्दा उपस्थित करून विरोध दर्शवीला होता.

ताराबाईने शाहू महाराजांना विरोध दर्शविण्यासाठी उपस्थित केलेले मुद्दे टिकण्यासारखे नव्हते.

१) रायगड मोगलांच्या ताब्यात जात असताना केवळ राजारामांना वाचविण्यासाठी नाईलाजास्तव येसूबाईने शाहूमहाराजासह मोगलांची कैद स्वीकारली होती.
२) शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी संभाजी महाराजानाच पट्टाभिषेक (यूवराजाभिषेक) झाला होता. त्यामुळे संभाजी महाराजांचे पुत्र शाहू महाराज यांचा राज हक्क आहे हे सिद्ध होते.
३) मोगल सुध्दा शाहू महाराजांनाच छत्रपतींचे वारस मानत होते. पर्यायाने त्यांचा राजहक्क आहे हे सिद्ध होते.
४) स्वतः राजाराम महाराजांनीही खऱ्या अर्थाने शाहू महाराजांचा राजहक्क आहे हे मान्य केले होते.

वरील सर्व माहितीचा आधार घेता ताराबाईचा विरोध कायदेशीर टिकणारा नव्हता. हे या ठिकाणी आपण विचारात घेणे गरजेचे आहे.

मात्र ताराबाईने राजारामाच्या मृत्युपासून सात वर्ष अव्याहतपणे औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूशी लढा देऊन स्वराज्याचे संरक्षण केले होते. ताराबाईंच्या प्रखर लढ्यामुळे व कुशल मुत्सद्देगिरीमुळे मोगलांना मागे हटावे लागले होते. जे राज्य सतत सात वर्ष अविश्रांत परिश्रम करून जतन केले ते सहजासहजी शाहू महाराजांच्या हातात देणे ताराबाईला मान्य नव्हते म्हणूनच तिने शाहू महाराजांच्या गादीवरील हक्क अमान्य केला व त्यांच्या विरूद्ध संघर्ष करण्यासाठी आपली बाजू बळकट करण्यास सुरूवात केली. परिणामी दोहोत संघर्ष होणार हे निश्चित झाले होते. त्यातूनच हा संघर्षाचा प्रसंग उद्‌भवला.

## ८.५ शाहू महाराज ताराबाई संघर्ष व खेडची लढाई

ताराबाईने शाहू महाराजांच्या विरोधात उभे केलेले मुद्दे न टिकल्याने हतबल न होता कोणत्याही परिस्थितीत सत्ता न सोडण्याचा निर्णय घेतला. यासाठी तिने कोणत्याही मराठा सरदाराने शाहूला मदत करू नये असे सांगण्यास सुरूवात केली. याही पुढे जावून महाराष्ट्रात आलेला शाहू हा खरा शाहू नसून तो तोतया शाहू आहे असे घोषित केले. या वातावरणामुळे महाराष्ट्रातील जनतेमध्ये गोंधळ निर्माण झाला.

मात्र पंचवीस वर्ष दक्षिणेत मोगल छावणीत वावरत असलेले अनेक मराठा सरदार व सेवक शाहू महाराजांना ओळखत होते. त्यांनी शाहू महाराजांची बाजू घेतली. परिणामी महाराष्ट्रात मराठ्यांमध्ये दोन गट निर्माण झाले. एक शाहू महाराजांचा गट तर दुसरा ताराबाईचा गट.

शाहू महाराजाबरोबर संघर्ष करण्यासाठी ताराबाईने राज्यातील सर्व सरदारांना एकत्र केले होते. या सरदारामध्ये परशुरामपंत प्रतिनिधी, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण सचीव, निळकंठ मोरोपंत पिंगळे पेशवे, सेनापती धनाजी जाधव, खंडो बल्लाळ चिटणीस हे प्रमुख सरदार होते. या सर्वांना आपल्या बरोबर एकनिष्ठ असल्याच्या शपथा घ्यायला लावल्या या कलह प्रसंगी मराठा सरदारांची स्थिती अत्यंत नाजूक होती.

अशा परिस्थितीत शाहू महाराजांचा हक्क नाकारून ताराबाईने त्यांच्या विरोधात लढा देण्याची तयारी दर्शविली शाहू-ताराबाई यांच्यातील संघर्ष अटळ होता. ताराबाईने आक्रमक होऊन आपला सेनापती धनाजी जाधव यास फौजेसह शाहू विरूद्ध मोहिम काढण्यास आज्ञा केली.

**खेडची लढाई** : ताराबाईच्या आज्ञेनुसार धनाजी जाधवाने शाहू महाराज विरूद्ध मोहिम काढण्याचा निर्णय घेतला. या मोहिमेसाठी आपल्या सोबत परशुराम त्रिंबक याला घेतले. या काळात शाहूचा मुक्काम अहमदनगर या ठिकाणी होता. ताराबाईचे सैन्य आपल्याविरूद्ध चाल करून येत असल्याचे समजल्यानंतर शाहू पुण्याच्या दक्षिणेस असलेल्या खेड या गावी जाऊन तेथे आपला लष्करी तळ दिला. धनाजी जाधव व परशुराम त्रिंबक शाहूचा पाठलाग करत होते. ते टप्प्याटप्प्याने खेडपर्यंत आले. शाहू महाराज खूप मुत्सद्दी होते. त्यांनी आपल्या गटात धनाजी जाधवाला घेण्यासाठी एक योजना तयार केली. त्यांची योजना यशस्वी झाल्याने धनाजी जाधव शाहूला येऊन मिळाला.

अशा कठिण प्रसंगी खचून न जाता परशुराम त्रिंबक यांनी शाहूच्या विरोध लढण्याचा निर्णय घेतला. १२ ऑक्टोबर १७०७ रोजी परशुराम त्रिंबक व शाहू महाराज यांच्या फौजा खेड येथे समोरा-समोर आल्या. परशुराम त्रिंबक शर्थीने लढले मात्र सेनापतीने दोन वेळा रण मैदान सोडल्याने प्रतिनिधीचा पराभव झाला. खेडच्या लढाईत शाहू महाराजांना निर्णायक विजय मिळाला.

खेड विजया नंतर आपल्या सेनेचे सेनापतीपद धनाजी जाधवाकडे सोपविले. तर खंडो बल्लाळास चिटणीसपदी नियुक्त केले. खेड विजयाने शाहू व त्यांच्या सहकाऱ्यामध्ये आत्मविश्वास वाढला. स्वराज्याचा मार्ग एका अर्थाने शाहूला खुला झाला.

**आपली प्रगती तपासा**

१) खेडच्या लढाईचे महत्त्व स्पष्ट करा.

## ८.६ राजपुत्र शाहुचा राज्याभिषेक

खेड विजयाने शाहू महाराजांचा आत्मविश्वास वाढला होता. म्हणूनच त्यांनी आक्रमक धोरण स्वीकारून स्वराज्यातील महत्त्वाचे किल्ले जिंकण्यास सुरूवात केली. रोहिडा, तोरणा, रायगड, चंदन - वंदन हे किल्ले शाहू महाराजांने ताब्यात घेतले. मावळ भागावर प्रभुत्व निर्माण केल्यानंतर शाहू महाराज साताऱ्याच्या दिशेने निघाले.

शाहू महाराज साताऱ्याच्या दिशेने येत आहे हे समजताच ताराबाईने साताऱ्याच्या संरक्षणाची जबाबदारी परशुरामपंतावर सोपवून स्वतः पन्हाळ्याचा आश्रय घेतला. परशुरामपंताने लढा देण्याची तयारी केली. तेव्हा शेख मिरा सातारा किल्ल्याचा किल्लेदार होता. त्यांनी शाहू महाराजांचे सामर्थ्य पाहून त्याना शरण गेला. परिणामी सातारा किल्ला शाहू महाराजांच्या ताब्यात आला. शाहू महाराजांनी ताबडतोब परशुरामपंतांना कैद केली. जानेवारी १७०८ मध्ये शाहू महाराजांनी मोठ्या थाटात सातारा शहरात प्रवेश केला. तेव्हा पासून साताऱ्याच्या किल्ल्यावर दर शनिवारी चौघडा वाजवण्याची प्रथा सुरू झाली.

सातारा विजय शाहू महाराजांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला. या विजयानंतर त्यांनी १२ जानेवारी १७०८ मध्ये स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. व आपल्या राजधानीचे ठिकाण सातारा निश्चित केले. राज्याभिषेकानंतर राजधानी साताऱ्याहून छत्रपती शाहूमहाराजांच्या राज्यकारभार सुरू झाला.

राज्याभिषेकानंतर शाहू महाराजांनी आपले अष्टप्रधानमंडळ जाहीर केले.

बहिरोपंत पिंगळे - पेशवे

धनाजी जाधव - सेनापती

नारो शंकर - सचिव

बाळकृष्ण वासुदेव हणमंते - आमात्य

गदाधर प्रल्हाद - प्रतिनिधी

होनाजी अनंत - न्यायाधिश

बाळाजी विश्वनाथ - मुतालिक 'सेनाकर्ते' किताब

महादजी गधाधर - सुमंत

नेमाजी शिंदे - मानाची पदे व किताब

परसोजी भोसले - मानाची पदे व किताब

हैबतराव निंबाळकर - मानाची पदे व किताब

## ८.७ शाहू महाराजांपुढील अडचणी व बंदोबस्त

खेडच्या लढाईत ताराबाईचा जरी पराभव झाला असला तरी ताराबाईने सुरू केलेला शाहू महाराजांबरोबरचा संघर्ष समाप्त झाला नव्हता. उलट पन्हाळा येथे आपले सत्ता केंद्र निर्माण करून मराठा राजवटीत दोन सत्ता केंद्र निर्मितीला प्रोत्साहन दिले. परिणामी शाहू महाराजासमोर अडचणी वाढत गेल्या. याही पुढे जाऊन मोगल बादशहाकडे चौथाई व सरदेशमुखीचा हक्क मागितल्याने शाही राजवट दरबारात सुद्धा शाहू महाराजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांसमोरील महत्त्वाच्या अडचणी अशा होत्या.

**१) चंद्रसेन जाधवाचे बंड :**

चंद्रसेन जाधव हा धनाजीचा मुलगा होता. धनाजीच्या मृत्युनंतर शाहू महाराजांनी चंद्रसेन जाधवाला सेनापती पद दिले होते. मात्र तो चंचल प्रवृत्तीचा होता. त्याच्यावर शाहू महाराजांना संशय वाटत असे कारण तो सुरुवातीपासूनच महाराणी ताराबाईचा समर्थक होता.

चंद्रसेन जाधव ताराबाईचा समर्थक असल्याने त्याला शह देण्यासाठी शाहू महाराजाने बाळाजी विश्वनाथाला 'सेनाकर्ते' हे नवीन पद दिले. हे पद आपल्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे हे चंद्रसेन जाधवाला समजल्याने चंद्रसेन जाधव शाहू महाराजांवर नाराज होता. तसेच या घटनेमुळे चंद्रसेन व बाळाजीमध्ये वैमनस्य निर्माण झाले. नंतर एकमेकात संघर्ष झाला या संघर्षात चद्रसेनने बाळाजीचा पराभव केला. पराभवानंतर बाळाजी शाहू महाराजांकडे गेल्यानंतर शाहू महाराजाने बाळाजीला संरक्षण दिले.

या घटनेचा चंद्रसेनला राग आला व चंद्रसेन जाधव उघडपणे ताराबाईला जाऊन मिळाला. पुढे चंद्रसेन जाधवास समजविण्यासाठी गेलेले परशुरामपंत प्रतिनिधी व खंडेराव दाभाडे हे दोन्हीपण चंद्रसेन जाधवाच्या बाजूने सामिल झाले. याच वेळी कृष्णराव खटावकर, दमाजी थोरात, उदाजी चव्हाण यांनी ताराबाईचा पक्ष उचलून धरला.

चंद्रसेन जाधवाची ही उघड उघड बंडखोरी पाहून शाहू महाराजांनी हैबतराव सरलष्कर यास चंद्रसेनविरूद्ध पाठविले. हैबतरावाने चंद्रसेनचा दोन ठिकाणी पराभव केला. १७११ मध्ये चंद्रसेन ताराबाईला जाऊन मिळाला. पुढे त्यांनी मोगलांबरोबर आतून सख्य जोडले.

**२) खटावकर व थोरातांचे बंड :**

चंद्रसेन जाधवांचे शाहू महाराजांच्या पक्षातून उघड उघड फुटून जाणे व शाहू महाराजांविरूद्ध बंड पुकारणे या घटनेमुळे ताराबाईच्या पक्षातील इतर सरदार आक्रमक बनले व त्यांनी शाहू महाराजांच्या प्रदेशावर हल्ले चढविण्यास सुरूवात केली. या सरदारामध्ये धाडगे, घोरपडे आणि चव्हाण या सरदारांचा समावेश आहे. या सरदारांनी शाहू महाराजांच्या सातारा परिसरातील वडगाव, कुमठे, शिरवळ, कऱ्हाड या ठिकाणी हल्ले करून धुमाकूळ घातला होता.

याच संधीचा फायदा घेत खटावचा इनामदार कृष्णराव खटावकर आणि पाटण परगण्यातील हिंगणगावचा वतनदार दामाजी थोरात यांनी शाहू महाराजांविरूद्ध बंड पुकारून शाहू महाराजांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र खटावच्या लढाईत कृष्णराव खटावकर मारला गेला. दामाजी थोरात पुढे शाहू महाराजांना शरण आला. उदाजी चव्हाण वर नियंत्रण प्रस्तापित करण्यात शाहू महाराजांना यश आले. बाळाजीच्या मदतीने चंद्रसेन जाधवाचेही पारिपत्य केले.

**३) कान्होजी आंग्रेचे आव्हान :**

शाहू महाराजांनी चंद्रसेन जाधव, खटावकर थोरात यांची बंडे अटोक्यात आणली असली तरी शाहू महाराजांसमोर कान्होजी आंग्रेचे अजून एक समस्या रूपी आव्हान उभे होते. कारण चंद्रसेन जाधवाने आंग्रेना फितावून ताराबाईचा पक्ष स्वीकारण्यास भाग पाडले होते. म्हणजेच आंग्रे ताराबाईचे समर्थक होते.

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या आरमाराचा आंग्रेने विकास केला होता. पश्चिम किनाऱ्यावर स्वतंत्र वचक निर्माण केला होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. त्याचा सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीजांना धाक वाटत होता.

महाराणी ताराबाईच्या प्रेरणेने कान्होजीने शाहू महाराजांच्या सत्तेपुढे आव्हान निर्माण केले होते. सर्व प्रथम त्यांनी शाहू महाराजांच्या कोकणातील फौजांना हुसकावून लावले. व राजमाची, तुंग, त्रिकोण आणि लोहगड हे महत्त्वाचे किल्ले आपल्या ताब्यात घेतले.

कान्होजीचा प्रतिकार करण्यासाठी शाहू महाराजांनी बहिरोपंत पिंगळे यास ससैन्य पाठविले परंतु कोन्होजीने त्याचा सहज पराभव करून त्याला

कैद केले. या घटनेने शाहू महाराजांपुढील चिंता वाढली. कारण या आगोदर चंद्रसेन जाधव, कृष्णाजी प्रतिनिधी, थोरात, खटावकर यांचा बंदोबस्त करण्यात शाहू महाराजांची तीन-चार वर्ष खर्च झाली होती. अशा कठिण प्रसंगी मार्ग शोधून काढणारा एकमेव माणूस शाहू महाराजांकडे होता तो म्हणजे बाळाजी विश्‍वनाथ होय. मग शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथास या प्रकरणाकडे लक्ष घालण्यास सांगितले.

बाळाजीने ४००० सैनिकांच्या फौजेनिशी कोकण मोहिम हाती घेतली. मात्र आपल्या राजकीय मुत्सद्दी डावपेचाच्या आधारे लोणावल्याजवळ वळवण या ठिकाणी आंग्रेची प्रत्यक्ष भेट घेऊन शाहू महाराज हेच खरे मराठा राजवंशाचे वारसदार आहेत. हे आंग्रेना पटवून दिले. तसेच तुम्ही शाहू महाराजांचे स्वामित्व मान्य करणे किती गरजेचे आहे हे ही आंग्रेना पटवून दिले. मुत्सद्दी बाळाजीचा प्रस्ताव धूर्त व धोरणी कान्होजीने मान्य केला. उभयतात तह झाला. बाळाजीला आंग्रेंना शाहू महाराजांच्या पक्षात आणण्यात यश आले. या घटनेने शाहू महाजारांची बाजू बळकट तर झाली पण मराठ्याच्या इतिहासाला एक वेगळे वळण लागून बाळाजी विश्वनाथाचा मराठ्यांच्या राजप्रणालीमध्ये उदय झाला.

**आपली प्रगती तपासा**

१) शाहू महाराजांनी बंडोखोरांचा बंदोबस्त कसा केला ते लिहा.

## ८.८ कोल्हापूर राज्यातील क्रांती व महाराणी ताराबाई कैद

शाहू महराजांच्या आगमनानंतर ताराबाईंनी वेगवेगळ्या मार्गाने शाहूमहाराजांना विरोध करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले होते. मात्र शाहू महाराजांनी अत्यंत संयमाने हे विरोध मोडीत काढत आपली बाजू बळकट बनविली होती.

दरम्यानच्या काळात शाहू बरोबर सतत लढणाऱ्या ताराबाईला एका नव्या संकटाला सामोरे जावे लागले. राजारामाची दुसरी पत्नी राजसबाई हिने आपला मुलगा दुसरा संभाजी याच्यासाठी ताराबाई बरोबर संघर्ष सुरू केला. या संघर्षाची परिणती १७१४च्या कोल्हापूर क्रांतीत झाली. राजसबाईने कोल्हापूरवर वर्चस्व प्रस्थापित करून आपला मुलगा दुसरा संभाजी यास गादीवर बसविले. आणि ताराबाई व तिचा मुलगा दुसरा शिवाजी यांना कैदेत

टाकले. उरलेली संपूर्ण ह्यात म्हणजे ४७ वर्ष ताराबाईची कैदेत गेली. या घटनेमुळे शाहु महाराजांसमोरील ताराबाईचा उपद्रव संपुष्टात आला. मात्र पुढे राजसबाईचा पुत्र संभाजी यांने मुघल सुभेदार निजाम उलमुल्कशी संपर्क साधण्यास सुरूवात केल्याने पुन्हा संभाजीच्या रूपाने शाहू महाराजांपुढे अडथळा उभा राहिला, असे जरी असले तरी या घटनेने शाहू - ताराबाई संघर्ष संपुष्टात येण्यास मदत झाली.

## ८.९ बाळाजी विश्वनाथचा उदय

मराठा साम्राज्यातील बाळाजी विश्वनाथाचा उदय ही एक महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. कारण या घटणेने पुढे छत्रपती पदाची सत्ता संपुष्टात येऊन पेशवे पद मराठा साम्राज्याचे सर्वाधिकारी बनले बाळाजी विश्वनाथाच्या उदयाची माहिती पाहत असतांना सर्व प्रथम त्यांच्या आरंभाच्या जीवनाची पाश्र्वभूमी समजून घेणे गरजेचे आहे.

**१) जीवन परिचय :**

बाळाजी विश्वनाथाचा जन्म कोकणातील श्रीवर्धन येथील चितपावन ब्राह्मण भट्ट कुटूंबात १६६० मध्ये झाला. या भट्ट घराण्याकडे तेव्हा श्रीवर्धनची देशमुखी होती. सुरूवातीला बाळाजी विश्वनाथ हे रामचंद्रपंत आमात्याकडे कारकून होते. पुढे राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत १६९९ ते १७०२ या काळात पुणे प्रांताचे सुभेदार होते १७०४ ते १७०७ या काळात बाळाजी विश्वनाथ दौलताबादचे सुभेदार होते. दौलताबादचे सुभेदार असतांना त्यांचे संबंध धनाजी जाधवांबरोबर आले होते. नंतर या दोहोत घनिष्ठ संबंध प्रस्तापित झाले. या संबंधाचा फायदा घेत बाळाजी मराठा सत्तेच्या राजकारणात सक्रीय सहभागी झाला व त्यांने स्वतःचे अस्तित्व निर्माण केले.

**२) बाळाजीच्या उदयास जबाबदार पार्श्वभूमी :**

मराठा सम्राज्यातील बाळाजी विश्वनाथाचा उदय हा अचानक झाला नसून त्याच्या या उदयामागे जी पार्श्वभूमी निर्माण झाली होती ती पार्श्वभूमी आपण या ठिकाणी समजून घेणे गरजेचे आहे. शाहू महाराजांच्या महाराष्ट्रातील आगमनाने या पार्श्वभूमीचा आरंभ होतो. कारण सर्व प्रथम बाळाजीनी शाहू महाराजांच्या आगमनानंतर त्यांना सहकार्य करण्याचा निर्णय घेतला. नंतर मराठी राजवंशाच्या गादीवर शाहू महाराजांचा हक्क आहे हे पटवून देऊन धनाजी जाधवाला शाहू महाराजांच्या पक्षात आणले. चंद्रसेन जाधवावर 'सेनाकर्ते' पदाच्या माध्यमातून नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. पुढे चंद्रसेन जाधवाचा बंदोबस्त केला. कृष्णाराव खटावकरांचा बंदोबस्त, दामाजी थोरातांचा बंदोबस्त, उदाजी चव्हाणांचा बंदोबस्त अशा अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्याने शाहू महाराजांचा त्यांच्यावरील विश्वास वाढत गेला. शाहू महाराज व ताराबाई संघर्षातही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. अशी ही उदयास पार्श्वभूमी निर्माण होत असतांनाच कान्होजी आंग्रे

स्वारी प्रसंगातून खऱ्या अर्थाने बाळाजी विश्वनाथ या स्वतंत्र अस्तित्वाचा उदय झाला.

### ३) कान्होजी आंग्रे प्रसंग व बाळाजीला पेशवे पद प्राप्ती :

कान्होजी आंग्रे हे सुरूवातीला शाहू महाराजांचे समर्थक होते. मात्र चंद्रसेन जाधवांच्या चिथावणीने ते ताराबाईचे समर्थक बनले होते व त्यांनी शाहू महाराजांबरोबर संघर्ष सुरू केला होता. एवढेच नव्हे तर त्यांनी राजमाची, तुंग, त्रिकोणा व लोहगड हे महत्त्वपूर्ण किल्ले ताब्यात घेतले होते.

शाहू महाराजांनी कान्होजीच्या बंदोबस्ताची जबाबदारी पेशवा बहिरोपंत पिंगळे यांच्याकडे सोपविली होती. मात्र कान्होजीने त्यांचा पराभव करून त्यांना कुलाबा किल्ल्यात बंदिस्त केले. परिणामी शाहू महाराजांची स्थिती अत्यंत गंभीर झाली. अशा कठिण प्रसंगी शाहू महाराजांचे लक्ष बाळाजी विश्वनाथाकडे गेले व बाळाजीस बोलावून असे सांगितले की आंग्रे प्रसंगाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडलीत तर तुम्हाला पेशवेपद बहाल करण्यात येईल. परंतु बाळाजीने प्रथम पेशवेपदाची मागणी केली. व आपल्या मागणीचे समर्थन करण्यासाठी पुढील युक्तीवाद लढविला.

‘पदाचा जोर असल्याशिवाय कामगिरी होणार नाही आणि एका पेशव्यास कैद ठेवले तरी दुसरा पेशवा ताबडतोब त्या जागी आला आणि तो आपल्यावर चालून येतो आहे असे पाहून कान्होजी नरम होईल’ शाहू महाराजांना हा युक्तीवाद मान्य झाला व त्यानुसार१७ नोव्हेंबर १७१३ रोजी बाळाजीस पेशवाईची वस्त्रे देण्यात आली. येथूनच मराठ्यांच्या इतिहासातील पेशवाईच्या कालखंडाचा आरंभ झाला.

कान्होजी व बाळाजी यांच्या फार पूर्वीपासून स्नेह असल्याने संघर्षाऐवजी दोहोत वार्तालाप झाला. बाळाजीने शाहू महाराजांचा पक्ष कसा योग्य आहे हे कान्होजीला पटवून दिले. राष्ट्रीय हित लक्षात घेऊन व व्यक्तीगत रागलोभांना मुठमाती देऊन कान्होजीने शाहू महाराजांचा पक्ष स्वीकारला. हा प्रसंग केवळ शाहू महाराजांच्या दृष्टीने नव्हे तर बाळाजीच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरला.

### आपली प्रगती तपासा :

१) बाळाजी विश्वनाथाच्या उदयास कारणीभूत परिस्थितीचे परीक्षण करा.

## ८.१० बाळाजी विश्वनाथाची कामगिरी

पेशवेपदाची प्राप्ती व कान्होजी आंग्रेचे शाहूच्या पक्षात येणे या दोन्ही घटणेमुळे बाळाजी विश्वनाथाचे शाहू महाराजांच्या राजप्रणालीत वजन वाढले होते. शाहू महाराजांनी ही एक कार्यक्षम पेशवा म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवला होता. शाहू महाराजांचा विश्वास बाळाजीने आपल्या कामगिरीच्या माध्यमातून सार्थ ठरविला. या ठिकाणी आपण शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाने बाळाजी विश्वनाथाने जी कामगिरी बजावली आहे. त्याचा आढावा घेणार आहोत.

**१) निजाम-उल-मुल्कचा उदय :**

औरंगजेबाच्या मृत्युनंतर बहादुरशहा दिल्लीच्या गादीवर आला. पण त्याला फारसे आयुष्य लाभले नाही. त्यांच्या मृत्युनंतर जहांदरशहा सम्राट बनला. जहांदरशहाच्या राजवटीत सय्यद अब्दुल्ला व सय्यद हुसेन या बंधूचे दिल्लीच्या राजकारणात वर्चस्व निर्माण झाले होते. त्यांनी जहांदरशहा व झुल्फिकारखानास ठार मारले. व त्यांनी फरुखसियर यास गादीवर बसविले. दिल्लीच्या राजकारणात त्यांचा प्रतिस्पर्धी निजाम-उल-मुल्क होता. म्हणूनच सय्यद बंधूनी फरूखसियरच्या मदतीने त्याला दक्षिणेच्या सुभ्याची जबाबदारी देऊन दक्षिणेत पाठवले.

निजामाला मराठ्यांच्या गादीबाबत सुरू असणाऱ्या अंतर्गत संघर्षाची चांगलीच कल्पना होती. म्हणूनच त्यांनी दक्षिणेत येताच रंभाजी निबाळकर, चंद्रसेन जाधव यांना शाहू महाराजांच्या विरोधात चिथावणी देण्यास सुरूवात केली. त्यामुळे शाहू महाराजांसमोर प्रश्नचिन्ह निर्माण झाला होता. मात्र दिल्लीच्या राजकारणात याच काळात सय्यद बंधूचे वर्चस्व वाढले होते. म्हणून बादशहा फरूखसियरने निजाम-उल-मुल्कला मुरादाबाद येथे बदलले व दक्षिणेत सय्यद हुसेन यास पाठविले. परिणामी निजाम-उल-मुल्क बाबत शाहू महाराजांना अथवा बाळाजी विश्वनाथाला जास्त हालचाल करावी लागली नाही. मात्र त्यांच्या बदलण्याने मराठ्यांना पुढील राज प्रणालीचे भविष्य बदलता आले. त्यामुळे या घटकाला कामगिरीतून वगळता येत नाही.

**२) दक्षिणेत सय्यद हुसेनचे आगमन :** बादशहा फरूखसियरने हुसेन बंधू पैकी सय्यद हुसेनची नियुक्ती दक्षिणेच्या सुभेदारपदी केली. मात्र तो दक्षिणेत रूजू होण्यापूर्वीच रस्त्यात त्याला मारण्याचा कट केला. पण तो कट उघड झाला. कटात सामिल झालेल्या दाऊद खान पन्नीला पराभूत करून त्याने ठार मारले.

नंतर सय्यद हुसेन दक्षिणेत आला. दक्षिणेच्या सुभ्याची सुत्रे हातात घेतली व जवळपास दोन वर्ष मराठ्यांच्या आक्रमक हालचालींना पायबंद घालण्यात प्रयत्न केला. मात्र या कामी त्यास म्हणावे तितकेसे यश आले नाही.

दरम्यानच्या काळात सय्यद हुसेनचा बंधु सय्यद अब्दुल्लाचे स्थान दिल्लीच्या राजकारणात अस्थिर झाले होते. म्हणूनच सय्यद अब्दुल्लाने सय्यद हुसेनला दिल्लीत बोलावले. या कठिण प्रसंगी सय्यद हुसेनने मराठ्यांची मदत मागितली. या मागणीमुळेच मराठ्यांच्या उत्तरेकडील राजकारणाचा मार्ग मोकळा झाला.

मराठ्यांनी मदत देत असतांना सर्व प्रथम तह केला. या तहात शाहू महाराजांच्या वतीने शंकराजी मल्हार नरगुंदकर यांनी प्रतिनिधीत्व केले सय्यद हुसेन व नरगुंदरकर यांनी जो तह केला त्या तहातील अटी खालीलप्रमाणे आहेत.

१) शिवाजी महाराजांचे स्वराज्य व किल्ले शाहू महाराजांना मिळावे.
२) खानदेश, गोंडवन, विदर्भ, हैद्राबाद आणि कर्नाटक आदी मराठ्यांचा प्रदेश शाहू महाराजांकडे राहावा.
३) दक्षिणेतील सहा मोगल सुभ्यातील चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा अधिकार मराठ्यांना असावा.
४) चौथाईच्या मोबदल्यात मराठ्यांनी बादशहाच्या रक्षणासाठी १५,००० फौज ठेवावी.
५) सरदेशमुखीच्या मोबदल्यात मोगल सुभ्यातील दरोडेखोरांचा आणि अन्य उपद्रवी गुंडाचा मराठ्यांनी बंदोबस्त करावा.
६) बादशहाने शाहू महाराजांची आई व इतर नातेवाईकांना मुक्त करावे.

उभयतांत तह झाल्याने मराठ्यांना दिल्लीकडे कुच करणे गरजेचे होऊन बसले. म्हणून पूर्व नियोजन करून बाळाजी विश्वनाथाच्या नेतृत्वाने दिल्ली स्वारी करण्याचा निर्धार पक्का झाला.

### ३) बाळाजी विश्वनाथाची दिल्ली स्वारी :

सय्यद हुसेनने मराठ्यांबरोबर तह केला होता हे बादशहा फरूखासियरला माहित झाले होते. त्याही पेक्षा महत्त्वाचे म्हणजे सय्यद हुसेनला आपल्या विरोधात मराठे मदत करणार आहेत याचीही कल्पना होती. म्हणूनच बादशहाने निजाम-उल-मुल्क व अजितसिंग याची मदत घेण्याचे ठरविले व त्यांना दिल्लीत बोलावले मात्र परिस्थिती उलट झाली. या दोघांनीही सय्यद बंधूचा पक्ष स्वीकारला.

सय्यद हुसेन दक्षिणेतून मदत घेऊन निघाला होता. त्यांच्या सोबत बाळाजी विश्वनाथ, खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे, उदाजी पवार, संताजी भोसले आदी मातब्बर होते. हे सर्व मातब्बर फेब्रुवारी १७१९ मध्ये दिल्लीमध्ये पोहचले.

फरूखसियरने सय्यद बंधूची व मराठ्यांची तयारी पाहून तहाची बोलणी करण्याची तयारी दर्शविली. मात्र सय्यद बंधूनी त्यास पदभ्रष्ट केले व

त्याच्या जागी रफिउद्दीजीत व रफिक उद्दौला यांना दिल्लीच्या गादीवर आणले नंतर त्यांनी आपल्या विश्वासातील महमदशहा यास मोगल सम्राट पदावर विराजमान केले व दिल्ली क्रांतीस पूर्णविराम दिला.

रफी-उद्-जात हा सम्राट असतांना हुसेन अलीने त्याच्याकडून मराठ्यांना सनदा मिळवून दिल्या. स्वराज्य, चौथाई व सरदेश्मुखी असे ह्या सनदांचे स्वरूप होते. छत्रपती शाहु महाराजांच्या नावे या सनदा होत्या. मोगल बादशहाकडून या सनदांवर शिक्कामोर्तब झाला होता. या सर्व यशस्वी कार्यामुळे बाळाजी विश्वनाथाची दिल्ली स्वारी यशस्वी झाली.

**४) येसूबाई व इतरांची मोगलांच्या कैदेतून मुक्तता**

दिल्ली स्वारीवर निघतांना बाळाजी विश्वनाथापुढे महत्त्वपूर्ण असे तीन उद्देश होते. पहिला उद्देश उत्तरेच्या राजप्रणालीत यशस्वी प्रवेश करणे, दुसरा उद्देश सय्यद हुसेनबरोबर झालेल्या तहानुसार सनदांचीप्राप्ती करणे व तिसरा उद्देश म्हणजे येसूबाई व इतर कैद्यांची मोगलाच्या कैदेतून सुटका करणे. पैकी दोन उद्देश प्रथम सफल झाले होते. नंतर बाळाजी विश्वनाथाने या प्रकरणात लक्ष घालून येसूबाई व इतर कैद्यांची मोगलांच्या ताब्यातून सुटका करून घेतली. या सुटकेने तब्बल १२ वर्षांनी शाहू महाराजांना आपली आई येसूबाईंना भेटता आले. तर इतर कैद्यांना तब्बल ३० वर्षानंतर महाराष्ट्रात येता आले. बाळाजीची ही कामगिरी प्रशंसनीय होती. शाहू महाराजांना या घटनेचा विलक्षण आनंद झाला.

**५) आर्थिक मदत आणली :**

बाळाजी विश्वनाथ जेव्हा दिल्ली स्वारीवर होते तेव्हा दररोज पन्नास हजार रूपये मराठ्यांना मिळत होते. त्यातील रोजचा फौजांचा खर्च करून पैसे शिल्लक राहत असत. ते सर्व पैसे दिल्ली स्वारी पूर्ण झाल्यानंतर बाळाजी विश्वनाथाने साताऱ्यात आणले व शाहू महाराजांच्या स्वाधीन केले. पुढे ही रक्कम मराठा साम्राज्याला किफायतशीर ठरली. या कामगिरीतून शाहू महाराजांची विश्वसनीयता स्पष्ट होते.

**६) मराठा मंडळाची निर्मिती :**

मराठा मंडळाची निर्मिती ही कल्पना बाळाजी विश्वनाथाची आहे. छत्रपतीच्या या आगोदरच्या राजवटीचा विचार करता प्रशासनासाठी अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात होते. औरंगजेबाच्या राजवटीपासून हे अष्टप्रधान मंडळ दिवसेंदिवस कमजोर होत चालले होते.

जेव्हा शाहू महाराज छत्रपती झाले तेव्हा वेगवेगळ्या सरदारानी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर दरारा निर्माण केला होता. कर्नाटकात घोरपडे, वऱ्हाड-नागपूरात कान्होजी भोसले, खानदेशात सेनापती दाभाडे तर बागलाण भागात सरलष्कर निंबाळकरांनी आपले वर्चस्व निर्माण केले होते. ही वजनदार मंडळी अष्टप्रधान मंडळाच्या नियंत्रणाखाली राहणे शक्य नव्हते म्हणूनच बाळाजींनी

मराठा मंडळाची रचना करून शाहू महाराजांच्या नेतृत्वाने नवी संयुक्त राज्यव्यवस्था प्रस्थापित केली.

मराठा मंडळाच्या निर्मिती बाबत न्या. महादेव गोविंद रानडे लिहितात, ''बाळाजी विश्वनाथाने मराठ्यांची स्थिती नीट पारखली व मराठ्यांची सत्ता जगवून वाढविण्यासाठी जो उपाय काढला त्याचे अंतर्बाह्य स्वरूप भिन्न होते. शिवाजी महाराजांच्या परंपरेला धरून परकीय सत्तेशी एकदिलाने लढेल असा मोठा बलिष्ठ पुढाऱ्यांचा संघ निर्माण करणे हे त्या उपयाचे बाह्य स्वरूप होते. या सरदारांच्या ताब्यातील प्रदेशात ज्याचा तो कुलमुखत्यार व्हावा व त्याने त्या प्रदेशात आपली सत्ता गाजवावी मात्र सर्व विभागातील सरदारांची कुलमुखत्यारी समान दर्जाची असावी, ही त्या उपायाची दुसरी बाजू होती.'' या वरून मराठा मंडळाने स्वरूप लक्षात येते.

न्यायमूर्ती रानडेनी ही योजना उत्तम होती असे म्हटले आहे. भावी काळात साम्राज्य विस्तार करण्यासाठी मराठ्यांना या मंडळाचा फायदा झाला. दोषाचा विचार केला तर सरदारांमध्ये स्वतंत्रवृत्ती निर्माण झाली व सत्ता प्रमुखांच्या विरूद्ध सरदार फटकून वागू लागले.

मात्र पंचवीस वर्षानंतरच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या परिस्थितीचा विचार केला तर मराठा मंडळा शिवाय तरणोपाय नव्हता हे आपणास मान्य करावे लागेल. म्हणूनच बाळाजीची ही कामगिरी सुद्धा बदलत्या परिस्थितीनुसार योग्य होती हे नाकारता येणार नाही.

### ७) बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु :

पेशवेपदाच्या प्राप्तीनंतर बाळाजी विश्वनाथाचे जीवन व्यस्त झाले होते. सततच्या कामगिरीने शरीर थकले होते. मराठा मंडळाची निर्मिती केल्यानंतर बाळाजी विश्वनाथ सय्यद हुसेन सोबत दिल्लीस गेले. त्याच्या दिल्ली वारी दरम्यान कोल्हापूरच्या संभाजीने शाहू महाराजांविरूद्ध मोहिम हाती घेतली. बाळाजींना ही घटना समजताच ते परत आले व त्यांनी संभाजीवर चाल केली. १७१९ ला त्यांनी कोल्हापूरला वेढा दिला. त्यानंतर मार्च १७२० मध्ये बाळाजी विश्वनाथ सासवड येथे परतला. त्याच ठिकाणी २ एप्रिल १७२० मध्ये त्यांचे निधन झाले.

### आपली प्रगती तपासा

१) बाळाजी विश्वनाथाची कामगिरी वर्णन करा.

## ८.११ बाळाजी विश्वनाथाची योग्यता

मराठा साम्राज्यातील नाव लौकिकास प्राप्त ठरलेले एक अद्वितीय व्यक्तीमत्त्व म्हणून बाळाजी विश्वनाथाकडे पाहिले होते. कारकून ते सेनाकर्ते व सेनाकर्ते ते पेशवा असा त्यांच्या कर्तृत्वाचा चढता आलेख आहे. त्यांनी आपल्या प्रभावी राजप्रणालीद्वारे मराठा साम्राज्यात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. एक कारकून ते मराठा राजकर्ता पेशवा असा बाळाजीच्या जीवनाचा चढता आलेख आहे अशा या बाळाजी विश्वनाथाची योग्यता आपण खालील माहितीच्या आधारे स्पष्ट करणार आहोत.

### १) कारकून म्हणून कारकिर्दीचा आरंभः

बाळाजी विश्वनाथाने आपल्या कारकिर्दीचा आरंभ कारकून पदापासून केला. सुरूवातीला ते रामचंद्रपंत अमात्यांकडे कारकून म्हणून काम पाहत होते. त्यांच्या हाताखाली काम करत असतांना त्यांना राजप्रणालीचे चांगले ज्ञान प्राप्त झाले.

### २) सुभेदार म्हणून कामगिरी :

आरंभी बाळाजी विश्वनाथाची नियुक्ती पुण्याच्या सुभेदारापदी करण्यात आली होती. तेव्हा पुणे हे मोगलांच्या हालचालीचे केंद्र होते. अशा कठिण परिस्थितीत बाळाजी विश्वनाथाने मराठ्यांना अंमल चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. पुण्याबरोबरच औरंगाबादचा सुभेदार म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी बजावली म्हणजेच या पदास आवश्यक असणारी योग्यता त्यांच्यामध्ये होती हे सिद्ध होते.

### ३) शाहूस छत्रपती बनविले :

शाहू महाराजांच्या महाराष्ट्र आगमनानंतर बाळाजी विश्वनाथ त्यांना भेटले व त्याचाच राज हक्क आहे हे इतरांना पटवून देऊ लागले. अनेक मातबरांना शाहू महाराजाच्या पक्षात आणले विरोधकांचा बंदोबस्त करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केली व दिल्ली दरबारातून छत्रपती पदास रितसर परवानंगी आणली परिणामी या कार्यातूनही त्याची योग्यता अचूक आहे हे स्पष्ट होते.

### ४) शाहूच्या सत्तेला स्थैर्य मिळवून दिले :

शाहू महाराजांना स्वराज्याची देणगी जरी मोगलांकडून मिळाली असली तरी ते टिकविणे अत्यंत कठिण काम होते. या कामी शाहू महाराजांना बाळाजी विश्वनाथाने महत्त्वपूर्ण मदत केली. जुन्नर, पुणे, चाकण, खटाव, कराड, इस्लामपूर या ठिकाणी मराठी अंमल प्रस्तापित बाळाजींनी मदत केली.

दामाजी थोरात, चंद्रसेन जाधव, कृष्णराव खटावकर, उदाजी चव्हाण यांना वठणीवर आणले. धनाजी जाधव, बोकील, खंडेराव दाभाडे, परसोजी व

कान्होजी भोसले यांना शाहू महाराजांना सहकार्य करण्यास प्रवृत्त केले. परिणामी शाहू महाराजांच्या राज्याला स्थैर्य प्राप्त झाले.

### ५) कान्होजी आंग्रेबरोबर समन्वय:

कान्होजी आंग्रेबरोबर समन्वय ही प्रारंभीच्या काळातील बाळाजी विश्वनाथाची सर्वश्रेष्ठ कामगिरी मानली जाते. कान्होजी ताराबाईच्या बाजूने होते. त्यांनी शाहू महाराजांच्या प्रदेशावर आक्रमण करून बहिरोपंत पिंगळेना कैद केले होते. अशा कठिण परिस्थितीत शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथावर ही जबाबदारी सोपविली. बाळाजीने पेशवेपद स्वीकारून आंग्रेचे मन:परिवर्तन करून त्यांना शाहूच्या बाजूला आणले. बाळाजीच्या या कार्यामुळे मराठी राज्यावरील सर्वात मोठे संकट टळले. या घटनेतून बाळाजीची समय सूचक योग्यता सहज स्पष्ट होते.

### ६) सनदांची उपलब्धता :

मोगलांचे दक्षिणेत सुभेदार होते. मात्र त्यांच्यापुढे अनेक अडचणी होत्या. त्याच्या अडचणीचा फायदा बाळाजीने शाहू महाराजांच्या मदतीने घेऊन महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. बाळाजीच्या नेतृत्वाने सय्यद बंधूच्या मध्यस्थीने मराठे दिल्लीपर्यंत पोहचले व बादशाहकडून स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या. या सनदामुळे मराठ्यांना चौथाई व सरदेशमुखी वसुल करण्याचे कायदेशीर हक्क प्राप्त झाले. मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले. मराठ्यांच्या साम्राज्याचा दक्षिण-उत्तर विस्तार झाला. या सर्व घटनाक्रमाचे श्रेय बाळाजी विश्वनाथाला जाते.

### ७) संयुक्त राज्यव्यवस्थेचा जनक :

बाळाजी विश्वनाथ हा धोरणी पेशवा होता. त्यांनी बदलत्या राजकीय परिस्थितीचे मर्म ओळखून मराठ्यांना राज्य वृद्धीसाठी संयुक्त राज्य व्यवस्थेचा नवा आराखडा तयार केला. हा नव्या संयुक्त राज्यव्यवस्थेचा आराखडा शाहू महाराजांनी मान्य केला. नव्या संयुक्त राज्यव्यवस्थेच्या आराखड्याने मराठा एक सुत्राने बांधणे शक्य झाले. या नव्या आराखड्याप्रमाणे मराठा मंडळाचे नियंत्रण करण्याची जबाबदारी बाळाजी विश्वनाथावर आली. मराठा मंडळाच्या स्थापनेने अष्टप्रधान मंडळाचे अस्तित्व संपुष्टात आले. या वरूनच त्यांच्याकडे प्रशासकीय प्रणालीचे उत्तम ज्ञान होते हे सिद्ध होते.

### ८) स्वामिनिष्ठ पेशवा :

बाळाजी विश्वनाथ एक स्वामिनिष्ठ पेशवा होता, हे त्यांनी संघर्षाच्या परिस्थितीत शाहू महाराजांच्या घेतलेल्या बाजूवरून स्पष्ट होते. त्यापेक्षाही पुढे जावून जर आपण विचार केला त्यांनी ओसाड मराठी प्रदेशाला समृद्धीकडे व संपन्नतेकडे नेण्यासाठी त्यांनी जो प्रयत्न केला तो विश्वसनीयतेमुळेच. त्यांनी कारकूनी हिशोब विश्वासाने सांभाळला. आर्थिक व्यवस्थेत शिस्तबद्ध वळण लावले. स्वराज्याच्या जमीन महसूलाची चोख व्यवस्था लावली. एक

स्वामीनिष्ठ पेशवा या नात्याने शाहूच्या पडत्या काळात बाळाजी विश्वनाथाने दाखविलेली कामगिरी प्रशंसनीयच मानली जाते.

## २) मुत्सद्दी बाणा:

मुत्सद्दीपणा हा बाळाजी विश्‍वनाथाच्या स्थायीभाव होतो. म्हणूनच एका प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्याचा उदय झाला. मुत्सद्दीपणामुळेच धनाजी जाधवाला शाहू महाराजांच्या पक्षात आणले. कान्होजी सारख्या मातबर सेनान्याला सुद्धा मुत्सद्दीपणा मुळेच शाहू महाराजांच्या पक्षात आणले. सय्यद बंधूशी केलेली राजकारण, दिल्लीच्या बादशाहाकडून मिळविलेल्या स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा हे त्याच्या उत्तम मुत्सद्दीपणाचेच दाखले आहेत. त्याच्या मुत्सद्देगिरीच्या योग्यते बाबत असे म्हटले जाते की, 'त्याकाळात राजकारणात मुत्सद्दी करणारा बाळाजी विश्वनाथाच्या तोडीचा दुसरा कुणी नव्हता.' यावरून या बाबतची त्यांची योग्यता योग्य होती हे स्पष्ट होते.

## ३) पेशवेपदाचे महत्त्व वाढले :

छत्रपतीच्या राजवटीपासून मराठी स्वराज्यात पेशवेपद प्रचलीत होते. परंतु बाळाजी विश्वनाथाच्या कारकिर्दीपासून पेशवेपदाला एक वेगळेच महत्त्व वाढले. सत्तेचे केंद्रबिंदू जरी छत्रपती पद असले तरी प्रत्यक्ष सत्तेचा खरा वापर पेशव्यांकडून होऊ लागला. राजकारणातील सर्व धोरणे, निर्णय व अमलबजावणी पेशवे करू लागले. याही पुढे जावून बाळाजी विश्वनाथाच्या कारकिर्दीपासून पेशव्यांच्या वर्चस्वामुळे छत्रपतीची सत्ता नाममात्र बनली. स्वतः बाळाजी कर्तबगार असल्याने त्यांनी पेशवेपदाचे महत्त्व वाढविले, हे ही आपणास नाकारता येणार नाही.

## इतिहासकारांनी मांडलेली योग्यता :

इतिहासकार सरदेसाई व शेजवलकर यांनी बाळाजीच्या योग्यतेबाबत पुढील प्रकारची विधाने केली आहेत.

१) अल्पसंख्य मराठ्यांकडून बलवान मोगलांना कब्जात आणण्याचा प्रयोग केला.

२) मोगल बादशहाने जो मराठ्यांच्या बाबतीत भेद नितीचा वापर केला तो बाळाजीने हाणून पाडला.

३) समाजकंटकाचा समाचार घेऊन राष्ट्रैक्य बनविले.

४) आपापसात लढून नाश पावणाऱ्या मराठ्यांना उद्योगास बाहेर क्षेत्र देऊन पराक्रमीबनविले.

५) घरोघरी सेनानायक निर्माण केले.

६) देशभर नवीन राजधान्या उभारल्या.

७) स्वतः दिल्लीवर जाऊन मराठ्यांची राजसत्ता सिद्ध केली.

८) बाजीराव व त्यांचे सहाय्यक यांना पुढील मार्ग दाखवून दिला.

९) निर्धन महाराष्ट्रास सधन बनविण्यासाठी उपाययोजना निर्माण केला.

१०) महाराष्ट्र धर्माचा पुरस्कार करून तो वर्तमान दिशेस पोहचविला.

११) मराठ्यांच्या अनुकरणाने राजपूत, बुंदेल, जाट, शीख इत्यादींना राष्ट्रविकास स्वोद्धाराचा किता घालून दिला.

१२) कोल्हापूरकर संभाजी व निजाम वगैरेंना नमविले.

१३) शाहू महाराजाद्वारे हिंदू राष्ट्राचे संघटन केले.

**न्या. महादेव गोविंद रानडे:**

''बाळाजी विश्वनाथाला मोठ्या पुढाऱ्यांचे ऐक्य साधावयाचे होते. त्या ऐक्यामागे सर्वांचे सारखे संरक्षण व्हावे तसेच सर्वांना आक्रमण करता यावे हा हेतू सिद्धीस नेणारी संघटना उभारावी असे ध्यैर्य होते. त्याच्या प्रस्तुत ध्यैर्याच्या साफल्याला त्याच्या स्वार्थत्यागाचे फार मोठ्या प्रमाणात साह्य झाले. या देशभक्तीच्या प्रयत्नामुळेच शाहूच्या नोकरीत शिरल्यापासून अवघ्या दहा वर्षाच्या अवधित बाळाजी विश्वनाथाने राष्ट्रात सुसंघटित ऐक्य निर्माण केले.''

**प्रा. टी. एस. शेजवलकर :**

''शिवाजीची ध्यैय व त्याची राज्यपद्धती जशी प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण या सर्वांच्या डोक्यात उतरली होती, तशी ती पूर्वायुष्यात बाळाजीच्या गळी उतरली नव्हती. खेरीज प्रस्थापित राज्ययंत्रात नव्याने पुढे येऊन भाग्योदय करून घेऊ इच्छिणारास थोडा तरी संधिसाधूपणा करावाच लागतो व तसा तो करण्यास बाळाजीस मनाची आडकाठी असण्याचे कारण नाही.''

**डॉ. व्ही. जी. दिघे व डॉ. रॉलिन्स :**

''बाळाजी विश्वनाथ हा श्रेष्ठत्तम मुत्सद्दी होता. मराठी राज्याचे ऐक्य राखण्यातील त्याचे यश विशेष लक्षणीय ठरते. मोगलांशी झालेल्या करारामुळे मराठ्यांच्या संघर्षाचे खरे फलित हाती आले. हा करार म्हणजे पेशवाच्या मुत्सद्दगिरीचा विजय होय.''

छत्रपती शाहू महाराजांनी तर बाळाजी विश्वनाथाला ''अतुल पराक्रमी सेवक'' या गौरवपर शब्दाने गौरविले आहे.

मराठीशाहीचे नवे पर्व सुरू करणारा पुरूष म्हणून बाळाजीचे स्थान इतिहासात अलौकिक ठरले आहे.

वरील सर्व माहितीचा जर आपण आधार घेतला तर बाळाची विश्वनाथाची योग्यता ही श्रेष्ठोत्म प्रतिची होती हे आपणास नाकारता येणार नाही.

**आपली प्रगती तपासा**

१) बाळाजी विश्वनाथाच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

## ८.१२ सनदाचे स्वरूप व महत्त्व

बाळाजी विश्वनाथाच्या दिल्ली स्वारीने मराठा साम्राज्याला अभुतपूर्व यश मिळवून दिले. या स्वारीतच मराठ्यांना स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी या सनदाची प्राप्ती झाली. दिल्लीत क्रांती घडून येत असतानाच सय्यद बंधूनी १३ मार्च १७१९ रोजी छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने या सनदा तयार केल्या व त्या मराठ्यांच्या हवाली केल्या. या तिन्ही सनदा मराठ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होत्या. या सनदांचा आढावा आपण या ठिकाणी मुद्दामहून एक वेगळा घटक मांडून घेत आहोत.

**१) स्वराज्याची सनद :**

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले होते. तेव्हा तापी नदीपासून दक्षिणेतील कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशावर मराठ्यांची सत्ता निर्माण झाली होती. पुढे हे स्वराज्य औरंगजेबाच्या दक्षिण आगमनाने धोक्यात आले. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाने या स्वराज्याचे अस्तित्व टिकून राहिले. मात्र शाहू - ताराबाई संघर्षाने मराठा सरदार विभागले गेले व स्वराज्याच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला. अशा कठिण परिस्थितीत बाळाजी विश्वनाथानी आणलेली स्वराज्याची सनद राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची ठरली. कारण या सनदेने शाहू महाराज मराठा साम्राज्याचे कायदेशीर छत्रपती ठरले. या सनदेने कोल्हापूरच्या गादीला महत्त्व राहिले नाही. परिणामी मराठा सरदार शाहू महाराज व साताऱ्याच्या गादीशी एकनिष्ठ बनले.

**स्वराज्याच्या सनदेचे महत्त्व :**

१) बदलत्या परिस्थितीनुसार शाहू महाराज व बाळाजी विश्वनाथाने घेतलेला निर्णय योग्य होता.

२) या सनदेमुळे स्वराज्याचा राजहक्क शाहू महाराजांना मिळाला.

३) कोल्हापूरच्या गादीला या सनदेमुळे वैधानिकता राहिली नाही.

**स्वराज्याच्या सनदेवरील टीका :**

१) शाहु महाराजाने स्वतःला मोगल बादशहाचे मांडलिक म्हणून कबूल केले.

२) स्वराज्याची सनद स्वीकारून शाहू महाराजांनी मराठ्यांचे स्वातंत्र्य गमावले.
३) स्वराज्याचे स्वरूप साम्राज्यांतर्गत झाले.
४) छत्रपती शिवजी महाराज्याच्या स्वराज्य स्थापनेची ध्यैय मातीमोल केली.

**२) चौथाईची सनद :**

बाळाजीने स्वराज्याच्या सनदेबरोबरच चौथाईची सनद सुद्धा आणली होती. या सनदेमुळे मराठ्यांना दक्षिणेतील सहा सुभ्यांतून चौथाई वसुल करण्याचा कायदेशीर हक्क मिळाला. या सनदेच्या माध्यमातून मराठे या सहा सुभ्यातून उत्पन्नाचा चौथा हिस्सा मिळविण्यात यशस्वी ठरले.

**चौथाईच्या सनदेचे महत्त्व :**

१) मराठ्यांना चौथाई वसुल करण्याचे अधिकार प्राप्त झाले.
२) मराठ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाली.
३) मराठ्यांचा दरारा वाढला.
४) मराठ्यांना दक्षिणेच्या राजकारणा व्यतिरिक्त उत्तरेकडील राजकारणात जाण्यास मुभा उपलब्ध झाली.
५) मराठा सत्तेचा वेगाने प्रसार होणयास मदत झाली.

**चौथाईच्या सनदेवरील टीका :**

१) इच्छे नुसार प्रदेश विस्ताराचे स्वातंत्र्य दिल्याने स्वतंत्र प्रवृत्तीचा विकास झाला.
२) यातून पुढे संरजामदारी प्रथा अस्तित्वात आली.
३) पुढे सरदार व सत्तेच्या प्रमुखांमध्ये बेबनाव होऊन मराठी सत्तेचा अस्त झाला.

**३) सरदेशमुखीची सनद :**

बाळाजीने आणलेली ही तिसरी महत्त्वपूर्ण सनद आहे. ही सनद राजस्वाशी संबंधीत आहे. सरदेशमुखी मध्ये शेतकऱ्याकडून कर वसुल केला जात असे व जमा केलेल्या करातून १०% मोबदला या सनदेच्या माध्यमातून जमा करणाऱ्याला मिळत असे. ही पद्धती छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीपासून सुरू होती. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत स्वतःस ते सरदेशमुख मानत असत.

शाहू महाराजांना ही सनद मिळाल्याने त्यांनी सुद्धा या पदाच्या बाबतीत हेच केले. या सनदेने स्वराज्यात व दक्षिणेतील सहा सुभ्यात सरदेशमुखी वसुल करण्याचा अधिकार मिळाला.

**सरदेशमुखी सनदेचे महत्त्व :**

१) मराठ्यांना जमीन महसूलाकडे प्रत्यक्ष लक्ष देण्याची संधी उपलब्ध झाली.
२) मराठ्यांना राजस्व पद्धतीने ज्ञान प्राप्त होण्यास मदत झाली.
३) मराठ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली.
४) सरदेशमुखी मिळवितांना साम्राज्यात मराठ्यांनी प्रभाव वाढविला.

**सरदेशमुखी सनदेवरील टीका :**

१) एकूण राजस्वाच्या उत्पन्नापैकी १०% उत्पन्नाचा भाग म्हणजे अत्यंत कमी दाम.
२) आपल्याच साम्राज्यातील लोकांकडून वसूली करताना घेतलेली भूमिका योग्य आहे काय? नाही यात वाद.

**सनदाबाबत विचारवंतांची मते :**

**१) रिचर्ड टेंपल :** ''आपल्या कुटनितिक उद्देशात बाळाजी सफल झाला. त्याने आणलेल्या तीन सनदा म्हणजे मराठा राज्याच्या मॅग्नाकार्टा होय.''

**२) श्री. टी. एस. शेजवलकर :** ''साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्या सनदा''

**३) रियासतकार सरदेसाई :** ''मोगलाशी उघड-उघड लढा देऊन स्वराज्याचे रक्षण करणे अवघड आहे याची शाहूला खात्री होती आणि म्हणूनच शाहू महाराजांनी शिवाजी महाराजांच्या धोरणाला मुरड देऊन सनदा स्वीकारल्या. ''

## ८.१३ सारांश :

औरंगजेबाच्या मृत्युनंतर दक्षिणेच्या राजकीय परिस्थितीत मोठ्या प्रमाणात अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत ताराबाईचे आक्रमक धोरण व शाहू महाराजांची संयमी भूमिका या दोन्ही बाजूंनी मराठा साम्राज्यात परिवर्तने घडू लागली होती. अशा कठिण परिस्थितीत बाळाजी विश्वनाथाचा झालेला उदय सर्व परिस्थिती बदलून टाकतो व मराठा साम्राज्याच्या राजवटीला कलाटणी देत पेशवाईच्या राजवटीकडे घेऊन जातो या सर्व घटकांचा सविस्तर आढावा आपण या घटकांत घेतला आहे.

## ८.१४ दिर्घोत्तरी प्रश्न

१) शाहू ताराबाई संघर्षाच्या थोडक्यात आढावा घ्या?
२) शाहू महाराजांसमोरील अडचणी सांगून या अडचणीवर त्यांनी कशी मात केली ते सांगा?
३) पेशवे बाळाजी विश्वनाथाच्या उदयास जबाबदार पार्श्वभूमी सांगून त्याची कामगिरी स्पष्ट करा.

४) बाळाजी विश्वनाथाची योग्यता अचूक स्पष्ट करा.

५) बाळाजी विश्वनाथाच्या दिल्ली स्वारीचे वर्णन करून प्राप्त झालेल्या सनदांची माहिती लिहा.

## ८.१५ इतर संदर्भ ग्रंथ सुची


१) अ. रा. कुलकर्णी व ग. ह. खरे - काँटीनेटल प्रकाशन, ''मराठ्यांचा इतिहास (खंड दुसरा)''.

२) प्रमोद ओक : कॉन्टीनेंटल प्रकाशन : पेशवे घराण्याचा इतिहास.

३) प्रा. सदाशिव आठवले व डॉ. प्र. ल. सासवडकर, ''मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास''.

४) वा. कृ. भावे : वरदा प्रकाशन पेशवेकालीन महाराष्ट्र.

५) प्रा. जयसिंगराव पवार : मेहता प्रकाशन, ''मराठी साम्राज्याचा उदय व अस्त''.


❖❖❖❖

# ९

# पेशवा पहिला बाजीराव

**अनुक्रमणिका**

९.० उद्दिष्टे
९.१ प्रस्तावना
९.२ पेशवा बाजीराव पहिला
९.३ बाजीराव आणि निजाम
९.४ माळव्याची मोहिम १७२४-२८
९.५ वारणेचा तह
९.६ पेशवा-सेनापति संघर्ष
९.७ जंजिऱ्याची सिद्धी विरुध्द मोहिम
९.८ कोकणावरील स्वारी
९.९ भोपाळची लढाई
९.१० बाजीरावाचे व्यक्तीगत आयुष्य
९.११ मूल्यमापन
९.१२ सारांश
९.१३ प्रश्न
९.१४ संदर्भसूची

## ९.० उद्दिष्टे

१. पेशवा पहिला बाजीराव यांच्या कार्याचा आभ्यास करणे.
२. पहिला बाजीराव व निजाम यांच्यातील संबंधाविषयी माहिती समजून घेणे.
३. पहिल्या बाजीरावाच्या कोकण स्वारीची सविस्तर माहिती अभ्यासणे.
४. बाजीरावाचे भोपालच्या लढाईतील विषयाचे महत्व अभ्यासणे

## ९.१ प्रस्तावना

बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी पहिल्या बाजीरावाला पेशवेपद बहाल करण्यात आहे. बाजीरावाने आपल्या स्वपराक्रमाने मराठा राज्याचा सांभाळ तर केलाच, परंतुमराठ्यांच्या स्वराज्याचा उत्तरेमध्ये विस्तार करण्याचे महत्वाचे कार्य केले.

बाजीरावाच्या उत्तरेकडील मोहिमेमूळे मराठे दिल्लीतील राजकारण खेळू लागले. दिल्ल दरबारी मराठ्यांचे वजन वाढले.

पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत मराठ्यांनी अनेक लढायामंध्ये विजयश्री मिळविले आहेत. त्यामुळे बाजीरावाच्या कारकिर्दीचा सविस्तर अभ्यास या प्रकरणाच्या माध्यमातून केलेला आहे.

## ९.२ पेशवा बाजीराव पहिला

बाळाजी विश्वनाथ पेशव्याच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथाच्या मुलगा बाजीरावास पेशवेपदी नेमले (१६ एप्रिल १७२०) यावेळी बाजीराव २० वर्षाचा होता. तडफदार, संयमी आणि कर्तबगार तरुण असे बाजीरावाचे व्यक्तीमत्व होते. परंतु बाजीरावाच्या विरोधात पेशवेपदाबद्दल वाईट मत सुद्धा बोलले जात होते. छत्रपतींनी यास दुर्लक्ष करून बाजीरावांची नेमणूक पेशवे पदी केली. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांच्या स्वराज्यावरील उपकाराची परत फेड हा त्या मागील उद्देश होता. छत्रपती शाहूंना प्रशासनी राजकारणात रस नव्हता. डॉ. वि. जी. दिघे म्हणतात, छत्रपती केवळ नामधारी राहीले आणि मराठी सत्ता हळूहळू पेशव्याकडे हस्तांतरीत झाली. म्हणून हा कालखंड पेशवा पहिला बाजीराव या नावाने ओळखला जातो.

### पेशवा बाजीराव पुढील अडचणी :-

मराठी स्वराज्यात स्थिरता असतांना अनेक अडचणी होत्या. बाळाजी विश्वनाथांचा वारसा म्हणून काही समस्यांना बाजीरावांना तोंड द्यावे लागले. मराठी राज्यातले सरंजामदार, जहांगीरदार स्वतंत्रपणे वागल्यामुळे मराठी राज्याच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला. यांना नमवून मराठी स्वराज्यातील केंद्र सत्ता अधिक प्रभावित बनवणे अवश्यक होते. मुघल दरबारात सय्यद बंधुंचा प्रभाव कमी होऊन तुरानी नेतृत्व वाढीस लागले. मराठी साम्राज्याला चौथाई आणि सरदेशमुखीच्या सनदा १७१८ साली मिळाल्या होत्या. मार्च १७१९ मधील मोगल राजाने या सनदा वर शिक्कामोतर्ब केले परंतु तुराणी पक्षाची या सनदास मान्यता नव्हती. त्यांनी कोल्हापूरच्या संभाजीला जवळ करून यादवी संघर्ष पेटवण्यास हातभार लावला हैद्राबादच्या निजामने मराठी साम्राज्याला पुन्हा आव्हान दिले. मराठी साम्राज्याचा काही भाग मोगल अधिपत्या खाली होता. कोकणात जंजिऱ्याच्या सिद्दींचे वर्चस्व होते. स्वराज्यातील यादवी अजून पर्यंत होती. संभाजीचा गड अजून पर्यंत छत्रपतीचे प्रभूत्व मानत नव्हता. शिवाय गुजरात मावळा प्रदेशावरचा मराठ्यांचा ताबा मुगलांना अमान्य होता. मोगल हल्ल्याला उत्तर म्हणून मराठी सैन्य गुजरातमध्ये रत्नपूर पर्यंत जाऊन पोहचले. पेशव्यांना मराठी सैन्य बळकट करायचे होते. दोन गटातील सत्ता स्पर्धेतील फायदा पेशव्यांनी उचलला आणि दख्खनी राजकारणात मर्यादीत न रहाता मराठी सैन्य दिल्लीकडे धाव घेतल्यास समर्थ झाले.

### पेशव्यांचे विस्तारवादी धोरण :

अडचणीवर मात करून मराठी सत्ता देशाच्या राजकारणात प्रभावीपणे निर्माण करावी. अशी पेशव्यांची महत्त्वाकांक्षा होती. पेशवा बाजीराव मुत्सद्दी, राजकारणी व दूरदर्शी होता. त्याने उत्तर भारतात नेतृत्व पदी मराठी सत्ता यावी यादृष्टीने पाऊल टाकायला सुरूवात केली. दक्षिणेत मराठी सामर्थ्याला अव्हान देणाऱ्या सत्तांना नर्मदा पलीकडे अडवायचे होते. तसेच तो

प्रदेश ताब्यात घेऊन तेथे मराठी सत्तेचे सामर्थ्य वाढवायचे होते. दक्षिणेत निजामशाहीशी संघर्ष करून त्याच वाढत्या हालचालींना पायबंद घालायचे होते. निजामात मोगलांची मदत मिळाली नाही तर दक्षिणेतल्या संघर्षाचा निकाल लागणार होता.

गेली २५-३० वर्षे मराठे बचावात्मक संघर्ष करीत होते. मोगल बादशहा औरंगजेब सैन्यासह दक्षिणेत ठाण मांडून बसला होता. परत औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोघल दरबारात राजकीय परीवर्तन घडून आले. बाजीरावाने मराठ्यांना अधिक सामर्थ्यशाली बनवले. फक्त बचावाकरीता युद्धत्व अंमलात आणले. पेशव्यांना शिंदे, होळकर यांचे सहकार्य लाभले. विस्तारवादी धोरण असणाऱ्या पेशव्यांने दक्षिणेतील लहान सत्तांशी संघर्ष करण्यापेक्षा पाया असलेल्या मोगल सत्तेचा ऱ्हास करण्यास सुरवात केली. बाजीरावांचे हे धोरण छत्रपतींना मान्य होते. शिवाय मराठा सरदाराचे सहकार्य मिळताच बाजीरावांचे विस्तारवादी धोरण अंमलात येऊ लागले. दिल्लीच्या राजकारणातील मराठ्यांचे स्थान प्रस्तावित करणे हे बाजीरावांचे पहिले ध्येय होते. तथापि हैद्राबादच्या निजामाचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने पुढची पावले उचलली गेली.

## ९.३ पेशवा बाजीराव आणि निजाम

मोगल दरबारातील मिर शहाबुद्दीन या सुबेदारचा मुलगा निजाम - उल-मुल्क हा पुढे हैद्राबादचा निजाम म्हणून उदयास आला. त्याचा जन्म १६७१ साली झाला असून कमरूद्दीन हे त्याचे नाव होते. वयाच्या १४व्या वर्षी तो मोगल सैन्यात आला. औरंगजेबासाठी तो खास माणसांपैकी एक होता. त्याला खान-ए-खानान, निजाम-उल-मुल्क बहादुर ‘फत्तेजंग’ अशा पुरस्कारांनी गौरवण्यात आले. मावळ्यांची सुभेदारी मिळवताच तो तुराणी गटाचा सुभेदार बनला तो मोगलांच्या यादवी पासून अलिप्त राहीला.

### ९.३.१ बाजीराव व निजाम संबंध :-

निजामाने पेशवे यांची मदत घेतली. त्याचे संबंध ५ ते १० वर्षात बरेच वाढले. मोगल दरबारात यादवी सुरू सुरू झाली. १७४९च्या दरम्यान निजामाकडून दख्यनची सुभेदारी काढली. व त्याच्या जागी सय्यद हुसेन आला. १७२० मध्ये पहिल्यांदा निजामाने पेशव्यांची मदत घेतली व सय्यद हुसेन अलीवर हल्ला केला. यात निजामाचा पराभव झाल्याने पेशवे माघारी आले. पुढे १७२१ ला पेशव्यांनी खानदेशवर हल्ला केला. तेव्हाच पेशवा बाजीराव व निजाम-उल-मुल्क याची पहिली भेट चिकलढाण्याजवळ झाली. नंतर पेशव्यांनी खानदेश व बालाघाट परिसरात आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. दरम्यान निजाम दिल्लीच्या वजीरपदावर जाऊन पुन्हा दक्षिणेत परतला त्याला बंडखोर ठरविण्यात आले. निजामाने स्वतः ‘नालचा’ येथे बाजीरावाची भेट घेतली. १८ मे १७२४ च्या भेटीत निजाम पेशवे करार झाला. दोन्ही सत्तांनी एकमेकांना मदतीची आश्वासने दिली. साखरखेडच्या लढाईत निजाम व मुबारिझखान यांच्यातल्या संघर्षात मराठे निजामाच्या बाजूने होते. मराठ्याच्या मदतीने १ ऑक्टो. १७२४ ला निजाम विजयी झाला. निजामाने पेशव्यास ७ हजारी मनसब दिली.

### ९.३.२ बाजीरावाची कर्नाटकावरील मोहिम :-

कर्नाटकमध्ये तंजावर येथे व्यंकोजीराजे भोसले यांचे वंशज राज्य करीत होते. श्रीरंगपटटणचा राजा ओडिवयार याने मुस्लिमांच्या उपद्रव्यापासून आम्हाला वाचवावे अशी विनंती शाहूकडे केली होती आणि शाहूने ही कामगिरी बाजीरावावर सोपवली. बाजीरावाने चित्तलदुर्ग श्री

रंगपट्टणमवर विजय मिळविला. संपूर्ण कर्नाटक हाती येणार असे चित्र दिसत असतानाच तिकडे निजाम पुण्यावर चाल करून आला. म्हणून बाजीरावाला पुणे वाचविण्यासाठी कर्नाटकावरील मोहिम अर्ध्यावर टाकून परतावे लागले.

### ९.३.३ पालखेडची लढाई :

निजामाने पुण्यात मोठा धुमाकुळ घातला. लोहगड चिंचवड व पुणे परिसरातील सर्व प्रदेश उजाड करुन टाकला. पुण्यावरील निजामाची मिठी सुटावी म्हणून बाजीरावाने अजिंठ्याचा डोंगर ओलांडून औरगांबादकडे मोर्चा वळवला. औरंगाबादला वाचविण्यासाठी फेब्रुवारी १७२८ मध्ये निजााने पुणे सोडले व गोदावरी नदीच्या दिशेने निघाला. डोंगराळ प्रदेशातून तोफखाना घेऊन कुच करणे अवघड झाले. ज्या मराठी सरदाराच्या जोरावर त्याने युध्द पुकारले ते कुचकामी ठरले. बाजीराव सारखे धाडस व चपळाई त्याच्या अंगी नव्हती. अशा स्थितीत गोदावरी उतरून निजाम औरंगाबादकडे येत असताना औरंगाबादच्या पश्चिमेला २० मैलावरुन पालखेड येथे मराठयांनी त्याला घेरले. २५ फेब्रुवारीला लढाई होऊन मराठ्यांचा विजय झाला. निजामाची रसद तुटली. पाण्याचा ओढाही मराठयांच्या ताब्यात गेल्याने शेवटी निजामाने तहाची याचना केली. ६ मार्च १७२८ रोजी मराठे व निजाम यांच्यात मुंगी-पैठण परगणे शेवगाव येथे तह झाला. त्यालाचा मुंगी-शेवगावचा तह म्हणतात.

**आपली प्रगती तपासा :-**

प्र.१ पालखेडच्या लढाईवर थोडक्यात टीप लिहा.

---

## ९.४ माळव्याची मोहिम १७२४-२८

मुघल व शाहू महाराज यांच्यात झालेल्या तहानुसार गुजरात आणि माळवा या प्रांतात चौथाई व सरदेशमुखी मुघलांनी दिली होती परंतु नंतर मुघल बादशहाने त्यास नकार दिला म्हणूनच बाजीरावाने लष्करी बळावर गुजरात व माळव्याची सनद मिळण्याचे ठरले.

दाभाडेच्या पाडावानंतर गुजरातमध्ये पिलाजी गायकवाडचा प्रभाव वाढत गेला. त्याने आपल्या पराक्रमाने तिथे चौथाई व सरदेशमुखी वसुल केली. पण मोगल सुभेदार अभयसिंगला ही गोष्ट खटकत होती. पिलाजी विरुध्द लष्करी कारवाई करण्यात त्याला अपयश आल्याने बोलण्याचे नाटक करुन १७३२ मध्ये डाकोर येथे बेसावध पिलाजीचा खून घडवून आणला. अभयसिंग विरुध्द गुजरातमध्ये वणवा पेटला. मराठ्यांनी जोरदार स्वाऱ्या चालू केल्या. शेवटी अभयसिंगने गुजरातची चौथाई-सरदेशमुखी मराठ्यांना देण्याचे कबूल केले. १७३५ नंतर गुजरातवरील मोगलांचा ताबा पूर्ण नष्ट होऊन मराठयांकडे आला.

गुजरातप्रमाणे बाजीरावाचे माळव्याकडे लक्ष होते. मोगल दरबारात जयपूरचा राजा जयसिंगचे महत्त्व वाढलेले होते. पण जयसिंगला रजपूतांचे ऐक्य घडवून मोगलांना दुर्बळ करण्याचे होते. त्यासाठी त्याने मराठ्यांशी संधान साधले. जयसिंगचे निमंत्रण मिळताच बाजीराव व चिमाजी अप्पा उत्तरेकडे निघाले. दोघेजण वेगवेगळया मार्गाने माळव्याकडे निघाले. चिमाजी अप्पा बागलाण व खानदेशमार्गे माळव्याला पोहचले. यावेळी मोगल बादशहाने माळव्यावर गिरीधरबहादूर याला सुभेदार म्हणून नेमले होते. चिमाजीचे वेगवान हालचाली करून धार गाठले. याचवेळी गिरीधरबहादूर व त्याचा पुतण्या दयाबहादुर यांचा मुक्काम अमझेरमध्ये होता. चिमाजीने त्यांच्यावर आकस्मिकपणे हल्ला केला. २९ नोव्हेंबर १७२८ रोजी झालेल्या या लढाईत गिरीधरबहादूर व दयाबहादूर हे दोघेही मारले गेले. विजयी मराठी फौजांनी माळव्याचा ताबा घेतला.

**आपली प्रगती तपासा :-**

प्र.१ पहिल्या बाजीरावाच्या अधिपत्याखालील माळव्याच्या मोहिमेची चर्चा करा.

## ९.५ वारणेचा तह

पालखेडच्या लढाईनंतरही कोल्हापूरच्या संभाजीचा उपद्रव बंद झाला नव्हता. त्याने सरळ सरळ शाहुकडे स्वराज्याचा अर्धा हिस्साच मागितला. संभाजीचा समर्थक उदाजी चव्हाणने शाहूच्या प्रदेशात दंगा सुरु केला एवढेच नव्हे तर शाहूला ठार मारण्यासाठी मारेकरीही पाठवले त्यामुळे शाहूने आक्रमक भूमिका घेऊन संभाजीवर जानेवारी १७३० मध्ये आक्रमण केले.

संभाजी व उदाजी चव्हाणाचा पराभव होऊन ते पळून गेले. ऑक्टोबर महिन्यात शाहूने विशालगड जिंकला. संभाजीची परिस्थिती दयनीय होऊन त्याने शरणागती पत्करली. शाहूनेही मोठ्या मनाने त्याला क्षमा केली. उभयतात १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह घडून आला. या तहाने दोघांनी आपल्या राज्यांची हद्द आरवून घेतली. वारणेच्या खोऱ्यातील सर्व प्रदेश या दोन घराण्यातील १७०८ पासूनचे वैमनस्य कायमचे संपूष्टात आले. संभाजीने छत्रपती म्हणून शाहूला मान्यता दिली. तसेच कधीही परक्या शत्रूची मदत घेतली नाही. अंतर्गत यादवी संपल्याने शाहूलाही स्थिरता प्राप्त झाली.

## ९.६ पेशवा-सेनापती संघर्ष

दाभाडे प्रकरणात बाजीराव खुप बदनाम झाले. सेनापती दाभाडे यांना धडा शिकविण्यासाठी बाजीरावाने तेलंगणावर चाल केली व पेशव्याच्या हातून सेनापती दाभाडे हे

मारले गेले. ह्या प्रकरणात बाजीरावाची तशी कोणतीही चूक नव्हती. सेनापती दाभाडे हे सुरवातीपासूनच पेशव्यांच्या विरोधात होते. शिवाय ते गुजरातची जहांगिरीची मागणी करीत होते. अखेर सन १७३१च्या डभोईच्या लढाईत सेनापती दाभाडे मारले गेले. अखेरीस छत्रपती शाहू यांनी स्वतः जाऊन दाभाडांच्या मातोश्रीचे सांत्वन केले व या प्रश्नावर व प्रकरणावर पडदा पडला.

## १.७ जंजिऱ्याच्या सिद्‌दी विरुध्द मोहिम

जंजिऱ्याच्या सिद्दिना नष्ट करणे छत्रपती शिवाजींना व संभाजीनाही जमले नव्हते. सिध्दी हे मराठयांचे कट्टर शत्रू होते. पेशव्यांच्या काळातही हा संघर्ष सुरुच राहिला. सिद्दी अधूनमधून स्वराज्यातील प्रदेशांवर आक्रमणे करून मोठा विध्वंस घडवून आणीत. मराठ्यांचा महत्वाचा मानला गेलेला रायगडही त्यांच्या ताब्यात होता. पण अतर्गत संघर्षामुळे शाहूला सिद्दीकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही. त्यातच एक महत्त्वाची घटना घडली शाहू व पेशव्यांबरोबर समस्त मराठयांचे आध्यात्मिक गुरु ब्रम्हेंद्रस्वामी यांनी चिपळूणजवळ परशूरामाचे मंदीर बांधले होते. इ.स. १७२७ मध्ये अंजनवेलचा सिद्दी सतने सिद्दी सुभेदार या मंदिरावर हल्ला करुन ते उध्वस्त केले. त्यामुळे ब्रम्हेंद्रस्वामीनी शाहूकडे सिद्दींना शिक्षा करण्याचा आग्रह केला तसेच संपूर्ण महाराष्ट्रात सिद्दीविरोधी लाट निर्माण झाली. ब्रम्हेंद्रस्वामींनी चिपळूण सोडून साताऱ्याजवळील धावडशीमध्ये आश्रय घेतला.

१७२१ मध्ये कान्होजी आंग्रेचा मृत्यू झाला. त्याचा मूलगा सेखोजी आंग्रे हा आरमारप्रमुख बनला. दाभाडेंच्या बंदोबस्तानंतर बाजीरावने आंग्रेच्या सोबतीने सिद्दीविरुध्द मोहीम होती घेतली. याचकाळात १७३३ मध्ये सिद्दींचा प्रमुख सिद्दीरसूल याकूतखान मरण पावला व त्याच्या मुलामध्ये वारसायुध्द सुरु झाले. मोठा मुलगा अब्लाचा खून झाल्याने त्याचा मुलगा अब्दूल रहमान मराठयांच्या आश्रयास आला याचा फायदा घेऊन शाहूने राजापूर जंजिरावर बाजीरावला आणि रायगडावर प्रतिनिधिंना पाठवले. बाजीरावने जलद हालचाली करून सिद्दींच्या ताब्यातील बिरवाडी, अवचितगड, सूरगड, घोसाळा, मदगड, बाणकोट ही ठाणी जिंकून घेतली. त्यानंतर जंजिराला वेढा घातला. ८ जून १७३३ रोजी श्रीपतराव प्रतिनिधीने रायगड जिंकला. परंतुअंजनवेल व गोवळाकोट जिंकण्यात त्याला अपयश आले.

आंग्राची उदासिनता, प्रतिनिधीची मदत करण्यास टाळाटाळ व पावसाळा यो गोष्टीमुळे बाजीरावचे मोहीमेत मन लागत नव्हते. त्यातच १७३३ मध्ये सेय्वोजी मरण पावल्याने त्याच्या मुलांमध्ये संघर्ष सुरु झाला शेवटी बाजीरावने सिद्दींबरोबर अलिबागचा तह केला. त्यानुसार जंजिराचा प्रमुख म्हणून अब्दुल रहमानला मान्यता देण्यात आली. रायगड, महाड सोडून इतर प्रदेश सिद्दींना देण्यात आले. बाजीरावची पाठ वळतात सिद्दींनी आक्रमक धोरणे स्विकारले. बाणकोटचा किल्ला जिंकला, महाड काबीज केले व रायगडला वेढा घातला. १० जानेवारी १७३४ रोजी मराठी फौजांनी सिद्दी लष्करचा धुव्वा उडला १७३५ पर्यंत चकमकी सुरु होत्या पण सिद्दीचा नाश करण्याची शाहूची प्रखर इच्छा होती. त्याने चिमाजी अप्पा व पिलाजी जाधवकडे ही कामगिरी सोपविली. याचवेळी सिद्दी सतने कुलाब्यावर हल्ला केला होता. चिमाजी अप्पाने १८ एप्रिल १७३६ रोजी अचानकपणे रेवस जवळ गाफील सिद्दीवर हल्ला केला. भयंकर लढाई होऊन सिद्दी सात. सिद्दी याकूत मारले गेले. १० वर्षे मराठ्यांना सतावणाऱ्या सिद्दीसाताचा शेवट झाल्याने महाराष्ट्रात आनंदाची लाट उसळली.

## ९.८ कोकणवरील स्वारी

बाजीरावाने चिमाजी अप्पा याला ठाणे, वसईचा परिसर पोर्तुगिजाच्या हातातून मुक्त करण्यासाठी पाठविले होते. तेथे पोर्तुगिजाचा राजकीय प्रभाव होता आणि या परिसरात ते धर्मांतर घडवून आणित होता. मुंबईचे इंग्रज व मुरूडचा सिद्दी पोर्तुगिजांना मदत करीत असत. चिमाजी अप्पाने या स्वारीत वसईचा किल्ला घेतला आणि पोर्तुगिजांचे साम्राज्य नष्ट करून पोर्तुगिजांची सत्ता ही गोव्यापूरती मर्यादित केली. बाजीरावच्या कोकणवरील स्वारीचा एक भाग म्हणजे त्यांनी चिपळूण, परशुरामावर केलेली चाल होय. तिथे ब्रम्हेंद्र स्वामीचा मठ होता. हे स्वामी छत्रपती शाहूचे अध्यात्मिक गुरू होते. सिद्दीच्या धार्मिक छळाला हा परिसर कंटाळून गेला होता. बाजीरावाने कोकणवरील स्वारीत हा परिसर सिद्दीच्या प्रभावातून मुक्त केला.

**आपली प्रगती तपासा :-**

प्र.१ भाष्य करा.

अ) जंजिऱ्याच्या सिद्दीविरुध्द मोहिम

ब) कोकणावरील स्वारी

## ९.९ भोपाळची लढाई

दिल्ली मराठ्यांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी मुघल बादशहाने निजाम-उल-मुल्कला दिल्लीला बोलावले. १२ जुलैला निजाम दिल्ली जवळ आला. बादशहाने निजामाला एक कोटी रुपये व पाच सुभ्यांचा कारभार दिला. त्याच्या मुलाला गाझीउद्दीनला आग्रा व माळव्याची सुभेदारी दिली.

बाजीरावाच्या कानावर निजाम व बादशहाच्या हालचाली पोहोचल्या, त्यावेळेला बाजीरार वसईच्या मोहीमेवर होता. ही मोहीम अर्धवट सोडून बाजीरावाने २५ ऑक्टोबर १७३७ रोजी उत्तरेकडे कूच केले. निजामाचा दुसरा मुलगा नासिरजंग दक्षिणेतून प्रंचड सैन्य घेऊन आला व निजाम आणि नासिरजंगच्या फौजांनी एक होऊ नयेत म्हणून बाजीरावाने चिमाजी अप्पाला नासिरजंगला रोखण्याची जबाबदारी दिली. बाजीराव माळव्याला येण्याआधीच निजामाने ३० हजार फौज आणि मोठा तोफखाना घेऊन प्रथम बुंदेलखंडावर ताबा मिळवला. डिसेंबर महिन्यात दोन्ही सैन्यात अनेक चकमकी घडून आल्या मराठयांच्या हालचाली मात्र जलद होत होत्या परंतु अवज़ड तोफखाना सांभाळून निजामाला चपळाईने पुढे जाता येत नव्हते म्हणून त्याने भोपळच्या मजबूत किल्ल्याचा आश्रय घेतला. बाजीरावाने लगेच किल्ल्याला वेढा घातला. मराठ्यांच्या नाकाबंदीमुळे मोगलांची स्थिती दयनीय झाली. धान्याचा साठा आठवडयात संपला त्यामुळे

निजाम सैन्याबरोबर निसटून जाण्याच्या प्रयत्नात होता. शेवटी त्याने शरणागती स्वीकारली. बाजीराव व निजम यांच्यात ७ जानेवारी १७३८ रोजी दोरहा सराई येथे तह झाला.

## ९.१० बाजीरावचे व्यक्तीगत आयुष्य

शिवाजीनंतर बाजीरावाचे व्यक्तिमत्व अतिशय धाडसी होते. तो अतिशय हुशार व दुसऱ्याला आपल्याकडे खेचून घेणारा अशा व्यक्तीमत्वाचा होता. इ.स. १७३० मध्ये बुंदेलखंडाच्या स्वारीवर जेव्हा बाजीराव गेला त्यावेळी त्याने केलेल्या बहुमोल मदतीदाखल महाराजा छत्रसाल याने मस्तानी नावाची सौंदर्यवती व शूरवीर स्त्री बाजीरावाला नजर केली. तेव्हापासून बाजीराव तिच्या संर्पकात आला, असा उल्लेख तत्कालीन वाङ्मयात आढळते. तेव्हापासून पुण्यातील ब्राम्हणांना बाजीरावांचे हे सबंध पटले नाहीत व त्यानी बाजीरावाच्या मुलाची मुंज करण्यास नकार दिला. बाजीराव जेव्हा मोहिमेवर होता त्यावेळेला मस्तानीला कैदेत ठेवण्यात आले. शाहूला मस्तानीला दिलेली वागणूक पटली नव्हती. बाजीरावाला जेव्हा हे कळले तेव्हा तो आजारी पडला.

सततच्या युध्दामुळे तो थकला होता. शिवाय प्रेमात ही तो हताश झाला होता. त्यामुळे आजारी पडून तरुण वयात २८ एप्रिल १७४० ला अचानकपणे त्याचा मृत्यू झाला.

## ९.११ मूल्यमापन

बाजीरावाच्या चरित्रात बाजीराव व संभाजी प्रकरण, सेनापती दाभाडे प्रकरण आणि बाजीराव मस्तानी प्रकरण या घटना महत्त्वाच्या आहेत. परंतु बाजीराव कालीन मराठ्यांचा साम्राज्य विस्तार ही घटना सुध्दा पेशवेकालीन इतिहासात महत्वाची आहे. कोल्हापूरच्या छत्रपतींचा किताब रद्द करुन संभाजी दुसरा याला कोल्हापूरची मराठ्यांची जहांगिरी दिली आणि बाजीरावाने मराठ्यांतील दोन छत्रपती ही विचित्र घटना दूर केली.

सेनापती दाभाडे यांचा युध्दातील मृत्यू ही घटना बाजीरावाच्या अंगलटीस आली होती.

## ९.१२ सारांश

बाळाजी विश्वनाथांनी मराठयांच्या राजकीय क्षेत्रात मोठा बदल घडवून आणला. छत्रपतींच्या काळातून आता पेशव्यांचा काळ सुरु झाला होता. शिवाजी महाराजांचे वारसदार आणि त्याचे राजकीय महत्त्व कमी होत होते. मराठ्यांच्या राज्यकारभाराची सगळी सुत्रे पेशव्यांच्या हाती गेली आणि पुढील शंभर वर्षे पेशव्यांनी मराठयांवर राज्य केले. त्यानंतर पहिल्या बाजीरावाने मराठ्यांचे राज्य थेट उत्तर भारतापर्यंत नेले.

## १.१३ प्रश्न

१. मराठा राज्याचे दृढीकरण करण्यात पेशवा बाळाजी विश्वनाथाने मिळवलेल्या यशाचे परिक्षण करा.
२. पहिल्या बाजीरावाचे नेतृत्वगुणांमुळे मराठा साम्राज्यांचा झालेला विस्तार विशद करा.

## १.१४ संदर्भग्रंथ

१. सरदेसाई, जी. एस., न्यु हिस्ट्री ऑफ दी मराठा खंड - २ फोनीक्स पब्लिकेशन बॉम्बे, १९७१.
२. रॉलिनसन,एच.जी. हिस्ट्री ऑफ मराठा

❖❖❖❖

# १०

# पानिपतचे तिसरे युध्द

**अनुक्रमणिका**


१०.० उद्दिष्टये

१०.१ प्रस्तावना

१०.२ तिसऱ्या पानिपत युध्दाची कारणे

१०.२.१ श्रीमंत नाना साहेबांची कारकीर्द

१०.२.२ उत्तरेत दिग्विजयामुळे मराठयांना आलेले अपयश

१०.२.३ उत्तरेत मराठयांना प्रशासक व्यवस्था राबविता आली नाही.

१०.२.४ सन १७४८ व ४९ मधील महत्वाच्या घटना

१०.२.५ पानिपतच्या लढाईपूर्वी उत्तरेत सत्तांचे एकत्रीकरण

१०.२.६ पंजाब प्रकरण मराठयांच्या अगलतीस आले

१०.३ पानिपतचे तिसरे युध्द

१०.४ पानिपत युध्दात मराठयांच्या पराभवाची

१०.४.१ मराठयांना उत्तर हिंदूस्तानात परिस्थिती सांभाळता आली नाही.

१०.४.२ मराठयांना उत्तरेत सहकाऱ्यांचे सहकार्य मिळवता आले नाही.

१०.४.३ मराठी लष्करी सिरधेन व शिस्तीत कमी पडले.

१०.४.४ भाऊसाहेबांची कार्यक्षमता

१०.४.५ युध्दाच्या वेळी बाजारभुंगे बायका मुलांची आवश्यकता नव्हती.

१०.४.६ मराठयांमध्ये एक सुत्रता नव्हती.

१०.५ पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचे परिणाम

१०.५.१ लष्करी शोकांतिका

१०.५.२ मराठी सत्ता खिळखिळी बनली

१०.५.३ शीख सत्तेच्या उदयाला मदत झाली

१०.५.४ मोगलांचा अस्त

१०.५.५ रघुनाथ रावाच्या उदयास मदत

१०.५.६ इंग्रजी सत्तेचा मार्ग मोकळा झाला

१०.६ संदर्भ कारांची मते

## १०.१ प्रस्तावना :

जगाच्या इतिहासात भौगोलिकदृष्टया मोक्याच्या ठिकाणी व इतिहासाला कलाटणी देणाऱ्या अनेक युध्दाची नोंद झाली आहे. ग्रीसमधील धर्मपित्याची खिंड, फ्रान्समधील अल्सेस व लॉरेन्स हे प्रांत व हिंदुस्थानच्या दिल्लीवरच्या वाटेवर पानिपत येथे ऐतिहासिकदृष्टया महत्वाच्या तीन लढाया झाल्या.

१) पहिली लढाई १५२६, इब्राहिम खान लोदी आणि बाबर
२) दुसरी लढाई १५५६, अकबर आणि हेमू

पहिल्या लढाईत हिंदुस्थानातील सुलतानशाही नष्ट झाली. तर दुसऱ्या पानिपतच्या युध्दानंतर मुघल सत्ता प्रस्थापित झाली तर तिसरे पानिपतचे युध्द अफगणिस्तानचा अहमदशाह अब्दाली व मराठे यात होऊ त्यात मराठी सत्तेचा दारुण पराभव झाला. त्यामुळे भारतीय राजकारणात एक पोकळी निर्माण झाली व त्यांचा फायदा इंग्रजांना झाला आणि बंगालमध्ये इंग्रज राज्यकर्ते बनले. पानिपतच्या युध्दाच्या पुर्वी हिंदूस्थानातील परिस्थिती कशी होती हे पाहणे जरुरीचे वाटते किंवा या पानिपतच्या युध्दाला कोणत्या घटना कारणीभूत ठरल्या व मराठयांचा पराभव कसा झाला, याचे महत्वही लक्षात येणे जरुरीचे आहे.

## १०.२ तिसऱ्या पानिपत युध्दाची कारणे:-

### १०.२.१ श्रीमंत नानासाहेबांची कारकीर्द :-

पहिल्या बाजीरावाच्या मृत्यूनंतर जून १७४० मध्ये बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. नानासाहेबांच्या कारकिर्दीत मराठयांनी उत्तरेच्या राजकारणात हस्तक्षेप केला. मराठी सत्तेच्या विस्ताराचे धोरण चालू ठेवले. तसेच अनेक मराठे सरदार उत्तरेच्या मोहिमांकडे पाठविते. नानासाहेबाचे भाऊ रघुनाथराव यांनी उत्तरेस कटक ते अटक असा पराक्रम करुन उत्तरेस मराठयांचा राजकीय दरारा निर्माण केला. मराठयांच्या दिग्विजयामागे नक्की कोणता अर्थ आहे हे सांगण्याचा प्रयत्न काही इतिहासकारांनी केला आहे. ते म्हणतात मराठयांना उत्तरेस हिंदूचे साम्राज्य निर्माण करावयाचे होते.

### १०.२.२ उत्तरेस दिग्विजयामुळे मराठयांना आलेले अपयश :-

मराठयांनी उत्तरेच्या मोहिमांमध्ये उत्तरेतील हिंदु राजवटीत आणि प्रजा, त्याचबरोबर इतर राज्यात हस्तक्षेप वारंवार सुरु केला. वस्तुस्थिती अशी आहे की, उत्तरेत मराठयांनी अशी बेबंदपणे मोहीमा काढल्यामुळे त्यात कुठलाही निषेध पाळला नाही. म्हणूनच मराठयांच्या प्रत्येक विजयामागे अनेक शत्रू निर्माण झाले. त्यामुळे पानिपतपूर्वी मराठयांबद्दल उत्तरेत इतके विरोधाचे वातावरण निर्माण झाले की, इतर कोणीही चालेल, पण मराठे नको अशी भावना निर्माण झाली.

### १०.२.३ उत्तरेत मराठयांना प्रशासन व्यवस्था राबविता आली नाही :-

मराठयांनी उत्तरेकडील मोहीमांचा अर्थ लावताना आर्थिक व राज्यविस्ताराचे कारण नेहमी पुढे केले. पहील्या बाजीरावाच्या काळात उत्तरेतील युध्द मोहीमांना सुरुवात झाली. त्यामुळे मराठयांच्या तिजोरीवर अधिक ताण पडत गेला. हा ताण व आर्थिक चणचण कमी करण्यासाठी पुन्हा उत्तरेतील मोहिमांचे आयोजन करण्यात आले. युध्दात प्रचंड लुट मिळते. युध्दखंडणी

वसुल करता येते. मुख्य म्हणजे चौथाई आणि सरदेशमुखीद्वारे प्रचंड उत्पन्न प्राप्त होते. यासाठी उत्तरेतील मोहिमांकडे मराठयांनी जास्त लक्ष दिले. परंतु त्यांनी विजय प्राप्त केलेल्या राज्यावर स्थिर प्रशासन व्यवस्था राबविली नाही. केवळ मोहिमा व युद्ध करण्यास आणि वेगवेगळ्या तहाची अंमलबजावणी करण्याकरिता वारंवार उत्तर हिंदूस्थानात हस्तक्षेप सुरु केला. परंतु यांचे परिणाम उलट झाले. मोहीमांना खर्च अधिक व्हायचा पण त्या मोबदल्यात वसुली मात्र होत नव्हती. तात्पर्य म्हणजे उत्तर मोहिमांमुळे मराठयांना राजकीय व आर्थिक फायदा झाला नाही, तर अनेक समस्या निर्माण झाल्या.

### १०.२.४ सन १७४८ व ४९ मधील महत्त्वाच्या घटना :

ही दोन वर्षे मराठयांच्या इतिहासाला कलाटणी देणारी वर्ष होती. सन १९४८ मध्ये मुघल बादशाह मोहम्मद शहा याचा मृत्यू झाला आणि नंतर बादशाहा शहा आलम हा संपूर्णपणे मराठयांच्या सुरक्षा व्यवस्थेवर अवलंबून राहिला. मराठयांनी त्याला सुरक्षित ठेवायचे आश्वासन दिले होते. आणि दिलेला शब्द पाळण्यात मराठयांनी स्वतःला उत्तरेतल्या राजकारणात गुंतवले. सन १७४८ मध्येच निजाम-उल-मुल्क मरण पावला. गादीच्या वारसावरुन त्यांच्या दोन मुलांमध्ये जीवघेणा संघर्ष सुरु झाला. त्यावेळी गाझीउद्दीन हा उत्तरेत होता तर सलामत जंग हा दक्षिणेत होता. पेशव्यांनी गाझीउद्दीनचा पक्ष घ्यावा यासाठी जोरदार प्रयत्न चालले होते. पण नानासाहेब हे मुत्सददी होते आणि हैद्राबादच्या प्रकरणात पेशव्यांनी हस्तक्षेप केला नाही. टिकाकारांनी नानासाहेबांना याबाबतीत दोष दिला आहे. कारण गाझीउद्दीन जर निजाम बनला असता तर नानांच्या मराठयांना काही काळ तरी दक्षिणेत उसंत मिळाली असती कारण निजाम सलामत जंगने पुढे पेशव्यांना त्रास दिला.

सन १७४८ मध्ये अफगणिस्तानचा आमीर नादिरशहा याच्या जागी अहमदशहा अब्दाली आला. यानेच पुढे हिंदुस्थानावर स्वाऱ्या करुन मराठयांना पानीपतच्या युध्दात खेचले. सन १७४९ मध्ये छत्रपती शाहूचा मृत्यू झाला. ताराबाईने पुन्हा एकदा डोके वर काढून गादीच्या वारसाचा हट्ट धरला आणि खळबळ उडवून दिली. नंतर सदाशिव भाऊंनी सोलापूर जवळ सांगोती येथे ताराबाईंशी तह घडवून आणला. त्याला 'सांगोत्याचा तह' म्हणतात. छत्रपती शाहू याला पुत्रप्राप्ती नव्हती. अखेरीस ताराबाईंचा नातू रामराजा याला छत्रपती पद देण्यात आले आणि आता खऱ्या अर्थाने मराठयांचे छत्रपती नामधारी बनले व सत्ताकेंद्र शनिवारवाडयाकडे गेले.

### १०.२.५ पानिपतच्या लढाईपूर्वी उत्तरेत सत्तांचे एकत्रीकरण :-

उत्तरेत दिल्ली, रोहीलखंड आणि अयोध्यायेथील मुसलमान राज्य कर्त्यामध्ये एकीचा अभाव होता. सन १७५२ मध्ये मराठयांनी मुघल बादशाहाशी महत्वाचा करार करुन बादशाहाच्या संरक्षणाची जबाबदारी स्विकारली होती आणि त्याच्या बदल्यात बादशहा मराठयांना ५० लाख रु. देणार होता. बादशहाने नानासाहेब पेशव्यांना आग्रा आणि अजमेरची सुभेदारी सुध्दा दिली होती. हा तह रोहिलखंडाचा नवाबखान आणि सुजाउद्देला यांना पसंत नव्हता. दिल्लीच्या राजकारणात मराठा हिंदूना सामावून घेतल्याचे नजीब खानला पसंत नव्हते त्यामुळे त्याने उत्तरेत दिल्ली आणि मराठयांच्या विरुध्द मुसलमानाचे संघटन घडवून दिले आणि त्यातून पानिपत युध्द झाले.

### १०.२.६ पंजाबच्या मालकीचा प्रश्न :

मराठयांच्या हातून पंजाबमध्ये अहमदशहा अब्दालीच्या मुलाची हत्या करण्यात आली होती. त्याच्याशी राघोबांच्या सांगण्यावरुन दत्ताजी शिंदे याला नामजाद करण्यात आले होते. पुढे

जेव्हा अब्दाली हिंदुस्थानवर चाल करुन आला आणि त्याने पंजाब घेतला. त्यात दत्ताजी शिंदे मारला गेला. पेशव्यांनी मल्हारराव होळकर यांना पंजाबला जावून दत्ताजीला मदत करण्याचे आदेश दिले. पण शिंदे आणि होळकर यांच्यातील संबंध चांगले नसल्याने दत्ताजीला ऐनवेळी कुमक मिळाली नाही आणि दत्ताजी मारला गेला. ही घटना इतकी महत्वाची होती की उत्तरेत मराठयांचा मोहरा कामी आला होता. लगेच नानांनी उत्तरेत बंदोबस्तात वाढ केली आणि उत्तरेत आपला मुलगा विश्वासराव आणि सदाशिवराव भाऊ यांना पाठविले. ऑक्टो १७६० मध्ये भाऊने उत्तरेस प्रयाण केले व येथून अब्दालीची नाकेबंदी होण्यास सुरवात झाली.

## १०.३ पानिपतचे तिसरे युध्द (१४ जाने. १७६१)

अब्दालीच्या मुलाचे आणि दत्ताजी शिंदे यांचा मृत्यु पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचे तात्कालीन कारण समजले जाते. तत्पुर्वी उत्तरेत मराठयांच्या विरोधात संघटन निर्माण करण्यात नजीब खान रोहिल्याला यश आले होते. त्यामुळे उत्तरेत मराठे एकाकी पडले. तरीपण इब्राहीम खान गारदीची मदत आणि सूरजमल जाटची मदत मराठयांना झाली. मोगल राजवटीने मराठयांना मदत केली नाही. कारण अब्दालीने दिल्लीकडून येणारी रसद तोडण्यात यश मिळवले होते. पानिपतात प्रत्यक्ष युध्दाला सुरवात झाली तेव्हापासुन ते अगदी तिसऱ्या प्रहरापर्यंत हे युध्द मराठे निर्णायकपणे जिंकणार असे चित्र दिसत होते. पण अब्दालीने गारदयांचा तोफखाना निकामी केला आणि तिथुन जो परांजये व्हायला सुरुवात झाली ती सुर्यास्तापर्यंत, पानिपतमध्ये सदाशिवराव भाऊ मारले गेले. होळकर, शिंदे आणि फडणवीससारखी माणसे पळाली व म्हणून ती वाचली.

## १०.४ पानिपत युध्दात मराठयांच्या पराभवाची कारणे

पानिपत युध्दात मराठयांचा दारुण पराभव झाला. मराठे म्हणजे विजय असा दृढ विश्वास नाहीसा झाला. इतिहासकारांनी या युध्दाच्या पराभवाची कारणे शोधून काढली ती पुढीलप्रमाणे –

### १०.४.१ मराठयांना उत्तर हिंदूस्थानातील परिस्थिती सांभाळता आली नाही :-

उत्तर हिंदूस्थानातील परिस्थिती रघुनाथरावाने योग्य रितीने हाताळली नाही. तसेच उत्तरेकडील मराठा प्रतिनिधींमध्ये त्याने योग्य ते विचार व संघटन निर्माण केले नाही. मल्हारराव होळकर आणि नजीबखान यांच्यातील मैत्री मराठयांना हानीकारक ठरली. मराठयांनी नजीब खानाचा कडक बंदोबस्त करावयास हवा होता. उत्तरेकडील परिस्थिती दिवसेंदिवस इतकी बिघडत गेली की स्वतः बाजीराव (नानासाहेब) उत्तरेत जाणे आवश्यक होते. परंतु शेवटपर्यंत बाजीराव उत्तरेत जावू शकले नाही. नाहीतर शिखांचे सहकार्य जरुर मिळवले असते. अहमदशहा अब्दाली आणि शिख यांच्यात कट्टर शत्रुत्व होते त्याचा फायदा मराठयांना मिळविणे आवश्यक होते.

### १०.४.२ मराठयांना उत्तरेस आपल्या सहकाऱ्यांचे सहकार्य मिळविता आले नाही :-

मराठयांनी जाटांचे सहकार्य मिळविणे आवश्यक होते. भाऊसाहेबांनी जाटांचे प्रारंभी सहकार्य मिळविले. ही गोष्ट खरी परंतु सहकार्य टिकून राहिले नाही. कारण भाऊसाहेबांचा स्वभाव आड आला. तसेच मराठयांनी पानिपतपुर्वी जाटोंकडून जबरदस्तीने खंडणी वसुल केली

होती. त्यामुळे मराठयांबद्दल त्यांना आदर राहीला नाही. त्यामुळे जाटांचे सहकार्य मराठयांना मिळू शकले नाही. कारण पानिपतपूर्वी शिंदयांनी आणि होळकरांनी निरनिराळया रजपूत राज्यात पैशाकरिता जी जुलूम जबरदस्ती केली आणि निरनिराळया राज्यात जो अंतर्गत हस्तक्षेप केला त्यामुळे रजपूत शासक आणि प्रजा दुखावल्या गेल्या व मराठयांना पानिपतच्या वेळी रजपुतांचे सहकार्य मिळाले नाही. रोहिलाच्या बाबतीत भाऊसाहेब कूटनीतीस कमी पडले. सुजा उद्दोलाला मराठयांनी वारंवार मदत केली होती. तो मराठयांना सामील होणार होता. परंतु प्रत्यक्ष भाऊसाहेबांनी त्याची भेट घेतली नाही. परंतु याबाबतीत अब्दाली सावध होता. त्याने नजीब खानामार्फत सुजा उददौलाशी संपर्क साधुन त्याला आपल्या बाजुने केले.

### १०.४.३ मराठे लष्करी सिद्धतेत व शिस्तीत कमी पडले :

मराठयांचा जो दारुण पराभव झाला त्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी परंपरागत युध्द पध्दतीचा त्याग केला व समोरासमोराची लढाई करणे पसंत केले. तुलनेत पाहता अब्दालीच्या सैन्यात कडक शिस्त होती. तशी शिस्त मराठा सैन्यात नव्हती. मराठयांच्या हालचाली उद्दिष्टये साधणाऱ्या नव्हत्या. याउलट अब्दालीच्या हालचाली पूर्व नियोजित होत्या. अब्दालीजवळ शस्त्रास्त सुध्दा अदयावत होती आणि उत्तम दर्जाची होती. मराठयांची शस्त्रास्त्रे त्यामानाने जूनी व ऐन लढाईत बरीशची निकामी झालेली आढळून आली. मराठयांची खरी शर्त घोडदळावर होती. तोफखान्याचा त्यांना तितकासा अनुभव नव्हता. मराठयांच्या छावणीत धान्याचा अभाव होता. त्यामुळे शेकडो घोडी मृत झाली. ऐन युध्दाच्या वेळी घोडयांची चणचण निर्माण झाली. वास्तविक मराठयांना खंदकाच्या लढाईचा अनुभव नव्हता. इब्राहिम खान गारदी याच्या तोफखान्यावर मराठयांची भिस्त होती. पानिपतात खंदक खणले गेले. त्यामुळे मराठयांच्या वेगावर मर्यादा आल्या. त्याचा फायदा अब्दालीने घेतला व मराठयांची रसद बंद पाडली व त्यातून मराठयांचा पराभव झाला.

### १०.४.४ भाऊसाहेबांची अकार्यक्षमता :-

भाऊसाहेबांची दिल्लीत येताना अनेक ठिकाणी सैनिक भर्ती केली होती. हे सर्व सैनिक निष्टा शुन्य व मराठयांबद्दल प्रेम नसणारे होते. त्यामुळे ऐन युध्दात गोंधळ निर्माण झाला असताना ते पळुन गेले. सेनापती म्हणुन भाऊ कमीच पडला प्रत्यक्ष युध्दाच्या वेळी अहमदशहा अब्दाली सर्व सैन्याच्या मागे उंबवटयावर होता व सैन्याची प्रत्येक हालचाल न्याहाळीत होता. जिथे मदतीची गरज होती. तिथे तो धावुन जात होता. याउलट भाऊसाहेब मात्र सैन्याच्या आघाडीवर होता. आपल्या मागे सैन्याचे कायम हात आहे हे त्याला कळणे कठीण झाले होते. याशिवाय अब्दालीने स्वतःजवळचे राखीव व नविन सैन्याजवळ ठेवले होते. परंतु अशी काळजी भाऊसाहेबांनी घेतलेली दिसुन आली नाही.

भाऊसाहेबांनी लढाईपुर्वी देखील अनेक चुका केल्या होत्या. कुंजपुऱ्यात जाताना भाऊने सर्व बायका-मुलांना भरतपुरला ठेवणे आवश्यक होते. ऑक्टोबरमध्ये दोन्ही सैन्य समोरा समोर असताना भाऊने विनाकारण अडीच महिने घालविले. तसेच रसद मिळविण्यासाठी दिल्ली व गंगेचा दुआब येथे मराठयांनी सतत संबंध ठेवणे आवश्यक होते. तसेच युध्दाच्या वेळी विश्वासरावाला गोळी लागुन तो ठार झाला. ही बातमी ऐकताच भाऊसाहेब देहभान विसरुन सुड घेण्यासाठी हत्तीवरुन घोडयावर आले व शत्रुपक्षात बेभानपणे घुसले अशारितीने भाऊसाहेब नेतृत्वाच्या बाबतीत अब्दालीपेक्षा कमी पडले.

### १०.४.५ युध्दाच्या वेळी बाजारभुंगे व बायका मुलांची आवश्यकता नव्हती :-

पानिपतच्या वेळी मराठयांकडे १ लाख कोटीचा जमाव होता. परंतुत्यात प्रत्यक्ष असणारे सैनिक ६०,००० च्या जवळपास होते व उरलेले मुलकी नागरिक, बाजारभुंगे, बायकामुले, सैन्याच्या इतर गरजा पुर्ण करणारे लोक होते. वास्तविक मराठे कधीच आपल्या मोहिमेत बायका, मुले व वृध्द माणसे नेत नसत. परंतु उत्तरेकडील मोहिम अनेक तीर्थक्षेत्र, पवित्र नदया यांचे दर्शन घेण्याच्या उद्दिष्टाने ते उत्तरेत आले असावे असा अंदाज आहे. मराठे हे धार्मिक असल्यामुळे वाटेत येणाऱ्या तीर्थक्षेत्रावर त्यांचा बराच वेळ, विधी करण्यात जात असे. त्यामुळे जलदगतीने हालचाली होत नव्हत्या तसेच ऐन युध्दाच्या वेळी या युध्द माणसांची व बायकामुलांच्या रक्षणावर बरेच मराठा सैनिक गुंतलेले दिसून आले. यामुळे प्रत्यक्ष युध्दात सैन्याची चणचण भासू लागली.

### १०.४.६ मराठयांमध्ये एकसुत्रता नव्हती -

मराठा सदरांमध्ये एकवाक्यता नव्हती. उत्तर हिंदुस्थानात जे मराठा सरदार पाठविण्यात आले त्याला उत्तरेकडील मराठा सरदार पाण्यात पहात होते. दत्ताजी गायकवाड, जानकोजी शिंदे, मल्हारराव होळकर यांच्यातील स्पर्धा व वैरभाव सर्वांनाच माहिती होता. ऐनवेळी माधवराव होळकर या मराठा सरदारांनी पानिपतमध्ये मराठयांचा दारुण पराभव केला.

## १०.५ पानिपतच्या तिसऱ्या युध्दाचे परिणाम

### १०.५.१ लष्करी शोकांतिका -

पानिपतमधील पराभव हा मराठयांकरीता एक फार मोठी लष्करी शोकांतिका ठरली. मराठयांच्या १ लाख सैनिकांपैकी बहुतांशी मराठी सैनिक ठार मारले गेले. तर काही कायमचे अपंग बनले. लष्करी दृष्टीने या पराभवामुळे मराठयांच्या आत्मविश्वासाला जबरदस्त धक्का बसला.

### १०.५.२ मराठी सत्ता खिळखिळी बनली -

या पराभवामुळे मराठयांच्या सत्तेला जबरदस्त हादरा बसला. मराठयांचे उत्तर हिंदुस्थानातील राजकीय जीवन संपुष्टात आले. त्यांना दक्षिणेत माघार घ्यावी लागली. अशा रितीने मराठयांचे हिंदुस्थानात हिंदु साम्राज्य स्थापन करायचे जे स्वप्न होते ते भंग पावले. मराठे अजिंक्य होणार नाही ही गोष्ट दिसुन आली. ''मराठे म्हणजे यश'' इ.स.१७२१ पर्यंत असे समीकरण प्रस्थापित झाले. त्यांच्या तलवारीचा धाक सर्वत्र प्रस्थापित झाला होता. उत्तर हिंदूस्थानातील मोगल शासक सुध्दा त्यांच्याकडे मदतीच्या अपेक्षेने पाहत होते. परंतु १७६१ च्या पानिपतच्या पराभवामुळे ही परिस्थिती बदलली.

### १०.५.३ शीख सत्तेच्या उदयाला मदत झाली -

१७६१ पूर्वी अहमदशहा अब्दाली, मराठे आणि शिख यांची प्रबळ सत्ता निर्माण झाली होती. पानिपतच्या युध्दात मराठयांचा पराभव झाला. अब्दाली देखील अफगाणिस्तानाला परत निघुन गेला त्यामुळे पंजाबातून शिखांची सत्ता सहज प्रस्थापित होऊ शकली.

### १०.५.४ मोगलांचा अस्त -

पानिपतच्या तिसऱ्या युध्दामुळे मोगल सत्तेला जबरदस्त धक्का बसून त्यांचे साम्राज्य केवळ नाममात्र उरले. मोगल बादशहा दिल्लीत पळून गेला. अशारितीने १७६१ च्या पानिपत पराभवानंतर मोगलांचा खऱ्या अर्थाने अस्त झाला.

### १०.५.५ रघुनाथरावांच्या उदयास मदत -

तिसऱ्या पानिपतच्या युध्दात मराठयांचे कर्तबगार सरदार मृत्यु पावले (भाऊसाहेब, विश्वासराव, व्यंकोजी इ.) कालांतराने बाळाजी बाजीराव (नानासाहेब पेशवे) याचा मृत्यु झाला. त्या वेळेस मराठयांमध्ये कर्तबगार मंडळी उरली नव्हती. अशा परिस्थितीत रघुनाथरावांचा मराठयांच्या राजकारणात प्रवेश झाला व त्यांना महत्त्व प्राप्त झाले.

### १०.५.६ इंग्रजी सत्तेचा मार्ग मोकळा झाला -

सर्वात महत्वाचा परिणाम म्हणजे या पराभवामुळे इंग्रजांना बंगालमध्ये आपल्या सत्तेचा पाया घालण्यास वाव मिळाला. इ.स.१७५६ च्या सुमारास बंगालमध्ये ज्या घडामोडी झाल्या, तिकडे मराठयांना लक्ष देता आले नाही. त्यातच निजाम व मराठयांच्या संघर्षात इंग्रजांनी फायदा घेतला व लॉर्ड क्लाईव्ह यांच्या नेतृत्वाने बंगालमध्ये इंग्रजी सत्तेचा पाया रोवला गेला.

## १०.६ संदर्भ ग्रंथ -

१) मराठयांचा उदय व अस्त : जयसिंगराव पवार.
२) मराठयांचा इतिहास - डॉ. श. गो. कोलारकर.

❖❖❖❖

# ११

# पेशवा माधवराव व मराठा सत्तेचे पुनरूज्जीवन

**अनुक्रमणिका :**


११.० उद्दिष्ट्ये
११.१ प्रास्ताविक
११.२ निजामअलीची पुण्यावरील स्वारी
११.३ माधवराव - रघुनाथराव संघर्ष
११.४ राक्षसभुवनची लढाई
११.५ माधवरावाच्या कर्नाटकावरील स्वाऱ्या
११.६ रघुनाथरावांचा बंदोबस्त
११.७ जानोजीचा बंदोबस्त
११.८ उत्तरेकडील राजकारण
११.९ योग्यता
११.१० सारांश
११.११ प्रश्न
११.१२ संदर्भ


## ११.० उद्दिष्ट्ये

१. पानिपतच्या लढाईनंतर झालेल्या मराठा सत्तेच्या पुरूज्जीवनाचा आढावा घेणे.
२. माधवराव पेशव्यांच्या असामान्य कतृत्वाचा अभ्यास करणे.

## ११.१ प्रास्ताविक

१४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतच्या लढाईत मराठ्यांचा प्रचंड पराभव झाला. मराठ्यांची एक संपूर्ण पिढीच्या पिढी गारद झाली. पानिपतचा जबरदस्त धक्का नानासाहेब पेशव्यांना सहन झाला नाही. त्यातच २३ जून, १६६१ रोजी त्यांचा दु:खद शेवट झाला. त्यांच्या मृत्युने एका विशेष उल्लेखनीय कारकीर्दीची अखेर झाली. नानासाहेबांच्या मृत्युमुळे मराठ्यांच्या

राज्यावरील संकट अधिकच गंभीर झाले. या सर्वस्वी निराशजनक परिस्थितीत नानासाहेबांचा सतरा वर्षाचा द्वितीय पुत्र माधवराव याला पेशवेपदाची वस्त्रे बहाल करण्यात आली. रघुनाथरावच्या पालकत्वाखाली माधवरावाने राज्यकारभार पहावा असे ठरले. याशिवाय माधवरावाची आई गोपिकाबाई हिचेही मार्गदर्शन माधवरावाला मिळणार होतेच.

माधवरावांनी पेशवेपदाची सुत्रे ग्रहण केली. तो काळ राजकीयदृष्ट्या अनंत अराजकतेचा होता. मराठ्यांच्या उत्तर भारतातील वर्चस्वाला पानिपतच्या पराभवामुळे जबरदस्त तडा गेला होता. अब्दाली अफगाणिस्तानात परतला होता. मराठे दक्षिण हिंदुस्थानात परत गेले आणि परिणामी सत्तेची पोकळी उत्तर हिंदुस्थानात निर्माण झाली. याचा फायदा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने कालांतराने घेतला. अशा परिस्थितीत रघुनाथरावाने माधवरावाशी प्रामाणिकपणे सहकार्य केले असते तर परिस्थिती अगदी वेगळी बनली असती. परंतु स्वतः पेशवा बनण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे रघुनाथराव अंध बनलेला होता. अल्पवयीन माधवरावाने पेशवा बनावे, हे त्याला अजिबात पसंत नव्हते. परंतु एकाही मराठा सरदाराने पाठिंबा न दिल्याने नाइलाजाने माधवरावाला पेशवा म्हणून मान्यता द्यावी लागली होती. सुरूवातीला राघोबाने माधवरावाला बाजूला करून मराठ्यांच्या राज्याची सूत्रे आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु माधवरावची आई गोपिकाबाईंनी यास विरोध केल्याने पेशव्याच्या दरबारात माधवराव व राघोबा यांचे परस्पर विरोधी गट तयार झाले. याचा फायदा निजामाने घेतला.

## ११.२ निजामअलीची पुण्यावरील स्वारी :

उद्‌गीरच्या लढाईत मराठ्यांनी आपला घोर पराभव केला, हे दुःख निजामअली अजूनपर्यंत विसरलेला नव्हता. उदगीरच्या पराभवाचा निजामाला सुड उगवायचा होता. निजामाने मुरारराव घोरपडे, हणमंतराव निंबाळकर, रामचंद्रराव जाधव यांसारख्या सरदारांना आपल्या बाजूला वळवले. कर्नूल, कडप्पा आणि सावनूर येथील नवाबांना आपल्या गटात खेचले. पावसाळा संपताच ६० हजाराचे सैन्य घेऊन निजामअलीने पुण्याकडे मार्गक्रमण केले. वाटेत निजामाने प्रवरा संगम येथे असलेली अनेक मंदिरे पाडून टाकली. श्रीगोंदे येथील शिद्यांचा वाडा जमीनदोस्त केला. डिसेंबर १७६१ मध्ये निजाम पुण्याजवळ असलेल्या उरळीकांचन या गावाजवळ आला. पुण्यातील पेशवा, कुटुंबियांनी सुद्धा आक्रमणाच्या भयामुळे लोहगड, पुरंदर आणि सिंहगड येथे आश्रय घेतला.

अशा कठीण परिस्थितीत रघुनाथराव आणि माधवराव ह्यांनी इतर सर्व मराठा सरदारांनी आपल्या मदतीला यावे, असे आवाहन केला. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला आणि विशेष करून जानोजी भोसले हा पेशव्यांच्या मदतीला आला. प्रत्यक्ष युद्ध न करता गनिमीकाव्याने निजामबरोबर लढायचे असे मराठ्यांनी ठरविले व निजामाच्या प्रदेशावर प्रतिहल्ले चढविले.

निजामाच्या सैन्यात अनेक मराठा सरदार होते. त्यांना निजामाने मराठ्यांच्या धार्मिक क्षेत्राची चालविलेली मोडतोड आवडली नाही. निजामाचे सरदार रामचंद्र जाधव व त्याचा भाऊ मीर मोगल मराठ्यांना येऊन मिळाले. निजामाचा तळ पुण्याच्या जवळ उरळीकांचन येथे असताना निजामाला पूर्णपणे नेस्तनाबूत करण्याची संधी मराठ्यांना सापडली. परंतु दुर्दैवाने रघुनाथरावाचे राजकारण मराठ्यांच्या आड आले. निजामाचे राज्य नष्ट केल्यास माधवराव आपल्याला काहीच किंमत देणार नाही आणि मराठा राजकारणातून आपला अस्त होईल अशी भिती रघुनाथरावाला वाटत होती आणि म्हणून त्याने केवळ ४० लाखाचा प्रदेश घेऊन निजामास जीवदान दिले आणि युद्ध थांबविले. रघुनाथरावाची ही कारवाई एकतर्फी व मराठ्यांच्या हिताच्या विरोधी असल्याने खुद माधवराव, जानोजी भोसले, गोपाळराव पटवर्धन यांना आवडले नाही यातूनच माधवराव व रघुनाथाराव यांच्यातील मतभेद वाढले.

## ११.३ माधवराव - राघोबा संघर्ष :

निजामला नष्ट करण्याची सुवर्णसंधी रघुनाथरावाने आपल्या स्वार्थाकरीता वाया घालवली. मराठा प्रमुख सरदारांना सुद्धा रघुनाथरावांचे हे वर्तन पसंत पडले नाही. या कारणावरून रघुनाथराव आणि माधवराव यांच्यात वैमनस्य निर्माण झाले. निजामाचा बंदोबस्त केल्यानंतर रघुनाथराव आणि माधवराव ह्यांनी हैदरअलीचा बंदोबस्त करण्याकरिता कर्नाटकाकडे कूच केले, कारण निजामा प्रमाणेच हैदरअलीही पानिपताच्या पराभवाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करत होता. या स्वारीवर जाताना दोघांमध्ये मतभेद झाले व रघुनाथराव कर्नाटक मोहीम अर्धवट सोडून चिकोडीहून पुण्याला परत आला. पेशवे माधवराव तुंगभद्रेच्या प्रदेशावर आपला अंमल बसवून जून १७६२ मध्ये पुण्यास परत आले.

इकडे पुण्याला परत आल्यावर रघुनाथरावाने आपल्या समर्थकांशी संधान बांधण्यास सुरूवात केली. मल्हारराव होळकर यांनी त्याला उघडपणे साथ दिली. या विरूद्ध प्रतिक्रीया म्हणून माधवरावाने मिरजेचे पटवर्धन व अन्य सरदारांना आपल्या बाजूला वळवून घेतले होते. पेशवे कुटुंबातील या कलहाचा मराठ्यांच्या राज्यावर विपरीत परिणाम होणे अटळ होते. असे परिणाम टाळण्याच्या दृष्टिने माधवरावाने आपल्या परीने रघुनाथरावांशी तडजोड करण्याचे प्रयत्न केले. परंतु राघोबाने मुळीच दाद दिली नाही. त्याने माधवरावाकडे पाच महत्त्वाचे किल्ले व दहा लाख रूपये महसूली उत्पन्नाच्या जहागिरीची मागणी केली परंतु माधवरावाने ही मागणी मान्य केली नाही. कारण राज्याची वाटणी झाल्यास राज्य दुर्बल बनेल अशी भिती माधवरावास वाटत होती. मागणीला नकार मिळताच आपल्या जीवाला धोका आहे असा मोठा कांगावा करून रघुनाथरावाने पुण्याहून नाशिकजवळ विंचूर येथे पळ काढला. तेथे ठरलेल्या योजनेप्रमाणे विठ्ठल शिवदेव, आबा पुरंदरे, नारोशंकर इ. सरदार त्यास मिळाले. जानोजी भोसले व निजाम यांनी देखील रघुनाथरावास पाठिंबा दिला. रघुनाथरावाला सर्वांचे मिळून पन्नास हजारांचे

सैन्य घेऊन पुण्याच्या रोखाने कूच केले. घोड नदीच्या काठावर दोन्ही सैन्यांची लढाई ७ नोव्हेंबर १७६२ रोजी झाली. पण ही लढाई निकाली नव्हती. आळेगाव येथे माधवरावाची फौज बेसावध असताना राघोबा व निजाम यांनी छापा घातला. माधवरावाने शरणागती स्वीकारली. निजामाने रघुनाथरावाला मदत केल्याबद्दल लाखो रूपयांचा मुलूख व दौलताबाद किल्ला त्यास देण्यात आला. म्हणजे उदगीरच्या लढाईत भाऊसाहेबांनी जे मिळवले ते रघुनाथरावाने घालविले.

रघुनाथरावाने स्वत:चे स्थान बळकट करण्याचा प्रयत्न सुरू केला. चिंतो विठ्ठल रायरीकर याची फडणीसपदी नेमणूक केली. सखारामबापूला कारभारी बनविले. त्यांच्या वास्तव्यासाठी सिंहगड किल्ला दिला. पुरंदर कायमचा आबा पुरंदरे याजकडे देऊन त्याला आपला साहाय्यक बनविले. या नंतर सातार्‍याला जाऊन छत्रपती राजारामाचा पाठिंबा मिळवला व मिरजेच्या पटवर्धनांवर स्वारी करून त्यांना शरणागती पत्करण्यास भाग पाडले. हैदरअलीचा समाचार घेण्यासाठी राघोबा कर्नाटक प्रांताकडे रवाना झाला. परंतु हैदरअली विरूद्धची मोहीम पूर्ण होण्यापूर्वीच निजाम व नागपूरच्या रघुजी भोसले यांची युती झाल्याचे वृत्त त्याच्या कानी आल्याने तो परत फिरला. दरम्यान निजामाने भीमा नदीच्या पूर्वेचा मराठ्यांचा राज्याचा सर्व प्रदेश आपल्याला परत करण्यात यावा. या प्रदेशातील जहागिरदारांच्या हिरावून घेतलेल्या जहागिर्‍या त्यांना परत करण्यात याव्यात आणि आपण सांगू त्या व्यक्तीची दिवाणपदी नेमणूक करण्यात यावी अशा मागण्या राघोबाकडे केल्या. मराठ्यांच्या राज्यासमोर निजामाच्या मागण्यामुळे परत एकदा गंभीर पेचप्रसंग निर्माण झाला. गमाजी यमाजी, गोपाळराव पटवर्धन निजामाला मिळाले होते. राज्याचा खजिना रिकामा झाला होता. सैनिकांच्या वेतनाची थकबाकी मोठी झाली होती तसेच सैनिकांना शस्त्रास्त्रे दारूगोळा व अन्य साधनसामुग्री यांची टंचाई जाणवू लागली होती. त्यामुळे मराठ्यांच्या राज्यात आणिबाणीची परिस्थिती उद्‌भवली. तथापि सुदैवाने या आणीबाणीच्या प्रसंगी मराठा सरदारानी आपसातील हेवेदावे व मतभेद विसरून राज्यातील संकटाचे निवारण करण्यासाठी एकजुटीने आवश्यक ती कारवाई करण्याचा निर्णय घेतला. माधवराव, रघुनाथराव, सखारामबापू एकमेकांतील मतभेद विसरून एक झाले. मराठ्यांनी गनिमी काव्याचा अवलंब केला. रघुनाथराव मिरजेहून परस्पर औरंगाबादकडे वळला. औरंगाबाद येथे मल्हारराव होळकर मराठ्यांच्या फौजेत सामील झाला. निजामच्या फौजा भीमा नदीच्या काठाने पेशव्याचा प्रदेश उद्ध्वस्त करत पुण्याकडे सरकू लागल्या. पेशव्याने औरंगाबादचा परिसर लुटून साफ केला. मार्च ते ऑगस्ट १७६२ या सुमारे पाच महिन्यांच्या काळात दोन्ही पक्ष परस्परावर हल्ले करीत होते. नाशिक ते सातारा हा मराठी प्रदेश शत्रुने उध्वस्त केला तर औरंगाबाद पासुन हैद्राबाद पर्यंत प्रदेश मराठ्यांनी साफ केला. निजामाने या काळात मराठ्यांना गाठण्याचा प्रयत्न केला. परंतु मराठ्यांनी त्याला दाद दिली नाही. अवजड तोफखान्यासह मराठ्यांचा पाठलाग करणे अशक्य आहे, हे पाहून निजामाने पुण्यावर हल्ला केला. त्याने शहरात जाळपोळ केली. पेशवे कुटुंबियांनी सिंहगडावर आश्रय

घेतला. पुणे लुटल्याची बातमी समजताच रघुनाथराव अतिशय संतप्त झाला. त्याने निजामशी सरळ युद्ध करण्याचा आपला निश्चय केला. परंतु इतर ज्येष्ठ सरदारांनी त्याला आवर घातला. निजाम-मराठा संघर्षामध्ये निजामाला जे यश मिळत होते त्याचे कारण म्हणजे गोपाळराव पटवर्धन आणि जानोजी भोसले या सारखे मराठे सरदार निजामाचे समर्थक होते हे सगळ्यांना समजून चुकले होते. माधवरावाने या दोघांना निजामापासून वेगळे करण्याचे प्रयत्न चालविले. येथून रघुनाथरावाचे नेतृत्व निष्प्रभ होत गेले आणि माधवरावाच्या हाती राजकारणाची सुत्रे आपोआपच आली. माधवरावाने मराठा सरदारांना निजामाचा पक्ष सोडून परत येण्याचे आवाहन केले. तसे झाल्यास त्यांना क्षमा करण्यात येईल. त्यांच्या जहागिरी त्यांना परत करण्यात येईल असे आश्वासन दिले. एकंदरीत झालेल्या युद्धात मराठा सरदारांचा काहीच फायदा झाला नव्हता. याउलट मानहानी झाली होती. जानोजी भोसल्याच्या दृष्टीने तर सातारची गादी मिळणे अशक्य झाले होते. माधवरावाने त्याला पदच्युत करून नागपूरची गादी त्याचा धाकटा भाऊ मधोजी याला देण्याची घोषणा केली. उत्तरेत महादजी शिद्यांना भोसल्याच्या प्रदेशाची लुटालुट करण्यास सांगितले. पेशव्यांनी स्वतःही भोसल्यांचा प्रदेश लुटला. एकंदरीत त्यची परिस्थिती निराशाजनक झाली. जानोजीने माधवरावाला मदत करण्याचे वचन दिले. गोपाळरावालाही निजामाचे खरे स्वरूप कळून चुकले होते. अशारितीने माधवरावाच्या कुटनितीमुळे निजाम राजकारणात एकटा पडला. माधवराव सतत निजामाच्या पाठलागावर होते. निजामाचा भाऊ बसालत जंग यालाही माधवरावाने आपल्या बाजूला वळवून घेतले होते. दिवसेंदिवस निजामाचे सामर्थ्य कमी होऊ लागले. निजामाने औरंगाबादचा आश्रय घेण्याचे ठरविले. १० ऑगस्ट, १७६३ रोजी निजामाने राक्षसभूवन येथे गोदावरी नदी पार केली. नदीला महापूर असल्याने अवजड तोफखाना व सर्व सैन्य नदीपार नेणे कठीण होते. एवढ्यात अचानक मराठे राक्षसभुवनवर येऊन धडकले.मराठे गोदावरी नदी ओलांडून आपल्यावर हल्ला चढवतील अशी भीती वाटून निजाम औरंगाबादकडे गेला, त्यावेळी मराठ्यांनी त्याचा सतत पाठलाग केला. शेवटी निजामाने शरणागती पत्करली. उदगीरच्या तहातील ६० लक्ष व नवीन २२ लक्ष उत्पादनाचा प्रदेश निजामने मराठ्यांना दिला.

## ११.४ राक्षस भुवनची लढाई

राक्षस भुवनची लढाई ही मराठा इतिहासात महत्त्वाची समजली जाते. कारण पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचा जो दारूण पराभव झालेला होता. त्यामुळे मराठे कधीच आपले डोके वर काढू शकणार नाहीत, अशी सर्वांची कल्पना झाली होती. या कल्पनेला राक्षस भुवनच्या विजयामुळे फार मोठा धक्का बसला. या विजयामुळे मराठ्यांना आत्मविश्वास प्राप्त झाला. पानिपतपूर्वी आपल्याला जे प्रतिष्ठेचे स्थान होते, ते आपण पुन्हा परत मिळवू अशी आशा मराठ्यांना वाटू लागली आणि हा सगळा चमत्कार पेशवे माधवरावाने घडविला. आतापर्यंत माधवरावा रघुनाथरावाच्या पालकत्वा खाली होता. ते पालकत्वही या विजयामुळे आपोआपच संपुष्टात आले.

राक्षसभुवनच्या विजयामुळे माधवरावाच्या स्वातंत्र कर्तबगारीस सुरूवात झाली. या मोहिमेत त्याने स्वतंत्रपणे युद्धव्यूह रचले. बहादुरी गाजवली. निजामाला मिळालेल्या मराठा सरदारांना माधवरावाचा वचक बसला. पानिपतच्या युद्धात मराठी सत्तेचा शेवट झाला नसून तरुण, तडफदार पेशव्याच्या नेतृत्वाखाली मराठा सत्ता नव्या जोमाने उत्कर्षाकडे धाव घेत आहे, हे सर्व हिंदुस्तानला दिसून आले.

**आपली प्रगती तपासा**

१. माधवराव-रघुनाथराव संघर्षाचा आढावा घ्या.

२. राक्षसभुवनाच्या विजयाचे महत्त्व स्पष्ट करा.

## ११.५ माधवरावाच्या कर्नाटकावरील स्वाऱ्या

पानिपताच्या पराभवाचा फायदा घेऊन हैदरअली मराठ्यांची दक्षिण हिंदुस्तनातील सत्ता नष्ट करू पाहात होता. १७६३ मध्ये ज्यावेळी पेशवा निजामाशी लढा देत होता, त्यावेळी या परिस्थितीचा फायदा घेऊन हैदरअलीने बेदनूर जिंकून घेतले. त्याचप्रमाणे सावनूर, आणि कडाप्पा ही राज्ये आपल्या स्वामित्वाखाली आणली. हैदरअलीने याचबरोबर मुराररराव घोरपडे यांचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. ही सर्व राज्ये मराठा छत्राखालील राज्ये होती. इ.स.१७६४ मध्ये निजामाविरूद्धची मोहीम संपल्यानंतर माधवरावाने हैदरअलीचा समाचार घेण्यासाठी कर्नाटकावर स्वारी करण्याचे ठरवले. फेब्रुवारी १७६४ मध्ये मराठ्यांचे सैन्य कृष्णा नदीच्या दक्षिणेला असलेल्या सावनूरपर्यंत गेले. मराठ्यांच्या व हैदरअलीच्या सैन्यात काही किरकोळ चकमकी उडाल्या. ६ नोव्हेंबर १७६४ रोजी मराठ्यांनी धारवाडचा किल्ला ताब्यात घेतला. सावनूरजवळच्या अनवटीच्या लढाईत मराठ्यांनी हैदरअलीचा पराभव केला. या पराभवानंतर स्वतः हैदरअलीला आपला जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलात आश्रय घ्यावा लागला होता. यानंतर हैदरअलीने मराठ्यांशी कधीही समोरासमोरची लढाई केली नाही, त्याने गनिमी काव्याचा अवलंब केला. अनवटीच्या लढाईत मुराररराव घोरपड्याने विजयी कामगिरी केली. मराठ्यांच्या दृष्टीने जरी अनवटीची विजय महत्त्वाचा असला तरी नेमक्या याच वेळेस माधवराव व राघोबा यांच्यातील मतभेद अतिशय तीव्र झाले. पुण्यात राघोबाची गुप्त कारस्थाने चालूच होती. या काळातच पुरंदरच्या कोळयांनी किल्लेदार पुरंदरे यांच्या विरूद्ध बंड पुकारले. माधवराव पेशवे यांनीच असे बंड करण्यासाठी या कोळी सैनिकांना गुप्त चिथावणी दिली, असा आरोप रघुनाथरावाने केला. आपल्या

गैरहजेरीत रघुनाथराव आपल्या विरूद्ध नानाप्रकारची कारस्थाने करील अशी भिती माधवरावांस सतत वाटू लागली. यावर उपाय म्हणून मधावरावाने रघुनाथरावास ताबडतोब कर्नाटकात बोलावून घेतले. हैदरअलीविरूद्ध चाललेल्या युद्धात रघुनाथरावाने आपल्याशी सल्ला मसलत करावी असे कारण दाखवून माधवरावाने रघुनाथरावास कर्नाटकात बोलावले. रघुनाथराव कर्नाटकात आले तेव्हा हैदरअलीने माधवरावाशी वाटाघाटी चालविलेल्या होत्या. रघुनाथराव, ज्येष्ठ असल्याने साहजिकच वाटाघाटीची सर्व सूत्रे रघुनाथरावाकडे आली आणि त्याचा फायदा घेऊन रघुनाथरावाने पुन्हा राजकारण करण्याचा प्रारंभ केला. माधवरावाने राघोबाच्या सल्लाने ३० मार्च १७६५ रोजी हैदरअलीशी अनंतपूरचा तह केला. या तहातील महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.

१) हैदरअलीने मोहिमेच्या खर्चापोटी मराठ्यांना तीस लाख रूपये व तुंगभद्रा नदीच्या उत्तरेचा प्रदेश देण्याचे मान्य केले.
२) मराठ्यांच्या राज्याचे मांडलिकत्व पत्करलेल्या सावनूरचा नवाब, मुरारराव घोरपडे व अन्य मराठा सरदारांना कसलाही उपद्रव न देण्याचे हैदरअलीने मान्य केले.

अशाप्रकारे हैदरअलीचा पूर्णपणे नाश करण्याची पेशव्यांना मिळालेली संधी रघुनाथरावाने घालवली जास्तीत जास्त सौम्य अटींवर त्याने हैदरअलीशी तह करण्याचे ठरविले. निजामाला जसे त्याने जीवदान दिले तसेच जीवदान यावेळी हैदरअलीलाही मिळाले. १७६५ मधील पावसाळ्यामध्ये हैदरअली विरूद्धच्या यशस्वी मोहिमेनंतर माधवराव पेशवे पुण्याला परत आले. पुढील दोन वर्षेपर्यंत दक्षिणेच्या प्रदेशावर वर्चस्व स्थापन करण्यासाठी मराठे, हैदरअली, निजाम व इंग्रज यांच्यात तीव्र स्पर्धा सुरू झाली. इ.स. १७६६ मध्ये माधवरावाने निजामाशी परस्पर मैत्रीचा हा सहकार्याचा करार करून हैदरअली बरोबरच आपल्या संघर्षात तो तटस्थ राहील, अशी व्यवस्था केली होती. इ.स. १७६५च्या अखेरीस गोपाळराव पटवर्धन व अन्य सरदार आणि मराठ्यांचे सैन्य यांच्यासह माधवरावाने कर्नाटक प्रांतावर स्वारी केली. तेथील सुरापूर, रायपूर व मूदगळ हा प्रदेश त्याने प्रथम काबीज केला. फेब्रुवारी १७६७ मध्ये मराठ्यांच्या सैन्याने शीरा व मडेगिरी असे दोन किल्ले जिंकून घेतले. या सैन्याने मडेगिरीच्या किल्ल्यात तुरूंगात असणाऱ्या बेदनूरच्या राणीची सुटका केली. आता फक्त श्रीरंगपट्टण आणि बेदनूर ही दोनच ठिकाणे जिंकावयाची राहिली होती. त्यामुळे हैदरअली इतका अस्वस्थ झाला की त्याने माधवरावाशी तहाची बोलणी सुरू केली. अशा परिस्थितीत रघुनाथरावाचे राजकारण पुन्हा आड आले. रघुनाथराव यावेळी नुकताच उत्तेरेच्या स्वारीत अपयशी होऊन परत आला होता आणि त्याने पुण्यात राहून माधवरावांविरूद्ध नानाप्रकारची कारस्थाने चालवली होती. त्याच्या कारस्थानांनी गंभीर स्वरूप धारण करण्यापूर्वी आपण पुण्याला पोचले पाहिजे अशी निकड माधवरावास वाटू लागली आणि म्हणून त्याने हैदरअलीशी

घाईघाईने तह करणे पसंत केले. त्यामुळे परत एकदा हैदरअलीला विनाकारण जीवदान मिळाले होते.

यानंतर दोन वर्षे माधवराव पेशवे हैदरअलीच्या प्रश्नाकडे लक्ष पुरवू शकले नाही. या दोन वर्षात माधवरावाला रघुनाथरावाचा आणि जानोजी भोसल्याचा बंदोबस्त करावा लागला. हैदरअलीनेही या परिस्थितीचा फायदा घेऊन मुरारराव घोरपडे आणि सावनूरचा नवाबाचा पराभव केला. त्यामुळे १७७० मध्ये माधवरावाने कर्नाटकच्या मोहिमेची योजना आखली. सावनूरच्या रक्षणाकरता त्याने गोपळराव पटवर्धनाची नेमणुक करुन तो स्वतः इ.स. १७७० मध्ये कर्नाटकच्या मोहिमेवर निघाला. माधवरावाचे प्रचंड सैन्य पाहून हैदरअलीने बेदनूरच्या जंगलात आश्रय घेतला. पेशव्यांना निजाम व मुरारराव घोरपडे येऊन मिळाले. मराठ्यांनी हैदरचा एक कोटी उत्पन्नाचा मुलूख व बरेच प्रदेश जिंकले. परंतु दुर्दैवाने त्याचवेळी माधवराव गंभीर आजारी पडल्याने त्यांना पुण्यास परत निघून जावे लागले. मोहिमेची सर्व जबाबदारी त्रिंबकराव पेठे, गोपाळराव पटवर्धन, मुरारराव घोरपडे यांच्यावरच पडली. ५ मार्च, १७७१ रोजी मराठ्यांनी श्रीरंगपट्टणजवळ मोती तलावाच्या लढाईत हैदरअलीचा प्रचंड पराभव केला. हैदरअली जिवानिशी लढाईत निसटला व त्याने श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यात आश्रय घेतला. किल्ला मजबूत असल्याने एक वर्ष लढा देऊन सुद्धा मराठ्यांना तो जिंकता आला नाही. त्यातच माधवरावाच्या गंभीर आजारपणाच्या बातम्या कर्नाटकात येऊ लागल्या. हैदरही तहाची याचना करू लागला. शेवटी जून १७७२ मध्ये मराठे व हैदरअली यांच्यात एक तह झाला. त्यानुसार हैदलअलीने तुंगभद्रेच्या दक्षिणेतील बराचसा प्रदेश व एकतीस लाख रूपये मराठ्यांना देण्याचे मान्य केले. शर्थीचे प्रयत्न करूनही आपल्याला हैदरअलीचा पूर्ण बंदोबस्त करता आला नाही, हे शल्य मृत्युसमयी माधवरावाला नक्कीच बोचत असले पाहिजे.

**आपली प्रगती तपासा**

१. पेशवा माधवरावाच्या कर्नाटकातील स्वाऱ्यांचा आढावा घ्या.

---

---

---

---

---

## ११.६ रघुनाथरावांचा बंदोबस्त :

पेशवा माधवरावाच्या कारकिर्दीच्या अगदी सुरूवातीपासून रघुनाथरावाने कारभारात अडथळे निर्माण केले व राज्याची वाटणी करण्याचा आग्रह धरला. परंतु तशी वाटणी केल्यास मराठा राज्य दुर्बळ होईल, हे ओळखून माधवरावाने ती मागणी नाकारली. दैनंदिन कलह टाळण्यासाठी

माधवरावाने रघुनाथरावाला उत्तरेच्या मोहिमेवर पाठविले. परंतु उत्तरेकडील स्वारीत रघुनाथरावाला एकही विजय मिळवता आला नाही. उलट उत्तरेत आपला पराभव झाला, याला माधवरावच जबाबदार आहे, असे त्याने जाहीर केले, यामुळे माधवराव आणि रघुनाथराव यांचे संबंध बिघडले. रघुनाथराव नाशिकजवळ आनंदवल्ली याठिकाणी मुक्काम करून होता. माधवरावाकडे लढाईचा अवलंब केल्याशिवाय या प्रकरणाचा शेवट होणार नाही असे माधवरावास वाटू लागले. शेवटी नाईलाजाने माधवराव प्रचंड फौज घेऊन आनंदवल्लीस येऊन पोहोचले. माधवरावाने कडक भूमिका स्वीकारल्यामुळे रघुनाथराव घाबरला. शेवटी रघुनाथरावाने दहा लाखाची जहागिरी घ्यावी व पेशव्यांनी उत्तरेच्या स्वारीचे कर्ज रूपये २५ लाख फेडावे असे ठरले. यालाच आनंदवल्लीचा तह म्हटले जाते. (३ ऑक्टोबर, १७६७) पण या करारामुळे रघुनाथराव शांत बसणार नव्हता. त्याने अमृतराव हा मुलगा दत्तक घेतला व पेशव्याविरूद्ध निजाम, हैदर, जानोजी भोसले व इंग्रज यांच्याशी संधान बांधले, तेव्हा मात्र राघोबाला शेवटचा दणका दिला पाहिजे असे माधवरावाने ठरविले. माधवरावाने धोडप येथे रघुनाथरावाचा पूर्ण पराभव केला व पुण्यात आणून बंदीवासात टाकले.

## ११.७ जानोजीचा बंदोबस्त

भोसले व पेशवा यांचे संबंध कधीच सुधारू शकले नाहीत. मराठा संघातील एक सरदार या नात्याने पेशवा बोलावील त्यावेळे स्वारीत हजर न होणे, पेशव्याविरूद्ध कारस्थाने करीत राहणे, पेशव्यांच्या शत्रुशी हातमिळवणी करणे, या सारख्या तक्रारी भोसल्यांविरूद्ध होत्या. रघुनाथरावाचा घोडप येथे पराभव केल्यानंतर त्यांचा एक एक साथीदार म्हणून भोसल्याचाही बंदोबस्त करण्याचे पेशव्यांनी ठरविले. यासाठी माधवरावाने उत्तरेकडे जाणाऱ्या रामचंद्र गणेशांच्या फौजास व कर्नाटकाकडे जाणाऱ्या गोपाळराव पटवर्धनाच्या फौजास विदर्भाकडे वळविले. स्वतःही प्रचंड फौज घेऊन भोसल्याच्या प्रदेशावर चालून गेला. जानोजीने काही काळ गनिमाकाव्याने युद्ध चालविले. परंतु त्याला यश आले नाही. शेवटी तो पेशव्यांना शरण गेला. सर्वांनी एकीने राहाण्यात राष्ट्रहित आहे, असे आवाहन करून जानोजीला अभय दिले. दोघात परस्पर भेटी झाल्या व २४ एप्रिल, १७६९ रोजी दोघात वाटाघाटी होऊन कनकपूरचा तह झाला. या करारानुसार जानोजी भोसल्याने स्वतंत्र वागणार नाही, आपली फौज वाढविणार नाही व पेशव्याच्या दरबारात राज्याच्या सेवेसाठी हजर राहू, पेशव्यांशी एकनिष्ठ राहू इत्यादी अटीबरोबर पाच लक्ष देण्याचे मान्य केले.

## ११.८ उत्तरेकडील राजकारण :

पानिपतच्या अपयशानंतर उत्तरेत मराठा सत्तेचा प्रभाव फारसा उरला नव्हता. बूदेंलखंड, राजपूतांना, माळवा येथे मराठ्यांचा अंमल संपुष्टात येऊ

लागला. अनेक छोट्या मोठ्या राजपूत संस्थानिकांनी, जाट, बुंदेल्यांनी त्यांच्या विरूद्ध उठाव केला. गंगा-यमुनेचा दुआब सुजाउद्दौलाने घेतला. तर इटाव्यापासून हरीद्वारपर्यंतचा प्रदेश रोहिल्याने घेतला. उत्तरेतील मराठा सरदार आपआपल्या परीने मराठ्यांची सत्ता टिकविण्याचा प्रयत्न करीत होते.

पानिपतच्या पराभावानंतर मल्हारराव होळकर हाच मराठ्यांचा उत्तरेकडील मातब्बर सरदार होता. जयपूरचा माधोसिंग हा राजपुतांचा नेता होता आणि तो मराठ्यांचा कट्टर शत्रु होता. परंतु मल्हारराव होळकराने २९ नोव्हेंबर १७६१ रोजी कोटानजीक मंगरूळच्या लढाईत माधोसिंगाचा पराभव केला. याचवेळी मल्हाररावास दक्षिणेत बोलावल्या मुळे मराठे उत्तर हिंदुस्थानातील समस्यांकडे बरीच वर्षे लक्ष देऊ शकले नाहीत. याचाच फायदा इंग्रजांनी घेऊन बंगालमध्ये आपला प्रभाव वाढवला. अयोध्येचा सुजाउद्दौला व दिल्लीचा बादशहा शहाआलम यांचा बक्सारच्या लढाईमध्ये (ऑक्टोबर १७६४) इंग्रजांनी दणदणीत पराभव केला व उत्तर हिंदुस्थानवर आपला दरार उत्पन्न केला. बक्सारच्या पराभवानंतर मीर कासीमला सुजाउद्दौलाने आश्रय दिला होता. इंग्रजांनी चिडून सुजाविरूद्ध मोहिम हाती घेतली. शुजाने मल्हारराव होळकरांची मदत घेतली. पण इंग्रजांच्या प्रभावी तोफखान्यामुळे शूजा व मल्हारराव यांच्या संयुक्त सेनेचा निभाव लागला नाही व कोराच्या लढाईत इंग्रजी फौजा विजयी झाल्या. (३ मे १७६५).

शेवटी १७६५ च्या अखेरीस रघुनाथराव उत्तरेच्या मोहिमेवर निघाला. १७६६च्या एप्रिल महिन्यात शिंदे, होळकर रघुनाथरावास मिळाले. मराठ्यांच्या उत्तरेतील आगमनाला यावेळी गोहाडच्या जाटराजाने विरोध केला. जाटराजा जवाहिर सिंगचा या गोहाडच्या राजाला पाठिंबा होता. त्यामुळे रघुनाथरावाने प्रथम गोहाडचा पराभव करण्याचे ठरविले. मराठ्यांच्या दुर्दैवाने याचवेळी मल्हारराव होळकरांचा मृत्यु झाला. (२० मे, १७६६) आणि त्यामुळे मराठ्यांची परिस्थिती बिकट झाली. गोहाड जिंकण्यात यश मिळाले नाही व त्यामुळे रघुनाथरावाच्या प्रतिष्ठेला कमीपणा आला. अशा परिस्थितीत महादजी शिंदे याने या भांडणात समेट घडवून आणला आणि गोहाडच्या राजाने १५ लाख रूपये खंडणी दिल्यानंतर किल्ल्याचा वेढा उठवला. त्यानंतर गोहाडचा समर्थक जाटराजा जवाहिरसिंग याचा बंदोबस्त करण्याकरीता रघुनाथरावाने ढोलपूरकडे आपला मोर्चा वळविला. याचवेळी अहमदशहा अब्दाली पुन्हा पंजाबात आल्याच्या वार्ता आल्याने रघुनाथरावाला जुजबी तह करून ही मोहिम आटोपती घ्यावी लागली. अशारितीने उत्तरेत दिड वर्षे मुक्काम करून सुद्धा रघुनाथरावाला एकही भरीव विजय मिळविता आला नाही. उलट तो कर्जबाजारी बनला. रघुनाथराव दक्षिण माळव्यात १७६७ च्या मार्च महिन्यात येऊन पोहोचला. त्याने मल्हारराव होळकर याची विधवा सुन अहिल्याबाई होळकर यांच्या प्रदेशावर हल्ला करण्याचा विचार केला. अहिल्याबाईचा पूत्र मालेराव याचे थोड्या दिवसापूर्वी निधन झाले होते. अशा दु:खद प्रसंगात पैशासाठी रघुनाथरावाने हल्ला करण्याचे ठरविले. रघुनाथरावाच्या सैन्यातील अनेकांना हा विचार पटला नाही. अहिल्याबाईनेही युद्धाची तयारी केली. पण

पुढे रघुनाथरावालाच लाज वाटली व शेवटी मालेरावच्या निधनानिमित्त शोक व्यक्त करून रघुनाथराव पुण्याकडे निघून गेला.

रघुनाथरावाच्या अपयशी स्वारीचे परिणाम दूरगामी ठरले. रघुनाथरावाने माघार घेतलेली पाहून जवाहिरसिंगने १७६७ मध्ये बुंदेलखंडावर स्वारी केली आणि काल्पी पर्यंतचा सर्व प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन तिथल्या सर्व मराठा सरदारांना हाकलून लावले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी पेशवे माधवरावाने रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांना उत्तरेकडे पाठवले. १७६९मध्ये हे सैन्य उत्तरेत पोहचले व महादजी शिंदे, तुकोजी होळकर या सैन्यास मिळाले. मराठ्यांनी जाटांचा पराभव केला. मराठ्यांचे यश पाहून नजीबखान घाबरला व त्याने तुकोजी होळकरांकडे संधान बांधून मराठ्यांकडे तहाची याचना केली. महादजी शिंदे रोहिल्यांच्या दुष्ट कारवाया ओळखून असल्याने त्याने या वाटाघाटीस विरोध केला. परंतु तुकोजीने भर घातल्याने तूर्त नजीबखानाच्या मदतीने गंगा यमुना नदीच्या दूआबात आपला अमंल बसवावा असे रामचंद्रपंतांनी ठरविले. मात्र नजीबखानने आतून नबाब बंगश यांच्याशी संधान बांधले व मराठ्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. परंतु शुक्रतालच्या अनुभवावरून मराठे शहाणे झाले होते. त्यांनी नजीबखानचा डाव हाणून पाडला. मराठे ताबडतोब यमुना नदीच्या पलीकडे उतरले व नजीबखानचा मुलगा झबेताखान यास अटक केली. याचवेळी नजीबखान रोहिला मरण पावला. तुकोजी होळकरच्या मदतीने झबेताखान कैदेतून निसटला व अहमदखान बंगशाच्या आश्रयास गेला. मराठ्यांनी दोघांचाही पराभव करून गंगा यमुना नदीचा दुआब हस्तगत केला. अशा प्रकारे मराठ्यांनी जाटांचा व रोहिल्यांचा पराभव केला. १० फेब्रुवारी १७७१ मध्ये महादजी शिंदेच्या नेतृत्वाखाली मराठी फौजा दिल्लीवर चालून गेल्या व त्यांनी अलाहाबाद येथे इंग्रजांच्या आश्रयास असलेल्या शहाआलम यास दिल्लीचे सिंहासन मिळवून दिले. महादजी शिंदे यांनी झाबेताच्या छावणीवर हल्ला करून रोहिल्यांचा मूलूख लूटला. या संग्रामात महादजी शिंदेने विजेसारखे चमकून उठले. मराठ्यांची प्रतिष्ठा वाढली. पानिपताचे शल्य धुऊन निघाले.

**आपली प्रगती तपासा**

१) माधवरावच्या उत्तरेकडील कामगिरीवर प्रकाश टाका.

_______________

_______________

_______________

_______________

_______________

## ११.९ पेशवे माधवरावाचा मृत्यु व योग्यता

बारा वर्षांच्या अविश्रांत धडपडीचा माधवरावाच्या प्रकृतावर विपरीत परिणाम होऊन त्याला क्षयरोग झाला आणि त्यातच १८ नोव्हेंबर १७७२ रोजी पुण्याजवळच्या थेऊर येथे त्याचा मृत्यु झाला.

माधवरावांच्या अकरा वर्षाच्या कारकीर्दिचा विचार करता मराठेशाहीतील पेशव्यांच्या मालिकेत माधवरावांचे स्थान निर्विवादपणे श्रेष्ठ म्हणून मान्य करावे लागेल. ग्रॅण्ट डफने असे म्हटले आहे की, ''पानीपताच्या संकटामुळे मराठी राज्याचे जे नुकसान झाले त्यापेक्षा अधिक पटीने माधवरावाच्या अकाली मृत्युने झाले.'' हे मत सार्थ आहे. पेशवे माधवराव यांच्या गुणांचा आढावा घेतला तर ते प्रामाणिक, न्यायी, प्रशासकीय कामात कुशल, प्रजाहितदक्ष, निर्भिड, योग्य त्या व्यक्तीचा योग्य त्या ठिकाणी आदर राखणारा असा हा असामान्य पेशवा होता. बाळाजी विश्वनाथची मुत्सद्देगिरी, बाजीरावाचे शौर्य व नानासाहेब पेशव्यांचा करारीपणा या तिन्ही गुणांचा समावेश माधवरावाच्या व्यक्तिमत्वात आढळतो, असे मत सरदेसाई यांनी व्यक्त केले आहे. पानिपतच्या रणसंग्रामात मराठ्यांचे झालेले नुकसान त्याने पूर्णपणे भरून काढले आणि गेलेली प्रतिष्ठा परत मिळवून दिली. पराक्रमी व कर्तबगार मराठा सरदारांची एक नवी पिढी त्याने तयार केली व त्यांच्या सहाय्याने मराठ्यांचा दरारा परत एकवटला सर्वत्र प्रस्थापित केला. हरिपंत फडके, गोपाळराव पटवर्धन, नाना फडणीस, महादजी शिंदे, त्रिंबकराव पेठे, रामचंद्र गणेश, गोविंद शिवराम, रामशास्त्री प्रभूणे, विसाजी कृष्ण अशी कित्येक मराठी माणसे माधवरावाच्या तालमीत तयार झाली. माधवरावाने आपल्या राज्य कारभारास एक नवे नैतिक वजन प्राप्त करून दिले. रामशास्त्री प्रभुण्या सारख्या निःस्पृश न्यायाधिशाच्या हाती न्यायदानाचे काम सोपवून प्रजेला खरा निर्भिड न्याय दिला. कर आकारणीतील अन्याय त्याने दूर केले. वेठबिगारांवर बंदी घालण्यात आली. सैन्यातील आणि निरनिराळ्या सरकारी खात्यातील आळशीपणा, बेफिकिरी दूर करण्यात आली. दारूगोळ्याचे कारखाने जागोजागी स्थापन करण्यात आले. अशा लोकोत्तर गुणांचा पेशवा अकाली मृत्यु पावावा, हे मराठा राष्ट्राचे दुदैवच समजावे लागेल.

## ११.१० समारोप

पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यावर त्यांच्या अखिल भारतीय वर्चस्वास धक्का पोहोचला. त्यांच्या शत्रूंनी उचल खाली. परंतु माधवरावाने अल्पकाळातच निजामाचा बंदोबस्त केला. हैदरचा दारूण पराभव केला. उत्तरेत मुघल बादशहा यास सिंहासनावर बसवून शत्रूंचा बिमोड केला. मराठे अजूनही क्षीण झालेले नाही. पहिल्यासारखे तेजाने चमकू शकतात, हे मराठ्यांनी सिद्ध केले.

## ११.११ प्रश्न

१. मराठा सत्तेचे पुनःरूज्जीवन करण्यासाठी पेशवा माधवराव यांनी केलेल्या कामगिरीचे वर्णन करा.
२. माधवराव पेशव्यांच्या कर्तृत्वाबद्दल माहिती सांगून मराठ्यांच्या इतिहासात माधवरावाचे स्थान कोणते ते स्पष्ट करा.

## ११.१२ संदर्भ


१. अ. रा. कुळकर्णी, ग. ह. खरे 'मराठ्यांचा इतिहास' खंड ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
२. म. वा. काळे 'मराठ्यांचा इतिहास' मुंबई.
३. स. मा. गर्गे, सुहास राजदेस्कर 'मराठ्यांचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन.
४. आर. डी. गायकवाड, डी. डी. थोरात, आर. डी. चव्हाण, 'मराठी सत्तेचा विकास व ऱ्हास' पुणे.
५. गो. स. सरदेसाई, 'मराठी रियासर' खंड १ ते ८ प्रमुख संपादक - स. म. गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.


❖❖❖❖

# १२

# पानिपत युद्धानंतरचा कालखंड
# अ) बारभाई मंडळ   ब) महादजी शिंद

**अनुक्रमणिका :**


१२.० उद्दिष्ट्ये

१२.१ प्रास्तावना

१२.२ नारायणराव पेशवेचा वध

१२.३ बारभाईचे कारस्थान

१२.४ सुरतचा तह

१२.५ पुरंदरचा तह

१२.६ वडगावची लढाई

१२.७ चतु:संघाची स्थापना

१२.८ सालबाईचा तह

१२.९ महादजी शिंदे

१२.१० सारांश

१२.११ सरावासाठी प्रश्न

१२.१२ संदर्भ


## १२.० उद्दिष्ट्ये

१. बारभाई मंडळाच्या स्थापनेच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. बारभाई मंडळाच्या कार्याची माहिती करून घेणे.

३. महादजी शिंदे यांच्या कामगिरीचा आढावा घेणे.

४. इंग्रज मराठा यांच्यातील युध्दाचा अभ्यास करणे.

५. मराठा सत्तेच्या ऱ्हासाची कारणमिमांसा समजून घेणे.

## १२.१ प्रास्तावना

थोरल्या माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईमध्ये जी काही मोजकी कर्तबगार मंडळी होती त्यामध्ये नाना फडणीस व महादजी शिंदे यांचा समावेश होता.

मराठी सत्तेचा उत्तरेत विस्तार करुन दिल्ली दरबारमध्ये मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे महत्वाचे कार्य शिंदे, फडणीस व होळकर यांनी केले होते.

या विषयाची सविस्तर माहीती या प्रकरणातून दिलेली आहे.

## १२.२ नारायणराव पेशवाचा वध :

पेशवा माधवरावाच्या मृत्युनंतरही आपणास पेशवेपद मिळाले नाही, ही गोष्ट रघुनाथरावाच्या मनात सलत होती. ''मी नारायणरावाचा संभाळ करीन'' असे त्याने माधवरावास आश्वासन दिले असले तरी आता त्याला त्याचा विसर पडू लागला. त्याने नारायणरावाविरूद्ध कारवाया सुरू केल्या. नारायणरावास समजताच त्याने रघुनाथरावाची कैद कडक केली. याची परिणिती अखेर नारायणराव पेशवा याचा काटा काढण्यासाठी त्याच्याविरूद्ध कट करण्यात झाली. तुळाजी पवाराच्या मध्यस्थिने सुमेरसिंगाने नारायणरावास कैद करावे असे ठरले. गारद्यांनी राघोबाकडून धरावे असे लेखी हुकूम घेतला. पुढे लेखी हुकमातील 'ध'चा 'मा' आनंदीबाईने केला, असा सर्वत्र समज झाला. परंतु तो खरा नसावा. नियोजित कटाप्रमाणे नारायणरावचा खून करण्यात आला. नारायणरावाच्या दुर्दैवी वधामुळे मराठ्यांच्या राज्यावर परत एकदा गंभीर संकट कोसळले. रघुनाथरावाने राज्यकारभार करण्यास सुरूवात केली. नारायणरावाच्या वधाची चौकशी करण्यासाठी रामशास्त्री प्रभुणे यांना नियुक्त करण्यात आले. त्यांनी चौकशीनंतर वधाची संपूर्ण जबाबदारी रघुनाथरावावर टाकून त्याला खुनी जाहीर केले व त्यास देहान्त प्रायश्चिताची शिक्षा फर्माविली. दरम्यान मराठ्यांच्या शत्रूंनी उचल खाल्ली व रघुनाथराव कर्नाटकात हैदरअलीवर चालून गेला.

## १२.३ बारभाईचे कारस्थान :

रघुनाथराव कर्नाटक मोहिमेवर गेल्याची संधी साधून त्याला पदच्युत करण्याचे पुणे दरबारातील निवडक लोकांनी ठरविले. पुणे दरबारातील नाना फडणीस, सखारामबापू बोकील इ. मुत्सद्दी राघोबा विरूद्ध कारस्थान करू लागले. त्यांनी रघुनाथरावास पेशवेपदावरून काढून टाकण्याचा डाव रचला. याच घटनेस बारभाईचे कारस्थान असे म्हणतात. या कारस्थानात सखाराम बापू, नाना फडणीस, त्रिंबकराव पेठे, बाबाजी नाईक, हरिपंत फडके, मोरोबा फडणीस, रास्ते, पटवर्धन मालोजी घोरपडे, भवानराव प्रतिनिधी, महादजी शिंदे, तुकोजी होळकर हे बारा लोक प्रमुख होते. त्यांनी ठरविले की, राघोबास पेशवेपदावरून काढून टाकायचे व नारायणरावाची विधवा पत्नी गंगाबाई जी गरोदर होती तिला सुरक्षित स्थळी नेऊन ठेवायचे. तिला पुत्र झाल्यास त्याच्या नावाने पेशवाईची सूत्रे चालवायची, नाहीतर पहिल्या बाजीरावाचा मस्तानीपासून झालेल्या मुलाचा म्हणजे समशेर बहादूरचा मुलगा

अलीबहादूर यास पेशवेपद द्यावे असे ठरले. आपल्या विरूद्ध कारस्थान घडल्याची बातमी कळताच रघुनाथराव अस्वस्थ झाला. त्याने कर्नाटक मोहीम आटोपती घेतली. पंढरपूर मार्गाने पुणे येथे येत असतानाच त्याची त्रिंबकराव पेठे यांच्या सैन्याशी कासेगाव येथे गाठ पडली. यात पेठे जखमी झाले व काही दिवसांनी त्यांचा मृत्यु झाला. हरिपंत फडकेंनी सातारहून ताबडतोब रघुनाथवर चाल केली. फडक्यास भोसले व निजामाची मदत मिळाली पण रघुनाथराव उत्तरेकडे पळून गेला. दरम्यानच्या १८ एप्रिल, १७७४ रोजी गंगाबाईस पुत्र झाला. त्याचे सवाई माधवराव असे नाव ठेवण्यात आले. २८ मे, १७७४ रोजी मुलाच्या ४०च्या दिवशी त्याला पेशवेपदाची वस्त्रे देण्यात आली. रघुनाथरावाने शिंदे व होळकरांची मदत घेण्याचा प्रयत्न केले. परंतु कोणाचीही त्याला सहानुभूती नव्हती. त्याने इंग्रजांकडे मदतीची याचना केली व मराठ्यांच्या राजकारभारात हस्तक्षेप करण्याची संधी इंग्रजांना प्राप्त करून दिली.

**आपली प्रगती तपासा**

१. बारभाईचे कारस्थान म्हणजे काय ते लिहा?

## १२.४ सुरतचा तह :

राघोबा इंग्रजांच्या आश्रयास पोहचल्यानंतर इंग्रजांनी ६ मार्च १७७५ मध्ये रघुनाथरावाशी तह केला. या तहाच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या.

१. इंग्रजांनी आपले सैन्य रघुनाथरावाच्या तैनातीस द्यावे.
२. या फौजेच्या खर्चासाठी रघुनाथरावाने दीड लाख रूपये दर महिन्यास इंग्रजांना द्यावेत.
३. कंपनीकडे ठेव म्हणून रघुनाथरावाने सहा लाखांचे रत्नजडीत अलंकार ठेवावेत.
४. वसई साष्टी, मुंबईजवळील सर्व बेटे, गुजराथ मधील जंबूसार व ओल्पाड हे प्रदेश राघोबाने इंग्रजांना द्यावे.

राघोबाच्या मदतीला आलेले इंग्रजांचे सैन्य व हरिपंत फडके यांच्या सैन्यात चकमकी उडाल्या. परंतु त्यात कोणासही निर्णायक विजय मिळाला नाही.

## १२.५ पुरंदरचा तह :

गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टींग्ज याच्यापुढे अनेक अडचणी असल्याने मुंबईच्या गव्हर्नरने मराठ्यांशी चालविलेले हे युद्ध त्याला पसंत नव्हते. मुंबईच्या गव्हर्नरने त्याची परवानगी न घेतल्याने त्याने आपला प्रतिनिधी पुण्याला नव्याने समझोता करण्यासाठी पाठविण्याचा निर्णय घेतला व कर्नल अॅप्टन यास पाठविले. उभयतांमध्ये वाटाघाटी होऊन १ मार्च, १७७६ रोजी त्यांच्यात तह घडून आला. तो पुरंदरचा तह या नावाने ओळखला जातो. या तहातील तरतुदी खालीलप्रमाणे होत्या.

१. साष्टी व ठाणे ही ठिकाणे इंग्रजांकडेच राहावीत.
२. रघुनाथरावाला इंग्रजांनी केलेल्या मदतीपोटी मराठ्यांनी त्यांना १२ लाख रूपये द्यावेत.
३. पेशव्याने रघुनाथरावास दरसाल ३ लक्ष १७ हजार रूपये पेन्शन द्यावी, व यापुढे रघुनाथरावाने राजकारणात भाग न घेता राहिलेले आयुष्य गंगातीरी घालवावे.
४. इंग्रजांनी गुजरातमधील मराठ्यांचा जिंकलेला प्रदेश त्यांच्याकडे राहू द्यावा.
५. इंग्रजानी रघुनाथरावाला आश्रय देऊ नये.
६. घाईघाईने व पूर्ण विचार न करता केलेल्या या तहामुळे इंग्रज व मराठे यांच्यातील मूळ संघर्ष सुटण्यासाठी काहीच उपयोग झाला नाही.

**आपली प्रगती तपासा**

१. भाष्य करा.
   अ) सुरतचा तह   ब) पुरंदरचा तह

## १२.६ वडगावची लढाई (१६ जानेवारी, १७७९)

पुरंदरचा तह मुंबईच्या गव्हर्नरला पसंत पडला नाही. त्यांनी संचालक मंडळाकडे दाद मागितली. व पुरंदर तहा प्रमाणे रघुनाथरावास पेशव्यांच्या हवाली करण्यास नकार दिला. दरम्यान अमेरिकन वसाहती स्वतंत्र झाल्या व इंग्लंडच्या साम्राज्याला जबर धक्का बसला. ही हानी भरून काढण्याचा वॉरन हेस्टींग्जने प्रयत्न चालवला. त्याने मुंबईकरांना पुन्हा युद्ध करण्याचा आदेश दिला. नोव्हेंबर १७७८मध्ये रघुनाथराव, इंग्रजांच्या सैन्याच्या संरक्षणाखाली पुण्याला रवाना झाला. कर्नल इगरटन हा या सैन्याचा प्रमुख होता. मराठ्यांनी तळेगावच्या आसपासच्या प्रदेशात इंग्रजांची नाकेबंदी केली. इंग्रज वडगाव पर्यंत मागे हटले. मराठ्यांनी इंग्रज फौजांचा धूव्वा उडविला. इंग्रजांनी मराठ्यांपुढे शरणागती पत्करली व महादजी शिंद्याच्या मदतीने वडगाव येथे तह घडवून आणला. या तहानुसार इंग्रजांनी राघोबास पेशव्याच्या स्वाधीन करावे असे ठरले. साष्टी, ठाणे व गुजरातमधील इंग्रजांनी मराठ्यांचा जिंकलेला प्रदेश मराठ्यांना परत करावा असे ठरले.

वॉरेन हेस्टींग्जला हा तह पसंत पडला नाही. मराठ्यांविरूद्ध पुन्हा लढाई करण्याचे त्याने ठरविले. जनरल गोडार्डने गुजराथ प्रांतावर हल्ला चढवला आणि त्याचवेळी रघुनाथराव मराठ्यांच्या कडेकोट बंदोबस्तातून निसटून पुन्हा सुरतेला दाखल झाला.

## १२.७ चतु:संघाची स्थापना

इंग्रजांनी पुरंदर तह फेटाळून पुन्हा युद्धास सुरूवात केली. नाना फडणिसांनी इंग्रजांना प्रतिकार करण्यासाठी अखिल भारतीय आघाडी उभारली. त्यांनी इंग्रजांविरूद्ध पेशवे, निजाम, हैदरअली व भोसले असा चतु:संघ उभा केला. मराठ्यांनी महाराष्ट्र व गुजराथमधून इंग्रजांच्या विरूद्ध आघाडी लढवावी, हैदरने दक्षिण कर्नाटकातील इंग्रजांच्या प्रदेशावर हल्ला करावा, निजामाने पूर्व किनाऱ्यावर इंग्रजांच्या प्रदेशावर आक्रमण करावे, तर भोसल्यांनी बंगाल प्रांतात घुसून इंग्रजांनी आपल्या ताब्यात ठेवलेला प्रदेश जिंकावा अशी योजना ठरविण्यात आली. परंतु इंग्रजांनी निजाम व नागपूरकर भोसले यांना चतु:संघातून फोडण्यात यश मिळविले. जनरल गोडार्ड याने फत्तेसिंगराव गायकवाड याच्या मदतीने गुजरातमधील मराठी प्रदेशावर जोरदार हल्ले करण्यास सुरूवात केली. महादजी शिंदे व तुकोजी होळकरांनी गनिमी काव्याने लढून इंग्रजांची दाणादाण करून टाकली. मुंबईच्या आसपास मराठ्यांनी इंग्रज सैन्याची जबरदस्त हानी केली. शेवटी गुजराथची मोहीम आटोपती घेऊन मुंबईच्या संरक्षणास धावावे लागले. मराठ्यांनी इंग्रज फौजांना गनिमी काव्याने हैराण केले. महादजीने गुजरात मधील इंग्रजाची सत्ता उखडून काढली. प्रचंड वितहानी व मानहानीमुळे इंग्रजांना जबर धक्का पोहचला. त्यांनी महादजी मार्फत मराठ्यांकडे तहाची याचना केली व १७ मे १७८२ रोजी सालबाईचा तह करण्यात आला.

## १२.८ सालबाईचा तह

१. पुरंदरच्या तहापासून इंग्रजांनी वसई धरून जो मुलूख जिंकला असेल तो मुलुख इंग्रज मराठ्यांना परत करतील.
२. साष्टी व मुंबईच्या आसपासची लहान बेटे इंग्रजांच्या ताब्यात रहातील.
३. गुजराथेत जिंकलेला प्रदेश इंग्रज मराठ्यांना परत देतील.
४. इंग्रजांनी रघुनाथरावास मराठ्यांच्या ताब्यात देण्याचे मान्य केले. त्याला दरमहा रू. २५०००/- पेन्शन मराठ्यांनी द्यावे.
५. हैदरअलीने इंग्रजांचा जिंकलेला प्रदेश त्यांना परत मिळवून देण्याचा मराठ्यांनी प्रयत्न करावा.
६. इंग्रजांना पूर्वीप्रमाणे पेशव्यांनी व्यापारी सवलती द्याव्या. इंग्रज व पोर्तुगीज याशिवाय इतर युरोपीयन व्यापाऱ्यांस मराठ्यांनी आपल्या प्रदेशात व्यापाराची परवानगी देऊ नये.

या तहाने एक गोष्ट स्पष्ट झाली की, मराठ्यांच्या प्रदेशावर आक्रमण केल्यास किंवा मराठ्यांच्या अंतर्गत प्रश्नात ढवळाढवळ केल्यास त्याचे परिणाम काय होतील हे इंग्रजांना दिसून आले. या तहामुळे मराठ्यांना ठाणे व साष्टी हे दोन्ही प्रदेश मात्र कायम स्वरूपी गमवावे लागले. या तहामुळे महादजी शिंदे यांचे महत्त्व व प्रभुत्व वाढले. व त्यांना उत्तरेत पराक्रम गाजविण्याची चांगली संधी मिळाली. कारण दिल्लीच्या राजकारणात इंग्रज हस्तक्षेप करणार नाहीत अशी ग्वाही इंग्रजांनी मराठयांना दिली. रघुनाथराव स्वत: मराठ्यांच्या स्वाधीन झाला. ११ डिसेंबर, १७८३ मध्य निराश अवस्थेत कोपरगाव येथे त्याचे निधन झाले.

**आपली प्रगती तपासा**

१. भाष्य करा
अ) सालबाईचा तह

## १२.९ महादजी शिंदेचे योगदान

सातारा जिल्ह्यात कोरेगाव तालुक्यातील कण्हेरखेड हे शिद्यांचे मूळ गाव याच घराण्यातील राणोजी शिंदेने बाळाजी विश्वनाथाच्या पागेत बारगिराची नोकरी पत्करली. लवकरच त्याचा उत्कर्ष झाला व पुढे

बाजीरावाच्या उत्तरेतील राजकारणात त्याचा उजवा हात बनला. राणोजीसह त्याच्या सर्वच कर्तबगार मुलांनी मराठ्यांची उत्तरेत सत्ता वाढवली. पानिपतच्या युद्धात तुकोजी शिंदे व जानकोजी शिंदे मारले गेले. सुदैवाने महादजी शिंदे जखमी अवस्थेत जीव वाचवून माळव्यात पोहचला. रघुनाथरावाने महादजीला सरदारकी मिळू नये असा प्रयत्न केला. परंतु माधवरावाने महादजी जरी अनौरस पुत्र असला तरी त्याच्याकडेच शिंदे घराण्याची सत्ता सोपविली. पुढे त्याने उत्तर दिग्विजयाचे सेनापती रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांचा साहाय्यक म्हणून कार्य केले. या काळात त्याने रोहिल्याला शासन करण्यात, बादशहा शहा आलमची दिल्लीच्या सिंहासनावर प्रतिष्ठापना करण्यात या सरदारांना मदत केली. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धात महादजीने प्रभावी भूमिका पार पाडली. सालबाईच्या तहानंतर त्यांनी उत्तर हिंदुस्थानात अपूर्व यश प्राप्त केले.

सालबाईच्या तहानंतर ग्वाल्हेर, गोहद ही महत्त्वाची शहरे महादजी शिंदेंनी जिंकून घेतली. १७७२ ते १७८३ या अकरा वर्षाच्या काळात बादशहा शहाआलम मिर्झा नजफखानच्या नियंत्रणाखाली होता. नजफखानच्या मृत्युनंतर बादशहाने महादजीकडे मदत मागितली. त्याच सुमारास शहजादा जवानबख्त इंग्रजांची मदत घेऊन बादशहा शहा आलमला राजपदावरून काढून टाकण्याच्या योजना आखीत होता. महादजी शिंदेने बादशहाची भेट घेतली व बादशहाने महादजीस वकील-ई-मुतालीक ही पदवी दिली. ही केवळ पदवी नव्हती तर ते सर्वश्रेष्ठ स्थान होते. मोगल साम्राज्याचे कारभारीपद व सेनापतिपद या स्थानात एकत्रित होते. ही पदवी पेशव्याला द्यावी अशी विनंती महादजीने केली. परंतु पेशवे दूर असल्याने बादशहाने महादजीवरच पूर्णपणे विश्वास टाकला. महादजीने दिल्लीचा राज्यकारभार सांभाळण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली, परंतु अनेक अडचणी निर्माण झाल्या. दिल्ली दरबारातील मराठ्यांचे वर्चस्व राजपूत, जाट, रोहिले व मुसलमान यांना आवडले नाही व त्यामुळे त्यांनी मराठ्यांविरूद्ध हालचाली चालविल्या. दिल्लीचा बादशहा महादजीच्या ताब्यात असल्याने महादजी उत्तरेत स्वतंत्र होईल अशी नाना फडणिसांना भीती वाटू लागली. त्यामुळे त्यांनी महादजीस विरोध केला. महादजी पैशाच्या अडचणीत होते. त्यांनी राजपूत राजांकडे खंडणी व चौथाईविषयी मागणी केली. जयपूरच्या प्रतापसिंहने खंडणीची मागणी फेटाळून लावली.१८ जुलै १७८७ रोजी राजपुताण्यावर हल्ला केला. जोधपूरच्या विजयसिंहने प्रतापसिंहला मदत केली. या लालसोटच्या लढाईत शिंद्यांची फौज अपयश घेऊन मागे सरली. महादजीने नानाकडे मदत मागितली. नानाने तुकोजी होळकर व अलिबहादूर यांना पाठविले. पण महादजीला मदत करण्याऐवजी शत्रूला उपकारक ठरतील असे उद्योग तुकोजी व अलिबहादूर यांनी केले.

लालसोटच्या लढाईत शिंद्यांचा पराभव झाला, हे पाहून रोहिला प्रमुख गुलाम कादरने दिल्लीवर स्वारी करून दिल्लीत भयानक अत्याचार केले. दिल्लीचा बादशहा शहा आलमचे डोळे काढण्यात आले. ही बातमी महादजीस कळताच त्याने सरदार राणाखान व जिवबादादा यांना पाठविले. राणाखाने

दिल्लीचा लालकिल्ला सर केला. पण त्या अगोदरच गुलाम कादर दिल्ली सोडून पळून गेला होता. त्याला पकडून त्याचे हालहाल करून त्याला ठार करण्यात आले. बादशहाने खुष होऊन मथूरा व वृंदावन ही दोन तीर्थक्षेत्र मराठ्यांच्या ताब्यात दिली.

दिल्लीची घडी बसविल्यावर महादजीने उरलेल्या इतर शत्रुंच्या समाचारासाठी लक्ष केंद्रित केले १७९० मध्ये जयपूरच्या प्रतापसिंहने १५ लाख रूपये खंडणी देण्याचे मान्य केले. १७९० मध्ये फ्रेंच सेनापती डी. बॉयनच्या साहाय्याने पाटणच्या लढाईत जोधपूरचा पराभव केला. पुढे शीख, जाट व पठाण यांनीही महादजीचे वर्चस्व मान्य केले. महादजीच्या या कार्यात डी. बॉयनच्या कवायती फौजेचा फार मोठा वाटा होता. अशा प्रकारे सैन्याचे पाश्चातीकरण करणारा व त्याच्या साहाय्याने सर्व हिंदुस्थानभर आपला दरारा प्रस्थापित करणारा महादजी हाच एकमेव मराठा सरदार होय. महादजी शिंदे उत्तर दिग्विजय संपादन करून पुण्यास निघाले तेव्हा त्याचा फायदा तुकोजी होळकराने घेतला व महादजीच्या शत्रूशी संधान बांधले. पण शिद्यांच्या लष्कराने १७९३ मध्ये लाखेरीच्या लढाईत होळकरांचा पराभव केला.

महादजी बारा वर्ष उत्तर हिंदुस्थानात होता. त्यावेळी दक्षिणेत, विशेषकरून पुण्यातील बदलते राजकारण समजून घेणे जरूर होते. पुण्यात नाना फडणिसाचे वर्चस्व वाढत होते. इंग्रज, टिपू हे शत्रूप्रबल बनले होते. या सर्व गोष्टी समजून घेण्यासाठी महादजी दक्षिणेला आले. त्यांच्या आगमनामुळे महादजींने बादशहाने दिलेल्या पदव्या, मानचिन्हे पेशव्याला अर्पण केल्या. त्यामुळे संशयाचे वातावरण संपले. पुण्यात महादजींचा मुक्काम वीस महिने होता. या वीस महिन्यात त्यांनी पेशव्यांना मार्गदर्शन केले. परंतु मराठेशाहीच्या दुर्दैवाने पुण्याजवळ वानवडी येथे अचानकपणे आजारीपडून वयाच्या ६७व्या वर्षी महादजी शिंदेचा मृत्यु झाला.

मराठ्यांच्या इतिहासात महादजी शिंदे यांचे स्थान श्रेष्ठ आहे. नानाचे शहाणपण व मुत्सद्देगिरी आणि महादजीचे शौर्य व पराक्रम यामुळे मराठेशाहीला भाग्याचे दिवस लाभले. जदुनाथ सरकार त्यांच्या बद्दल लिहितात, ''महादजीच्या भव्य व्यक्तिमत्त्वामुळे उत्तर भारताच्या संपूर्ण राजकारणांत काही काळ त्यांचे नाव पूर्णपणे दुमदुमत होते. त्यांच्या मृत्युमुळे मराठ्यांचे अपरिमित नुकसान झाले.''

**आपली प्रगती तपासा**

१. महादजी शिंदे यांच्या कार्याचा आढावा घ्या.

## १२.१० सारांश

थोरल्या माधवराव पेशव्याच्या मृत्युनंतर मराठेशाही तिच्या अंतर्गत दूही मुळे वेगाने ढळू लागली.

## १२.११ प्रश्न:

१. बारभाईचे कारस्थान म्हणजे काय? बारभाई मंडळाच्या कार्याची माहिती द्या.

२. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाचा आढावा घ्या.

३. मराठेशाहीच्या उत्कर्षासाठी महादजी शिंदे व नाना फडणीसांच्या कार्याचा आढावा घ्या.

४. टिपा लिहा.

अ. बारभाई मंडळ

## १२.१२ संदर्भ पुस्तके


१. अ.रा.कुलकर्णी, ग. ह. खरे, 'मराठ्यांचा इतिहास', खंड ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

२. म. वा. काळे 'मराठ्यांचा इतिहास' मुंबई.

३. स. म. गर्गे, सुहास राजदेरकर 'मराठ्यांचा इतिहास' कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे

४. आर. डी. गायकवाड, डी. डी. थोरात, आर. डी. चव्हाण 'मराठी' सत्तेचा विकास व ऱ्हास' पुणे.

५. गो. रा. सरदेसाई, 'मराठी रियासत' खंड १ ते ८ प्रमुख संपादक - स. म. गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.


❖❖❖❖

# १३

# मल्हारराव होळकर, नाना फडणीस यांचे कार्य व मराठा सत्तेचा ऱ्हास

**अनुक्रमणिका**


१३.० उद्दिष्ट्ये
१३.१ प्रास्ताविक - नाना फडणीसांचे कार्य
१३.२ मल्हारराव होळकर
१३.३ म्हैसूर-मराठे संबंध
१३.४ मराठा निजाम संघर्ष
१३.५ दुसऱ्या बाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती
१३.६ होळकर — विरूद्ध बाजीराव व शिंदे
१३.७ वसईचा तह
१३.८ दुसरे इंग्रज-मराठा युद्ध
१३.९ देवगावचा तह
१३.१० सुर्जी - अंजनगावचा तह
१३.११ यशवंतराव होळकरचा पराभव
१३.१२ तिसरे इंग्रज-मराठा युद्ध
१३.१३ मराठा साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे
१३.१४ सारांश
१३.१५ सरावासाठी प्रश्न
१३.१६ संदर्भ


## १३.० उद्दिष्ट्ये

१. नाना फडणीस व मल्हारराव होळकरांच्या कामगिरीची अभ्यास करणे.

२. दुसऱ्या व तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाचा आढावा घेणे.

३. मराठा सत्तेच्या ऱ्हासास जबाबदार ठरलेल्या घटकांचा अभ्यास करणे.

## १३.१ प्रास्ताविक - नाना फडणीसांचे कार्य

माधवराव पेशव्याच्या अकाली मृत्युनंतर त्याचा लहान भाऊ नारायणराव याला पेशवेपदी नियुक्त करण्यात आहे. सखारामबापू बोकील व नाना फडणीस यांच्यासारख्या जुन्या व विश्वासू सहकाऱ्यांच्या मदतीने त्याने राज्यकारभार करावा अशी योजना होती. नारायणराव हा सतरा वर्षे वयांचा एक उतावळ्या, चंचल व अत्यंत रागीट स्वभावाचा तरुण होता. त्याच्यासमोर अनंत अडचणी निर्माण झालेल्या होत्या. माधवरावाच्या कारकिर्दीतील विविध सैनिकी मोहिमा व त्याचा शेवटचा आजार यामुळे राज्याचा खजिना रिकाम्या झाला होता, त्यामुळे प्रशासनामध्ये गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले होते. तशातच पुणे शहराच्या गस्तीवर तैनात केलेल्या गारदी पथकाने आपल्या वेतनाच्या थकबाकीचा तगादा लावण्यास सुरूवात केली. गारदी हे भाडोत्री सैनिकी असून त्यांचा मराठ्यांच्या राज्याला नेहमीच उपद्रव होत असे. माधवरावाच्या मृत्युनंतर मुंबईतील इंग्रजांनी साष्टी, वसई मिळविण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरू केले. इंग्रजांप्रमाणेचा जंजिऱ्याचा सिद्दी हाही मराठ्यांच्या अडचणींचा फायदा घेण्यास टपून बसलेला होता.

२७ ऑक्टोबर १७९५ रोजी सवाई माधवरावाचे निधन झाले. तो निपुत्रिक असल्याने भावी पेशवे पदाची समस्या निमार्ण झाली. या वेळचे सत्तेचे राजकारण, सरदारांतील स्वार्थीवृत्ती आणि संघर्ष, स्वतःच्या स्वार्थासाठी परकियांची घेतलेली मदत यातूनच मराठेशाहीचा अंत झाला.

**नाना फडणीसांचे कार्य:**

थोरल्या माधवराव पेशव्यांच्या मृत्युनंतर पेशवाईच्या अखेरीस जी कर्तबगार मंडळी होऊन गेली त्यात महादजी शिंदे व नाना या दोन महत्त्वाच्या व्यक्ती होत्या. नानाचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ मध्ये सातारा येथे झाला. त्यांच्या घराण्यात पेशव्यांची वंशपरंपरागत फडणिशी होती. २९ नोव्हेंबर १७५६ रोजी त्याना फडणिशीची वस्त्रे मिळाली. सदाशिवराव भाऊच्या तालमीत ते जमाखर्चाच्या कामात तज्ज्ञ झाले. इ.स. १७६० मध्ये ते भाऊच्या स्वारीबरोबर उत्तरेत गेले आणि पानिपतच्या पराभवानंतर कसाबसा जीव वाचवून पुण्याला परत आले. पुढे माधवरावाच्या मृत्युनंतर मराठ्यांच्या राजकारणावर त्याचा ठसा उमटला. माधवरावाच्या मृत्युनंतरच नाना खऱ्या अर्थाने प्रकाशात आले.

बारभाई कारभाराच्या कालात नाना फडणीस खऱ्या अर्थाने राजकारणात चमकू लागले. तसे पहाता बारभाईचे कारस्थान उभे करण्यात पुढाकार सखाराम बापू यांनी घेतला होता. तथापि पुढे त्यांनी रघुनाथरावाशी संबंध ठेवल्याने त्यांना कैद करण्यात आले व १७७५ ते १७९५ या काळात मराठ्यांच्या सत्तेची सुत्रे नानांच्या ताब्यात राहिली. मराठा सत्तेच्या विकासासाठी वीस वर्षे नानांनी प्रयत्न केले. नाना फडणिसाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे नारायणराव पेशव्याच्या खुनानंतर बारभाई शासनामार्फत मराठेशाहीचा कारभार चालविण्यात अपूर्व यश मिळविले. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे

रघुनाथरावाचा बीमोड करण्यासाठी त्याला पाठिंबा देणाऱ्या इंग्रजांना वठणीवर आणले. इंग्रजांचा धोका ओळखून पेशवे, हैदर, निजाम, भोसले यांचा चतु:संघ निर्माण करण्यात त्यांनी कमालीची मुत्सद्देगिरी दाखविली.

सालबाईच्या तहानंतर नानाच्या हातून नि:स्वार्थी राष्ट्रसेवा घडली नाही, असे सरदेसाई म्हणतात. त्यांनी उत्तरोत्तर राज्याची सर्व सत्ता आपल्या हाती ठेवण्याचा उपक्रम केल्याने पुष्कळांची मने दुखावली. उत्तरेतील महादजीच्या वैभवशाली कामगिरीचे महत्त्व नानाने ओळखले नाही. ज्यावेळी महादजीला मदतीची अत्यंत गरज होती. त्यावेळी त्याला वेळेवर मदत केली नाही. नानाच्या व्यक्तिमत्त्वाला महादजी विषयीच्या द्वेषाची जी किनार होती, त्यामुळे मराठ्यांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. खर्ड्याच्या लढाईच्या वेळी मराठ्यांची एकजुट बळकट करणे नानास शक्य होते. परंतु त्यांना ते जमले नाही. सत्तेचा स्वार्थ नानाला सुटला नाही. नानाच्या जाचाला कंटाळून सवाई माधवरावाने आत्महत्या केली ही एक फार मोठी शोकांतिका आहे. या घटनेनंतर नानाने संचित केलेल्या द्रव्याच्या साह्याने सत्ता टिकविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला व मराठा सत्ता कमकूवत झाली.

नाना कलमबहादूर होता पण तलवारबहाद्दूर नव्हता. नाना फडणीस पुराणप्रिय होता. आधुनिक शस्त्रास्त्रांकडे व त्याच्या उत्पादनाकडे जेवढे लक्ष देणे आवश्यक होते तेवढे लक्ष नानाने दिले नाही. भौगोलिक ज्ञानाबद्दल नाना फडणिसास फारशी माहिती नव्हती. सनातनी वृत्ती नानाच्या ठायी असल्याने भौतिक क्षेत्रात त्याच्या काळात फारशी प्रगती घडली नाही.

नाना फडणिसांचे एवढे दोष असून देखील असे म्हणता येईल की, नाना नंतर मराठेशाहीत त्यांच्या इतका बुद्धीचा, वकुबाचा दुसरा कोणी कर्ता पुरूष झाला नाही. आणि म्हणून ''नानाच्या मृत्युबरोबर मराठा राज्यातील सर्व सयंम व शहाणपण संपले'' हे इंग्रज वकील पामर याने काढलेले उद्गार यथार्थ वाटतात. सर रिचर्ड टेंपलने नानाच्या कार्यक्षमतेची, तर ग्रॅंट डफने त्यांच्या मुत्सद्देगिरीची व बुद्धिमत्तेची प्रशंसा केली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. नाना फडणीसांच्या कार्याची माहिती सांगा.

## १३.२ मल्हारराव होळकर

मल्हारजी होळकरांचे पूर्वज पुणे जिल्ह्यातील वाफगावी राहत असत. नंतर ते नीरा नदीच्या काठावर होळ नावाच्या खेड्यात स्थायिक झाले. या गावाच्या नावावरून होळकर हे नाव खंडोजी आणि त्यांचा मुलगा मल्हारी यांना पडले. वडिलांच्या मृत्युनंतर मल्हाररावांचे पालनपोषण त्यांचे मामा भोजराज यांनी केले. भोजराज सुप्रसिद्ध कंठाजी कदमबांडे या सरदाराच्या घोडदळात पंचवीस स्वारांचा नायक होता. मल्हारराव मोठा झाल्यावर त्यालाही लष्करात नोकरी मिळवून दिली. १७२० साली निजाम उलमुल्क दक्षिणेत आपले स्वतंत्र बस्तान बसविण्याच्या खटपटीत होता. तेव्हा निजामाशी झालेल्या संघर्षात मल्हारची कामगिरी बाजीराव पेशव्याच्या निदर्शनास आली. १७२८ मध्ये मराठ्यांनी माळव्यात जाऊन सुभेदार गिरीधर बहादूर यांचा अमझेरा येथे पराभव केला. या लढाईत मल्हाररावने मोठा पराक्रम गाजविला. त्यानंतर शिंदे व होळकर यांनी बुदेलखंडात व माळवा प्रांतात आपले चांगलेच वर्चस्व स्थापन केले. १७३० मध्ये मल्हारराव होळकरला माळव्याचा सुभेदार नेमण्यात आले. १७३७ मध्ये बाजीरावाने माळव्यावर स्वारी केली. मल्हारराव होळकरांनी या मोहिमेत विशेष कामगिरी बजावली.

पानिपतच्या रंणागंणातून मल्हारराव कसेबसे थोडीफार फौज घेऊन परतले अहमदशहा अब्दाली उत्तरेतून निघून गेल्यानंतर राजपुत प्रबळ झाले. जयपूरचा माधोसिंग मराठ्यांचा कट्टर शत्रू होता. मल्हारराव होळकरांनी १७६१ मध्ये कोटानजीक मंगरूळच्या लढाईत माधोसिंगचा पराभव केला. याचवेळी त्यांना दक्षिणेत बोलावण्यात आले व राक्षसभूवनच्या लढाईत निजामाचा पराभव करण्यात आला. बक्सारच्या लढाईनंतर अयोद्धेचा नवाब सुजाउद्दौलाने मीर कासिमला आश्रय दिल्यामुळे इंग्रजांनी त्यांच्यावर हल्ला केला. या संकटात सुजाने मराठ्यांकडे मदत मागितली. वास्तविक इंग्रजी तोफखान्यासमोर मराठ्यांचा टिकाव लागेल किंवा नाही याचा विचार मल्हाररावाने करावयास हवा होता. दुर्दैवाने मल्हाररावाने घाईने निर्णय घेतला व कोराच्या लढाईत (३ मे १७६५) मध्ये मल्हाररावाचा पूर्ण पराभव झाला. पुढे मे १७६६ मध्ये आलमपूर येथे मल्हाररावांचे देहावसान झाले.

हिंदुधर्माचे रक्षण, विद्येस उत्तेजन, अनेक मंदिरांची निर्मिती, इंदुर शहराची आर्थिक भरभराट, शेतीस उत्तेजन ही होळकरांच्या कारकिर्दीची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतील.

**आपली प्रगती तपासा**

१. मल्हारराव होळकरांचे कार्य विशद करा.

_______________

_______________

_______________

_______________

_______________

## १३.३ म्हैसूर - मराठे संबंध :

इंग्रज - मराठा युद्धाच्या वेळी नाना फडणिसाने चतु:संघ इंग्रजांविरूद्ध उभा करण्यात कमालीची मुत्सद्देगिरी दाखविली होती. त्याप्रमाणे हैदरअलीने दक्षिणेत इंग्रजांना खूपच हैराण केले परंतु शेवटी सालबाईच्या तहात मराठ्यांनी हैदरला न विचारता परस्पर इंग्रजांशी तह केला. ७ डिसेंबर १७८२ रोजी हैदरअलीचा मृत्यु झाला. त्याचा मूलगा टिपू सूलतानने इंग्रजांशी युद्ध चालूच ठेवले. शेवटी इंग्रजांनी शरणागती स्वीकारली व टिपूशी मंगलोरचा तह केला. त्यानंतर त्याने मराठ्यांशी युद्ध छेडले. मराठ्यांनी निजामाची मदत मागितली व निजामाने मदत देण्याचे आश्वासन दिले. टिपूला हे कळताच त्याने निजामाकडे विजापूरच्या प्रदेशाची मागणी केली व कृष्णा नदीच्या दक्षिणेकडे निजामाच्या ताब्यातील प्रदेशावर ताबडतोब हल्ले चढविले. टिपूने चित्तूर व नरगुंद जिंकून घेतले.

फेब्रुवारी १७८६ मध्ये नानाने पुन्हा निजामअलीची यादगीर या ठिकाणी भेट घेतली. मराठ्यांनी बदामीचा किल्ला जिंकला. टिपूने अडोणी सावनूर जिंकून घेतले. याचवेळी इंग्रज मराठ्यांना मिळतील अशी परिस्थिती निर्माण झाली व टिपूने मराठ्यांशी गजेंद्रगडचा तह केला. बदामी, नरगुंद मराठ्यांना देण्यात यावीत तर अडोणी निजामाला देण्यात यावे असे ठरले. मराठे व टिपू सुलतान यांच्यातील मैत्री फार काळ टिकली नाही व कॉर्नवॉलिसच्या कूटनितीला मराठे बळी पडले.

गव्हर्नर जनरल कॉर्नवॉलिसने टिपूविरूद्ध मराठे व निजामाला आपल्या बाजूला वळवून घेतले. मराठ्यांनी धारवाड जिंकून घेतले. इंग्रजांनी बंगलोर जिंकले व श्रीरंगपट्टणकडे कूच केले. शेवटी टिपूने मार्च १७९२ मध्ये शरणागती पत्करली व इंग्रजांशी श्रीरंगपट्टणचा तह केला. टिपूच्या अर्ध्या राज्याचे इंग्रज मराठा, निजाम यांनी आपापसात वाटप केले. या तहाचे हिंदुस्थानच्या इतिहासावर दूरगामी परिणाम घडून आले. यानंतर हिंदुस्तानमधील राजकीय श्रेष्ठत्व इंग्रजांकडे जाणार ही गोष्ट स्पष्ट होऊ लागली.

**आपली प्रगती तपासा**

१. म्हैसूर - मराठा संबंधावर प्रकाश टाका.

## १३.४ मराठा - निजाम संघर्ष - खर्ड्याची लढाई

खर्ड्याची लढाई ही मराठ्यांच्या इतिहासात महत्त्वाची मानली जाते. मराठ्यांच्या उत्तर कालातील हा अखेरचा विजय नंतर मराठेशाहीस ओहोटी लागली. इ.स.१७९३ मध्ये चौथाईची थकबाकी नाना फडणिसांनी निजामाकडे मागितली. निजामाने ही मागणी साफ फेटाळून लावली. नानाने सर्व सरदारांना एकत्र केले. स्वतः सवाई माधवराव या मोहिमेवर निघाले. या मोहिमेत शिद्यांच्या फौजा, तुकोजी होळकर, रघुजी भोसले, परशुराम पटवर्धन सामील झाले. निजामानेही जय्यत तयारी केली. ११ मार्च १७९४ रोजी मराठ्यांनी निजामची दाणादाण उडवून दिली. त्यामुळे त्याने खर्ड्याच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. मराठ्यांनी ताबडतोब किल्ल्यास वेढा देऊन त्याची रसद बंद पाडली. नाईलाजाने निजाम मराठ्यांना शरण आला व त्याने मराठ्यांशी तह केला. या तहाप्रमाणे असे ठरले की,

१. निजामाने मराठ्यांना पाच कोटी रूपये द्यावेत.
२. उदगीरच्या तहाने ठरलेला सर्व प्रदेश निजामाने मराठ्यांच्या हवाली करावा.
३. निजामाने स्वतंत्रपणे भोसल्यांना २८ लक्ष रूपये द्यावेत.
४. दक्षिण हिंदुस्थानात गोहत्तेला बंदी घालण्याचे निजामाने कबूल केले.

निजामावर मिळवलेला हा विजय नेत्रदिपक होता. ज्योत विझताना मोठी होते तसा हा विजय होता. खर्ड्याच्या लढाईनंतर मराठेशाहीचा विनाशकाल सुरू झाले. लवकरच सवाई माधवरावाचा मृत्यु झाला.

## १३.५ दुसऱ्या बाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती :

रघुनाथरावचे तिघे मुलगे पेशवेपदावर आपला हक्क सांगू लागले. अमृतराव दत्तकपुत्र होता. बाजीराव व चिमणाजी हे दोघे औरसपुत्र होते. चिमणाजी लहान होता. या तिघांनाही पेशवेपद मिळू नये असा नाना फडणिसांचा प्रयत्न होता. दुसऱ्या बाजीरावाने दौलतराव शिंद्याशी संपर्क साधला व एक गुप्त करार केला. त्यानुसार बाजीरावाला दौलतराव शिंदेनी पेशवेपद मिळवून द्यावे व मोबदला म्हणून एक कोटी रूपये शिदेंना द्यावे असे ठरले. ही बातमी नाना फडणिसाला कळताच त्यांनी बाजीरावाचा पेशवेपदाचा हक्क मान्य केला. नाना फडणिसाने कटास काटशह देण्याचा हा प्रकार होता. दौलतरावाने पुण्यावर स्वारी करण्याचे ठरविले. नानाला हे कळताच त्यांनी पुणे सोडले व महाड गाठले. दौलतरावाने चिमणाजीला पेशवा म्हणून जाहीर केले.

नाना फडणिसाने आपली मुत्सद्देगिरीपणाला लावली व होळकर, भोसले व छत्रपतींशी संपर्क साधला. नानाच्या या कारस्थानाची माहिती मिळताच दौलतराव अस्वस्थ झाला. नाना व शिंद्यामध्ये समझौता होऊन ५ डिसेंबर १७९६ ला बाजीराव दुसरा पेशवा बनला. कारभारी म्हणून नाना फडणीसाची नियुक्ती झाली. परंतु लवकरच त्यांच्यात मतभेद होऊन नानाला कैद करण्यात आले. बाजीराव व दौलतरावामध्ये सत्तेच्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्या पार

पाडण्याचे कसब व क्षमता नव्हती. शेवटी ते नानाला शरण गेले. नोव्हेंबर १७९८ मध्ये नानाची कैदेतून सुटका करण्यात येऊन त्यांच्याकडे कारभाराची जबाबदारी सोपविण्यात आली. परंतु दोन वर्षाच्या कैदेने नानाची सारी उमेदच संपली होती. शेवटी १३ मार्च १८०० रोजी नाना फडणीसांचा मृत्यु झाला.

## १३.६ होळकर विरूद्ध बाजीराव व शिंदे

तुकोजी होळकरचा ऑगस्ट, १७९५ मध्ये मृत्यु झाला. त्याला काशीराव व मल्हारराव हे दोन औरसपुत्र तर विठोजी व यशवंतराव हे दोन दासीपुत्र होते. बाजीराव व दौलतरावाने सामान्य कुवतीच्या काशीरावाला होळकरांचा वारसदार नेमले. मल्हारराव, विठोजी व यशवंतराव या तीन बंधूंनी दौलतराव शिंदे व बाजीराव यांच्याविरूद्ध शस्त्र हातात घेतले. या यादवीत दौलतराव शिंदे याने होळकरांच्या छावणीवर हल्ला चढवून मल्हाररावास ठार केले. विठोजी व यशवंतराव यांनी चिडून सर्वत्र धुमाकूळ घातला. त्यांनी माळव्यातही धूमाकूळ घातला. विठोजीने महाराष्ट्रात खानदेशापासून कृष्णेपर्यंत मोहिम काढली. बाजीरावाने विठोजी होळकरला पकडण्यास बापू गोखले याला सांगितले. बापू गोखल्याने विठोजीस पकडले. विठोजीला पुण्यात आणले व १६ एप्रिल १८०१ रोजी हत्तीच्या पायी देऊन त्याला ठार करण्यात आले.

विठोजी होळकराचा मृत्यु अमानूष पद्धतीने घडल्याची बातमी यशवंतरावास कळताच त्याने इंदूर, उज्जैन, नर्मदा नदीकडील सर्व प्रदेश बेचिराख केला. पुण्यावर स्वारी करण्यापूर्वी यशवंतराव होळकराने बाजीरावास कळविले की, ''आपण या राज्याचे धनी आहात आपल्याविरूद्ध शस्त्र धरण्याची माझी अजिबात इच्छा नाही. शिंदे - होळकरांमधील वाद आपण योग्य न्याय देऊन सोडवावा एवढीच माझी इच्छा आहे. असे झाले तरच इंग्रजांवर दबाव बसून राज्याचा बचाव होईल. बाजीरावाने हा निवाडा केला नाही. व बाळोजी कुंजरने भरीस घातल्याने होळकराबरोबर लढण्याची तयारी चालवली. यशवंतरावाने पेशव्यांच्या फौजेचा हडपसर येथे प्रचंड पराभव केला.''

## १३.७ वसईचा तह :

होळकराच्याविरूद्ध झालेल्या लढाईत दुसऱ्या बाजीरावाचा पराभव झाल्यावर बाजीरावाने वसईकडे आपला मोर्चा वळवला व इंग्रजांकडे मदतीसाठी याचना केली. इंग्रज ज्या संधीची वाट पाहत होते ती संधी त्यांच्याकडे चालून आली होती. इंग्रजांनी ३१ डिसेंबर, १८०२ रोजी बाजीरावशी वसईचा तह केला. या तहाचा अटी खालीलप्रमाणे होत्या.

१. इंग्रजांनी पेशव्यांच्या मुलखाचे रक्षण करावे.
२. बाजीरावाने सहा हजार तैनाती फौज बाळगावी व फौजेच्या खर्चासाठी २६ लाखांचा मुलूख इंग्रजांना द्यावा.
३. आवश्यक तेव्हा परस्परांशी एकमेकास लष्करी साहाय्य करावे.
४. इंग्रजांच्या परवानगीशिवाय बाजीरावाने इतर राज्याशी युद्ध किंवा तह करू नये.
५. बाजीरावाने इंग्रजांव्यतिरिक्त कोणत्याही युरोपियन व्यक्तिस नोकरीत ठेवू नये.
६. बाजीराव व निजाम यांच्यात संघर्ष झाल्यास इंग्रजांचा निर्णय अंतिम राहिल.

अशाप्रकारे मराठ्यांनी आपल स्वातंत्र्य इंग्रजांकडे गहाण टाकले. त्यामुळे मराठी सत्तेचा अस्त लवकर घडून आला.

**आपली प्रगती तपासा**

१) वसईच्या तहावर टीप लिहा.

## १३.८ दुसरे इंग्रज - मराठा युद्ध

दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांबरोबर तह केल्याने होळकर, पटवर्धन, भोसले इत्यादी सरदार बिथरले. त्यांनी बाजीरावाच्या कृतीला विरोध करण्यासाठी अमृतरावाच्या मुलाला पेशवेपदाची वस्त्र मिळवली. परंतु लवकरच यशवंतराव इंग्रजांबरोबर लढण्याऐवजी पुण्यातून निघून गेला. इंग्रज बाजीरावाला घेऊन पुण्यास आले व इंग्रजांच्या संरक्षणाखाली बाजीराव पेशवेपदी आरूढ झाला. अमृतरावास ८ लाख रूपये वार्षिक तनखा देण्याचे बाजीरावाने मान्य केले.

वसईच्या तहास दौलतराव शिंदे यांनी मान्यता द्यावी म्हणून वेलस्लीने कर्नल कॉलिन्सला ब्ऱ्हाणपूर येथे शिंदे यांच्या भेटीस पाठविले. या भेटीत शिंदे यांनी तहास मान्यता दर्शविली नाही. दरम्यान शिंद्याच्या विनंतीवरून रघुजी भोसले शिंद्यांना येऊन मिळाले. आपापसातील मतभेद विसरून होळकरही शिंद्यांना मिळण्यास सज्ज झाला. परंतु या दरम्यान शिंद्यांनी पेशव्यांना लिहिलेले एक पत्र मधल्यामध्ये पकडून इंग्रजांनी होळकराला दिले. या पत्रात शिंद्यांनी पेशव्यांना लिहिले होते की, ''तुम्ही होळकरांचे म्हणणे मान्य करा म्हणजे सर्व मिळून इंग्रजांचा धुव्वा उडवू. इंग्रजाचे संकट दूर झाल्यावर त्याचा समाचार घेता येईल.'' यामुळे यशवंतराव बिथरला. इंग्रजांनी अत्यंत हुशारीने यशवंतरावास आघाडीमधून बाहेर काढला. ३ ऑगस्ट १८०३ रोजी इंग्रजांनी शिंद्याविरूद्ध युद्ध पुकारले. हे युद्ध मराठ्यांच्या इतिहासात दुसरे इंग्रज-मराठा युद्ध म्हणून ओळखले जाते. आसईच्या लढाईत शिंदे - भोसले यांच्या संयुक्त सेनेचा इंग्रंजांनी पराभव केला. त्यानंतर अशीरगड, व अडगाव येथे मराठ्यांचा पराभव केला. अलीगड, दिल्ली, मथुरा, आग्रा इंग्रजांनी काबीज केले. १ नोव्हेंबर १८०३ रोजी लासवाडीच्या युद्धात शिंद्यांचा निर्णायक स्वरूपाचा पराभव झाला. शिंद्यांना व भोसलेंना इंग्रजांशी तह करण्यावाचून गत्यंतर नव्हते. इंग्रजांनी भोसल्यावर देवगावचा तर शिंद्यांवर सुर्जी अंजनगावचा तह लादला.

## १३.९ देवगावचा तह (१७ डिसेंबर १८०३)

१. वर्धा नदीपर्यंतचा पश्चिम वऱ्हाडचा प्रदेश निजामास द्यावा.
२. कटक प्रांत इंग्रजांना देण्यात यावा.
३. भोसल्यांनी मराठा महामंडळातून बाहेर पडावे व इंग्रजांच्या प्रतिस्पर्धांना आपल्या, पदरी आश्रय देऊ नये.
४. अन्य मराठा सरदारांशी इंग्रजांनी केलेले सर्व करारांना भोसले संमती देतील.

## १३.१० सुर्जी अंजनगावचा तह (३० डिसेंबर १८०३)

१. गंगा - यमुना नद्यामधील दुआबाचा प्रदेश, दिल्ली आग्रा दरम्यानचा प्रदेश, बुंदेलखंडाचा काही भाग, भडोच व गुजरात मधील अन्य काही प्रदेश तसेच गोदावरीच्या काठावरील अहमदनगर ते अजिंठा पर्यंतचा प्रदेश इंग्रजांना देण्यात यावा.
२. शिंद्यांचे मुघल बादशहावरील नियंत्रण रद्द होईल.
३. पेशवे, निजाम व गायकवाड यांच्याकडे असलेली शिंद्याची सर्व देणी रद्द समजण्यात येतील. तसेच अन्य सरदारांशी इंग्रजांनी केलेल्या सर्व करारांना शिंदे संमती देतील.
४. इंग्रजांच्या प्रतिस्पर्ध्यांना शिंद्यांनी आपल्या पदरी आश्रय देऊ नये.

या युद्धातील विजयाने इंग्रजांचा फार मोठा लाभ झाला. फ्रेंच प्रभाव पूर्णपणे नष्ट झाला. दिल्ली, आग्रा, दुआब इंग्रजांच्या ताब्यात गेला.

## १३.११ यशवंतराव होळकरचा पराभव :

शिंदे - भोसलेच्या पराभवानंतर यशवंतराव होळकरचा बंदोबस्त करण्याचे इंग्रजांनी ठरविले. जयपूर राज्याशी ब्रिटिशांनी स्वतंत्रपणे करार केला होता. तर या राज्यामधून चौथाई वसुलीचा आपणास अधिकार आहे असा यशवंतरावाचा दावा होता. ब्रिटिशांनी यास आक्षेप घेतला. गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने एप्रिल, १८०४ मध्ये यशवंतरावाविरूद्ध युद्ध पुकारले. यशवंतरावने कर्नल मॉनसनचा धुव्वा उडवला व दिल्लीपर्यंत धडक मारली. पण जनरल लेकच्या प्रयत्नामुळे दिल्ली जिंकता आली नाही. फरूखाबाद येथे होळकरांचा पराभव झाला. याच वर्षी होळकरांनी शिंदे यांचे साहाय्य घेण्याचा प्रयत्न केला. पण तो अयशस्वी झाला. आपल्याला कोणाची मदत मिळणार नाही, जो तो पराभूत अवस्थेत आहे हे कळताच होळकरांनी इंग्रजांशी २४ डिसेंबर १८०५ साली राजघाट येथे तह केला. हा तह ''राजघाटचा तह'' म्हणून ओळखला जातो. या तहानुसार चंबळ नदीचा उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रदेश इंग्रजांना मिळाला. दारूण अपयश एकाकीपणाची भावना, कर्जाचा डोंगर, या गोष्टींमुळे यशवंतराव खचून गेला. वयाचा अवघ्या विसाव्या वर्षी २८ ऑक्टोबर १८११ रोजी भानपुरा या ठिकाणी यशवंतरावाचा मृत्यु झाला.

**आपली प्रगती तपासा**

१) दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धास कारणीभूत ठरलेल्या घटनांचा आढावा घ्या.

## १३.१२ तिसरे इंग्रज-मराठा युद्ध :

इंग्रजांच्या साहाय्याने दुसऱ्या बाजीरावाला पेशवाई मिळाली, मात्र त्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य संपुष्टात आले. वसईच्या तहापासून इ.स. १८११ पर्यंत ब्रिटिश रेसिंडट म्हणून कर्नल क्लोज बाजीरावाच्या दरबारी होता. बाजीरावाशी त्याने सामंजस्याचे धोरण स्वीकारले होते. फेब्रुवारी १८११ मध्ये कर्नल क्लोजच्या जागी एलिफिन्सटन आला. या काळात लहान मोठ्या सरदारांनी बंड केले होते. अनेक सरदारांनी एल्फिन्स्टनकडे धाव घेतली. या सरदारांच्या विरोधात तैनाती फौजेचा वापर एल्फिन्स्टनने होऊ दिला नाही. एल्फिन्स्टनने बाजीरावाकडून १९ जुलै १८१२ रोजी एक करार लिहून घेतला. या करारामुळे पेशव्यांचे जहागिरदारांवरील वर्चस्व कमी झाले व बाजीराव इंग्रज यांच्या संबंधात तणाव निर्माण झाला.

पेशवा व गायकवाड यांच्यामधील देवाण-घेवाणीच्या प्रश्नावरून पेशवा व इंग्रज यांच्यात कटूता निर्माण झाली. बडोद्याचे गायकवाड पेशव्यांना तीन कोटी रूपयांची खंडणी देणे लागत होते. खंडणीची रक्कम त्वरेने भरणा करावी याबाबत पेशव्याने सारखा तगादा गायकवाड यांच्यामागे लावला. बाजीरावाने आपल्यावतीने बोलणी करण्यासाठी त्रिंबकराव डेंगळे यास वकील म्हणून नेमले. तर गायकवाडांनी गंगाधर शास्त्रींची नेमणूक केली. इंग्रजांनी त्याला त्याच्या पुण्यातील मुक्कामात सुरक्षिततेची हमी दिली होती. परंतु पंढरपूर येथे गंगाधरशास्त्रींचा खून झाला. इंग्रजांनी त्रिंबकजी डेंगळे यास जबाबदार धरले. व त्यास कैद करण्याचा हुकूम बाजीरावास दिला. बाजीरावाने त्रिंबकजी डेंगळे यास कैद केले. पुढे वर्षभराने डेंगळे ठाण्याच्या तुरूंगातून निसटला. वास्तविक इंग्रजाच्या हातावर तुरी देऊन तो निसटला होता. परंतु या मागे बाजीरावाचा हात असावा असे समजून बाजीरावकडे डेंगळे यास पकडून देण्याची मागणी केली. एवढेच नव्हे तर पुरंदर, सिंहगड व रायगड हे तीन किल्ले मागितले. इंग्रजांच्या मागण्या नाकारण्याचे सामर्थ्य बाजीरावात नव्हते. शेवटी सर्व मागण्या मान्य करणारा करार केला. त्याला ''पुणे करार'' म्हटले जाते. या करारानुसार मराठा सरदारांवरील पेशव्याची सत्ता संपुष्टात आली. महाराष्ट्राबाहेरचा मराठ्यांचा सर्व प्रदेश बाजीरावाने इंग्रजांच्या हवाली केला. अशाप्रकारे मराठा मंडळाचे रीतसर विसर्जन झाले. करारातील अटी अतिशय कठोर असल्याने बाजीरावाने त्यांना प्राणपणाने विरोध करण्याचे ठरविले.

इंग्रजांनी पेंढाऱ्याविरूद्ध मोहिम उघडली व त्यामध्ये मराठ्यांनी सामील व्हावे अशी सूचना गर्व्हनर जनरल लॉड हेस्टिंग्जने केली. बाजीरावाला सैन्य जमवण्यासाठी निमित्त मिळाले.

युद्धाची तयारी झाल्याबरोबर बाजीरावाने आपल्या सैन्याचे नेतृत्व बापू गोखले याजकडे सोपविले. ५ नोव्हें. १८१७ रोजी मराठ्यांनी इंग्रजांवर हल्ला केला व इंग्रजांविरूद्ध युद्ध पुकारले. पुण्याजवळील खडकी या ठिकाणी बापू गोखल्याने हल्ला चढविला. पुढे घोरपडी, येरवडा या ठिकाणी इंग्रज व बाजीराव यांच्या सैन्यात लढाया झाल्या. मराठा सैन्याने निकराने सामना दिला. पण इंग्रजांच्या सुसज्ज फौजांपुढे मराठ्यांचा टिकाव लागला नाही. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी पुणे शहर इंग्रजांनी जिंकले. शनिवारवाड्यावर इंग्रजांचे युनियन जॅक हे निशाण लावण्यात आले. मराठेशाहीचा अस्त झाला. पुढे १९ फेब्रुवारी १८१८ रोजी अष्ट्यानजीक बाजू गोखले युद्धात मारला गेला. अखेर बाजीराव दुसरा इंग्रजांना शरण गेला. इंग्रजांनी त्याचे पेशवेपद खालसा केल्याचे जाहीर केले. आठ लाख वार्षिक पेन्शन स्वीकारून बाजीराव कानपुरजवळील बिठूर या ठिकाणी राहण्यास गेला.

**आपली प्रगती तपासा**

१) तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाचा आढावा घ्या.

## १३.१३ मराठा साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे:

छत्रपती शिवाजी महाराजांचे कर्तृत्व व नेतृत्व यांच्या संयोगाने मराठ्यांचे राज्य सतराव्या शतकात हिंदुस्तानच्या राजकीय क्षितिजावर उदय पावले. अठराव्या शतकात पेशव्यांच्या तसेच त्यांच्या सरदारांच्या पराक्रमाने वाढविलेले साम्राज्य व त्याचा केलेला विस्तार हे दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत नष्ट झाले. या साम्राज्याच्या विघटनाची अनेक कारणे इतिहासकरांनी शोधली आहेत. प्रबळ मध्यवर्ती सत्तेचा अभाव, स्वतंत्र सरंजाम व जहागिरी देण्याची अनिष्ट प्रथा, तसेच देशाभिमान, शिस्तबद्ध सैन्य व आधुनिक शस्त्रस्त्रांचा अभाव ही न. चि. केळकर त्यांच्या दृष्टीने मराठ्यांच्या अधोगतीची प्रमुख कारणे होती. वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांची पुराणप्रिय सनातनी वृत्ती व त्यामुळे मराठ्यांनी आधुनिक भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाकडे केले दुर्लक्ष हे मराठ्यांच्या पराभवाचे सर्वात प्रमुख कारण दिले आहे. आपसातील दुफळी हा मराठ्यांचा स्थायीभाव होता. समान शत्रूविरूद्ध ते एकत्र येत, पण त्या शत्रूचे संकट नाहीसे झाले की एकमेकांत भांडायला सुरूवात करीत. या त्यांच्या प्रवृत्तीमुळे मराठेशाहीच्या ऐन वैभवाच्या काळात तिच्या विनाशाची बीजे पेरली होती, असे डॉ. सुरेंद्रनाथ यांनी प्रतिपादन केले आहे. उत्तरेतील सैनिकी मोहिमा हाती घेऊन मराठ्यांनी चूक केली व त्यामुळे त्यांच्या राज्याचा विनाश झाला असे मत श्रीराम शर्मा यांनी व्यक्त केले आहे. दुसरा बाजीराव व दौलतराव शिंदे यांच्या नाकर्तेपणामुळेच मराठ्यांचा ऱ्हास झाला असे मत रियासतकार सरदेसाई यांनी व्यक्त केले आहे. त्र्यं. रां. शेजवलकर यांनी मराठ्यांच्या ऱ्हासासाठी पेशव्यांच्या चुकीच्या धोरणाला जबाबदार धरले आहे. वरील सर्व मते लक्षात घेता मराठा सत्तेच्या ऱ्हासास केवळ एकच घटक

कारणीभूत नसून अनेक घटक कारणीभूत ठरले आहेत हे मान्य करावे लागेल. त्यांचा आढावा खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१. प्रबळ मध्यवर्ती सत्तेचा अभाव :**

मराठा सत्तेच्या ऱ्हासाचे हे एक प्रमुख कारण होते. शिवाजी महाराजांचे राज्य एकसत्ताक असूनही एकतंत्री नव्हते. हे राज्य लहान असले तरीही त्याला अंतर्गत स्थैर्य व भक्कम पाया होता. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर मात्र मराठ्यांची मध्यवर्ती सत्ता हळूहळू कमकुवत होत जाऊन मराठ्यांच्या राज्याचा पाया ढासळू लागला. शिवाजी महाराजांच्या नंतर राज्याला अतिशय प्रतिकूल परिस्थितून जावे लागले. राज सत्तेमध्ये वंशपरंपरेने कर्तबगार राजांची मालिका कायम राहू शकली नाही. मध्यवर्ती सत्तेच्या दुर्बलतेमुळे व मराठ्यांमध्ये अंगभूत असलेल्या स्वतंत्र वृत्तीमुळे मराठा सत्तेचा ऱ्हास झाला.

**२. पेशव्यांकडे सत्तेचे झालेले हस्तांतर :**

बाळाजी विश्वनाथाच्या काळात पेशव्याच्या हाती प्रामुख्याने मुलकी अधिकार होते. त्याचा मुलगा पहिला बाजीराव पराक्रमी असल्याने मुलकी सत्तेबरोबरच सैनिकी सत्ताही एकवटू लागली. परिणामी इतर प्रधानांचे महत्त्व कमी होऊन ते मागे पडले. १७४९ मध्ये शाहूराजाच्या मृत्युनंतर पेशव्यांना जाब विचारणारे कोणीच राहिले नाही. पेशवाच मराठ्यांच्या राज्याचा सर्वाधिकारी झाल्याने छत्रपतीचे महत्त्व कमी झाले. भोसले, दाभाडे, प्रतिनिधी पेशव्यांना बरोबरचे मानत असल्याने पेशव्यांचे वर्चस्व त्यांना सहन होत नसे. त्यांनी पेशव्यांशी कधीच मनापासून सहकार्य केले नाही.

**३. सरंमजामशाही व्यवस्था :**

बाळाजी विश्वनाथाने मराठा संघाची स्थापना केली व मराठ्यांच्या साम्राज्यविस्तारासाठी हिंदुस्थानचा प्रदेश मराठा सरदारांना वाटून दिला. बाजीराव व नानासाहेब पेशव्यांच्या काळानंतर मराठ्यांनी प्रचंड साम्राज्य उभारले. परंतु ते एकाच केंद्रीय सत्तेखाली नियंत्रित न करता त्या त्या प्रदेशात नवे नवे सरदार निर्माण करून त्यांना वंशपरंपरागत वतने व जहागिऱ्या दिल्या. यात शिंदे, होळकर, पवार, गायकवाड इ. सरंजाम सरदारांचा उल्लेख करता येईल. त्यामुळे मराठा साम्राज्याचे एकसंघ स्वरूप जाऊन त्यास विस्कळीतपणा प्राप्त झाला. जोपर्यंत पहिले चार पेशवे सामर्थ्यशाली होते तोपर्यंत या सर्व सरदारांवर त्यांचा वचक राहिला. पुढे या सरदारांनी पेशव्यांना न जुमानल्याने मराठ्यांचे साम्राज्य पतनाकडे गेले.

**४. आर्थिक दिवाळखोरी :**

शिवाजी महाराजांनी अनेक युद्धे केली असली तरी आपल्या आयुष्याच्या अखेरीस त्यांनी आपला खजिना पूर्ण भरलेला ठेवला होता. पुढे मराठ्यांचा राज्यविस्तार मोठ्या प्रमाणात झाला. विस्तारित प्रदेशातील चौथाई - सरदेशमुखीचे अधिकार मराठ्यांना मिळाले. परंतु महसूल वसूल कधीच वेळेवर झाला नाही. महसूल वसुलीचे नियोजन योग्य पद्धतीने झाले नाही. कित्येक वर्षाचा महसूल थकीत राहू लागला. सततच्या युद्ध मोहिमांमुळे पेशव्यांना कर्ज घेण्याशिवाय पर्याय नव्हता. १७४० ते १७६० या काळात पेशव्यास दीड कोटी रूपयांचे कर्ज होते. युद्ध मोहिमेसाठी पेशवे व सरदार, सावकारांकडून कर्जे काढत व लुटीतूनच कर्जफेड करत. याला चांगला राज्यकारभार म्हणू शकत नाही.

**५. व्यापाराकडे दुर्लक्ष :**

मराठ्यांच्या राज्यात स्थानिक व्यापाराला सर्व प्रकारचे प्रोत्साहन देण्यात आले तरी दूरच्या अंतरावरील व्यापारात मराठे हिंदुस्थानातील अन्य व्यापारी जमातीपेक्षा मागेच होते. कोकण व गुजरात मधील प्रदेश त्यांच्या नियंत्रणाखाली असला तरी सागरी व्यापार इंग्रज व अन्य युरोपियन व्यापाऱ्यांच्या ताब्यातच होता. या काळात इंग्रज व अन्य व्यापारी निर्यातीच्या व्यापारातून लाखो रूपयांचा नफा मिळवत असताना शिंदे व गायकवाड चौथाईच्या छोट्या रक्कमावर समाधान मानत असत.

**६. लष्करी क्षेत्रातील दोष :**

मराठ्यांच्या सैन्याची संघटना, शिस्त व मोहिमेची पद्धत याविषयी शिवाजी महाराजांनी घालून दिलेली तत्त्वे नंतरच्या काळात विसरली गेली. महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन महाराजांनी गनिमी काव्याच्या तंत्राचा अतिशय परिणामकारक वापर केला होता. पेशवाईतही गनिमी काव्याचे तंत्रच वापरण्यात आले होते. गनिमी काव्याने शत्रूचे नुकसान करता येते. पण त्यांचे सैनिकी सामर्थ्य नष्ट करता येत नाही ही गोष्ट पेशव्यांच्या लक्षातच आली नाही. परिणामी त्यांनी हिंदुस्थानात सर्वत्र बराच प्रदेश जिंकला असला तरीही खऱ्या अर्थाने त्याचे राज्य कोठेच स्थापन झाले नाही. मराठ्यांनी कवायती फौजांचे, आधुनिक शस्त्रास्त्राचे महत्त्व ओळखून या गोष्टींचा आपल्या सैन्यात स्वीकार केला. परंतु याबाबत ते परकीय लोकांवर अवलंबून राहिले. ऐन युद्धात या परकीय सेनापतींनी मराठ्यांना दगा दिला. उदा. दौलतराव शिंद्यांचे युरोपियन अधिकारी मराठ्यांविरूद्ध लढत असताना ऐन वेळी इंग्रजांना जाऊन मिळाले. शस्त्रास्त्रे व दारूगोळा या बाबत बऱ्याच वेळा मराठे इंग्रजांवर अवलंबून रहात. साहजिक इंग्रजांनी निकृष्ट प्रतीची हत्यारे व दारूगोळा मराठ्यांना पुरविला.

शिवकाळात मराठ्यांच्या सैन्याचे स्वरूप एकजिनसी होते, ते पेशवाईत नष्ट झाले व त्याला बहुजिनसी स्वरूप प्राप्त झाले. शिवकाळातील सैन्याप्रमाणे पेशवाईत मराठ्यांचे सैन्य मराठ्यांचे उरले नाही. मावळे, हेटकरी व रामोशी मागे पडले व त्यांची जागा अरब, पठाण व पुरभय्ये अशा गारदी सैनिकांनी घेतली. या गारदी सैनिकांचे दंगे व अरेरावी ही उत्तर पेशवाईतील नित्याचीच बाब झाली होती.

शिवकालीन मराठ्यांचे छावणीतील जीवन अत्यंत साधे होते. मोहिमेवर जाताना स्त्रिया व अन्य बाजारबुणगे यांना बरोबर न नेण्याचा नियम शिवाजी महाराजांनी कटाक्षाने पाळला होता. पेशवाईत या नियमाकडे दुर्लक्ष झाल्याने पानिपतच्या मोहिमेवर गेलेल्या सैन्यात सैनिकांपेक्षा बाजार बुणग्यांची संख्या जास्ता होती व त्यामुळे लष्करी हालचाली मंदावल्या तसेच रसदेचा प्रश्न गंभीर बनला पेशवाईत हेरखात्याकडेही दुर्लक्ष झाले व याचा परिणाम सैन्याच्या कार्यक्षमतेवर झाला.

**८. आरमाराकडे दुर्लक्ष :**

मराठी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी आरमाराचे महत्त्व ओळखून समुद्र किनाऱ्याच्या व व्यापाराच्या संरक्षणासाठी आरमार उभारले व ते अधिकाधिक सुसज्ज, कार्यक्षम व बलिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला. पुढे मराठा आरमार प्रमुख आंग्रेस सर्व प्राश्चात्य पोर्तुगिज, फ्रेंच, इंग्रज घाबरत असत. परंतु आरमाराची ही महान परंपरा टिकविण्याचा पेशव्यांनी प्रयत्न केला नाही. नाना साहेब पेशव्याने इंग्रजांच्या मदतीने तुळाजी आंग्रे म्हणजेच

पर्यायाने मराठा आरमाराचा नाश केला. त्यामुळे समुद्रावर वर्चस्व असलेले इंग्रज पुढील संघर्षात मराठ्यांना भारी पडले.

**९. सुयोग्य नेतृत्वाचा अभाव :**

१७९४ ते १८०० या काळात मराठा साम्राज्यातील कर्तबगार, पराक्रमी, मुत्सद्दी अशा अनेक व्यक्तींचा मृत्यु झाला. १७९४ महादजी शिंदे, हरिपंत फडके; १७९४ सवाई माधवराव, अहिल्याबाई होळकर, १७९७ तुकोजी होळकर, १७९९ परशुरामभाऊ पटवर्धन व १८०० नाना फडणीस अशा अनेक व्यक्ती काळाने ओढून नेल्याने मराठा साम्राज्याची जबाबदारी दुसरा बाजीराव व दौलतराव या सारख्या अविवेकी आणि कर्तव्यशून्य व्यक्तींवर पडली. त्यामुळे मराठा साम्राज्याचा डोलारा कोसळला.

**१०. कर्तबगार व्यक्तींना अल्पायुष्य लाभले :**

शिवाजी महाराजांच्या अनपेक्षित व अल्पायुषी जीवनामुळे औरंगजेबाचे संकट उद्‌भवले. बाजीराव पेशव्याच्या अल्पकालीन आयुष्यामुळे दक्षिणेत निजामचा उदय झाला, तर नानासाहेबच्या मृत्युमुळे राघोबाची भाऊबंदकी उद्‌भवली. निझाम, हैदर, इंग्रज बळावले. थोरल्या बाजीराव पेशव्यांना ३९ वर्षाचे, नानासाहेब पेशव्यांना ३८ वर्षांचे तर माधवराव पेशव्यांना फक्त २८ वर्षांचे आयुष्य लाभले. पेशव्यांच्या घराण्यातील चिमाजी आप्पा व सदाशिवरावभाऊ दोघेही अल्पायुषी ठरले. या गोष्टी मराठेशाहीच्या पतनास कारणीभूत ठरल्या.

**११. इंग्रजांची जबरदस्त मुत्सद्देगिरी :**

वेलस्ली बंधु, पुण्याचे, शिंद्याकडचे किंवा नागपूरचे इंग्रज रेसिडेंट हे सर्व एकापेक्षा एक इंग्रज अमंलदार मराठ्यांचा पाडाव करण्यास चंग बांधून उभे राहिले. त्यांनी राजकारणाने व फितुरीने भारतीय राज्ये आणि समाज यात मोठी फट पडली. गुप्त बातम्या मिळविल्या, सरदारांना फितूर केले, जाहीरनामा काढून व नानाप्रकारची लालूच दाखवून लोकमत आपल्या बाजूस वळविले. सरदारांमध्ये एकजूट होऊ दिली नाही.

**१२. जाती व्यवस्था :**

मराठ्यांतील जातिसंस्था व निरनिराळ्या जातीतील वैमनस्य देखील मराठ्यांच्या नाशास कारणीभूत ठरले. शिवाजी महाराजांनी सर्व जाती - जमातींना समान संधी देऊन राष्ट्रीय कार्यास जुंपले. परंतु नंतर पेशव्यांच्या काळात ब्राह्मणांना विशेष सवलती मिळू लागल्या. मराठेशाहीचे ब्राह्मणशाहीत रूपांतर झाले अशी अनेकांची भावना झाली. दानधर्म, यज्ञयाग यासाठीच राजसत्ता वापरली जाऊ लागली. इतर जातीजमातीवर खूप अन्याय केला जाऊ लागला. जातीबंधने अधिक कडक झाली. धर्माचरणाचे स्तोम माजले, त्यामुळे मराठ्यांनाच मराठा राज्याबद्दल आस्था राहिली नाही.

## १३.१४ सारांश

नाना फडणीसाचे शहाणपण व मुत्सद्देगिरी आणि महादजी शिंदेचा पराक्रमामुळे मराठ्यांनी मराठा राज्याला सावरले. रघुनाथारावाचा बीमोड करण्यासाठी त्याला पाठिंबा देणाऱ्या इंग्रजांना वठणीवर आणले. साऱ्या हिंदुस्थानात मराठेशाहीस प्रतिष्ठा मिळवून दिली.

## १३.१५ प्रश्नः

१. टिपा लिहा.

अ. नाना फडणीस

ब. मल्हारराव होळकर

२. दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाचा आढावा घ्या.

३. तिसरे इंग्रज-मराठा युद्धाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

४. मराठेशाहीचा अस्त होण्यास जबाबदार असलेल्या कारणाचा आढावा घ्या.

## १३.१६ संदर्भ पुस्तके


१. स. म. गर्गे, सुहास राजदेरकर 'मराठ्यांचा इतिहास' कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे

२. अ.रा.कुलकर्णी, ग. ह. खरे, 'मराठ्यांचा इतिहास', खंड ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

३. गो. रा. सरदेसाई, 'मराठी रियासत' खंड १ ते ८ प्रमुख संपादक - स. म. गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

४. म. वा. काळे 'मराठ्यांचा इतिहास' मुंबई.

५. आर. डी. गायकवाड, डी. डी. थोरात, आर. डी. चव्हाण 'मराठी' सत्तेचा विकास व ऱ्हास' पुणे.


❖❖❖❖

# १४

# शिवकालीन प्रशासन

**अनुक्रमनिका :**


१४.१ उद्दिष्ट्ये

१४.२ प्रास्तविक

१४.३ मुलकी प्रशासन

१४.४ महसूल व्यवस्था

१४.५ न्यायिक प्रशासन

१४.६ लष्करी व्यवस्था

१४.७ समारोप

१४.८ प्रश्न

१४.९ संदर्भ


## १४.१ उद्दिष्ट्ये

१. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुलकी प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२. छत्रपती शिवाजी महाराजाच्या महसूल प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या न्यायिक प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.

## १४.२ प्रस्तावना

एक आदर्श राज्य मध्ययुगीन काळात शिवाजी महाराजांनी निर्माण केले. तत्कालीन मोगल, निजाम व अदिलशाही राजवटीच्या पार्श्वभूमीवर शिवाजी राजांचे राज्य अधिकच समाजभिमुख होते. त्यामुळेच इतिहासकार सुरेंद्रनाथ सेन यांनी शिवाजी राजांची तुलना पहिल्या नेपोलीयनशी केली आहे. मुलकी राज्यकर्ते म्हणून शिवाजी राजांची योग्यता अधिकच थोर होती, असे मत सेन यांनी व्यक्त केले आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, प्रभावी योद्धा, कुशल प्रशासक, लोककल्याणकारी राजा म्हणून शिवाजी राजांच्या प्रशासनातील गुण आपल्या निदर्शनास येतील. शिवाजी राजांच्या मृत्युनंतर सुद्धा त्यांची प्रशासन व्यवस्था अनेक वर्षे टिकून राहिली. ही पौर्वात्य राज्यपद्धतीत दिसून न येणारी बाब शिवाजी राजांच्या राज्यपद्धतीत दिसून येते. या राज्यपद्धतीमुळे रयतेला सुव्यवस्था, शांतता यांचा लाभ झाला. प्रत्येक व्यक्तिला विकासाची संधी मिळाली. सामान्य माणूस केंद्रबिंदू मानूनच शिवाजी राजांनी आपल्या राज्यकारभाराची यंत्रणा उभारली होती.

## १४.३ मुलकी प्रशासन :-

शिवकालीन प्रशासनात 'छत्रपती' हे सर्वोच्च पद होते. ते स्वराज्याचे प्रमुख होते. हे पद वंश - परंपरागत होते. न्यायदान, करवसुली, युद्ध, तह, साम्राज्यविस्तार, धर्मरक्षण व प्रजेचे कल्याण करणे ही जबाबदारी छत्रपतींची होती.

### १४.३.१ अष्टप्रधान मंडळ :-

राज्याचा कारभार जास्तीत जास्त सुरळीत चालविण्यासाठी छत्रपती शिवाजी राजांनी अष्टप्रधान मंडळाची रचना केली होती. राज्याभिषेकाच्या निमित्ताने त्यांनी आपल्या प्रशासनव्यवस्थेला औपचारीक स्वरूप दिले. त्यासाठी त्यांनी प्राचीन भारतात प्रचलित असलेल्या प्रशासनव्यवस्थेच्या तत्वांचा व कार्यप्रणालिंचा आधार घेतला होता. त्यांच्या प्रशासनव्यवस्थेच्या केंद्रस्थानी अर्थातच राजा होता. राजाच्या मदतीला अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती.

**१) मुख्य प्रधान (पेशवा)** - मोरोपंत पिंगळे - याला सर्व राज्य कारभाराकरीता जबाबदार समजले जाई. त्याने इतर खात्यावर निगराणी ठेवून कामात एकसुत्रता आणावी अशी त्याच्याकडून अपेक्षा होती. राजपत्रावर मुख्य प्रधानाचा शिक्का मारत असे. त्याला सरदारांवर नियंत्रण ठेवून मुलखांचे संरक्षण ही करावे लागत असे.

**२) अमात्य (मुजूमदार) महसूलमंत्री - रामचंद्र निलकंठ मुजुमदार** - राज्याच्या उत्पन्नाचा व खर्चाचा जमाखर्च पहात असे. राज्याच्या खर्चावर कडक निगराणी ठेवत असे. सर्वहिशोब राजाला सादर करत असत. महसूल विषयक सर्व दस्तेवज तसेच महाल व परगण्यांच्या जमाखर्चाच्या कागदपत्रावर त्याची सही व शिक्का आवश्यक होता.

**३) मंत्री (वाकनवीस) मूख्य सचिव** - दत्ताजी त्रिंबक - राज्यातील रोजच्या राजकीय हालचालींची नोंद ठेवण्याचे कार्य त्याच्याकडे असे. छत्रपतींची दिनचर्याही तो लिहीत असे. त्याला हेर व्यवस्थेवरही लक्ष ठेवावे लागत असे.

**४) सचिव (सुरनीस) अर्थमंत्री** - अण्णाजी दत्तो - राजाचा पत्रव्यवहार स्वतः पहात असे. राजपत्रे वाचून त्यावर दुरूस्ती करणे, सरकारी आज्ञापत्रे पाठविणे, नव्याने जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावणे, युद्धकालीन कामकाज पाहणे, महाल व परगण्यांचा हिशेब तपासण्याचे काम करणे इ. कामे सचिवाला करावी लागत असत.

**५) सेनापती (सरनौबत) संरक्षणमंत्री** - हंबीरराव मोहिते - याला सैन्यभरती, सैन्यसंघटन, व सैन्यातील शिस्तीसाठी जबाबदार धरले जाई. लढाईची योजना त्यालाच आखावी लागे. नव्याने जिंकलेल्या प्रदेशाचे संरक्षणही त्याला करावे लागत असे.

**६) सुमंत (डबीर) परराष्ट्रमंत्री** - रामचंद्र त्रिंबक - विदेशी प्रश्नावर सल्ला देणे, परराष्ट्रव्यवहार बघणे, परकीय वकीलांचे स्वागत करणे, परराज्यातील राजकीय समीकरणांचा अभ्यास करून राजाला सांगणे इ. कामे करावी लागत असत.

**७) न्यायाधिश (निराजी रावजी) न्यायमंत्री** - संपूर्ण राज्यातील न्यायदानाचे कार्य यांच्याकडे सोपविण्यात आले होते. सर्व पुराव्यांचा विचार करून न्यायदान त्याला करावे लागत होते.

**८) पंडितराव** - पंडित रघुनाथराव - धार्मिक बाबतीत राजाला सल्ला देणे, धर्म परंपरा, आचार विचार इ. लक्षात घेऊन निर्णय देणे, धार्मिक कृत्ये व विद्वानांची संभावना करणे, दानधर्म, अनुष्ठाने करणे इ. कामे यांना बघावी लागत असत.

### १४.३.२ अष्टप्रधान मंडळाची आधारभूत तत्त्वे -

१) सेनापती खेरीज अन्य सर्व प्रधान ब्राह्मण होते, मात्र सेनापती मराठा असे सर्वच प्रधानांवर राजाचा पूर्ण विश्वास असे. काही महत्त्वाचे अपवाद वगळल्यास एका प्रधानाकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी वर्षानुवर्षे तशीच कायम ठेवण्यात येई. सेनापती पद मात्र या नियमाला अपवाद होते.

२) प्रधानपद वंशपरंपरेने चालत नसे. छत्रपती शिवाजी राजांनी या संबंधी घालून दिलेला नियम नंतरच्या पेशवेकाळात बदलण्यात आला.

३) प्रधानांना कोणतीही जहागिरी किंवा वतन न देता त्यांना रोख वेतन नियमितपणे देण्याची पद्धत छत्रपती शिवाजी राजांनी स्वीकारली होती.

४) प्रत्येक प्रधान आपल्या खात्यांच्या कारभार राज्याच्या नावे व राज्याच्या वतीने चालवत असला तरी त्यासंबंधीची पूर्ण जबाबदारी त्या प्रधानाची असे.

५) प्रशासनाची जबाबदारी अष्टप्रधान मंडळावर संयुक्त रीतीने असे महत्त्वाच्या सरकारी दस्तऐवजांवर व कागदपत्रांवर त्यापैकी बहुतेकांची सही शिक्का असण्याची गरज होती.

६) या प्रधानांना आपला मदतनीस निवडण्याची मुभा नव्हती सर्व मुतलिकाची नेमणूक राजातर्फे केली जाई व त्यावेळी संबंधीत प्रधानाची आवड निवड किंवा मत घेण्यात येत असे.

७) मंत्र्यांची नेमणूक ही जातिभेदविरहीत होती. व्यक्तीचे गुण पाहूनच त्याची नेमणूक ही प्रधानपदासाठी होत असे.

**१४.३.३ ग्रामप्रशासन** - सतराव्या शतकात सामाजिक व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू खेडे हा होता. शेती हा प्रमुख व्यवसाय होता. छोट्या खेड्याला मौजे असे म्हणत तर त्याहून मोठ्या खेड्याला कसबा असे म्हणत. अनेक खेड्यांचा मिळून परगणा तयार होत असे. त्यांचा कारभार देशपांडे, देशमुख, पाटील, कुलकर्णी यांसारखे अधिकारी बघत असत.

छत्रपती शिवाजी राजे महान राजनितीज्ज्ञ असल्याने त्यांनी चातुर्याने अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली होती. कारण राजा व्यक्तीशः कितीही कर्तबगार असला तरीही राज्याच्या प्रशासनाचा गाडा त्यांना एकट्याने कधीच रेटता येणारा नव्हता. त्यासाठी त्यांना इतरांच्या मदतीची व सहकार्याची आवश्यकता होती. हे शिवाजी राजांनी हे ओळखले होते.

**आपली प्रगती तपासा :-**

प्र.१ शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाची आधारभूत तत्वे सांगा.

## १४.४ महसूल प्रशासन

स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाचे साधारणपणे चार भाग पडतात. १) जमीन महसूल २) विविध कर ३) नाणी टांकसाळी ४) चौथाई व सरदेशमुखी

**१४.४.१ जमीन महसूल -**

हे राज्याचे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. त्यात खूप सुधारणा शिवाजी राजांनी केल्या. जमिनदारी पद्धत बंद केली व रयतवारी पद्धत आणली. पूर्वी महसूल वसूल करणारे पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे हे अधिकारी होते. हे वंशपरंपरेने पद त्यांच्याकडे होते. त्यामुळे रयतेवर अनेक वेळा अन्याय ते करत. सरकारात नाममात्र महसूल भरत व बाकीचा आपल्याकडे ठेवून घेत. छत्रपती शिवाजी राजांनी मलिक अंबर याने अमलात आणलेली महसूल व्यवस्था आदर्श म्हणून समोर ठेवली. महसूल वसूलीतील अन्याय दूर होण्यासाठी जबाबदारीचे तत्व अंमलात आणले. खेड्यातील पाटील किंवा देशमुख, परगण्यातील देशपांडे यांच्याकउे महसुल वसूलीचे काम देण्यात आले. या सर्व अधिकाऱ्यांवर सुभेदारांचे नियंत्रण ठेवण्यात आले.

जमीन मोजण्यासाठी दोर किंवा साखळीचा वापर पूर्वी होत होता. शिवाजी राजांनी स्वराज्यात एक विशिष्ट लांबी असणारी काठी हे परिमाण वापरात आणले. जसे पाच हातांची एक काठी, वीस गुणीले वीस काठ्यांचा एक बिघा होत असे. जमिनीच्या एकंदर उत्पन्नाच्या २/५ भाग शेतसारा म्हणून शेतकऱ्यांकडून घेण्यात येत असे. नवीन व पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना २ ते ४ वर्षांच्या मुदतीचे कर्ज दिले जाई.

जमिनीची मोजणी झाल्यावर तिचे वर्गीकरण अव्वल, दुम, सीम व चारूम असे केले जाई. त्यानंतर दोन किंवा तीन गावांचा एक गट बनवून त्यातील प्रत्येक प्रकारच्या जमिनीतील तीन वर्षाच्या सरासरी उत्पन्नाचा अंदाज घेण्यात येई व त्या सरासरी उत्पन्नाच्या ४०% भाग जमीन महसुलापोटी पैशात घेण्यात येई. दुष्काळ, टोळधाड, साथीचे रोग व युद्धातील हानी अशा प्रसंगी शेतकऱ्यांना महसूल माफ केला जाई किंवा त्यामध्ये सुट देण्यात येई. ''रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे'' अशा स्वरूपाच्या सुचना छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या.

**१४.४.२ विविध कर -** स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाचे दुसरे महत्त्वाचे साधन म्हणजे आकारण्यात येणारे विविध प्रकारचे कर होय. त्यामध्ये आयात - निर्यात कर, मालावरील जकात

कर, उत्पादन कर, न्यायालयात भरलेला दंड व इतर शुल्क, जंगलातून मिळणारे उत्पन्न, मासेमारीकर, खाणी कर, वारसा कर, कोतवाली कर, वतन जप्ती, देवस्थान दुभी, वनचराई, घासकटाई, बेवारसी संपत्ती इ. बाबीपासून सरकारला महसूल मिळत असे.

**१४.४.३ नाणी व टांकसाळी** - टांकसाळी व त्यात पाडण्यात येणारी विविध प्रकारची नाणी ही स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाची एक महत्त्वाची बाब हाती. सरकारी व खासगी अशा दोन्ही प्रकारच्या टाकसाळी शिवकाळात होत्या. खासगी टांकसाळींना सरकारची पूर्व परवानगी आवश्यक होती. परवाना धारक सोनार टांकसाळीत नाणी पाडत असे. त्यासाठी त्याला निर्धारीत परवाना शूल्क भरावे लागत असे. अटींचा भंग केल्यास सोनाराला दंड भरावा लागत किंवा त्याचा परवाना रद्द होत असे. खाजगी टांकसाळीवर सरकारची कडक देखरेख होती. सभासद बखरीत त्याकाळी प्रचलीत असलेल्या एकूण ३२ प्रकारच्या सोन्याच्या व चांदीच्या नाण्यांचा उल्लेख आढळतो. छत्रपती शिवरायांची मालकीची टांकसाळ रायगडावर होती. मराठ्यांच्या राज्यातील एकूण २५,००० नाण्यांचे निरीक्षण केल्याचा दावा ॲबट या धर्मगुरू प्रवाशाने केला आहे.

**१४.४.४ चौथाई व सरदेशमुखी** - चौथाई याचा अर्थ आपल्या राज्याच्या रक्षणार्थ व युद्ध टाळण्यासाठी दुर्बल सत्ताधीश आपल्या राज्यातील उत्पन्नाचा चौथा हिस्सा प्रबळ राजांना देत असत. छत्रपती शिवाजी राजांनी चौथाईचा पुरस्कार करून सीमारेषेवरील सत्ताधीशांकडून चौथाई वसूल केलेली दिसते. चौथाई स्वराज्याचा महसूल वाढविण्यासाठी वसूल केली जात असे.

सरदेशमुखी म्हणजे सुभ्यातील एकूण उत्पन्नाच्या १/१० भाग होय. अनेक सरदेशमुख हा हक्क वसूल करत असत. स्वराज्य स्थापनेनंतर छत्रपती शिवाजी राजांनी सरदेशमुखीचे अधिकार आपल्या ताब्यात घेतले होते. हे अधिकार स्वराज्यापुरतेच मर्यादित होते, हे लक्षात घेणे आवश्यक ठरते.

**१४.४.५ वतनदारी पद्धत** - ही पद्धत महाराष्ट्रात अगदी यादवकाळापासून प्रचलीत होती. इस्लामी राज्यकर्त्यांनी ही पद्धत स्वीकारली व कायम ठेवली. शिवरायांच्या काळात मात्र वतनदारी पद्धतीला काहीही स्थान नव्हते. किंबहुना शिवरायांनी नवी वतने कोणालाही दिली नव्हती. खुद्द जावयाने वतन मागीतले होते तेव्हा शिवरायांनी त्याला वतन दिले नव्हते. यावरून वतनदारीबद्दल शिवरायांना किती तिटकारा होता, हे लक्षात येते. कारण वतनदार रयतेला लुटत होते हे राजांना माहीत होते. तथापि ही पद्धत बंद करण्यात खुप अडचणी होत्या. म्हणून राजांनी वतनदारांच्या बंडखोर व जुलमी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी काही नियम केले उदा. वतनदारांनी वाडे बांधू नयेत, सामान्य रयतेप्रमाणे रहावे, नाणी पाडू नयेत, किल्ले बांधू नयेत इ. अशा तऱ्हेने राजांनी वतनदारांची मिजासखोरी, अरेरावी व नसती हुकमत बंद करून त्यांच्या बंडखोरीला आळा घातला.

**१४.४.६ महसुलाच्या उत्पन्नाचा विनियोग** - स्वराज्याच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा संरक्षण व्यवस्थेवर खर्च होत असे. त्यामध्ये किल्ले बांधणे, तटांची व्यवस्था भक्कम करणे, तसेच रयतेच्या कल्याणासाठी काही उत्पन्न वापरले जात असे. त्यात शेतकऱ्यांना कर्ज देणे, गुरेढोरे, शेती कसण्यासाठी देणे, बी-बीयाणे पुरविणे, ओस पडलेल्या गावांमध्ये वस्ती निर्माण करण्यासाठी उत्तेजन देणे, जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली कशी येईल याकडे लक्ष देणे, शेतमालाचे

उत्पन्न व त्याचे वितरण योग्य प्रकारे कसे होईल यासाठी मदत करणे इ. कामे आपल्या उत्पन्नातून छत्रपती शिवाजी राजांनी 'रयत' केंद्रबिंदू मानून केलेत. खऱ्या अर्थाने शिवकाळात 'रयतेचे सरकार' होते वतनदारांचे किंवा श्रीमंतांचे नव्हते.

सभासद बखरीनुसार, 'शिवरायांचे महसुली उत्पन्न वार्षिक ७ लाख रू. होते.' इतिहासकार जदुनाथ सरकारांच्या मतें,' मुलकी व लष्करी प्रशासनावर शिवाजी राजांचे महसूली उत्पन्न मोठ्या प्रमाणात खर्च होत होते.

अशा तऱ्हेने सततच्या युद्धजन्य परिस्थितीतून शिवाजी राजांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवून एक आदर्श व प्रभावी अशी महसूल व्यवस्था व त्याची विनियोग पद्धती निर्माण केली होती.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. शिवाजी महाराजांच्या महसूल व्यवस्थेचे मुख्य स्त्रोत सांगा.

## १४.५ शिवकालिन न्यायव्यवस्था

शिवकाळात मराठ्यांची वेगळी व स्वतंत्र अशी न्यायदान व्यवस्था नव्हती. त्यांनी पूर्वी प्रचलित असलेली न्यायव्यवस्था स्वीकारून ती पुढे चालविली होती. या न्यायव्यवस्थेनुसार ग्राम पंचायत हे न्यायदानाचे सर्वात कनिष्ठ मात्र अत्यंत महत्त्वाचे केंद्र होते. गावातील कोणताही वाद तेथील पंचायती मार्फत सोडविला जाई. या पंचायतीला 'गोत' असे म्हणत. गोत पेक्षा वरीष्ठ न्यायदानाच्या केंद्राला 'देशक' असे म्हणत असत देशकाच्या निर्णयाविरूद्ध राजाने नेमलेल्या न्यायधिशाकडे अपील करता येत असे त्याहीपेक्षा वरिष्ठ न्यायदानाचे केंद्र म्हणजे स्वतः राजा होता. शिवकाळात गावातच न्याय मिळवण्याची व्यवस्था असल्याने लोकांच्या वेळचा व पैशाचा अपव्यय होत नसे.

**१४.५.१ केंद्रीय न्यायव्यवस्था** - शिवाजी राजांच्या केंद्रीय न्यायव्यवस्थेत राजा, राजमंडळ, हुजुर, मजलीस व गोतसभा (गोतमजलीस) या न्यायालयीन संस्था न्यायदानाचे कामकाज करीत असत.

**१. राजा** - शिवकाळात राजा हाच सर्व न्यायव्यवस्थेचा प्रमुख असे. राजमंडळात अष्टप्रधान मंडळ व ब्राहमसभा या दोन महत्त्वाच्या सभा असत. राजमंडळात अष्टप्रधान मंडळ, खाजगी सचिव त्याच्या हाताखाली काम करणारे दुय्यम मुतालिक इ. लोक असत. काही वेळा विद्वान लोकांना राजमंडळात सामील करून घेतले जाई. त्यांची नेमणूक स्वतः राजा करत असे. हिंदु धर्मशास्त्रानुसार राजा हाच न्यायखात्याचा प्रमुख होता, तर न्यायाधीश व पंडीतराव हे दोन मंत्री स्वतंत्रपणे न्यायदानाचे काम करीत असत.

केंद्रीय न्यायालयाचे कामकाज दोन पद्धतीने चालत असे. त्यातील पहीली पद्धत म्हणजे राजा स्वतः मंत्र्यांच्या मदतीने निकाल देत असे. त्याला 'राजमुद्रा' असे म्हणत. तसेच ज्यावेळी दरबारात उघडपणे खटल्याचे काम चालत असे त्यास 'धर्मसभा' किंवा 'हुजूर मजलिस' असे म्हणत. याज्ञवाल्यक्य स्मृतीला अनुसरून राजा सल्लागारांचे मत विचारात घेऊनच न्यायनिवाडा करत असे. तर स्थानिक स्वरूपाचा प्रश्न ज्या खटल्यामध्ये समाविष्ट असेल अशा वेळी राजा गोतसभेचा सल्ला घेत असे. फौजदारी स्वरूपाचे खटले मात्र स्वतः शिवाजी महाराज चालवित असत फिर्यादीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात असे.

**२. न्यायाधीश व पंडीतराव** - हे राजा खालोखालचे अधीकारी न्यायदान प्रक्रीयेतील होते. न्यायाधिशाने प्रचलीत असलेल्या कायद्यांचा विचार करून निकाल द्यावा असे त्याच्यावर बंधन असे. त्याने धर्मशास्त्राला अनुसरूनच निकाल देऊन त्या निकालावर राजाची संमतीदर्शक सही देण्याचे बंधन होते. न्यायाधीशाच्या जोडीला पंडीतराव हा एक दुसरा न्यायाधीश असे. त्याच्याकडे धार्मिक स्वरूपाचे खटले असत. काही खटले छत्रपती शिवाजीराजे न्यायाधीश व पंडीतरावांकडेच चालवायला देत असत. अशा अधिकाऱ्यांची निवड करत असताना बुद्धीमत्ता, प्रामाणिकपणा, निःपक्षपातीपणा, हिंदू कायद्याचे व रूढींचे ज्ञान असणे याकडे राजांचा कटाक्ष असे. कवी परमानंदांच्या मते, 'शिवाजीराजांना न्यायाधीशांबद्दल मोठा आदर वाटत असे. न्यायालयात त्यांना बसण्यासाठी उच्च आसन दिले जात असे.'

**३. राजमंडळ (राजसभा) :** शिवकालीन राजमंडळात, राजा, मंत्री व उच्च अधिकारी असत. या अधिकाऱ्यांमध्ये सुभेदार, हवालदार, मुजुमदार, सरनौबत हे सरकारी अधिकारी आणि देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, शेटे महाजन हे वतनी अधिकारी असत. न्यायाच्या बाबतीत राजाला सल्ला देण्याचे काम राजसभेला करावे लागत असे. राजाने अंतीम निकाल दिल्यानंतर जी 'राजमुद्रा' तयार होत असे त्यावर सही करणे हे राजसभेचे काम असे.

वतनासंबंधीचे खरेदी विक्री संबंधीचे व्यवहार व खटले, वतनाचे वारस ठरविणे, वतनासंबंधीचे भांडणे या सभेमार्फत सोडविली जात. गावमजलीस किंवा गावराज मंडळ, महालराज मंडळ, परगणा राजमंडळ व सुभा राजमंडळ अशा चढत्या श्रेणीने या राजमंडळाचे काम चालत असे.

### १४.५.२ प्रांतीय न्यायव्यवस्था -

**अ) सुभेदार** - सुभा राजमंडळामध्ये सुभेदार न्याय देण्याचे काम करीत असे, परंतु त्याने दिलेल्या निकालावर राजाची संमती दर्शक सही असल्याशिवाय निकाल अंतीम समजला जात नसे. दिवाणी व फौजदारी प्रकरणावर देखरेख ठेवत असे. वतनासंबंधीचे खटलेही चालवत असे.

**ब) देशमुख** - सुभेदाराला न्यायदानाच्या कामकाजात मदत करण्यासाठी देशमुख हा अधिकारी असे. काहीवेळा गावकीच्या हक्कासंबंधी बलुतेदारांमध्ये भांडण होत असे तेव्हा ही भांडणे सोडविण्याचे कामही सुभेदार व देशमुखांना करावे लागे. अशा वेळी सुभा मजलीसची सभा कसब्याच्या ठिकाणी बोलविली जात असे. या सभेला अधिकाऱ्यांबरोबरच बलुतेदारांनाही बोलविले जात असे.

**क) हवालदार** - हवालदार हा निश्चित स्वरूपाच्या पगारावर काम करणारा सरकारी अधिकारी होता. त्याला ठाणा मजलीसच्या मदतीने काम करावे लागत असे. मजलीसच्या कामावर देखरेख ठेवणे, गावच्या सरहद्दीसंबंधीचे तंटे सोडविणे, इनामी वतनासंबंधीच्या तक्रारी दूर करणे, हे हवालदाराचे मुख्य काम असे. महाल किंवा ठाणा मजलीसची सभा बोलावून तिच्या मदतीने न्यायदानाचे काम हवालदार करीत असे. पोलीस अधिकारी म्हणून त्याला काम करावे लागत असे. अशावेळी त्याला बरेच न्यायालयीन अधिकार प्राप्त होत असत तुरुंगाच्या व्यवस्थेवरच त्याला देखरेख ठेवावी लागत असे.

**ड) मुकादम** - शिवकाळात ग्राममजलीस हे स्थानिक न्यायव्यवस्थेतील सर्वांत कनिष्ठ न्यायालय होते. त्यामध्ये मुकादम, चौगुला व मुजूमदार हे अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावत असत.

गावचा मुख्य मुकादम किंवा पाटील याच्याकडे शिवकाळात मुलकी व न्यायालयीन असे दोन्ही अधिकार असत. गावातील गोतसभेचा तो अध्यक्ष असे. गावातील लोकांच्या वतनासंबंधीच्या तक्रारींचा गोतसभेच्या मदतीने निर्णय देण्याचे काम मुकादम करीत असे. दोन गावातील सरहद्दी संबंधीच्या तक्रारी तो गोतसभेच्या सहाय्याने सोडवित असे.

**इ) चौगुला** - हा ग्राममजलीस मधील एक महत्त्वाचा घटक असे. ग्राममजलीस मध्ये खटल्याचे कामकाज चालवित असताना गावचा चौगुला त्यावेळी हजर असे व निकालपत्र तयार झाल्यावर त्यावर तो सही करत असे.

**ई) मुजूमदार** - चौगुल्या प्रमाणे ग्राममजलीस मध्ये निवाडयाच्या वेळी हजर राहून निकालपत्र तयार झाल्यावर त्यावर तो सही करीत असे.

**१४.५.३ ब्राह्मसभा** - डॉ. व्ही.टी.गुणे यांच्या मते, 'ब्राह्मसभा किंवा धर्मसभा ही ग्राममजलीस किंवा परगणामजलीस यांचेच विकसीत रूप होय.' शिवकाळातील ब्राह्मसभा ही विद्वान ब्राह्मणांची सभा असे. तिची बैठक पैठण, कोल्हापूर, पंढरपूर यासारख्या तीर्थस्थळी भरत असे. या सभेपुढे सर्वसाधारणपणे सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे खटले चालविण्यासाठी येत असत. त्यामध्ये पुजाऱ्यांचे मंदीरांसंबंधीचे खटले, धर्माधिकाऱ्यांचे खटले, दोन जातीजमातींमधील भांडणे, हिंदू मुस्लिम धर्मियातील भांडणे इ. प्रकारचे खटले सोडविले जात असे. काही वेळा न्यायदानासाठी काशीच्या विद्वान ब्राह्मणांचाही सल्ला घेतला जात असे.

**१४.५.४ न्यायदानाच्या कामकाजाचे स्वरूप** - सर्वसाधारणपणे कोणतीही तक्रार प्रथम ठाणा मजलीसच्या हवालदारापुढे किंवा परगण्याच्या प्रमुख अधिकाऱ्यापुढे आणली पाहिजे अशा पद्धत असे. हवालदार या संदर्भात ब्राह्मसभा व जातीसभा यांच्याशी चर्चा करीत असे त्यानंतर ही तक्रार कोणत्या सभेच्या अधिकार क्षेतात येते हे ठरवून ती संबंधीत सभेकडे सोपविली जात असे. मात्र सर्वसाधारणपणे तक्रार किंवा घटना ज्या ठिकाणी घडली असेल त्याच ठिकाणी तिचा निकाल लावण्याकडे कल असे.

मजलीस ही बहुधा गावच्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर, काही वेळा देशमुखाच्या घरी, कधी देवळात कधी चावडीवर भरत असे. तर काही वेळा तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीही मजलीसचे कामकाज चालत असे. मजलीसच्या मुखियाला सभानायक असे म्हणत. शास्त्र आधार

व इतर परंपरा असणारी तज्ञ मंडळी एकत्र येत असत त्यांना परीक्षक अथवा 'प्रासनिक' किंवा 'महाप्रासनिक मायेवत' असे म्हणत. एखादा खटला कोणत्या सभेपुढे चालवायाचा हे निश्चित झाल्यावर 'करीना' किंवा 'तकरीर' लिहीली जात असे. खटल्याचे कामकाज सुरू झाल्यावर करिन्यामध्ये लिहिलेली तक्रार मजलीसपुढे वाचून दाखविली जात असे. बचाव करण्याची संधी दिली जात असे. जर आरोपीने गुन्हा कबूल केला तर मजलीसचे काम लवकर पूर्ण होत असे व जर नाकबूल केला तर हे प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविले जात असे.

आरोपीने गुन्हा कबुल केल्यानंतर मजलीसचा निर्णय कायम समजून आरोपीकडून राजीनामा लिहून घेतला जाई. त्यावर एक-दोन साक्षीदारांच्या सह्या घेतल्या जात. मजलीसाचा निकाल कायम झाल्यावर त्या निवाडापत्राची एक प्रत तयार करून त्यावर हजर असणारे सर्व वतनदार आपआपले चिन्हे उमटवित त्याला 'महजर' असे म्हटले जाई. महजरांची अंमलबजावणी मजलीसला हजर असणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याकडे असे. तो अधिकारी आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना संबंधीत महजरसंबंधी लेखी सूचना पाठवित असे. अशा रितीने खटल्याच्या निकालाची अंमलबजावणी होत असे. अशा प्रकारे शिवकालीन न्यायव्यवस्था ही जुन्या धर्मग्रंथांवर आधारित होती. काही नवीन पद्धती न्यायव्यवस्थेत आणल्या असल्या तरी जुन्या परंपरा तशाच अस्तित्वात होत्या.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. शिवाजी राजांच्या केंद्रीय न्यायव्यवस्थेतील अधिकारांचे कर्तव्ये व जबाबदारीचे वर्णन करा.

## १४.६ शिवकालीन लष्करी व्यवस्था

छत्रपती शिवाजी राजांनी स्वपराक्रमाने स्वराज्याची स्थापना केली होती. या स्वराज्याच्या रक्षणासाठी व त्याच्या विस्तारासाठी कार्यक्षम सैन्याची निर्मिती शिवाजी राजांनी केली. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वताच्या रांगा व त्यावरील घनदाट जंगलाचा पुरेपुर उपयोग करून घेण्यासाठी त्यांनी गनिमी काव्याचे तंत्र विकसित करून अत्यंत कौशल्याने त्याचा वापर केला. सैन्याची व्यवस्था सेनापती (अष्टप्रधान मंडळातील मंत्री) बघत होते तरीही स्वतः राजे आपल्या सैन्याचे सरसेनापती होते. त्यांच्या सैन्यात पायदळ, घोडदळ, हत्तीदळ, उंटदळ, राजांचे अंगरक्षक दल व हेरखाते असे विविध विभाग होते. स्वराज्याच्या रक्षणासाठी किल्ल्यांची निर्मिती व स्वतंत्र्य आरमाराचीही निर्मितीही त्यांनी केली होती.

**१४.६.१ - पायदळ** - महाराष्ट्रातील डोंगरदऱ्यात गनिमी काव्याच्या तंत्रासाठी पायदलाचा जास्त उपयोग होत असल्याने छत्रपती शिवाजी राजांनी पायदलावर अधिक भर दिला. पायदळात मावळ प्रांतातील काटक मावळे सैनिक भरलेले होते. ते गनिमी काव्याच्या तंत्रात विशेष वाकबदार

होते. मुघलांच्या सैन्यातील दोष व उणिवा छत्रपती शिवाजी राजांनी हेरल्या होत्या. त्या उणिवा व दोष त्यांनी आपल्या सैन्यातून दूर करण्याचा प्रयत्न केला होता. विद्यूत वेगाने हालचली करणारे मावळे सैनिक त्वरीत एखाद्या ठिकाणी जमू शकत व तेथून त्याच वेगाने सर्वत्र पांगत असत. पायदळातील सैनिकांची संघटना अत्यंत साधी होती. दर १० सैनिकांवर एक नाईक, दर ५ नाईकांवर एक हवालदार, दर दोन - तीन हवालदारांवर एक जूमलेदार, दर दहा जुमलेदारांवर एक हजारी व दर सात हजाऱ्यावर एक सरनोबत अशी पायदळातील सैनिकांची श्रेणी होती. मावळा सैनिकांकडे ढाल, तलवार, जाबिया, खंजिर व भाले अशी साधी हत्यारे असत. ९१ कलमी बखरीनुसार दोन लाख पायदळ शिवाजी राजांचे होते.

**१४.६.२ घोडदळ** - छत्रपती शिवाजी राजांच्या घोडदळात दोन प्रकारच्या घोडेस्वारांचा समावेश १) बारगीर २) शिलेदार बारगीरांना सरकारमार्फत घोडे पूरविले जात. शिलेदारांकडे होता. स्वतःच्या मालकीचे घोडे होते व त्यांच्या दाणा - वैरणीचा तसेच नालाबंदीच्या खर्चाचीही ठराविक रक्कम शिलेदारांना सरकारमधून देण्यात येई. दर पंचवीस घोडेस्वारांच्या गटावर एक हवालदांर, दर ५ हवालदारांवर एक जुमलेदार, दहा जूमलेदारांवर १ हजारी, ५ हजाऱ्यांवर एक पंचहजारी व सर्व पंचहजारी सरनोबताच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असत. घोडेस्वाराच्या प्रशिक्षणाचीही व्यवस्था करण्यात आलेली होती. सभासद व चिटणीस बखरीनुसार १ लाख घोडदळ छत्रपती शिवाजी राजांचे होते.

**१४.६.३ छ. शिवाजी महाराजांचे अंगरक्षक दळ** - या दलातील रक्षकांची निवड छत्रपती शिवाजी राजे स्वतः करीत असत. सशक्त, सुदृढ, चपळ, आज्ञाधारक व विश्वासू इ. विशेष कडक कसोट्यांना उतरणाऱ्यांनाच या दलात सामील करून घेतले जाई. या दलाची संघटना पायदळ व घोडदळाप्रमाणेच होती. प्रत्येक रक्षक आपल्या कपाळी एक मोठा टिळा लावत असत. राजांच्या रक्षणासाठी प्राणपणाला लावण्याच्या निश्चयाचेच ते जणू प्रतिक असे. छत्रपती शिवाजी राजांच्या आयुष्यातील अनेक बिकट प्रसंगी या दलातील अंगरक्षकांनी त्यांचे रक्षण केले होते. उदा. अफजलखान भेटीच्या प्रसंगी जीवा महाला या रक्षकाने राजांचे प्राण वाचविले होते. 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' या उक्तीने जीवा महालाचे ते कृत्य मराठ्यांच्या इतिहासात नोंदले गेले आहे. तसेच सुरतेवरील हल्ल्याच्या प्रसंगी राजांवर इनायत उल्लाखानाने अचानक हल्ला केला होता, तो त्यांच्या अंगरक्षकाने परतवून लावल्यामुळेच राजांचे प्राण वाचले होते. आग्रा येथील तुरुंगातील प्रसंगी तसेच सुटका व त्यानंतरच्या प्रवासातही रक्षकांनी प्राणाची पर्वा न करता राजांचे रक्षण केले होते.

**१४.६.४ हत्ती व उंटदळ** - तत्कालीन कागदपत्रांवरून हत्ती व उंटदळाचा लष्करात समावेश असला तरी हे लडाखु दल नव्हते. फक्त रसद धान्य, दारूगोळा व तोफा वाहून नेण्या-आणण्यासाठी त्यांचा वापर केला जात असे. सभासद बखरीनुसार हत्ती १२५० इतके होते तर चिटणीस बखरीनुसार उंटांची संख्या १००० ते १५०० च्या दरम्यान होती.

**१४.६.५ हेरखाते** - छत्रपती शिवाजी राजांनी हेरखात्याची गरज ओळखून बहिर्जी नाईकाच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र हेरखात्याची नेमणूक केली होती. परिणामकारक सैनिकी कारवाईसाठी, यशस्वी मोहिमांसाठी, शत्रूपक्षाची, त्याच्या सैन्यबळाची, त्यांच्या ठिकाणाची अद्यावत माहिती मिळविण्याचे काम हे हेर खाते करत असे. सैनिकी मोहीमांपूर्वी गुप्तहेरांकडून राजे माहिती मिळवत असत व नंतरच मोहिमेवर निघत असत. उदा. अफजलखान भेटीच्या पूर्वी त्याच्या

सैन्याची इत्यंभूत माहिती फकीरच्या वेशात विश्वासराव प्रभूने घेतली होती. कर्नाटक स्वारी पूर्वीही हेरांनी अशीच उपयुक्त माहिती मिळविली होती. सुरत लुटीपूर्वीही तेथील संपत्तीचा अचूक अंदाज हेरांनी घेतला होता.

**१४.६.६ तोफखान** - हिंदुस्थानातील अन्य राज्यकार्त्यांप्रमाणेच मराठेही तोफखान्याच्या वापरात मागे राहीले होते. छत्रपती शिवाजी राजांच्या काळात लष्करात तोफखाना हा एक स्वतंत्र विभाग होता. दारूगोळ्याचाही एक वेगळा प्रशासकीय विभाग होता. तथापि दारू गोळ्यासाठी छत्रपती शिवाजी राजांना पूर्णपणे युरोपियन व्यापाऱ्यांवर विसंबून राहावे लागत असे कारण राजांकडे तोफा व बंदूका बनविण्याचे कारखाने नव्हते. राजांच्या तोफखान्यात परदेशी व भारतीय अशा दोन्हीही बनावटीच्या तोफा होत्या. जेजाला, झंबरूक व शुतरनाल या नावाने या तोफा ओळखल्या जात. भारतीय बनावटीच्या अर्थातच ओबडधोबड असून त्यात दगडांचा किंवा लोखंडी गोळ्याचा वापर केला जाई. तोफा व दारूगोळा खरेदीकरिता राजांनी पोर्तुगीज व्यापाऱ्यांना मध्यस्ती म्हणून मान्यता दिली होती. असे असले तरी पोर्तुगीजांशी झालेल्या करारांत मात्र या विषयीचा कोणताच उल्लेख नव्हता.

**१४.६.७ - सैन्यविषयक नियम** - अत्यंत दूरदर्शी व धोरणी असलेल्या राजांनी सैन्याच्या सुयोग्य संघटनेचे व शिस्तिचे महत्त्व ओळखले होते. त्यासाठी आवश्यक ते नियमही त्यांनी केले होते. या नियमांची अंमलबजावणीही अत्यंत कडकपणे केली जाई. त्यांनी केले सैन्यविषयक काही नियम पुढीलप्रमाणे -

१. पावसाळ्यात सैनिकांच्या प्रशिक्षणावर भर देण्यात येई.

२) पावसाळा संपल्यावर दसऱ्याच्या मुहूर्तावर सैन्य मोहिम पार पाडण्यासाठी बाहेर पडे.

३) स्त्रिया, मुले, नाचगाणी करणारे, तमासगीर व अन्य बाजार बुनग्यांना मोहिमेवर नेण्यास बंदी होती.

४) मोहिमेवरील सैनिकांना मोहिमेच्या वेळी शिस्तीच्या सर्व नियमांची कडक अंमलबजावणी केली जाई. या नियमांचा भंग करणाऱ्या सैनिकांवर कडक कारवाई केली जाई.

५) मोहिमेतील पराक्रमाबद्दल इनामी जहागीरी ऐवजी रोख पैसे रूपाने बक्षीस सुरू केले होते.

**१४.६.८ किल्ले** - स्वराज्याच्या स्थापनेत किल्ल्यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. स्वराज्यात लहान मोठे मिळून २४० किल्ले होते. त्यापैकी १११ किल्ले राजांनी बांधून घेतले होते. किल्ले तीन प्रकाराचे होते. ते म्हणजे गिरी दुर्ग, स्थल दुर्ग, जल दुर्ग होय. प्रत्येक किल्ल्यावर तीन अधिकारी होते. हवालदार किल्ल्याचे संरक्षण करीत असे, सबनीस जमाखर्च पहात असे तर कारखानीस किल्ल्यावरील सर्व भांडारांचा प्रमुख असे. प्रत्येक अधिकाऱ्याच्या बदल्या होत असत. रामोशी जातीकडे किल्ल्यास गस्त घालण्याचे काम होते. शत्रूबद्दलची पहिली बातमी तेच देत असत. प्रत्येक किल्ला चांगला रक्षिला जावा म्हणून तटसरनोबतच्या नेतृत्वाखाली लढाऊ शिबंदी ठेवली जात असे. किल्ला व त्याचा परिसर हे एक स्वयंपूर्ण छोटे खेडे होते. असेच त्याचे स्वरूप होते.

**१४.६.९ युद्धतंत्र** - गनिमी कावा हे शिवकालीन लष्कराचे मुख्य लष्करी युद्धतंत्र होते. जेथे शक्ती कमी तेथे हे गनिमी काव्याचे युद्धतंत्र वापरले जात असे. अचानक छापा घालणे, शत्रूची

माणसे कापून काढणे, शत्रू सावध होण्यापूर्वी पळून जाणे, शत्रूची रसद लूटणे, शत्रूच्या मुलखात जाळपोळ करणे, शत्रूस सळो की पळो करून सोडणे, ही गनिमी काव्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती. समोरासमोरच्या लढाया शिवाजी महाराजांनी शक्यतो टाळलेल्या दिसतात. कारण त्यामुळे मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर होत असे.

**१४.६.१० आरमार** - छत्रपती शिवाजी राजांच्या आरमाराबद्दल आज्ञापत्रात विस्तृत माहिती आलेली आहे. १६५९ मध्ये राजांनी आरमार बांधण्यास सुरूवात केली. भिवंडी, कल्याण, पनवेल या ठिकाणी लढाऊ जहाजे बांधली जात होती. लहान लहान जहाजे निर्माण करण्यावर राजांनी अधिक भर दिला होता. राजांच्या आरमारात गुराब, गलबत, शिवाड, तरांडी, तारू, पगार, तिरकाठी या नावाची लहान मोठी जहाजे होती. राजाच्या आरमारातील जहाजांची संख्या काही इतिहाकारांच्या मते ५०० तर काहीच्या मते ७०० इतकी होती. दर्यासारंग व मायनाक या दोन अधिकाऱ्यांच्या ताब्यात २०० जहाजांचे आरमार होते. इंग्रज देखील राजांच्या आरमाराची वाढती ताकद पाहून हबकून गेले होते. मराठ्यांच्या वाढत्या आरमारी शक्तीमुळे इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी या तिनही परकीय सत्ता वचकून होत्या.

राजांच्या आरमार निर्मितीमुळे हजारो लोकांना रोजगार मिळत होता. हजारो लोक दुर्ग व जंजिरे बांधण्यासाठी व जहाजे बांधण्यासाठी मोठे कष्ट घेऊ लागले होते. कोळी, भंडारी, पाचकळशी, सोमवंशी, मुसलमान, ख्रिश्चन अशा विविध जातींना आरमारात नोकऱ्या मिळाल्या होत्या. आरमारात मुस्लिम अधिकाऱ्यांची संख्या जास्त होती. दौलतखान हा राजांचा नौदलप्रमुख होता. कोकणपट्टीच्या समुद्रकिनाऱ्यावर राजांनी विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधदुर्ग, पदमदुर्ग यांसारखे किल्ले बांधले होते.

**१४.६.११ राष्ट्रीय लष्कराची निर्मिती** - लष्करी क्षेत्रात राजांची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे त्यांनी निर्माण केलेले राष्ट्रीय लष्कर होय. छत्रपती शिवाजी राजांनी आपल्या लष्करात मराठे, मावळे, हेटकरी, ब्राह्मण, रामोशी, महार, मांग, कोळी, भंडारी इ. अनेक जाती जमातींना सामावून घेतल्याने व या सर्वामध्ये स्वराज्यप्रेम निर्माण केल्याने राजाचे लष्कर ‘राष्ट्रीय लष्कर’ बनले होते. इतिहासकार डॉ. सेन या संदर्भात म्हणतात. ‘त्या काळात ज्या अस्पृश्य महार जमातीस घराच्या भिंतीच्या आतच आपले जीवन व्यतीत करावे लागत असे त्या महारांच्या खांद्याला खांदा लावून ब्राह्मण लढत असल्याचे चित्र छत्रपती शिवाजी राजांच्या लष्करात दिसते.’

**आपली प्रगती तपासा :**

प्र.५. छत्रपती शिवाजी राजाच्या घोडदळ व पायदळाची रचना सांगा.

## १४.७ सारांश

शिवकालीन प्रशासन व्यवस्थेचा विचार करता असे लक्षात येते की, छत्रपती शिवाजी राजे हे अत्यंत कसलेले कुशल प्रशासक, राष्ट्रनिर्माते, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, लोक कल्याणकारी, दूरदृष्टी असणारे, न्यायी, आदर्श महसूल व्यवस्था अमलात आणणारे व राष्ट्रीय लष्कराची शिस्तबद्ध निर्मिती करणारे राजे म्हणून मराठ्यांच्या इतिहासात अजरामर असे व्यक्तीमत्व आहे.

## १४.८ प्रश्न

१) शिवकालीन मूलकी व महसूल व्यवस्थेचा आढावा घ्या.

२) शिवकालीन न्याय व लष्करी व्यवस्थेचा आढावा घ्या.

३) टीपा लिहा :

   अ) शिवाजी महाराजांचे आरमार

   ब) अष्टप्रधान मंडळ

## १४.९ संदर्भपुस्तके

१. प्रा. सावंत बी. एस, व प्रा. जाधव व्ही. के मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास, विद्याप्रकाशन, नागपूर (१९९७)

२. प्रा. डॉ. कोलरकर मराठ्यांचा इतिहास - मंगेश प्रकाशन, नागपूर (२००३)

३. प्रा. तांबोळी, प्रा. पवार, प्रा. राजदेव, प्रा. रुपनवर - मराठ्यांचा इतिहास निराली प्रकाशन, पूणे (२००४)

४. डॉ. काळे वा. मराठ्यांचा इतिहास, प्राचीन प्रकाशन, मुंबई (१९९८)

५. कुलकर्णी अ. रा. व. खरे ग.ह. मराठ्यांचा इतिसाह - कॅन्टिनेन्टल प्रकाशन, पूणे (१९८४)

६. प्रा. महल्ले व प्रा. पाठक - मराठा सत्तेचा इतिहास, विद्याप्रकाशन नागपूर (१९९७)

❖❖❖❖

# १५

# पेशवेकालीन प्रशासन व्यवस्था

**अनुक्रमणिका**

१५.१ उद्दीष्टे
१५.२ प्रस्तावना
१५.३ मुलकी प्रशासन
१५.४ महसूली व्यवस्था
१५.५ न्यायदान पद्धती
१५.६ लष्करी व्यवस्था
१५.७ सारांश
१५.८ प्रश्न
१५.९ संदर्भ

## १५.१- उद्दिष्टे

१. पेशवेकालीन मुलकी प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.
२. पेशवेकालीन महसूल प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास करणे.
३. पेशवेकालीन न्यायदान पध्दती अभ्यासणे.
४. पेशवेकालीन लष्करी व्यवस्था अभ्यासणे.

## १५.२ प्रस्तावना

छत्रपती शिवाजी राजांनी कालानुरूप जी राज्यव्यवस्था निर्माण केली होती त्यात अनेक बदल पेशव्यांनी केले. पेशवेकाळात साताऱ्याच्या छत्रपतीचे महत्त्व हळूहळू कमी होत गेले व पेशव्यांच्या हातात सर्व सत्ता गेली. वास्तविक शिवाजी राजांच्या काळात पेशवे हे पद अष्टप्रधानांपैकी एक होते. परंतु बाळाजी विश्वनाथाच्या कारकीर्दीपासून पेशवेपद हळूहळू सत्तेचे केंद्रच बनले. मराठ्यांच्या स्वराज्याचे पेशवाईत साम्राज्यात रूपांतर झाले. राज्याचे सर्व सुत्रे पेशव्यांच्या हाती गेली. तरीही छत्रपतींना सार्वजनिक समारंभ व दरबारांमध्ये अतिशय मान होता. पेशवेकालीन राज्यव्यवस्था ही प्राचीन भारतातील राजकीय तत्वे, शिवकालीन प्रशासन व्यवस्थेतील तत्वे व वेळच्या वेळी पेशव्यांनी बदललेल्या तत्वांवर अवलंबून होती.

## १५.३ मुलकी प्रशासन व्यवस्था

पेशवेकालीन प्रशासनव्यवस्थेत मराठी राज्याचा प्रमुख छत्रपती होता. केंद्रशासन, प्रांतीय शासन व ग्रामप्रशासन हे मुलकी प्रशासनाचे आधारस्तंभ होते.

**१५.३.१ छत्रपती** – पेशवे काळातही छत्रपती पदाला अगदी आदराचे व मानाचे स्थान होते. घटनात्मक प्रमुख हा छत्रपतीच होता. छत्रपती शाहूराजांनीच बाळाजी विश्वनाथाला पेशवेपद बहाल केले. शाहूराजांच्याच कारकीर्दीत मराठा राज्याचा विस्तार होत गेला. शाहूराजांच्या निधनानंतर मात्र त्या पदावर योग्य व्यक्ती न आल्याने पूर्वीच्या छत्रपतीचा धाक व प्रतिष्ठा कायम राहीला नाही. पेशव्यांनी मात्र छत्रपतीचा सन्मान राखण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला.

**१५.३.२ पेशवा** - मराठ्यांच्या राज्यकारभारात पेशवापद हे अत्यंत महत्त्वाचे व प्रतीष्ठेचे समजले जाई. किंबहुना मराठी राज्याचा कारभार खऱ्या अर्थाने पेशवाच पहात असे. अंगी कर्तबगारी असल्याशिवाय या पदावर टिकून राहणे अत्यंत कठीण होते. शिवकाळात पेशवे पद वंशपरंपरागत नव्हते. कर्तबगार व्यक्तीचीच या पदावर नेमणूक होत असे. बाळाजी विश्वनाथ हा भट घराण्यातील पहिला पेशवा. परंतु पेशवे पदावरील सातवा पेशवा होता. भट घराण्यातील पेशवे इतके कर्तबगार निपजले की शेवटी त्यांनी छत्रपतीलाही निष्प्रभ केले. सर्व पेशव्यांमध्ये पहिल्या माधवरावाला राज्यकारभारासंबंधी विषेश दृष्टी होती. त्याच्याच काळात मराठ्यांना योग्य न्याय देणारा राज्यकारभार प्रस्थापित करता आला. भट घराण्यापासून पेशवेपद वंशपरंपरागत बनले.

**१५.३.३ हुजुर दफ्तर** - मराठी राज्यकारभाराच्या प्रमुख केंद्राला हुजूर दफ्तर किंवा सचिवालय असे म्हणत. दफ्तराचा कारभार पुण्याला चालत असे. दफ्तरात २०० कारकून काम करीत असत. हे कारकून ज्या ठिकाणी काम करत असत त्याला ‘फड’ असे म्हणत. राज्यकारभाराची सर्व कागदपत्रे या ‘फड’ मध्ये जपून ठेवत असत. यामध्ये महसूलविषयीची कागदपत्रे, अबकारी कागदपत्रे तसेच सर्व प्रांतांचा संभाव्य जमाखर्चाचा ‘तर्जमा’ याच ठिकाणी असे. हुजूर दफ्तराच्या कार्यपद्धतीत नाना फडणीसाने अनेक सुधारणा केल्या. सोयीसाठी या दफ्तराचे अनेक भाग करण्यात आले त्यापैकी चालते दफ्तर – बेरजी दफ्तर ही दोन महत्त्वाची दफ्तरे होती.

**अ) चालते दफ्तर** - हे फडणीसाकडे असे. या दफ्तरात बेहडा, फड, सरंजाम असे विभाग असत. फडामध्ये सर्वप्रकारच्या रोजकीर्दि ठेवल्या जात असत. बेहडा विभागात प्रत्येक खेडे व सुभा यांचे जमाखार्चाचे अंदाज तयार केले जात असत. सरंजामी विभागामध्ये सरंजामदाराचे सर्व हिशोब ठेवले जात.

**ब) बेरजी दफ्तर** - हुजूर दफ्तरातील हाही महत्त्वाचा उपविभाग होता. ते कायमस्वरूपी पुण्यालाच होते. यामध्ये सर्व जमाखर्च व शिल्लक दाखविली जात असे. हिशोबाच्या खतावण्या या दफ्तरातच तयार करत असत. त्यामुळे अधिकाऱ्यांना प्रांतीय  व ग्रामप्रशासनात अडचणी येत नसत.

**१५.३.४ प्रांतीय प्रशासन** - राज्याची अनेक प्रांतामध्ये विभागणी करण्यात आली होती. प्रांतालाच सरकार, सुभा वा प्रांत असे म्हणत. मामलेदार किंवा सुभेदार हा प्रांतांचा जबाबदार

अधिकारी असे तर कमाविसदार हा परगण्याचा प्रमुख असे. परगण्याच्या उपविभागास महाल किंवा तर्फ असे म्हणत. त्यावर हवालदार, तर्फदार किंवा महलकरी नावाचे अधिकारी असत.

**अ) सरसुभेदार** - पेशवेकाळात प्रांताचा सर्वोच्च अधिकारी सरसुभेदार हा होता. राजधानीपासून लांब असलेल्या प्रांताचा राजयकारभार पहाण्यासाठी पेशव्याकडून सरसुभेदाराची नेमणूक होत असे. सरसुभेदाराच्या कामाचे स्वरूप निरनिराळ्या प्रांतात भिन्न - भिन्न होते. कर्नाटकातील सुभेदारास महसूल व्यवस्थेकडे लक्ष द्यावे लागत असे. तसेच मामलेदारांच्याही नेमणूका करण्याचा अधिकार त्याला असे. परंतु खांदेशातील सरसुभेदाराला मामलेदाराच्या कामावर देखरेख ठेवून त्या प्रांताचा सर्व हिशोब केंद्राला सादर करावा लगात असे.

**ब) सुभेदार** - कार्यक्षम व लायक व्यक्तीचीच सुभेदारपदी नेमणूक होत असे. नेमणूकाच्या वेळी पेशवे सुभेदारांना जबाबदारी व कर्तव्य विषयीच्या सुचना देत असत. प्रांतात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, सार्वजनिक पैशाचा अपव्यय टाळणे, प्रांताचा आर्थिक व न्यायालयीन व्यवहार बघणे इ. कामे सुभेदाराला करावी लागत.

**क) मामलतदार** - हा परगण्याचा अधिकारी असे. एलफिन्स्टच्या मते, ''मामलतदार हे प्रांतातील मोठ्या विभागाचे तर कमावीसदार हे लहान विभागाचे मुख्य अधिकारी असत. ते पेशव्यांचे परगण्यातील प्रतिनीधी होते.'' मामलतदाराची नेमणूक ही कायमची नसे. तो जोपर्यंत प्रामाणिकपणे व जबाबदारीने काम करी तोपर्यंत तो आपल्या पदावर राहू शकत असे. अप्रामाणिक व बेजबाबदार व्यक्तींना काढून त्याजागी दुसऱ्या योग्य व्यक्तीची नेमणूक होत असे. प्रांतातील शेती व्यवसायाला प्रोत्साहन देणे, शेतकऱ्यांना कर्जाची व्यवस्था करणे, जमिन महसूल जमा करणे, दिवाणी दावे निकालात काढणे, किल्ल्यांच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणे, परगण्यातील आरमारावर देखरेख ठेवणे, प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे इत्यादी कामे मामलतदाराला करावी लागत असत.

**ड) कमाविसदार** - हा देखील परगण्याचा अधिकारी असे. कमाविसदाराला त्याच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाच्या उत्पन्नाच्या ४% मेहनताना मिळत असे. जमिन महसूल गोळा करणे, महसूली उत्पन्न वाढविणे, रयतेचे कल्याण साधणे, परगण्याच्या प्रशासनावर देखरेख ठेवणे इ. कामे तो करत असे.

**इ) दरखदार** - मामलतदार व कमाविसदारांच्या कामावर अप्रत्यक्ष देखरेख दरखदार ठेवत असत. हे अधिकारी पेशव्यांनी नेमलेले असत. प्रांतीय प्रशासनाच्या सर्व विभागावर यांची देखरेख असे. दरखदारांमध्ये दिवाण, मुजूमदार, फडणीस, दफ्तरदार, पोतनिस, पोतदार, जमेनीस व अमीन या आठ अधिकाऱ्यांचा समावेश होता की जे प्रत्यक्षरीत्या मध्यवर्ती शासनाला जबाबदार असत.

**ई) हवालदार** - परगण्याच्या उपविभागास महाल किंवा तर्फ असे म्हणत. हवालदार हा महालाचा प्रमुख असे. मुजूमदार व फडणीस हे दोन अधिकारी त्याच्या मदतीला असत.

**१५.३.५ ग्रामीण प्रशासन** - ग्रामीण प्रशासनात पाटील, कुलकर्णी, चौगुला, महाल, पोतदार नावाचे अधिकारी काम करीत असत. पेशव्यांच्या राज्यकारभाराचा प्रमुख कणा खेडेगाव होते.

खेड्यात स्वयंपूर्ण समाज होता. खेड्याला कसबा, मौजे, मजरे असेही म्हणत. पाटलाच्या मदतीला कुलकर्णी असत. कुलकर्णी पदही पाटलाइतकेच महत्त्वाचे असे. गावच्या गरजा भागविण्यासाठी बारा जणांचे एक मंडळ असे त्याला 'बारा बलूत' असे म्हणत. गावातील सर्व जातींचे प्रतिनीधी या मंडळात असत. सुतार, लोहार, चांभार, महार, कुंभार, न्हावी, परीट, मांग, भट, गुरव व मुलाणी यांना बलुते म्हणत.

महार, रामोशी, तराळ हे पाटील व कुलकर्णी यांना सरकारी कामात मदत करीत व रयतेच्याही उपयोगी पडत असत. थोडक्यात पाटील हा गावचा राजाच असे. जमिन महसूल वसूल करणे, सारा ठरविणे, तंटे मिटविणे इ. कामे त्याला करावी लागत. कुलकर्णी गावचे दप्तर सांभाळीत असत. त्यात जमिनीचे मोजमाप, वर्णन यांचा समावेश असे.

महाराकडे शेताच्या हद्दीवर व पिकांवर लक्ष ठेवण्याचे काम असे. चौगुला, पाटील व कुलकर्णीला मदत करीत असे पोतदार नाण्यांचा दर्जा, वजन तपासत असे. अशा प्रकारे ग्रामप्रशासनाला सरकार शक्यतोवर कोणताही धक्का लावीत नसे. खेड्याला अंतर्गत स्वाययत्ता देण्यात आली होती.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. पेशवेकालीन प्रांतीय प्रशासन व्यवस्थेचे वर्णन करा.

प्र. २ पेशवेकालीन ग्राम प्रशासन व्यवस्थेवर चर्चा करा.

## १५.४ महसूल व्यवस्था

सुप्रद्धिस इतिहासकार डॉ. सेन यांनी मराठ्यांच्या महसूल व्यवस्थेची स्तुती केलेली दिसते. मराठी राज्यकर्ते रयतेकडून कर वसूल करीत पण प्रजेचे कल्याणही साधले पाहिजे, ही पण त्यांची तळमळ होती. कर देण्याच्या मोबदल्यात प्रजेचा तितकाच फायदा झाला पाहिजे, असा पेशव्यांचा दृष्टिकोन होता.

**१५.४.१ जमीन महसूल -** वा. कृ. भावे म्हणतात, 'पेशवाईत सरकारी वसूलाच्या पुष्कळ बाबी असल्या तरी त्यात सर्वात महत्त्वाची जमीन महसूल बाब होती.' पेशवेकाळात जमीन महसूल ही उत्पन्नाची प्रमुख बाब असल्याने पेशव्यांनी शेती व्यवसायाला प्रोत्साहन देऊन जमीन महसूल वाढविण्याचा प्रयत्न केला. महसूल निश्चिती करतांना प्रत्यक्ष पीक पहाणी करूनच सारा आकारणी करत. जमिनीची वर्गवारी करून सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन मुख्य भाग पाडले जात असत. शिवाय काळी जमीन, डोंगराळ जमीन, बागाईत, जिराईत, पाटस्थळ, मोटस्थळ, आमराई इ. प्रकारही जमीनीचे पाडलेले होते व त्यानुसार धान्याच्या व रोख रकमेच्या स्वरूपात

महसूल वसूल केला जात असे. काळ्या कसदार जमिनीवर जास्त तर डोंगराळ जमिनीवर कमी सारा आकारला जात असे. शेतकऱ्यांवर महसूल वसूलीसाठी अन्याय होऊ नये यासाठी पेशवे नेहमी जागृक असत.

**अ) पाटस्थळ बागायती जमिनीचे दर** - प्रत्येक बिघ्याला १ल्या वर्षी ५ रू. दुसऱ्या वर्षी ७ रू. चौथ्या वर्षी ८ रू. तर पाचव्या वर्षी १० रू. महसूल वसूल केला जाई. पिकांच्या जातीप्रमाणेच महसूल आकारणी होत असे.

**ब) मोटस्थळ बागाईत जमिनीचे दर** - प्रत्येक बिघ्याला पहिल्या वर्षी १रू. दुसऱ्या वर्षी २ रू. तिसऱ्या वर्षी ३ रू. चौथ्या वर्षी ४ रू. तर पाचव्या वर्षी ५ रू. महसूल जमा केला जाई. महसूल आकारणीच्या पद्धतीला कौल असे म्हणत.

पेशवे काळात प्रत्येक तालुक्यातून दरवर्षी ३ ते ४ लाख रूपये जमीन महसूल सरकारला मिळत असावा असे 'पेशवा रोजनिशीतील' पत्रावरून दिसते. मक्ता पद्धतीनुसार मामलेदार किंवा कमाविसदार काही रक्कम सरकारात भरीत व कुळाशी परभारे करार करून सारा वसुली करत. जो जास्त बोली बोलत असे त्याला सारा वसूलीचे काम दिले जाई. कोकणात विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यातील गावांची वसूली पेशवाईत मक्त्याने केली जाई.

**१५.४.२ चौथाई व सरदेशमुखी** - शिवकाळापेक्षा पेशवेकाळात चौथाई व सरदेशमुखीच्या एकूण स्वरूपामध्ये बदल झालेला दिसतो. शिवकाळात हा हक्क परंपरेने वसूल केला जात असे. परंतु पेशवे काळात १७१९ मध्ये मोगलबादशहा व मराठे यांच्यातील तहानुसार या हक्काला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. या तहानुसार दक्षिणेकडील सहा प्रांतांची चौथाई व सरदेसाई शाहूला मिळाली. मराठ्यांच्या संयुक्त राज्यव्यवस्थेत विविध सरदारांकडे विविध प्रदेश सोपविण्यात आले होते. या सर्व सरदारांनी चौथाई व सरदेशमुखी गोळा करून आपापल्या प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी लागणारी रक्कम ठेवून बाकीची रक्कम केंद्र सरकारात भरावी. अशी व्यवस्था पेशवेकाळात लावण्यात आली होती. पहिल्या बाजीरावाने आपल्या कारकीर्दित (१७२०-१७४०) दिल्लीचा मोगल बादशहा व हैद्राबादचा निजाम यांचकडून कर्नाटक व माळवा प्रांतात चौथाईच्या सनदा मिळविल्या होत्या. १७३९ मध्ये मराठ्यांनी वसई, चौल, कोरलाई या पोर्तुगिजांच्या प्रदेशातून एकूण महसूलीपैकी ४० टक्के उत्पन्न पोर्तुगिजांकडून वसूल केले. न्यायमुर्ती रानडेंच्या मते, 'मोगलांच्या ६ सूभ्यातून मराठ्यांना १८ कोटी रू. चौथाई व सरदेशमुखीपासून उत्पन्न मिळत होते; यापैकी छत्रपती शाहुंचा सरदेशमुखीचा हक्क म्हणून १ कोटी ८० लाख त्यांना मिळत होते. याशिवाय पेशव्यांनी मराठी सत्तेचा विस्तार करून गूजरात, माळवा, राजपुताना, बुंदेलखंड, काठेवाड, दुआब, गोंडवन, ओरिसा, आग्रा, दिल्ली, अयाध्या व बंगाल प्रांतातून चौथाई व सरदेशमुखी गोळा करण्यास सुरूवात केली होती. पहिल्या बाजीरावाला एकट्या माळवा प्रांतातून ५० लाख चौथाई मिळत होती.'

**१५.४.३ टांकसाळी** - पेशवेकाळात राज्यात ३८ प्रकारची सोन्याची व १२७ प्रकारची चांदीची नाणी चलनात होती. ही नाणे सरकारमार्फत तसेच खाजगी लोकांकडून पाडून घेतली जात. त्यांना तसा परवाना दिला जाई. परवाना देतांना फी वसूल केली जात असे. इतिहासकार ग.ह.खरेंच्या मते, 'नाणी पाडण्याचा परवाना ३ वर्षांसाठी दिला जाई, पहिल्या वर्षी ५०, दुसऱ्या वर्षी ७५, तर तिसऱ्या वर्षी १०० रू. टांकसाळ मालकाला शासनास द्यावे लागत असे.'

**१५.४.४ खाणी** - पेशवेकाळात तांबे, लोखंड, चांदी, सोने, यांचा खाण उद्योग चालविला जात असे. खाण मालकाकडून कराच्या रूपाने काही रक्कम सरकारला मिळत असे. कमाविसदार खाण उद्योगावर कर बसवून तो वसूल करत असत.

**१५.४.५ जंगलकर** - जंगलातील झाडे, सरपण, कोळसा, मध, गवत इ. पासून सरकारला बरेच उत्पन्न मिळत असे. झाडे तोडण्यासाठी परवानगी कर सरकारला मिळत असे.

**१५.४.६ खंडणी व नजराणा** - सरंजामदार व संस्थानिकांकडून काही खंडणी सरकारला मिळत असे. दसऱ्याला पेशव्यांना त्यांचे अधिकारी व इतरांकडून अनेक वस्तु नजराणा म्हणून मिळत असत. प्रजा व मांडलिक राजांकडूनही खास प्रसंगी पेशव्यांना नजराने मिळत.

**१५.४.७ विविध कर** - जकात व अबकारी करापासून पेशवे सरकाराला मोठे उत्पन्न मिळत असे. हा कर विविध मालावर मालानुसार, ठिकाणानुसार आकारला जाई. शिंगशिंगोटी हा कर जनावरांच्या खरेदीविक्रीवर आकारला जाई तर दारू व तंबाखूवर अबकारी कर आकारला जाई.

**१५.४.८ व्यवसायकर** - विविध व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांकडून कर वसूल केला जाई. उद्योगधंद्यावरही कर आकारला जाई.

अशा तऱ्हेने विविध करांपासून सरकारला सहा कोटी रू. उत्पन्न वर्षाकाठी मिळत होते, असे प्रसिद्ध इतिहासकार ग्रँट डफचे म्हणणे आहे तर एलफिन्स्टनच्या मते, 'पेशवेकालीन राज्याचे उत्पन्न ९६,७१,७३५ रू. इतके होते.'

**१५.४.९ पेशवेकालीन महसूल विभाग** - जमिन महसूलाची आकारणी व वसुलीच्या सोयीसाठी राज्याचे खालीलप्रमाणे महसूल विभाग पाडण्यात आले होते.

**अ) मौजे** - हा सर्वात लहान महसूली विभाग असून त्यावर पाटील व कुलकर्णी हे मुलकी अधिकारी महसूल वसूलीसाठी होते. काही मौजामध्ये अनेक वाड्या असत त्यांना मजरे म्हणत. तेथूनही पाटील व कुलकर्णी महसूल वसूल करीत.

**ब) परगणा** - अनेक मौजांचा एक परगणा होई. परगण्यावरील मुलकी अधिकारी, कमाविसदार, मामलेदार हे असत ते परगण्यातील महसूल जमा करत.

**क) प्रांत** - ५ ते ६ किंवा त्याहून अधिक परगण्यांचा एक प्रांत बनत असे. प्रांतावर सरसुभेदार हा अधिकारी असे. तो मामलेदार कमाविसदार यांच्या मदतीने प्रांतातील महसूल वसूल करत असे.

अशा प्रकारे पेशवे काळात महसूल वसूलीसाठी उपरोक्त विविध विभाग पाडण्यात आले होते. त्या-त्या विभागावर नेमलेल्या अधिकाऱ्यांकडून महसूल तसेच इतर करांची वसूली करण्यात येत असे व नंतर सर्व महसूल व विविध करांपासूनचे उत्पन्न सरकार जमा केले जात असे.

**आपली प्रगती तपासा :**

१. पेशवेकालीन महसुली उत्पानाचे स्त्रोत सांगा.

२. पेशवेकालीन महसूल विभागाची माहिती द्या.

## १५.५ पेशवेकालीन न्यायव्यवस्था –

१८व्या शतकातील न्यायव्यवस्थेचा अभ्यास करताना न्यायव्यवस्थेत जे बदल घडून आले त्या बदलावरून मराठ्यांची न्यायव्यवस्था शाहुकालीन व पेशवेकालीन अशा दोन कालखंडात विभागलेली आढळते.

**१५.५.१ शाहूकालीन केंद्रीय न्यायव्यवस्था** - (१७०७-१७५०) शाहूकाळात केंद्रीय प्रशासनात राजा हा सर्व श्रेष्ठ न्यायालयीन अधिकारी होता. सरदारांच्या तंट्याबद्दल राजाने दिलेला निर्णय अंतिम असे. कधी कधी राजा मंत्र्यांचा किंवा सरदारांचा सल्ला घेत असे. मात्र हा सल्ला राजावर बंधनकारक नसे. जर एखादे प्रकरण अगदीच हाताबाहेर गेले तर राजा धर्म सभेला पाचारण करत असे. न्यायाधिश व पंडितराव हे पूर्वी प्रमाणेच आपली कामे बजावत असत.

**१५.५.२ शाहूकालीन स्थानिक न्यायव्यवस्था** - शाहूकाळात स्थानिक न्यायव्यवस्थेत बरेचसे सरंजामशाहीकरण झालेले दिसून येते. विविध सरदारांना शाहूकाळात सरंजाम देण्यात आले होते. हे सरंजामदार आपापल्या क्षेत्रात न्यायदानाचे काम दिवाण मजलिस, गोतसभा व पंचायत यांच्यामार्फत करीत असत. काही वेळा ते एखादे प्रकरण केंद्रीय न्यायव्यवस्थेकडे पाठवित असत. शाहूच्या कारकीर्दीच्या शेवटी पंचायत पध्दतीचे स्थानिक न्यायव्यवस्थेत महत्त्व वाढत गेले.

**१५.५.३ पेशवेकालीन केंद्रीय न्यायव्यवस्था** - (१७५० ते १८१८) शाहूच्याच काळात छत्रपतीकडून पेशव्यांकडे सत्तेचे हस्तांतरण केले. शाहूनंतर आलेले दोन छत्रपती हे अकार्यक्षम असल्याने पेशव्यांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण झाले; व पेशवा हा सर्व सत्ताधीश झाला तोच राजमंडळाचा प्रमुख झाला तर छत्रपती नामधारी बनला.

**अ) केंद्रीय न्यायव्यवस्था -**

**१) सातार्‍याचा राजा** - १७०८ ते १७५० पर्यंत मराठी राज्याचा सार्वभौम सत्ताधीश सातार्‍याचा राजाच होता. शिवकाळाप्रमाणे राजाला सर्व अधिकार न्यायदानाचे होते. न्यायाधीश व पंडीतराव या न्याय प्रक्रीयेतील दोघांचे अधिकार कमी होऊन ते सातार्‍याच्या राजाकडे गेले. १७५० नंतर मात्र ते अधिकार पेशव्यांकडेच आले.

**२) धर्मसभा** - धर्मसभा किंवा हुजूर-हाजीर मजलीस ही शिवकाळापासून राज्यातील प्रमुख न्यायसंस्था असूनही १७५० नंतर ती दुर्बल झाली. धर्मसभेत पेशवा, राजमंडळ व इतर जूने सरदार, यांचा समावेश होता. पुढे पेशव्यांचे महत्त्व वाढल्याने राजमंडळातील सभासद व जून्या सरदारांचे महत्त्व कमी झाले. त्यामुळे पेशव्याने धर्मसभेचे लष्करी व दिवाणी अधिकार स्वतःकडे घेतले परिणामी धर्मसभा केवळ नावालाच उरली.

**३) मुख्य प्रधान किंवा पेशवा** - शिवकाळात न्यायालयीन क्षेत्रात राजाचे जे स्थान होते ते १७५० नंतर पेशव्यांना प्राप्त झाले. पेशवेकाळात पहिल्या तीन पेशव्यांनी मजलीस व गोतसभा यांची न्यायदानात मदत घेतली. शाहूंच्या मृत्युनंतरच्या पेशव्यांनी मजलीस ऐवजी गोतसभा किंवा पंचायत पद्धती बळकट केली. पेशव्याला मदत करण्यासाठी त्याचा दिवाण किंवा फडणीस नावाचा अधिकारी असे. तोच पंचायतीमार्फत बहुतेक सर्व प्रकरणांचा निकाल लावीत असे. तसेच पेशव्याने एक स्वतंत्र न्यायाधीश नेमून त्याच्याकडे धार्मिक व ऐहिक स्वरूपाचे सर्व खटले सोपविले होते. काही सरदारांकडेही पेशव्याने न्यायदानाचे काम सोपविले होते. हे सरदार आपापल्या जहागिरीत न्यायदानाचे काम करीत असत.

**१५.५.४ पेशवेकालीन स्थानिक न्यायव्यवस्था** - स्थानिक पातळीवर सरसुभेदार, सुभेदार, मामलतदार, कमाविसदार व अमीन हे अधिकारी पेशव्यांच्या वतीने न्यायदानाचे काम करत.

**१) सरसुभेदार व सुभेदार** - प्रांतीक न्यायदान प्रकीयेत हे दोन अधिकारी महत्त्वाची भूमिका बजावत असत. त्यांना न्यायदानाच्या बाबतीत सर्वोच्च अधिकार प्रांतीक पातळीवर असत. प्रांतातील सर्व न्यायनिवाड्यावर त्यांचा शिक्का व सही असे. परगणा गोतभेचेही हे महत्त्वाचे सदस्य असत.

**२) मामलतदार व कमाविसदार** - प्रांतातील विविध दिवाणी फौजदारी खटल्यांची माहिती करून घेऊन त्यांचा निवाडा करणे, प्रसंगी पंचायत स्थापन करून तिच्यामार्फत खटल्याचा निकाल लावणे, ही कामे मामलतदाराला न्यायदान क्षेत्रातील करावी लागत.

कमाविसदाराला मामलतदरापेक्षा न्यायालयीन क्षेत्रात व्यापक अधिकार होते. कौटुंबिक मालमत्ते संबंधीचे तंटे निकालात काढणे, कर्जासंबंधीची भांडणे सोडविणे इ. कामे त्याला गावपंचायतीच्या मदतीने करावी लागत असत. घर, जागासंबंधीचे कब्जे, किरकोळ तक्रारी पंचायतीच्या मदतीशिवाय कमाविसदार सोडवत असे. फौजदारी गुन्ह्यांचीही तो पेशव्याच्या आदेशावरून चौकशी करत असे.

**३. अमीन** - जेव्हा पेशवे सरकारकडे तालुक्यातील अधिकाऱ्यांविरूद्ध तक्रारी जात असत. त्यावेळी पेशवे सरकार या तक्रारीची चौकशी करण्यासाठी आपला विश्‍वस्त म्हणून अमीन या अधिकाऱ्याला तालुक्यातील अधिकाऱ्यांच्या चौकशी साठी पाठवत असत.

**१५.५.५ पंचायत न्यायव्यवस्था** - ही सर्वांत महत्त्वाची न्यायदान व्यवस्था होती. त्यामध्ये न्यायव्यवस्थेचे लोकशाहीकरण झाले होते. थोरल्या माधवरावाच्या काळात पंचायतीचे महत्त्व अधिक वाढले होते. पंचायतीमध्ये त्या त्या गावातील प्रतिष्ठीत लोकांचा समावेश असे. या

पंचायतीत कमीत कमी पाच व जास्तीत जास्त पन्नास सभासद असत. दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले पंचायत चालवत असे.

**१५.५.६ गोतसभा** - मराठेकालीन न्यायव्यवस्थेत गोतसभा हे एक महत्त्वाचे अंग समजले जात असे. गोतसभेला शाहूच्या काळात महत्त्वाचे स्थान होते. मात्र पेशव्यांच्या काळात गोतसभेचे महत्त्व कमी होऊन तीची जागा पंचायतीने घेतली. तरीही मराठेकालीन न्यायव्यवस्थेचे खास वैशिष्टे म्हणून गोतसभेकडे पाहिले जात असे.

डॉ. व्ही. टी. गुणे यांनी गोतसभेचे तीन विभाग पाडलेले आहेत. ते म्हणजे परगणा गोतसभा, कसबा किंवा पेठ गोतसभा व खेडेगावची गोत सभा. परगणा गोतसभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, नायकवाडी, निरासदार यांचा समावेश असे. मुख्य अधिकारी देशमुख तर देशपांडे त्याला मदत करीत असत. परगण्यात निर्माण होणारी आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेची प्रकरणे हाताळणे हे परगणा गोतसभेचे मुख्य काम असे.

कसबा किंवा पेठगोतसभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, कुलकर्णी व चौगुला यांचा समावेश असे.

खेडेगावची गोतसभा ही न्यायदान प्रक्रीयेतील सर्वांत पहिली पायरी होती. यात सर्व वतनदार, आलुतेदार व उपरे यांचा समावेश होत असे. सर्व एकत्र बसून विचार विनिमय करून निर्णय देत असत. ग्रामगोतसभेने दिलेला निर्णय राजा सुद्धा बदलू शकत नसे.

दोन गावातील तंटे सोडविणे, कर्जव्यवहाराचे, कज्जे सोडविणे, वतनसंबंधी खटले चालविणे, घटस्फोट संबंधीचे दावे चालविणे इ. कामे गोतसभा करत असे.

**१५.५.७ ब्राह्मसभा** - ही विद्वानांची सभा होय. त्यात धर्माधिकारी हा प्रमुख असे. त्याला मदतनीस म्हणून मीमांसक, जोशी, पुराणिक, वैदिक, ज्ञानसंपन्न पंडित यांचा समावेश होत असे. ही सभा नाशिक, पैठण, पुणतांबे, कऱ्हाड, कोल्हापूर महाबळेश्वर, वाई, पंढरपूर अशा तीर्थक्षेत्री भरत असे. या सभेत धार्मिक तंटे सोडविले जात असे. धार्मिक गुन्हा केलेल्या व्यक्तीस सामान्यपणे प्रायश्चित्त द्यावे लागत असे. प्रसंगी त्यास दिवाण दंडही द्यावा लागत असे.

**१५.५.८ जातिसभा** - प्रत्येक जातीची स्वतंत्र सभा असून त्या त्या जातीची माणसे एकत्र येत असत. डॉ. गुणे या संदर्भात म्हणतात. 'जातीचे नियम भंग करणाऱ्याचा खटला जातिसभे समोर येत असे' यावरून या सभेमध्ये फक्त स्वतःच्या जातीची बंधने योग्य पद्धतीने पाळली जातात किंवा नाही हे पाहिले जात असे. एखाद्या व्यक्तीने जातिबाह्य कृत्य केले असेल तर त्यास ही सभा योग्य ती शिक्षा करत असे.

**१५.५.९ पंचायत न्यायव्यवस्थेचे कामकाज** - गावातील दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले चालविण्याचे काम पंचायत करीत असे. यामध्ये पाटील, कुलकर्णी, शेटे, महाजन, चौगुला, मिरासदार, वतनदार, बलुतेदार यांचा समावेश होता. खटल्याच्या स्वरूपावर व्याप्तीवर सभासदांची संख्या अवलंबून असे.

**१. निवाडापत्र -** वादी - प्रतिवादींनी दिलेली लेखी निवेदने, साक्षीदारांनी दिलेल्या साक्षी पुरावे या सर्वांचा विचार करून पंचायत निर्णयाप्रत येऊन पोहचत असे. त्या निर्णयाला सारांश म्हणत. हा सारांश संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला जाई व त्याला अनुसरून तो अधिकारी त्यावर निर्णय देऊन प्रतिवादी यांची तक्रार ऐकून त्यांची उत्तरे देत असत. त्यानंतर घेतलेल्या साक्षी व पुराव्यांची माहिती असे. त्याच्याखाली पंचाने घेतलेला निर्णय व शेवटी फडणीसाची सही असे. शेवटी राजाची सही झाली म्हणजे निवाडापत्र अंतिम मानले जाई.

**२. निवाडापत्राची अंमलबजावणी -** निवाडापत्र तयार झाल्यावर त्या संबंधीचा हुकूम संबंधीत अधिकाऱ्यास कळविला जाई व नंतर हा अधिकारी स्थानिक अधिकाऱ्यामार्फत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत असे.

**३. अपिलाची सवलत -** वादी किंवा प्रतिवादीला निर्णय मान्य नसेल तर तो खुद पेशव्यांकडे अपील करत असे. पेशवा प्रत्यक्ष लक्ष घालून पंचायतीमार्फत न्यायदान करण्याचा हुकूम देत असे.

**४. न्यायालयीन शुल्क -** विजयी पक्षाकडून 'हरकी' किंवा 'शेरणी' न्यायालयीन कामकाजापोटी शुल्क म्हणून घेतली जात असे. तर पराभूत पक्षाकडून दंड घेतला जात असे.

**१५.५.१० पुरावा व साक्षी -** कागदोपत्री पुरावा व साक्षींना न्यायालयीन कामकाजात महत्त्वाचे स्थान होते. ही कागदपत्रे एका विशिष्ट पद्धतीने लिहिलेली असत व त्यावर सही, शिक्केही असत. न्यायालयीन अधिकारी कागदपत्र पाहताक्षणीच ते अस्सल की बनावट आहे हे ओळखत असत.

ज्या प्रकरणात कागदोपत्री पुरावा उपलब्ध नसे त्यावेळी गावातील प्रतिष्ठित लोकांची साक्ष घेत असत. साक्षीदार देवाळासमोर किंवा बेलपत्र किंवा पाणी हातात घेऊन साक्ष देत असत.

**१५.५.११ दिव्य -** पेशवेकाळात साक्षी पुराव्याच्या जोडीलाच दिव्य हा प्रकारही तितक्याच महत्त्वाचा मानला जाई. उकळत्या तेलातून लोखंडाचा तुकडा हाताने बाहेर काढणे, लोखंडाचा तप्त गोळा हातात घेऊन सात प्रदक्षिणा देवळाभोवती घालणे, नदीच्या पात्रात उतरून शपथ घेणे, भाकरी, फुले, अंगारा, बेल, हातात घेऊन शपथ घेणे इ. दिव्याचे प्रकार पेशवेकाळात प्रचलीत होते.

**१५.५.१२ शिक्षेचे प्रकार -** पेशवेकाळात दिवाणदंड (राजदंड), देवदंड (ब्रह्मदंड), जातीदंड (गोतदंड) हे शिक्षेचे प्रकार प्रचलित होते. राजदंड स्वतः पेशवे व सरन्यायाधीश करत असे. धर्मशास्त्रानुसार विद्वान ब्राह्मण देवदंड म्हणजे आरोपीला प्रायश्चित देत असत. जातिबाह्य कृत्य केल्यास जातिदंड आरोपीला केला जात असत. म्हणजे त्यास समाज बहिष्कृत करत असत. त्याला पुन्हा जातीत घेण्यासाठी त्याची गोताई (पंक्तीपावन) केली जात असे.

सारांशाने असे म्हणता येईल की, पेशवेकालीन न्यायपद्धती सोपी व सुटसुटीत होती. पंचायत न्याय पद्धती मध्ये लोकशाहीकरण झालेले होते. विशेष म्हणजे प्रत्येकाला राजापर्यंत अपिलाची सवलत होती.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ पेशवेकालीन स्थानिक न्यायव्यवस्थेतील अधिकाऱ्यांची नावे व कर्तव्य सांगा.

## १५.६ लष्करी प्रशासन –

पेशवेकालीन लष्कराचे घोडदळ, पायदळ, तोफखाना व हुजूरात (पेशव्यांची फौज) असे चार प्रमुख विभाग होते. गनिमी पद्धती बरोबरच समोरासमोर युद्ध करण्याचीही पद्धती अंमलात आणली गेली होती. आरमाराच्या विकासाकडे पेशव्यांनी बरेच लक्ष पुरविले होते.

**१५.६.१ घोडदळ** - घोडदळात करोल, भालेकरी व आडहत्यारी असे प्रकार होते. करोल म्हणजे बंदुकवाले, भालेकरी म्हणजे भाला धारण करणारे व आडहत्यारी म्हणजे मिळेल ते हत्यार चालविणारे.

घोडदळात दोन मुख्य विभाग होते ते म्हणजे बारगीर व शिलेदार.

**अ) बारगीर** - बारगीर हा सरकारी नोकर असे. त्याला सरकारकडून घोडे, हत्यारे व पगार मिळत असे. बारगीरांना महिना ४ ते १० रूपयांपर्यंत पगार मिळत असे. हे बारगीर पेशव्यांच्या व त्यांच्या सरदारांच्याही घोडदळात ठेवले जात असत. बरेच बारगीर व घोडे मिळून पागा तयार होत असे. पागेवरील अंमलदारास 'पाग्या' म्हणत. एका पागेत १० घोड्यांपासून ७०० पर्यंत घोडी असत. या पाग्यांची गणना पुढे सरदारांत होत असे. नौबत, निशान, पालख्या, फडणीस, पोतनीस इ. दरखदार असत. मशालजी, जासूद, डेरे, राहुट्या व ओझ्यासाठी बैल, उंट, हत्ती इ. जनावरेही पागेमध्ये असत. त्यांचा सर्व खर्च सरकारकडून होत असे.

**ब) शिलेदार** - शिलेदारकडे घोडा व हत्यार स्वतःचे असे. शिलेदाराच्या समुदायास 'पथक' म्हणत. अशा शिलेदारांच्या समुदायावर सरदार असत. सरदारांना पथक म्हणत असत. पथकाच्या खर्चास सरकारकडून रोख रक्कम मिळत असे. त्यास 'इतलाखी' पथक असे नाव होते व पथकाच्या खर्चास सरकारकडून मुलूख तोडून दिला असेल तर त्यास 'सरंजामी पथक' असे म्हणत. शिलेदाराचा पगार त्याचा घोडा व हत्यारे पाहून ठरविला जात असे. तो दरमहा २० ते ३० रूपये इतका असे.

**१५.६.२ हुजूरात** - हुजूरात म्हणजे पेशव्यांची फौज होय. पेशव्यांच्या मध्यवर्ती सत्तेकरीता ती शक्य तितकी मोठी असे. साधारणः पेशव्यांच्या घोडदळात एक हजार पर्यंत घोडेस्वार असत. त्यांची १२ पथके तयार करून प्रत्येक पथकावर वेगवेगळे सरदार नेमले जात असत. पागेकडे

फडणीस, पोतनिस इ. रखवालदार श्रेणीतील अधिकारी व शिलेदार पथकाकडे बक्षी हे अधिकारी असत. शिलेदाराजवळ २५ स्वार असून आपला पथक घेऊन स्वारीस निघण्याची आज्ञा त्याला होत असे. पेशव्यांच्या सैन्याचा उपयोग केवळ लढाईसाठी केला जात असे. शत्रुचा प्रदेश ताब्यात आल्यावर त्याचा ताबा हुजूरात घेत असे. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी हुजूरातचा उपयोग करीत असत.

**१५.६.३ पायदळ** - पेशवेकाळात सैन्यात मुख्य भरणा पायदळाचा असे. ही फौज २५००० पर्यंत असे. मराठ्यांबरोबरच परप्रांतातील व परधर्मातील लोकांचाही भरणा पायदळात केला जात असे. त्यात रोहिले, पठाण, गारदी, शीख, सिद्दी यांचाही भरणा असे. पेशवा माधवरावाने १७७० मध्ये हैदरअलीच्या विरूद्ध मोहिमेसाठी फार मोठे पायदळ उभारले होते. १७७०-७१ मध्ये सुमेरसिंग गारद्याला ४०० गारद्यांचे पथक उभे करण्यास सांगण्यात आले होते. शेरसिंग या शिख जमादाराला २०० सैनिक जमवण्यासाठी आज्ञा करण्यात आली होती. पायदळातील मराठी फौजावर मराठा सरदाराचा जितका वचक असे तितका वचक परप्रांतीय, परकीय शिपायांवर राहत नसे.

**१५.६.४ तोफखान** - पेशवाईत मराठ्यांनी गनिमी काव्याचे युद्धतंत्र सोडून समोरासमोर मैदानात लढण्यास सुरवात केल्याने त्यांना तोफांची जास्त गरज भासू लागली. त्यामुळे पेशव्यांनी स्वतंत्र तोफखान विभाग सुरू करून मुझफरखान व नंतर इब्राहिमखान या तज्ञ व्यक्तींच्या तोफखान्याकडे नेमणुका करून तोफखाना सुसज्ज बनविण्याचा प्रयत्न केला. राज्यात अनेक ठिकाणी तोफा व तोफगोळे तयार करण्याचे कारखाने सुरू केले. इंग्रज व पोर्तुगीजांकडून लांब पल्ल्याच्या तोफा मागविल्या जात असत.

शूतरनाला व गरनाला असे तोफांचे दोन प्रकार होते. त्यापैकी शुतरनाला उंटावर ठेवण्यात येई तर गरनाला किल्ल्यावर ठेवण्यात येत असे. लहान व हलक्या दमाच्या तोफा राज्यातच बनविल्या जात. तोफा व दारूगोळा यांच्या पुरवठ्यावर पेशव्यांचे कोणतेही नियंत्रण नव्हते. तोफखान्याची व्यवस्था दिवाण, मुजूमदार, फडणीस व सबनीस या मुलकी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येई. प्रत्यक्ष तोफा चालविण्यासाठी तोफंदाज, पैगंदाज, गोलंदाज, बांधानी व खासे अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाई.

**१५.६.५ पेंढारी व गारदी** - पेंढारी हे पेशवेकाळात लष्कराचे एक अंग होते. त्यात मुख्य भरणा मुस्लिम पठाणांचा असे. पेंढाऱ्यावरील प्रमुख मुस्लिम पठाणच होता. पेंढाऱ्याला लष्करात येऊन राहण्याची परवानगी पेशव्यांकडून घ्यावी लागे. सरदारांचेही पेंढारी असत ते त्यांच्या फौजांबरोबर असत. पेंढाऱ्यांना दर पालामागे ५ रू. सरकारात भरावे लागत. लष्कराबरोबर राहून पेंढारी शत्रुच्या प्रदेशातील लुटमार करून आपले पोट भरत. शत्रु हारला की त्याच्या छावणीची लुट करण्यात पेंढारी सैन्याला मदत करीत असत. पेंढाऱ्यांप्रमाणे पेशव्यांच्या फौजेत गारद्यांचाही समावेश असे. गारदी लोक शूर, आडदांड व बेगुमान असत. त्यामुळे गारद्यांवर मराठी सरदारांचा वचक राहिला नाही. पेंढारी व गारद्यांमुळे मराठा लष्करात बेशिस्त निर्माण झालीच परंतु मराठे हे लुटारू आहेत असा हिंदूस्तानभर समजही निर्माण झाला.

**१५.६.६ आरमार** - १६९८ मध्ये मराठ्यांचा आरमार प्रमुख कान्होजी आंग्रेची नेमणूक झाली. १७०७ मध्ये त्याने मुंबईवर इंग्रजांच्या आरमारी बोटीवर हल्ला करून आपल्या पराक्रमाची चुणूक

दाखवली. १७१० मध्ये खांदेरी बेट जिंकून तेथे तटबंदी केली. शाहूकडे मराठा राज्याची सूत्रे आली तेव्हा कान्होजीच आरमाराचा प्रमुख होता. १७२९ मध्ये कान्होजीच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा संभाजी आरमाराचा प्रमुख झाला. पुढे १७४३ मध्ये तुळाजी आंग्रेची प्रमुख पदी नियुक्ती झाली. पुढे तुळाजी नानासाहेब पेशव्याला जुमानत नसल्याने इंग्रजांची मदत घेऊन तुळाजीचा पाडाव केला. १७५६ मध्ये तुळाजीला अटक केली. विजयदूर्ग येथे नवीन तटबंदी करून तेथे मराठी आरमाराचे ठाणे स्थापन केले. तत्पूर्वी १७३७ मध्ये पहिल्या बाजीरावाने अर्नाळा येथे एका आरमारी ठाण्याची स्थापना केली होती. या दोन्हीही आरमारी ठाण्याचे अधिपत्य आनंदराव धुळप याच्याकडे दिले होते. हा आरमाराचा सूभेदार होता.

सुभेदाराच्या हाताखाली एक कारभारी होता. जगन्नाथ नारायण हा सुभेदार धुळपाचा कारभारी होता. मोहिमेवर जाणाऱ्या आरमारी जहाजांची जबाबदारी त्याच्यावर असे. कोकणातील विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेळा, देवगड येथे मराठ्यांची आरमारी ठाणे होती. त्या प्रदेशातील दालदी, गाबीत व भंडारी लोक नौकानयतनात निपून होते. त्यांचीच भरती आरमारात होत असे. तांडेला व सरतांडेला नावाचे आरमारी अधिकारी असत.

पेशवेकाळात आरमाराचा उपयोग चाचेगिरीचा बंदोबस्त करणे, व्यापारी जहाजांपासून जकात वसूल करणे, समुद्रात फुटलेली जहाजे ताब्यात घेणे व समुद्रकिनाऱ्याचे शत्रुपासून संरक्षण करणे यासाठी केला जात असे. तुळाजीच्या पाडावानंतर मराठी आरमारच्या ऱ्हासाला सुरूवात झाली होती. माधवरावाच्या काळात हैदर विरोधात मराठा आरमार पश्चिम किनाऱ्याने म्हैसुरच्या समुद्रकाठापर्यंत गेले होते. सागरी लढाईत मराठा आरमाराने चांगली कामगिरी बजावली होती. सारांशाने असे म्हणता येईल की, पेशव्यांनी सर्व भिस्त भूदलावर असल्याने त्यांनी आरमाराकडे विशेष लक्ष दिलेले नव्हते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१ पेशवेकालीन घोडदळाची रचना सांगा.

---

---

---

---

---

## १५.७ सारांश

छत्रपती शिवाजी राजांनी राज्यकारभारासाठी जी तत्वे पुरस्करलेली होती त्या तत्वांचा पेशव्यांनी त्याग केल्याने पेशवाईचा ऱ्हास झाला. असे जरी असले तरी स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर पेशव्यांनीच केले होते. हेही नाकारता येणार नाही. म्हणूनच पेशव्यांची कर्तबगारी खरोखरच महान होती हे नमुदच करावे लागेल.

## १५.८ प्रश्न :

१) पेशवेकालीन महसूल व्यवस्थेचा आढावा घ्या.

२) पेशवेकालीन लष्करी प्रशासनाची चर्चा करा.

३. टीपा लिहा.

अ) पेशवेकालीन मुलकी व्यवस्था

ब) पेशवेकालीन न्यायदान पद्धती.

## १५.९ संदर्भपुस्तके :

१) प्रा. सावंत व प्रा. जाधव व्ही. के. मराठ्यांचा प्रशासकीय व सामाजीक व आर्थिक इतिहास, विद्याप्रकाशन नागपूर (१९९७)

२) डॉ. कोलारकर श. गो. मराठ्यांचा इतिहास – मंगेश प्रकाशन, नागपूर (२००३)

३) कुलकर्णी अ. रा. व खरे ग. ह. मराठ्यांचा इतिहास – कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पूणे (१९९७)

४) प्रा. महल्ले व प्रा. पाठक – मराठा सत्तेचा इतिहास – विद्या प्रकाशन, नागपूर (१९९७)

५) डॉ. काळे म. वा. मराठ्यांचा इतिहास – प्राची प्रकाशन, मुंबई (१९९८)

६) प्रा. तांबोळी प्रा. पवार, प्रा. राजदेव, प्रा. रुपनवर – मराठ्यांचा इतिहास - निराली प्रकाशन, पूणे (२००४)

❖❖❖❖

# १६

# मराठेकालीन सामाजिक व आर्थिक जीवन

**अनुक्रमणिका :**

१६.० उद्दिष्टे
१६.१ प्रस्तावना
१६.२ जातीव्यवस्था
१६.३ संस्कार
१६.४ स्त्रीयांचे स्थान
१६.५ समाजातील अंधश्रद्धा
१६.६ सणउत्सव
१६.७ समारोप
१६.८ उद्दिष्टे
१६.९ प्रस्तावना
१६.१० शेती - प्रमुख व्यवसाय
१६.११ उद्योग - व्यापार
१६.१२ उत्पन्नाची साधने
१६.१३ ग्रामव्यवस्था
१६.१४ वतनव्यवस्था
१६.१५ सारांश
१६.१६ प्रश्न
१६.१० संदर्भ

## १६.० उद्दीष्टे

१. मराठेकालीन सामाजिक व्यवस्थेचा अभ्यास करणे.
२. मराठेकालीन आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.

## १६.१ - प्रस्तावना

शिवकाळापासून मराठ्यांसमोर आपले स्वत्व, अभिमान व स्वधर्म कसा टिकावायचा हाच विचार होता. मराठेकालिन सामाजिक जीवनाचा विचार करताना तत्कालिन मुस्लिम राज्यकर्त्यांबरोबर संघर्ष करूनच मराठ्यांना आपले जीवन टिकवून ठेवावे लागले होते, हे लक्षात

घेणे क्रमप्राप्त ठरते. मुस्लिम राज्यकर्त्यांनी मराठ्यांच्या स्वधर्म व स्वाभिमानावरच आघात सुरू केल्याने मराठ्यांसमोर गंभिर परिस्थिती निर्माण झालेली होती. छत्रपती शिवाजी राजांनी स्वराज्याची स्थापना करून मुस्लिमी वर्चस्वाला मोठे आव्हान दिले होते. मुसलमान राज्यकर्त्यांनी तत्कालीन हिंदू समाजावर सातत्याने जे आघात केले, त्याचा मराठ्यांनी सतत प्रतिकार केला. मराठेकालिन सामाजिक चौकट ही वर्णव्यवस्थेवर अवलंबून होती. त्यात बदल करण्याचा फारसा प्रयत्न पेशवे काळातही झाला नाही. थोडे फार प्रयत्न झाले मात्र ते अत्यल्प होते. मराठेकालीन सामाजिक जीवनाचा आढावा घेताना तत्कालीन सामाजिक चालीरीती, जातीव्यवस्था, वतने, धर्मांतर, संस्कार, व्रत - वैकल्य, सण-उत्सव इत्यादींचा विचार केल्यास तत्कालिन सामाजिक जीवन आपल्या लक्षात येईल.

## १६.२ जातीव्यवस्था

मराठ्यांच्या काळात समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार भाग पडले होते. मराठ्यांनी राज्य स्थापन केल्यानंतर ब्राह्मणांनी त्या राज्याच्या प्रशासनाची जबाबदारी पार पाडावी असा प्रघात होता. वैश्य वर्गातील बहुसंख्य लोक शेती करत असत व फारच कमी लोक मोठा व्यापार करीत असत. शूद्रांना नेहमीप्रमाणेच समाजातील अन्य वर्गापासून दूर ठेवण्यात येत असले तरी त्यांच्यापैकी काहींना सैन्यात किंवा ग्रामप्रशासनात सामील करून घेण्यात येत असे. उदा. गावच्या पाटीलाला गावचा महार मदत करी तर किल्ल्यांच्या आजूबाजूच्या प्रदेशावर रात्री पहारा करण्याची जबाबदारी रामोशी या निशाचर वर्गाकडे सोपविण्यात येत असे.

मराठ्यांच्या काळात जातीचे बंधने अधिकाधिक दृढ़ बनत गेली. ब्राह्मणांच्या वर्चस्वाला अन्य वर्गाची मान्यता होती. जातीय बंधने संकुचित विचारांचा तर खुद्द छत्रपती शिवाजी राजांना सुद्धा उपद्रव झाला होता. ते क्षत्रिय नसल्याचा व म्हणून त्यांना स्वतःचा राज्यभिषेक करण्याचा अधिकार नसल्याचा युक्तीवाद तत्कालीन प्रतिष्ठित ब्राह्मणांनी केला होता. असे जरी असले तरी भक्तीमार्गाच्या चळवळीमुळे जातीय बंधने निदान काही प्रमाणात तरी शिथिल होण्यास मदत झाली होती. मराठी संतांच्या अद्वितीय कामगिरीमुळे समाजात धर्मातील कर्मठ प्रथेविषयी विशेष जागृती झाली होती.

**१६.२.१ ब्राह्मण - अब्राह्मण संघर्ष** - पेशवेकाळात मराठा सरदारांच्या बरोबरीने ब्राह्मण सरदारांनीही पराक्रमाने आपली संस्थाने निर्माण केली होती. पेशवे स्वतःच ब्राह्मण असल्याने ब्राह्मण जातीचा समाजात वरचष्मा असणे सहाजिकच होते. ब्राह्मणांनी आपली पारंपारिक कर्तव्ये सोडून इतर क्षेत्रात शिरकाव केल्याने सामाजिक नेतृत्व सहाजिकच ब्राह्मण वर्गाकडे आले होते.

आपल्या हातातील सत्ता दुसऱ्या सत्ता वर्गाकडे जाऊ नये, अशी वरीष्ठ वर्गाची इच्छा असल्याने साहाजिकच पेशवेकाळातील वतनदारांमध्ये संघर्ष निर्माण झाले होते. परीणामी जातीजातींमध्ये वारंवार कटू संघर्ष होत असत. पेशव्यांनी हा संघर्ष मिटविण्याऐवजी त्याला खतपाणी घालून प्रसंगी राज्य चालविलेले दिसते. पेशव्यांच्या या भेदनितीच्या धोरणामुळे समाज हा आतून जातीय तणावाने पोखरला गेला होता. जातीबंधने न पाळल्यास प्रसंगी प्रायश्चीत्तही घ्यावे लागत असे.

**१६.२.२ ब्राह्मण-ब्राह्मण संघर्ष** - बहुतांश पेशव्यांनी शहाणपणाने राज्य केले. जातीवादाला प्रमाणाबाहेर उत्तेजन मिळणार नाही याची दक्षता घेतली होती. मात्र नारायणरावाच्या काळात ब्राह्मण विरूद्ध प्रभू असा वाद निर्माण झाला होता. छत्रपती शिवाजी राजांच्या काळात सुद्धा असे वाद नव्हते असे नाही. मात्र छत्रपती शिवाजी राजांनी दूरदृष्टी ठेवून प्रभूंना उपनयन वगैरे अधिकार बहाल केले व समाजाने प्रभू जमातीतील लोकांना ब्राह्मणांच्या बरोबरीने वागवावे असा निर्देश दिला होता. नारायणरावाने मात्र कसलाही विचार न करता प्रभूजमातीचे हे सर्व अधिकार काढून घेतल्याने प्रभू जमातीत मोठा असंतोष निर्माण झाला. म्हणूनच नारायणरावविरूद्ध जी कटकारस्थाने झाली त्यात प्रभू जमातीची संख्या जास्त असल्याचे आढळून येते.

पेशव्यांच्या काळात ब्राह्मण विरूद्ध अब्राह्मण असा संघर्ष झाला असे नाही तर खूद्द ब्राह्मणांमध्येही संघर्ष निर्माण झालेले दिसून येतात. चित्तपावन विरूद्ध इतर ब्राह्मण पोट जातीतील तो संघर्ष होता. कारण प्रशासनातील सर्व महत्वाच्या जागा चितपावन ब्राह्मणांना दिल्या जात असत आपल्याला महत्त्वाच्या जागा दिल्या जात नाही अशी देशस्थ, ऋगवेदी ब्राह्मणांची तक्रार होती. उदा. पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत श्रीपतराव प्रतिनिधीने त्याला विरोध केला होता कारण तो देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण होता. बाळाजी बाजीरावाच्या काळात सखाराम बापूने कोकणस्थ वर्चस्वाला विरोध केला होता. पुढे रघूनाथराव - माधवरावाच्या वारसा संघर्षात देशस्थांनी रघुनाथरावास पाठींबा दिला होता. अशा रितीने पेशवाईत कोकणस्थ विरूद्ध देशस्थ, चित्पावन - कऱ्हाडे विरूद्ध देवरूखे ब्राह्मण इ. अनेक वाद निर्माण झाले होते. अर्थातच हे सर्व वाद राजकीय वर्चस्वाच्या भावनेतून निर्माण झाल्याचे लक्षात येते.

**१६.२.३ जाती - पोटजाती व अस्पृश्यता** - मराठेकालीन समाजात ब्राह्मणांशिवाय इतर अनेक जाती व पोटजाती आढळून येतात. त्यापैकी सर्वात अधिक संख्येने मराठे होते. त्यांच्यातही मराठे व कुणबी अशा दोन प्रमुख शाखा होत्या. मराठा समाज हा राज्यकर्ता समाज होता. ते वतनदार होते. तर कुणबी हे शेतकरी किंवा शेतमजूर होते. याशिवाय धनगर, तेली, न्हावी, कुंभार, माळी आदि अनेक जाती अस्तित्वात होत्या. त्यांच्यातही अनेक पोटजाती होत्या.

समाजात अस्पृश्यांची संख्याही बरीच मोठी होती. त्यांच्यामध्ये मांग, महार, चांभार इत्यादींचा अंतर्भाव होता. या अस्पृश्य वर्गाला समाजातील अन्य वर्गांपासून दूर ठेवण्यात येत असे. कारण या काळात जातीय बंधने अधिकाधिक दृढ होत गेली. जातीय बंधने व त्यामुळे अपरीहार्यपणे येणारे संकुचित विचार यामुळे समाज हा आतून जातीय तणावाने पोखरला होता. जातीय बंधने अधिक कडक होती. जो ही बंधने पाळणार नाही त्याला कडक शिक्षा दिली जात असे. एखाद्या व्यक्तीने परंपरागत चालीरीती किंवा ही जाती बंधने यांचे पालन करण्यात चूक केली तर त्याला प्रायश्चित घ्यावे लागत असे.

एकूणच मराठे काळात अनेक जाती व पोटजाती आढळून येतात. त्यांच्यात चालीरीती, मानपान, रीतिरीवाज व परंपरा या कारणांवरून सतत संघर्ष निर्माण होत असत व ते सरकारला सोडवावे लागत असत.

**१६.२.४ गोतसभा** - जातीजातींमध्ये किंवा पोटजातींमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास शिवकाळात हा संघर्ष गावपंचायतीमार्फत सोडविला जात असे. या पंचायतीला 'गावाचे गोत' असे म्हणत असे. गोत म्हणजे निरनिराळ्या जातींचा व धंदे करणाऱ्यांचा समुह. त्यामध्ये गावचे पाटील,

कुलकर्णी, बाराबलूतेदार, शेटे व महाजन यांचा समावेश असे. पेशवे काळात जाती - पोटजातीतील तंटे सोडविण्यासाठी गोतसभा निर्माण झाली. या गोतसभेत निरनिराळ्या जातीतील वयोवृद्ध व अनुभवी व्यक्तींचा समावेश केला जात असे की ज्यांना सामाजिक चालीरीतींचे यथार्थ ज्ञान असे. एकूण मामल्यांचा सर्वांगीन विचार करून ते निर्णय देत असत. त्यामुळे सर्वांचेच समाधान होत असे.

## १६.३ - संस्कार

हिंदू समाजात संस्कारांना अतिशय महत्त्व होते. शिव व पेशवे काळ त्याला अपवाद नव्हता. बारसे, जावळ, व्रतबंध व विवाह इत्यादी संस्कार मोठ्या थाटामाटात केले जात असत. विवाह विधीला अतिशय पवित्र समजण्यात येई. त्यामुळे समाजात बालविवाह सर्वसामान्यपणे रूढ झाले होते.

## १६.४ समाजातील स्त्रियांचे स्थान –

मराठ्यांच्या राज्यात स्त्रियांना समाजात विशेष मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान देण्यात येत असे. उदर निर्वाहासाठी पुरूषांबरोबर स्त्रियांनाही शेतामध्ये शारीरिक कष्टाची कामे करावी लागत असत. परिणामी प्रथमपासूनच समाजात पडदा पाळण्याची पद्धत प्रचलित नव्हती. मात्र प्रतिष्ठित वर्गातील स्त्रिया याला अपवाद होत्या. शिवकाळात अनेक स्त्रियांनी उल्लेखनिय कामगिरी बजावली होती. जिजाबाईने बालशिवाजीचे संगोपन उत्कृष्ट प्रकारे करून त्याच्या मनात स्वराज्य स्थापनेची महत्त्वाकांक्षा जागृत केली होती. स्वराज्यावरील ऐन संकटाच्या प्रसंगी महाराणी ताराबाईने केलेले पराक्रम तर मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरात नोंदवून ठेवण्यासारखे आहे. पुढे पेशवेकाळात महत्त्वाकांक्षी आनंदीबाईने राघोबाला पेशवेपद मिळविण्याच्या सर्व प्रयत्नांना मनापासून साथ दिली होती. पुण्यश्लोक अहील्याबाई होळकर या दानधर्म व कूशल कारभारासाठी प्रसिद्ध होत्या. तथापि स्त्रियांना या काळात कोणतेही औपचारिक शिक्षण देण्याची पद्धत नसल्याने त्यांना घरगुती स्वरूपाचे शिक्षण देण्यात येई. या शिक्षणाचा त्यांना आपल्या संसारात विशेष उपयोग होत असे. सार्वजनिक जीवनात व प्रशासनातही त्यांचा फारसा सहभाग नसे. किंबहूना त्या काळात तशी पद्धतही नव्हती व खूद्द स्त्रियांचीही तशी अपेक्षा नसावी. परिणामी बहुसंख्य स्त्रियांचे जीवन घराच्या चार भिंतीपुरतेच मर्यादीत होते.

**१६.४.१ बालविवाह व बहुपत्नीत्त्व** - तत्कालीन समाजात मुलीचे वय विवाहासाठी ८ वर्ष तर मुलाचे वय १४ वर्ष योग्य समजण्यात येई. ८ वर्षाच्या वर मुलीचे वय झाल्यास तिच्या विवाहाबद्दल कुटुंबात चिंता निर्माण होई. बालविवाहाची अनेक उदाहरणे पेशवेकाळातील देता येतील पेशवा बाळाजी बाजीरावाचे विवाहाचे वेळी वय अवघे १० वर्षाचे होते तर गोपीकाबाईचे वय ४-५ वर्षाचे होते. थोरल्या माधवरावांचे विवाहाच्या वेळी वय ५ तर नारायणरावाचे वय १० वर्षे होते, दुसऱ्या बाजीरावाने तर ९ वर्ष वयानंतर कोणतीही मुलगी विवाहाशिवाय राहता कामा नये, असा फतवाच काढल्याचे आढळून येते. अर्थातच या बालविवाहामुळे समाजात अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या बालवधूचा पती अकाली मृत्यु पावल्यास त्या स्त्रिला उरलेल्या संपूर्ण आयुष्यात नरक यातना भोगाव्या लागत. पेशव्यांच्या काळात बहुपत्नीत्वाची चालही सर्व जातीजमातींमध्ये अस्तित्वात होती. स्वतः पेशव्यांनी अनेक विवाह केल्याचे उल्लेख आढळतात. बाळाजी

बाजीरावाला दोन, रघुनाथरावाला ६, दुसऱ्या बाजीरावाला १ पत्नी होत्या. समाजानेही या प्रथा उघडपणे मान्य केल्याचे आढळते. विवाहाचे अनेक प्रकार प्रचलीत होते. वराचे वय चाळीस वर्ष तर वधुचे ९ वर्ष असेही विवाह होत असत. खूद्द नानासाहेब पेशव्याने पैठणच्या वाखोरे कुटुंबातील एका ९ वर्षाच्या मुलीशी विवाह केला. त्यावेळी त्यांचे वय ४० वर्ष होते. वधुला जबरदस्तीने पळवूनही विवाह केले जात असत. त्याला राक्षस विवाह म्हणत.

**१६.४.२ विधवांची स्थिती -** पेशवेकाळात विधवांची स्थिती अत्यंत वाईट होती. ब्राह्मणांमध्ये विधवा पुनर्विवाहाला अनुमती नव्हती. मात्र इतर जातींमध्ये विधवा विवाह सर्रास होत. वैधव्य हा दैवी कोप असून विधवेने संन्यास जीवन जगावे, अशीही समाजाची अपेक्षा होती. म्हणूनच पती निधनानंतर विधवेचे केशवपन केले जाई. ही अत्यंत वाईट कृर अशी प्रथा होती. परंतु तत्कालिन सामाजिक रूढी कल्पनांप्रमाणे त्या काळचा समाज वागत असे.

**१६.४.३ सतीची दृष्ट पद्धत -** सर्वसाधारणपणे १०व्या शतकानंतर सतीची प्रथा रूढ झाली होती असे मानतात. जी स्त्री आपल्या मृत पतीबरोबर सहगमन करते ती आपल्या कुळाचा उद्धार करते. अशा कल्पना त्या काळात रूढ होत्या. सर्वच जातीजमातीत सती जाण्याची प्रथा होती असे विविध उदाहरणांवरून दिसून येईल. थोरल्या माधवरावाची पत्नी रमाबाई तसेच बापू गोखल्याची सुन सती गेल्याची उदा. देता येईल. अहिल्याबाई होळकरांची ही सती जाण्याची इच्छा होती, पण मल्हारराव होळकराने त्यांना त्यापासून परावृत्त केले होते. पेशवेकाळात सती जाणे मोठे पवित्र व प्रतिष्ठेचे समजले जात होते. वरिष्ठ वर्गातील या प्रथा कनिष्ठ वर्गातही आल्या होत्या. पुढे राजा राममोहन रॉय आदींच्या प्रयत्नांनी ब्रिटिशकाळात ही पद्धती कायद्याने नष्ट करण्यात आली.

## १६.५ - समाजातील अंधश्रद्धा –

मराठेकालीन समाज हा श्रध्देला धरून होता. देवाधर्मावर समाजाचा मोठा विश्वास होता. स्वधर्म–स्वजाती-स्वराज्य या संबंधी समाजाला अतीव अभिमान होता. तरीही समाजात अंधश्रद्धा या होत्याच, की ज्यामुळे समाजाचेच नुकसान झाले. लहानसहान गोष्टींसाठी मुहूर्त बघणे, अपशकून पाळणे, पायगुणाची प्रथा, जपतप, अनुष्ठान, नवस, भुतबाधा, व्रतवैकल्य, होमहवन, चेटुक इत्यादी अंधश्रद्धा तत्कालिन समाजात अस्तित्वात होत्या.

## १६.६ सण, उत्सव –

मराठेकाळात निरनिराळे सण, उत्सव, साजरे केले जात असत. गणेशोत्सव, दसरा, दिवाळी, होळी इत्यादी सण मोठ्या प्रमाणावर साजरे केले जात असत. सरकारतर्फे गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जाई. त्यासाठी मोठा दरबार भरविला जाई. थोरले व सवाई माधवरावांच्या काळात तर गणेशोत्सव अतिशय वैभवाने साजरा झाल्याची अनेक वर्णने आढळतात. शिव व पेशवे काळात दसऱ्याला विलक्षण महत्त्व होते. दसऱ्याचा मुहूर्त साधूनच मराठ्यांचे सैन्य नविन मोहीमेवर कुच करत असे. होळी हा सण पाच दिवस साजरा होत असे. पाचही दिवस संपूर्ण मराठा राज्य रंग उडविण्यात व आनंदामध्ये मशगुल होत असे. खूद्द पेशवे यामध्ये सहभागी होत असत.

**आपली प्रगती तपास :**

प्र.१. मराठेकालीन स्त्रियांची स्थिती स्पष्ट करा.

प्र.२. मराठेकालीन जाती व्यवस्थेचे स्वरुप वर्णन करा.

## १६.७. समारोप

मराठ्यांच्या राज्यातील सामाजिक स्थितीचा आढावा घेताना असे लक्षात येते की, एकूणच समाजजीवन रुढी परंपरेवर आधारीत होते. परंतु काही प्रमाणात समाजजीवन सुखकर व समाधानी असल्याचे दिसून येते. अंधश्रद्धेचे जरी प्राबल्य समाजात असले तरी पुढे इंग्रजी शिक्षणाचा प्रभावाने समाज जागृत होत गेला.

**मराठेकालीन अर्थिक जीवन :-**

## १६.९ प्रस्तावना

भारताच्या इतिहासात १८वे शतक बऱ्याच उलथा पालथी करणारे ठरले. या शतकात मोगल साम्राज्य ऱ्हासाला गेले तर युरोपियन सत्तांचा भारतात उदय झाला. १८व्या शतकात अस्तास गेलेल्या मराठा साम्राज्याच्या आर्थिक जीवनावर या घडामोडीचा प्रभाव पडणे साहजिकच होते. मोगलांच्या आर्थिक जीवनाचा आधार जसा तळागाळाशी असलेला शेतकरी वर्ग होता. तशीच परिस्थिती मराठ्यांच्या राज्यातही होती. शेती हा बहुसंख्य लोकांचा चरितार्थाचा प्रमुख व्यवसाय होता. चौथाई व सरदेशमुखी हे मराठ्यांच्या राज्याचे उत्पन्नाचे मुख्य साधन होते. शिवकाळापासूनच उद्योगधंदे व व्यापारालाही चालना मिळाली होती.

## १६.१० - शेती प्रमुख व्यवसाय

छत्रपती शिवाजी राजांनी मलिक अंबरची महसूल पद्धती स्वीकारली होती. पेशवेकाळातही हीच पद्धती प्रचलीत होती. या पद्धतीनुसार जमीनीची प्रत व मगदूर याप्रमाणे जमीनीचे अव्वल, दुम, सीम व चारूम असे ४ भाग पाडले जात. याशिवाय जिरायत व बागायत असेही जमीनीचे वर्गिकरण करण्यात येई. कोकणात भात व देशावर जोंधळा, बाजरी ही मुख्य पारंपारिक पिके होती. शेतीचे उत्पन्न भरपूर होत असे. वऱ्हाडात कापसाचे उत्पन्न भरपूर होत असे.

जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्यामुळे महसूलाची आकारणी व वसुली काटेकोरपणे करणे आवश्यक होते. त्यासाठी जमिनीची मोजणी करून त्यानुसार

महसूल बसविला जात असे. जमिनीची प्रत व त्यातील पिके यांच्या आधारेही महसूल आकारला जाई. कृष्णाजी अनंत सभासद यांच्या मतानुसार, सर्व साधारणपणे एकूण उत्पन्नाच्या २/५ किंवा ४० टक्के भागजमीन महसूलाच्या पोटी वसूल केला जात असे. अडीअचणीच्या, संकटाच्या व परचक्राच्या प्रसंगी यापेक्षा जास्त प्रमाणात महसूल वसूल करत. ज्या जमिनीत दरवर्षी दोन पिके घेतली जात, त्यावरील महसूलाचे प्रमाण अर्थातच जास्त होते.

## १६.११ उद्योगधंदे व व्यापार

आपल्या राज्याची चौफेर प्रगती व्हावी, यासाठी छत्रपती शिवाजी राजे विशेष जागरूक होते. राज्याचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने त्यांनी इंग्रज व उच्च व्यापाऱ्यांना राज्यात ठिकठिकाणी व्यापारी वखारी स्थापन करण्याची परवानगी दिली होती. तसेच त्यांना अनेक सवलतीही दिल्या होत्या. हस्तउद्योग व कलाकुसरीच्या उद्योगांनाही छत्रपती शिवाजी राजांनी सर्व प्रकारची मदत केली होती. राज्यातील व्यापार वाढल्यास राज्याचे उत्पन्न वाढेल व त्यासाठी सर्व प्रकारच्या देशी परदेशी व्यापाऱ्यांना अनेक सवलती देण्याची गरज छत्रपती शिवाजी राजांनी ओळखली होती. मात्र मिळालेल्या सवलतीचा दुरूपयोग करू नये यावर त्यांचा कटाक्ष होता.

तत्कालीन समाजरचना जातिनिहाय असल्याने प्रत्येक जातीचा व्यवसाय नेमून दिला जाई. प्रत्येक गाव आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण असल्याने बहुतेक सर्व जीवनावश्यक वस्तु त्या गावातच निर्माण होत असत. व्यवसायानुसार प्रत्येक जातीच्या श्रेणी असून त्या साधारपणे सहकारी संस्थाप्रमाणे काम करीत असत. कोकणपट्टीतील लहान मोठ्या शंभरवर बंदरातून मालाची आयात निर्यात होत असे. कारवार, वेंगुर्ले, राजापूर, चिपळून, मुंबई, कल्याण, वसई, भिवंडी आदी त्या काळातील व्यापारी बंदरे होती. खाड्यांवरील बंदराच्या ३० मैलाच्या परीसरात व्यापारी गावाची साखळीच तयार होत असे. या गावांतून मालाची वाहतूक होई. त्या गावांमध्ये व्यापारी, सावकार, सराफ, हुंडीवाले, आडते, तांबोळी, अमलदार, कारखानदार, कारागीर व लहान मोठे विक्रेते इ. लोक राहत असत. त्याकाळात कोकणातील राजापूर हे सुरतेच्या खालोखाल असणारे बंदर होते. कोकणातील जंगलातील वनस्पती व्यापार येथूनच चालत असे. दंडाराजापूरी येथे जहाजासाठी धक्के बांधण्यात आलेले होते. आयात निर्यातीच्या मालावर जकात आकारली जाई. जकातीचे उत्पन्न हे राज्याच्या महसुलाचे महत्त्वाचे साधन होते. मालानुसार जकात होती. कोकणाच्या किनाऱ्यावरील मिठागरांवर सरकारतर्फे कर आकारला जाई.

**१६.११.१ व्यापाराचे स्वरूप** - १७ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील उद्योगधंदे व व्यापाराचा उत्कर्ष झालेला नव्हता. मात्र १७व्या शतकात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर युरोपीन व्यापाऱ्यांचे आगमन झाले व त्यामुळे व्यापारी उलाढाली, भांडवलाची गुंतवणूक, आयात निर्यात मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. मात्र त्याचा फायदा मराठी माणसाला झाला नाही. गुजराथी व्यापाऱ्यांनी आपला फायदा करवून घेतला. पुढे शिवाजी राजांनी स्वराज्य निर्माण केल्यानंतर मात्र मराठी माणसांना व्यापार उद्योगधंद्यात फायदा होऊ लागला. अनेक उद्योगधंद्यात व व्यापारामध्ये मराठी माणूस अधिक मोकळेपणाने भाग घेऊ लागला. त्यातूनच सावकरांचा स्वतंत्र वर्ग महाराष्ट्रात उदयाला आला. शेटे, महाजन, वाणी, विक्रेते इत्यादी वाणिज्य वर्ग शिवकाळात उदयाला आले. पुढे मराठा साम्राज्य जसजसे विकसीत होऊ लागले, तसतसे व्यापाराचे क्षेत्र जास्तीत जास्त

विस्तृत होऊ लागले. पेशव्यांच्या काळात नवनविन युद्धमोहीमा दरवर्षी हाती घेतल्या जाऊ लागल्याने युद्ध मोहीमांवर अवलंबून असणारा एक वर्ग समाजात निर्माण झाला, की जो युद्धमोहिमांकरीता पैसा पुरविणाऱ्या सावकारांचा वर्ग होता.

**१६.११.२ व्यापारी धोरण** - रामचंद्रपंत अमात्याच्या आज्ञापत्रात विशद केल्याप्रमाणे, जसे छत्रपती शिवाजी राजांनी व्यापाराला उत्तेजन देण्याचे, व्यापाऱ्यांना सवलती व सुविधा देण्याचे धोरण स्वीकारले होते, तसेच धोरण पेशव्यांनीही कमी जास्त प्रमाणात अनुसरले होते. मात्र पेशव्यांना छत्रपती शिवाजी राजांच्या धोरणाचे महत्त्व तितक्या प्रमाणात जाणवत नव्हते. कारण पेशव्यांचे सैन्य कधी कधी व्यापाराला अतिशय हानीकारक अशा गोष्टी करत असत. असे जरी असले तरी छत्रपती शिवाजी राजांप्रमाणेच पेशव्यांनीही जकात व वाहतूक संबंधी एक चांगली व्यवस्था आखली. तणावाच्या काळात आयात निर्यातीवरील कर माफी देऊन त्यांनी व्यापाराला उत्तेजन दिले. गावात व शहरात नविन व्यापारी केंद्रे उभारली. महामार्ग व घाट मार्गावर व्यापारी संरक्षण दिले. जकात कर ठरवून देऊन, सरकारी दुकाने, चालवून, वस्तुची मागणी नियंत्रीत करून, व्यापाऱ्यांना परवाने व मक्ते देऊन त्यांनी व्यापारावर नियंत्रण ठेवले.

**१६.११.३ औद्योगिक व व्यापारी केंद्रे** - शिवकाळात कोकणाचा प्रदेश व्यापारासाठी भरभराटीला आला होता. इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड मध्ये चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला इ. बंदराचा उल्लेख भरभराटीची बंदरे म्हणून आलेला आहे.

चौल हे बंदर शिवकाळात व्यापारासाठी भरभराटीला आलेले बंदर होते. येथे डिसेंबर ते मार्च दरम्यान व्यापार अतिशय जलदगतीने होत असे. मलबारी व्यापारी चौल बंदरातून कापड, गहू, मलमल व सुती कापड नेत असत, तर विनलेले कापड व मलमल अरबस्थान व इराणला जात असे. डॉ. फ्रायर (इंग्रज) हा प्रवासी या बंदराचे वर्णन पुढीलप्रमाणे करतो, 'दक्षिणेकडून येणाऱ्या मालाची ही एक उत्कृष्ट बाजारपेठ होती. परंतुछत्रपती शिवाजी राजे व मोगलांमध्ये होणाऱ्या युद्धामध्ये या बंदराची वाताहत झाली.'

दाभोळ सुध्दा कोकणातील भरभराटीला आलेले बंदर होते. आफ्रीका, अरबस्थान व इराण देशाबरोबर दाभोळचे व्यापारी संबंध होते. मक्का, एडन येथून येणारी अनेक जहाजे दाभोळला भेट देत असत. येथून कापड, गहू, धान्य व डाळी निर्यात होत असत.

कल्याण व भिवंडी बंदरेही सतराव्या शतकात भरभराटीला आली होती. विल्यम फॉस्टर च्या मते, 'कल्याण हे सतराव्या शतकातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. हिंदूस्थानच्या सर्व भागातून येथे माल येत होता'. 'इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड नुसार,' भिवंडीही सतराव्या शतकात महत्त्वाचे व्यापारी केंद्र असून तेथे विणकामाचा उद्योग जोरदार चालत असे.

राजापूर, वेंगुर्ला ही बंदरेही सतराव्या शतकात भरभराटीस आलेली होती. राजापूरहून मिरे, वेलदोडे, सुती कापड, मिठ, कागद, हा माल निर्यात होत असे. या दोनही बंदरांना इराण अरबस्थान हून येणारी मालवाहू जहाजे भेट देत असत.

**१६.११.४ सावकाराचे स्थान** - मराठ्यांच्या राज्यात सावकारांना महत्त्वाचे स्थान होते. 'सावकार हे राज्याची व राज्यश्रीची शोभा असून त्यांच्यामुळे राज्याची आबादी होते, राज्य श्रीमंत होते, व संकटाच्या प्रसंगी राज्याला कर्जही मिळू शकते. ' असे मत खुद्द रामचंद्रपंत अमात्यांनी

व्यक्त केलेले आहे. ते पुढे म्हणतात, 'राजाने सावकारांचे रक्षण करून त्यांचा बहुमान करावा, लग्न वगैरे सारख्या समारंभात त्यांना प्रतिष्ठेने बोलावून त्यांना वस्त्र, पात्र देऊन त्यांचे समाधान करावे, परमुलखातील सावकारांना आपल्या राज्यात मुद्दाम पाचारण करावे. सावकारांना राज्यात सर्व सवलती मिळाव्यात हे सांगताना आमात्य परदेशी सावकारांबद्दल मात्र धोक्याचा ईशारा देतात. ते सावकार हट्टी असून हाती आलेली जागा काही केल्यास सोडणार नाही म्हणून त्यांना समुद्रकिनारी वखारीसाठी जागा देऊ नये. आरमार, तोफा व दारूगोळा हे त्यांचे बळ असून त्याच्या आधारे ते प्रत्येक बंदरात एक नवा किल्लाच तयार करतील व असे झाल्यास ते बंदर कायमचेच राज्यातून जाईल, असे इशारा वजा मतही त्यांनी व्यक्त केले आहे.'

पेशवे काळात सावकारांनी पेशव्यांना अडचणीच्या प्रसंगी कर्जे दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. तसेच लष्करी मोहिमांसाठीही पेशव्यांनी सावकारांकडून कर्जे घेतल्याचे उल्लेख अनेक ठिकाणी आलेले आहेत. महाराष्ट्रातील सावकार हे चित्पावन, देशस्थ, कायस्थ, शिंपी, मराठा या जातीतील असल्याचे आढळते. पुष्कळदा या सावकारांमध्ये महत्त्वाकांक्षा निर्माण होई व त्यामुळे राजकारणात मोठी गुंतागुंत निर्माण होई. उदा. बाबु नाईक या सावकाराला पेशवा बनण्याची महत्त्वाकांक्षा माधवरावाच्या कारकिर्दीत निर्माण झाली होती. त्यामुळे त्याचा बंदोबस्त माधवरावाला करावा लागला होता. सावकार वर्गाला सतत युद्ध परिस्थिती राहावी, असे वाटत होते. कारण हा वर्ग युद्ध मोहिमांसाठी पेशव्यांना कर्जे देत होता व त्यातून त्यांचा मोठा फायदा होत होता. तसेच युद्धावर जाणाऱ्या सैनिकांना जीवनावश्यक वस्तुही हाच वर्ग पुरवत होता. त्यामुळे पेशवाईत या वर्गाचा प्रभाव निर्माण झाला होता, असे लक्षात येते.

## १६.१२ मराठ्यांच्या उत्पन्नाची साधने -

१. चौथाई व सरदेशमुखी - हे मराठ्यांच्या राज्याचे प्रमुख उत्पन्नाचे साधन होते. या उत्पन्नाचे ४ भाग पाडण्यात येत असत. २५% छत्रपतीला ६६% निरनिराळ्या सरदारांना त्यांच्या सैन्याच्या पोषणाकरीता, ६% सचिवाला तर उरलेले ३% छत्रपतीजवळ ठेवण्यात येऊन त्याला इच्छेनुरूप त्याचे वाटप करण्याचा अधिकार होता.

२. विविध कर - मराठ्यांच्या राज्यात गृहकर, वेठबिगारी, फर्मासी, बेलकाटी, पायपोशी, मेजवानी, तेलपट्टी, फासकी, जंगमपट्टी आदी कर जनतेकडून सरकार आकारत होते. जंगलातून लाकूड तोडण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक असे. लाकूड तोडण्यावरही जंगलकर वसूल केला जाई. वजनमापासाठीच्या प्रमाणपत्रासाठी व्यापाऱ्यांना कर भरावा लागत असे. टोलकरापासूनही सरकारला बरीच प्राप्ती होत असे. सोनारांनाही व्यवसाय करण्यासाठी परवाना घ्यावा लागत असे. त्यांना आपल्या व्यवसायात उच्च दर्जाची सचोटी पाळावी लागे या परवाना करापासूनही सरकारला बरीच प्राप्ती होत असे. न्यायखात्यात ज्या घडामोडी होत असत त्यापासूनही सरकारला चांगली प्राप्ती होत होती. व्यभीचार सिद्ध झाल्यास त्यावर जबर दंड आकारला जात असे.

## १६.१३. - खर्चाचा विनियोग

मराठ्यांच्या राज्यात विविध उत्पन्नाच्या साधनांद्वारे जो महसूल जमा होत असे, तो कशापद्धतीने खर्च होत होता हे पाहणे तेवढेच उद्बोधक ठरेल. सर्वात जास्त उत्पन्न लष्करावर खर्च केले जात असत. कारण सैन्य सामर्थ्यशाली ठेवणे सरकारला अत्यावश्यक होते. उत्पन्नाचा

दुसरा मोठा हिस्सा प्रशासनावर खर्च होत असे. राज्य व्यवस्थित चालावयाचे असेल तर प्रशासन उत्तम असायलाच हवे होते, त्यामुळे मराठे काळात लष्कराप्रमाणेच प्रशासनावरही मोठा खर्च होत असे. राज्यात शांतता व सुव्यवस्था राखण्याकरता पोलिस विभागावरही सरकार बराच खर्च करत असे.

हेरखात्यावर बराच खर्च सरकारला करावा लागत असे. राज्यात रस्ते व प्रवाशांच्या सोयी सुविधांसाठीही बराच पैसा खर्च केल्याचे उल्लेख पत्रव्यवहारांमध्ये आढळून आलेले आहेत. शिक्षणासाठी व विद्वत्तेच्या सत्कारासाठीही बराच खर्च होत होता. मराठा राज्याचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर असूनही मराठ्यांची आर्थिक स्थिती सुव्यवस्थित नव्हती असे लक्षात येते. कारण मराठेकाळात खर्चाचे योग्य नियोजन नव्हते हेही आपण मान्य केले पाहिजे.

## १६.१४ ग्रामव्यवस्था

मराठा कालखंडात सामाजिक व आर्थिक व्यवहारांचा केंद्रबिंदू खेडे होते. खेड्याच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या भूपृष्ठाचे प्रामुख्याने दोन भाग केले जात असत. पहिला विभाग म्हणजे वसाहतीची जागा किंवा पांढरी किंवा काळी आई. ग्राम, देहे, मौजा इ. नावांनी खेड्याचा उल्लेख केला जात असे. खेड्याच्या अंतर्गत काही उपविभाग असत त्यांना मजरा, वाडी, पाडी, बाडी इ. नावे होती. खेडेगाव व त्याचा वाढीव भाग अनुक्रमे बुदुक व खुर्द अशा नावाने ओळखला जाई. एखाद्या खेडेगावाला आठवड्याचा बाजार भरत असेल तर त्याला कसबा म्हणत. कसबा म्हणजे ज्या ठिकाणी हरहूनरी व कसब असणारे लोक राहत असत. बंदराच्या ठिकाणी असलेल्या व्यापारी गावाला मिरे असे म्हणत.

खेड्यापाड्यांतून बलुतेदारी पद्धतीने मुख्यतः शेतीचे अवजारे, शेतकऱ्यास लागणाऱ्या दैनंदिन वस्तु इत्यादीचे त्या त्या खेड्यांपुरते मर्यादीत उत्पादन होत असे. खेडे गावात दिवानसत्ता, गोतसत्ता, ज्ञातिसत्ता व व्यापारी सत्ता अशा ४ सत्ता रूढ होत्या. बलूतेदारांमध्ये सोनारांसारखे घटक होते मात्र त्यांचा व्यापार सचोटीवर आधारीत असल्याने हा वर्ग सामान्य पणे गरीब व्यावसायिकच राहिल्याचे दिसून येते. बलूतेदारी बाहेरील घटकांत खेड्यातील वाणी मोडत असत. मात्र त्यांच्यात द्रव्य संचय करण्याची फारशी कुवत नव्हती. असे जरी असले तरी व्यवसायाच्या बाबतीत त्यांना मात्र इतरांपेक्षाा जास्त मोकळीक होती.

## १६.१५ वतनव्यवस्था

वतन या अरबी शब्दाचा वापर महाराष्ट्रात मुस्लिम अंमलात रूढ झाला. ज्यांना गावकीचे वंशपरांपरागत अधिकार असत, ज्यांना या कामासाठी सरकारातून जमीन मिळत असे व ज्यांना समाजात मानही असे, गावापासून ज्यांना काही हक्क प्राप्त होत असत, अशा लोकांना वतनदार म्हटले जाई. तर वतन म्हणजे वंशपरंपरेने व शाश्वतपणे उपभोगावयाची सारा मुक्त जमीन होय. जोपर्यंत एखादा वतनदार गावचे काम पाहील तोपर्यंत जमीनचे हक्क त्याच्याकडे राहत होते. वतनदारांचे पालनपोषण सारा गाव करीत असे. गावकऱ्यांकडून त्याला रोख किंवा वस्तुंच्या रूपाने त्यांच्या सेवेचा मोबला मिळत असे. हे त्याचे हक्क सनदेत नमूद केले असल्याने गावकऱ्यांकडून त्याची वसूली तो कायदेशीरपणे करून घेत असे. वतनदारांच्या या मोबदल्यास

हकलजिमा असे म्हणत. सारावसूली व शेतीचा विकास, गावात शांतता व सुव्यवस्था राखणे इ. कामे वतनदारांना करावी लागत असत.

**१६.१५.१ प्रमुख वतनदार** - खेड्यातील प्रमुख वतनदारांमध्ये देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौघुले, शेटे, महाजन, मिरासदार व बलुतेदार यांचा समावेश होत असे.

१. देशमुखाचा दर्जा हा सर्व वतनदारांमध्ये श्रेष्ठ होता. प्रत्येक खेड्यापाड्यातून भेट किंवा नजरांना रूपाने त्याला अनेक वस्तू मिळत असत. त्यामध्ये धान्य, गवत, जळण, आंबे, तसेच धनगराकडून लोकर, चांभाराकडून वहाणा, कुंभाराकडून मातीची भांडी, तेल्याकडून तेल इ. वस्तू मिळत असत. प्रत्येक गावाकडून किमान १ होन त्याचा दौऱ्याचा खर्च, जनावरांच्या खरेदी विक्रीवर ३ रूके (तांब्याचे नाणे), गावावर बसवलेल्या सरकारी कराचा काही हिस्सा इत्यादीच्या रूपाने त्याला रोख रक्कमही मिळत असे.

२. गावातील दुसरा महत्त्वाचा अधिकारी देशपांडे होय. त्याच्याकडे त्याच्या परगण्यातील सर्व गावाचा हिशोब पाहण्याचे काम असे. त्याला सरकारकडून सारामुक्त जमिन इनाम म्हणून मिळत असे. देशमुखाप्रमाणेच देशपांडेलाही बलुतेदारांकडून वस्तु हक्काने मिळत असत. प्रत्येक उस मळ्यामागे ५ शेर गुळ, एक उसाचा भारा व एक रसाची घागर त्याला मिळत असे. शेतकऱ्यांकडून भाजीपालाही मिळत असे.

३. पाटील हा गावचा मुख्य सरकारी अधिकारी असे. गावापासून सरकारला काही जोड उत्पन्न मिळत असे. त्यातील काही हिस्सा पाटलाला मिळत असे. प्रत्येक जमिन धारांकडून पाटलाला काही धान्य किंवा इतर वस्तू मिळत. कारागिरांकडूनही काही वस्तू भेट म्हणून मिळत असत.

४. कुलकर्णी हा खेडेगावचा हिशोब लिहित असे. पाटलासारखेच त्याला गावातून काही हक्क मिळत असे, मात्र त्याचे प्रमाण पाटलापेक्षा कमी असे.

५. चौगुला हा पाटलाला गावकीच्या कामात सहाय्यक म्हणून काम करत असे. सारावसूलीच्या कामात तो पाटलाला मदत करत असे. गोळा झालेला सारा तो परगण्याच्या मुख्य कचेरीत नेऊन भरत असे.

६. गावात सावकारीचे व्यवहार शेटे - महाजन करीत असत. तराजू ही त्याची व्यावसायिक निशानी होती. पाटील कुलकर्णी यांच्याप्रमाणेच त्याला हक्क मिळत असत.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. मराठेकालीन औद्योगिंक व व्यापारी केंद्राचे वर्णन करा.

प्र.२. मराठेकालीन उत्पन्नांची साधने सांगा.

## १६.१६ सारांश

सतराव्या शतकातील स्वराज्याच्या स्थापनेमुळे व नंतरच्या शतकातील राज्यविस्तारामुळे मराठी समाजाला अनेक क्षेत्रात प्रगती करण्याची संधी मिळाली. त्या एकूण प्रक्रियेचाच भाग म्हणून महाराष्ट्रात एक नवा अस्सल मराठी असा व्यापारी - सावकार वर्ग अठराव्या शतकात उदयास आला. त्यात अनेक जातीचे लोक होते.

## १६.१७ प्रश्न

१) मराठेकालीन समाजजीवनातील विविध अंगाचा परामर्श घ्या.

२) मराठे काळातील आर्थिक प्रगतीचा आढावा घ्या.

३) टीपा लिहा.

अ) मराठेकालीन स्त्रियांची स्थिती.

ब) मराठेकालीन व्यापार व उद्योगधंदे

## १६.१८ संदर्भपुस्तके

१) प्रा. सावंत बी. एस. व प्रा. जाधव व्ही. के. – मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिसाह – विद्या प्रकाशन, नागपूर (१९९७)

२) डॉ. कोलारकर श. गो. – मराठ्यांचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर (२००३)

३) प्रा. तांबोळी, प्रा. पवार, प्रा. राजदेव, प्रा. रुपनवर – मराठ्यांचा इतिहास – निराली प्रकाशन पूणे (२००४)

४) डॉ. काळे म. वा. – मराठ्यांचा इतिहास – प्राची प्रकाशन मुंबई (१९९८)

५) कुलकर्णी आर. खरे ग. ह. – मराठ्यांचा इतिहास – कॉन्टिनेन्टल प्रकाशन पूणे (१९९७)

६) प्रा. महल्ले व प्रा. पाठक – मराठ्यांच्या इतिहास – विद्या प्रकाशन नागपूर (१९९७)

❖❖❖❖

# १७

# मराठेकालीन सांस्कृतिक जीवन

**अनुक्रमणिका :**

१७.० उद्दिष्टे
१७.१ प्रास्तविक
१७.२ वाङ्मय
१७.३ शिक्षणपद्धती
१७.४ कला
१७.५ स्थापत्य
१७.६ सारांश
१७.७ प्रश्न
१७.८ संदर्भ

## १७.० उद्दिष्टे

१. मराठेकालीन वाङमय प्रकाराचा अभ्यास करणे.

२. मराठेकालीन शिक्षण पध्दतीचा अभ्यास करणे.

३. मराठेकालीन कला व स्थापत्याचा अभ्यास करणे.

## १७.१ प्रस्तावना

मराठ्यांनी आपले सर्व लक्ष प्रामुख्याने राजकारणाकडे केंद्रीत केले होते. त्यामुळे विद्या, साहित्य, कला व स्थापत्य यांच्या विकासाकडे त्यांना म्हणावे तितके लक्ष देता आले नाही. या काळात सरकारकडून फारशामोठ्या वास्तू निर्माण करण्यात आल्या नाहीत. मराठे सरदार, त्यांच्या बायका, श्रीमंत सावकार व श्रद्धाळू लोकांनी जी काही मंदिरे, धर्मशाळा, घाट इ. निर्माण केले त्यातून तत्कालिन कलाविषयक अविष्काराची कल्पना येते. तर संत तुकाराम व संत रामदास यांच्या पाासून भक्तीमार्गातून लोकजागृतीचे कार्य वाङ्मय व प्रबोधनाच्या माध्यमातून सुरू झाले. मराठेकाळात पारंपारिक शिक्षण पद्धत अस्तित्वात होती. मल्लविद्या व लष्करी शिक्षणास प्राधान्य होते.

## १७.२ वाङ्मय

प्राचीन मराठी वाङमय प्रामुख्याने धर्मपंथाच्या आश्रयाने निर्माण झालेले दिसते. महानुभाव, नाथ, वारकरी, दत्त, रामदास इ. धर्म पंथ वा संप्रदाय महाराष्ट्रात निर्माण झाले. या धार्मिक भक्ती चळवळीच्या प्रेरणेनेच मराठी वाङ्मयाची निर्मिती झाली. चक्रधर, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ या संतांनंतर तुकाराम व रामदास या संतांनी लोकजागृतीचे कार्य शिवकाळात सुरू केले. शिवरायांच्या अपूर्व कर्तृत्वाने महाराष्ट्रातील जनजीवन विविध अंगांनी बहरून गेले तर पेशवाईत मराठे सरदारांच्या व पेशव्यांच्या मर्दुमकीमुळे महाराष्ट्राचा दरारा हिंदुस्थानभर पसरला होता. मुसलमानी भाषा, रितीरिवाज, पोशाख, विविध कला इ. च्या सहवासाने मराठी लोकजीवनावर चांगलाच प्रभाव पडण्यास सुरूवात झाली. संस्कृत भाषेला पुन्हा महत्त्व प्राप्त होऊ लागले. या बदलत्या परिस्थितीला अनुसरून मराठी वाङ्मयात ही परिवर्तन घडून आले.

**१७.२.१ पंडिती वाङ्मय** - मराठे काळात वारकरी कीर्तनाचा प्रभाव कमी होऊन हरिदासी कीर्तनाचे महत्त्व वाढले. लोकमनोरंजनाच्या या प्रेरणेमुळे वाङ्मयाचे स्वरूपच बदलून गेले. पौराणिक आख्यानांना लोकप्रियता मिळाली. कवीत्व, कीर्तन हा चरितार्थाचा व्यवसाय बनल्याने त्यांच्यातील चैतन्य संपत गेले. वामन पंडितांनी ज्ञानेश्वरानंतर गीतेवर महत्त्वाचे भाष्य यथार्थ दिपिकेच्या रूपाने केले. कृष्णदास या कवीने चतु:श्लोकी भागवतावर एकवीस अध्यायांची टीका लिहिली. नाझरेकर या कवीने महाभारत, भागवत इ. ग्रंथातील कथा मराठीत ओवीवृत्तातून लिहिल्या. माधवस्वामी यांनी एक श्लोकबद्ध रामायण लिहिले तर श्रीधर या लोकप्रिय कवीने हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, जैमिनी - अश्वमेध, शिवलिलामृत, पांडुरंग महात्म्य असे अनेक ओवीबद्ध ग्रंथ लिहिले.

**१७.२.२ चरित्रकथा** - मराठी भाषेतील चरीत्रग्रंथ गद्यात लीळाचरित्र या नावाने १३व्या शतकात लिहिला गेला. १७०० च्या सुमारास बहिणाबाईने आपले चरित्र विस्तृत पणे अभंगातून मांडले. कृष्णदास जगदानंदन यांनी एकनाथांचे चरित्र 'प्रतिष्ठान चरित्र' या नावाने १६९८च्या सुमारास लिहिले. पेशवेकाळात चरित्रलेखनात सर्वांत महत्त्वाची कामगिरी ताहराबादच्या महिपती बुवांनी बजावलेली दिसते. त्यांची संतचरित्रे व भक्तीचरित्रे विशेष लोकप्रिय आहेत. भक्तीविजय संतलिलामृत, भक्तलिलामृत, संतविजय या त्यांच्या ग्रंथांना खूपच लोकप्रियता मिळाली होती. मराठे काळात जैन व लिंगायत या दोन अवैदिक पंथांनीही वाङ्मय निर्मिती-मध्ये विशेष हातभार लावलेला दिसतो. विरदासाने लिहिलेल्या सुदर्शन चरित्रात जैन धर्माची तत्त्वे आलेली आहेत. सुक्तिमुक्तावळी नावाचा जैनांचा दुसरा एक महत्त्वाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. लिंगायत पंथात शांतलिंग यांनी लिहिलेली कर्णहंस किंवा कर्णहस्तिका तसेच ब्रह्मदासाचा लिलाविश्वंभर हे ग्रंथही प्रसिद्ध आहेत.

**१७.२.३ स्फुटकाव्य रचना** - जनसामान्यांच्या तोंडात राहणारा आणखी एक प्रकार म्हणजे स्फुटकाव्य. पदे, अभंग, स्तोत्रे, अष्टके, आरत्या, भुपाळ्या हा प्रकार स्फुटकाव्य म्हणून ओळखला जातो. विविध देवदेवतांच्या आरत्या मराठेकाळात विशेष लोकप्रिय झाल्या. 'धनश्याम सुंदरा' ही होनाजी बाळाची अमर भुपाळी तर सर्वांच्याच परिचयाचीआहे. शाहिरी परंपराही याच काळात बहराला आली. लावणी, पोवाडे ही काव्य रचना विशेष प्रसिद्धीस आली. ऐहिक जीवन, मराठ्यांचा पराक्रम हा शाहिरांचा विषय होता. परशुराम, होनाजीबाळा, रामजोशी, प्रभाकर,

अनंत फंदी, सुगन भाऊ या शाहिरांचे पोवाडे, लावण्या, भूपाळ्या इ. काव्यरचना लोकांच्या सदैव स्मरणात राहतील.

**१७.२.४ बखरी व ऐतिहासिक पत्रे** - पेशव्यांची बखर, मराठेशाहीची बखर, मराठी साम्राज्याची छोटी बखर यात मराठ्यांचा इतिहासाचा वृत्तांत काही अंशी मिळतो. हरिवंशाची बखर, होळकरांची कैफीयत अशा काही कुळांच्या बखरीही आहेत. पाणीपतची बखर, खडर्याची लढाई अशा काही विशिष्ट लढायांच्या वर्णनाच्याही बखरी आहेत.

शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र ही शिवरायांच्या चरित्रा वरील बखर आहे. कृष्णाजी शामराव या दिल्लीच्या ग्रहस्थाने भाऊसाहेबांची बखर लिहिली असून त्यात कुंभेरीच्या वेढ्यापासून नानासाहेब पेशव्यांच्या आत्तापर्यंत हकीकती सांगितलेल्या आहेत. १८१७ साली लिहिलेल्या मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत भोसल्यांच्या मुळ पुरूष बाबाजी पासून प्रतापसिंहाच्या अखेरपर्यंत हकीकत आलेली आहे.

या काळात बखर रचना मुबलक प्रमाणात झाली. प्राचीन मराठी गद्यांची परंपरा या बखरींनी समृद्ध केली. तत्कालीन राजकारण व समाजव्यवस्था यांचे यथार्थ चित्रण या बखरींमध्ये आढळते. बखरींमध्ये अनेक प्रकारचे दोष असले तरी मराठ्यांच्या इतिहासाचे प्राथमिक साधन म्हणून त्यांचे महत्त्व अनन्य साधारण असेच आहे.

बखर वाङ्मयाबरोबरच राजकीय पत्रव्यवहारही मराठ्यांच्या काळात मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसतो. तत्कालीन हजारो राजकीय पत्रांतून वाङ्मयीन गुण दृष्टीत पडतात व राजकारणातील अंतस्थ प्रवाहाची कल्पनाही येते. बाळाजी आवजी चिटणीस, आंताजी माणकेश्वर, महादेव व बापू हिंगणे आणि गोविंदपंत बुंदेले यांची हजारो पत्रे आजही उपलब्ध आहेत. का. ना. साने, वा. वा. खरे, वि. का. राजवाडे, गो. स. सरदेसाई यांनी अनेक ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध केले आहेत.

रामचंद्रपंत अमात्यांच्या 'आज्ञापत्रातून' तत्कालीन राजकीय व्यवहार ज्ञानावर प्रकाश पडतो.

असे जरी असले तरी मराठ्यांच्या काळात अभिजात व अनेक अंगांनी फुललेल्या वाङ्मय प्रकारांची निर्मिती झाली नाही हे आपणास मान्य करावे लागते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. मराठेकालीन स्फुटकाव्यरचनेची माहिती द्या.

## १७.३ शिक्षणपद्धती

मराठे काळात पारंपारिक शिक्षणपद्धती अस्तित्वात होती. प्रजेच्या शिक्षणाची जबाबदारी सरकारची आहे, असे त्या काळात मानले जात नव्हते. प्रत्येकाने आपल्या मुलांची शिक्षणाची तरतुद आपल्या इच्छेप्रमाणे व शक्तीप्रमाणे करावी, अशी पद्धत असल्याने सर्वांना समान अशी शिक्षणपद्धती त्याकाळी प्रचलित नव्हती. शिक्षण देणाऱ्या शाळाही नव्हत्या. प्रतिकुल परिस्थितीत आपला टिकाव लागण्याचे साधन शरीर सामर्थ्य हेच असल्याने प्रत्येक व्यक्ती ते कमावण्यामध्ये काही वर्षे घालवत असत. चरितार्थाचे व नाव कमविण्याचे साधन युद्धातील पराक्रम हे असल्याने लष्करी शिक्षणाची त्या खालोखाल गरज होती. त्यानंतर व्यवहारीक व पुस्तकी शिक्षणाचा दर्जा असे. सैनिक व शेतकऱ्यांना शिक्षणाची गरज नव्हती. मात्र सरदार, जमिनदार व समाजातील अन्य प्रतिष्ठित मंडळी आपल्या मुलांना पुस्तकी शिक्षण देत असत. त्यापैकी ब्राह्मण सरदार व जमिनदार असे शिक्षण देण्यासाठी अधिक जागरूक असत. वाणी, सोनार, शिंपी ही आपला व्यवहार पाहण्यासाठी पारमार्थिक उन्नतीसाठी पुस्तकी शिक्षण मुलांना देत असत. ही गरज भागविणारा एखादा शिक्षक-पंतोजी प्रत्येक गावात असे. श्रीमंत व प्रतिष्ठित मंडळी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी खास शिक्षकांची नियुक्ती करत असत.

**१७.३.१ शिक्षणाचे स्वरूप** - पुस्तकी शिक्षणात अक्षर ओळख, उजळणी व हिशोब यावर मुख्य भर असे. त्यासाठी कित्ते, संसारचोपडी, गावीत, बखरी, महाभारत, भागवत व रामायण यांच्यातील आख्याने, रामरक्षा, स्तोत्रे, जमाखर्चाची पद्धत व पत्रव्यवहार यांचा वापर करण्यात येई. असे शिक्षण अर्थातच समाजाच्या वरिष्ठ वर्गापुरते मर्यादीत होते. सामान्य प्रजाजनांसाठी असणाऱ्या शिक्षणाच्या सोई फारच कमी होत्या. खेड्यातील प्रजेला लिहिता, वाचता येणे व हिशोब समजणे पुरेसे होते. अशा परिस्थित शिक्षणासाठी स्वतंत्र खाते किंवा विद्यापीठ स्थापन करून अनेक विद्या, कला व शास्त्रांचे एकत्रीत शिक्षण देणे त्याकाळी शक्य नव्हते.

ब्राह्मणांसाठी वेद, काव्य, न्याय, व्याकरण व मीमांसा इ. शिकविण्यासाठी सरकारी आश्रयांने वेद व पाठशाळा चालविण्यासाठी जुन्या हिंदू राजांची पद्धत होती. त्यामुळे जुनी विद्या जरी टिकून राहिली तरी शिक्षणाचा प्रसार फारसा होत नसे.

**१७.३.२ मल्लविद्या** - मराठेकाळात मल्लविद्येमध्ये जोर, बैठका, कुस्ती, वजन उचलण यांच समावेश होत असे, तर लष्करी विद्ये मध्ये लाठी चालविण्यापासून ते बंदूक चालविण्यापर्यंतचे शिक्षण दिले जात असे. मल्लविद्येसाठी गावो-गावातून लहानमोठ्या तालमी असत. या तालमीत दररोज सकाळी तरुण मंडळी व्यायाम करण्यात व एकमेकांना कुस्तीचे डावपेच शिकवण्यात मग्न असत. सर्वश्रेष्ठ मल्लाला गावकऱ्यांमार्फत खूराक पुरविला जात असे. शरीरसंवर्धनाबरोबरच ग्रामसरंक्षणाचे शिक्षणही तालमीतून दिले जात असे. त्यामुळे तरुणांच्या मनात ऐक्याची भावना जोपासली होती. समाजात मल्लविद्या लोकप्रिय असल्याने मल्ल बाळगण्याची प्रथा होती. खेड्यांमधून दरवर्षी यात्रा भरत असे. या यात्रेत कुस्त्यांची दंगल उडत असे. सर्वश्रेष्ठ पहिलवानास छत्रपती किंवा पेशव्यांकडून इनाम दिला जात असे.

नानासाहेब, भाऊसाहेब, जनार्दनराव, विश्वासराव, माधवराव व नारायणराव यांनाही कुस्त्यांचा व व्यायामाचा लहानपणापासून छंद होता. ते दरबारात वारंवार कुस्त्या घडवून आणत असत. सवाई माधवरावाने नियमित व्यायाम करावा, असे गोपीकाईंनी एका पत्राद्वारे सुचित केले होते.

**१७.३.३ शस्त्रास्त्र विद्या** - मराठे काळात मल्लविद्येइतकीच शस्त्रास्त्र विद्याही आवश्यक होती. त्यामध्ये तलवार, भाले, बाण, बंदुक, दांडपट्टा, बिचवा इ. हत्यारे चालविण्याचे शिक्षण देण्यात येत असे. घोड्यावर बसणे, भालाफेक करणे हा वरिष्ठ वर्गाचा व्यायामच होता. पाश्चिमात्य पद्धतीचे शिक्षण घेण्यासाठी इंग्रज किंवा फ्रेंच व्यक्तींची नेमणूक करून शिक्षण घेतले जात असत. त्यात तोफा ओतणे व तोफा उडविणे अशा शिक्षणाचा अंतर्भाव होता.

मराठेकाळात उपरोक्त शिक्षणाच्या पद्धती जरी अस्तीत्वात होत्या तरीसुद्धा समाजातील शुद्र जाती सर्वसामान्यपणे शिक्षणातून वंचित होत्या. अस्पृश्यांना तर शिक्षण घेण्याचा हक्कच नव्हता, हे मान्य करावे लागेल.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. मराठेकालीन शिक्षण पध्दतीचे स्वरुप स्पष्ट करा.

## १७.४ - मराठेकालीन कला

मानवाला कलेची उपजतच आवड आहे. अश्मयुगीन काळापासून संगीत, नृत्य, नाट्य, चित्र व शिल्प या कला मानवाच्या जीवनाशी प्राथमिक स्वरूपात का असेना मात्र निगडीत होत्या, हे उत्खननातील अविष्कारांवरून सिद्ध झालेले आहे. मराठे काळातही कलेला बहर आला होता, हे पुढील विवेचनावरून आपल्या लक्षात येईल.

**१७.४.१ संगीत** - महाराष्ट्रात संगीत कलेचा काही अंशी विस्तार मराठा काळात झालेला दिसतो. पेशव्यांच्या काळी दरबारी उत्सव, तमाशा, कीर्तने यांतून संगीताचा प्रसार झाला. पेशव्यांच्या दरबारात गणेशोत्सवाच्या काळात गवयांचे गायन होत असे. पहिला बाजीराव पेशवे व रघुनाथरावांच्या पदरी गवई होते हे उपलब्ध पुराव्यावरून लक्षात येते.

**१७.४.२ नृत्य** - मराठेकाळात लेझिम, भलरी किंवा मुलींचे घुमा हे खेळ म्हणजे नृत्याचा प्राथमिक भागच होते, तर लावणी गातांना होणारे नृत्य हे यापेक्षा आणखी वरच्या दर्जाचे होते. लावणी नृत्य लयबद्ध, नियमबद्ध व काही अंशी तंत्रबद्धही होते. महाराष्ट्रात नृत्यकलेचा विकास या पायरीने झालेला दिसत नाही.

**१७.४.३ नाट्य** - भारूडे, तमाशा, लकिते, दशावतहारी, खेळ या पलिकडे मराठेकाळातील नाट्यकला पोहचलेली दिसत नाही. शाकुंतल, मृच्छकटीक, उत्तर-रामचरित्र अशा दर्जाचे एकही नाटक मराठीत त्या काळात लिहिले गेले नाही. तमाशा, लळीते हे नाट्याचेच प्रकार होते पण ते अगदीच प्राथमिक स्वरूपाचे होते.

**१७.४.४ चित्रकला** - मराठ्यांच्या काळात चित्रकलेच्या क्षेत्रात फारशी प्रगती झाल्याचे आढळत नाही. मोगल व राजपूत शासकांप्रमाणे पेशवे व त्यांच्या सरदारांनी चित्रकलेकडे फारसे लक्ष दिले नाही. पहिल्या बाजीराव पेशव्याने शनिवार वाड्यात भिंतीवर चित्रे काढून घेतली होती. पूर्व पेशवाईत शिवराम नामक चित्रकार प्रसिद्धिस आला होता. पहिल्या माधवरावाच्या पदरी माणकोजी नावाचा चित्रकार होता. पुणे, सातारा, वाई, नाशिक, चांदवड, निपाणी येथील वाड्यांमध्ये भित्ती चित्रे काढलेली होती. तसेच पांडेश्वर, मोरगाव, खंडोबाची पाली, बेनवडी, पाषाण (पुणे) येथील मंदीरांच्या भिंतीवर व छतावरही चित्रे काढलेली होती. चित्रांचा मुख्य विषय 'दशावतार' होता. वाईचा रास्तेवाडा, साताराचा नवा राजवाडा येथे या प्रकारची चित्र अजूनही चांगल्या स्थितीत आहे. गणपती व रिद्धी-सिद्धी यांचीही अनेक चित्रे त्या काळातील आढळतात. भगवान शिवाचे चित्रही बऱ्याच ठिकाणी स्वतंत्रपणे आढळते. देवदेवतांचे एकत्रीत चित्रेही काढलेली दिसतात. त्यामध्ये रामपंचायतन, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी इ. चा समावेश आहे. पुंडलीक व विठ्ठलाची चित्रे मराठा काळात काढलेली आढळतात.

मराठाकाळातील ७०० ते ८०० चित्रांचा संग्रह पुणे येथील भारत इतिहास संशोधन मंडळाने केला आहे. नाना फडणींसाने मराठ्यांच्या दरबारात अनेक चित्रकारांना आश्रय दिला होता. ठिकठिकाणच्या प्रसिद्ध चित्रकारांनी तयार केलेली देवदेवतांची चित्रे गोळा करून त्याचा चांगला संग्रही केलेला दिसतो. जेम्स वेल्श या इंग्रज चित्रकाराने नाना फडणीस, महादजी शिंदे, परशुराम पंत पटवर्धन, माधवराव, नारायणराव इ.ची चित्रे काढली होती. चित्रकार वेल्श हा १७९०-९५ या काळात पुण्यात वास्तव्यास होता. त्याने सवाई माधवराव, नाना फडणीस व महादजी शिंदे यांचे एक सामुदायिक चित्र काढलेले असून ते पुण्याच्या गणेश खिंडीतील राजभवनात लावण्यात आलेले आहे. डॅनियल नावाचा आणखी एक चित्रकार पुण्यात होता. तथापि व्यवसाय म्हणून चित्रकलेचा स्वीकार करणारे कलावंत मराठाकाळात फारसे झालेले दिसत नाही. मात्र भिंतींवर चित्र काढणारे चित्रकार अनेक असावेत कारण त्यांनी काढलेली अनेक लहान मोठी भित्ती चित्रे अनेक सरदारांच्या वाड़यातील भिंतीवर तसेच विविध ठिकाणच्या मदीराच्या भिंतीवर आढळतात. चित्रांतील विषय महाराष्ट्रीयन समाजाला खास परिचित असलेले व महाराष्ट्रीयन संस्कृतीचे दर्शन घडविणारे असेच होते.

**१७.४.५ शिल्पकला** - मराठेशाहीत शिल्पकलेचा फारसा उत्कर्ष झालेला दिसत नाही. कारण छत्रपती व पेशव्यांचे सर्व आयुष्य मोगल, निजाम व ब्रिटिश या बलाढ्य शत्रुंशी लढण्यातच गेले. त्यामुळे मराठेकालीन स्वतंत्र शिल्पे दुर्मिळ आहेत. शिवाजी राजांचे एक अत्यंत दुर्मिळ शिल्प काही वर्षांपूर्वी कर्नाटकातील धारवाड जवळील यादवाड या गावी सापडले आहे. ते एका शिळेवर अत्यंत उठावदार पद्धतीने कोरलेले असून त्यात शिवछत्रपती व बेळवडी मल्लमा यांच्यात जी बोलणी झाली, त्याचे दृश्य दाखविले आहे. मराठेशाहीतील मंदीरेही त्यांच्या वास्तुशिल्पाचा विचार करता यादवकालीन मंदीरांसारखीच वाटतात. अहिल्याबाई होळकरांनी पेशवेकाळात अनेक मंदिरे बांधली त्या मंदिरांमध्ये शाहूच्या मुर्ती व कोरीव काम मोठ्या प्रमाणात केलेले आढळते. या वास्तुशिल्पांवर राजपूत व गुजराथी कलेचा प्रभाव जाणवतो. मंदिरांच्या प्रवेशद्वारांवर मराठा सरदारांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. त्या उभ्या किंवा बसलेल्या अथवा हत्तींवर आरूढ झालेल्या दिसतात तसेच नर्तकी व वाद्यवृंदातील वादकांच्याही मूर्ती आहेत.

मराठाकाळातील मंदिरांच्या बाहेरील भिंती व मंडपाच्या छतावर तर शिल्पांची मोठी रेलचेल आढळते. या कोरीव कामात फुले व भौमितीक नक्षी प्रकर्षाने जाणवते. नक्षीत कमळ व

हंसही प्रामुख्याने आढळतात. तसेच हत्ती, मोर, माकडे इ. प्राणीही कोरलेले आढळतात. टोके जि. अहमदनगर येथील सिद्धेश्वराच्या मंदिरात हंसाच्या पंक्तीचे चित्रणही कोरलेले आढळून येते. शिरवळ (सातारा) येथील शिवमंदिराच्या नंदिमंडपाच्या शिखरावर चारही बाजूस गोपाळकृष्ण, रामपंचायतन, महीषासुर-मर्दिनी व लक्ष्मी नारायण या देवतांच्या शाडूच्या मूर्ती आहेत.

मराठेशाहीतील काष्ठ शिल्पेही महाराष्ट्रभर पहावयास मिळतात. दगडात व लाकडात कोरलेल्या शिल्पात विलक्षण साम्य आढळते.

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, शिव व पेशवे काळातील सततच्या युद्धाच्या धामधुमीमुळे महाराष्ट्रातील कला भारतातील इतर प्रांतातील कलांप्रमाणे अत्युच्य शिखरावर पोहचू शकली नाही, असे खेदाने म्हणावे लागते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. मराठेकालीन शिल्पकलेचे परीक्षण करा.

## १७.५ मराठेकालीन स्थापत्य

शिवाजी राजांना जशी स्वराज्यांची नवनिर्मिती करावी लागली तशीच मराठी स्थापत्य विशारदांना स्थापत्य क्षेत्रात करावी लागलेली दिसते. त्यांनी पूर्वकालीन व समकालीन परंपरा व शैली यांचा या कामी उपयोग करून नवीन नगरे उभारली, देवालये व वाडे बांधले. मराठेकालीन प्रासाद, मंदीरे व इतर वास्तुंपैकी मंदिरे जर सोडली तर इतर वास्तू प्रकारचे फारच कमी नमुने चांगल्या अवस्थेत शिल्लक आहेत. मात्र बहुतेक सर्व मंदिरे चांगल्या अवस्थेत दिसतात. काही मंदिरांचे जिर्णोद्धार झालेले असले तरी त्यांच्या मुळ स्वरूपात फारसा फेरफार झालेला दिसत नाही.

**१७.५.१ नगररचना -** छत्रपती शिवाजी राजांची राजधानी रायगड या किल्ल्यावर होती. तर ताराबाई साताराच्या किल्ल्यावर राहत असे. शाहुराजांनी सातारा शहर वसवले. परंतु महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागांनी दळणवळणाच्या दृष्टीने सातारा सोईचे नसल्याने पेशव्यांनी पुणे शहर निवडले. १७२१ पर्यंत पेशव्यांचे वास्तव्य सासवड येथे होते. त्यानंतर त्यांनी आपला मुक्काम पुण्यास हलविला. त्यावेळी पुणे हे कसब्याचे लहानसे गाव होते. पुणे, कुमारी व कासारी या तीन खेड्यांचे मिळून पुणे शहर झाले. पुढे अन्य खेड्यांचा त्यात समावेश करून पेशव्यांनी पुणे शहराचा विस्तार केला. १७४८-४९ मध्ये शुक्रवार पेठेची स्थापना केली. तर बुधवार पेठेची स्थापना रामाजी व बाळाजी या नाईक बंधुंनी केली. १७५०-५१ दयाराम वल्लभदास या शेटीयाने गुरूवार पेठेची स्थापना केली. नायगाव खेड्याचे रूपांतर सदाशिव पेठेत करण्यात आले. तेथे नव्याने वस्ती करणाऱ्यांना पहिले ७ वर्षे जकात माफ करण्यात आली. पुणे शहराची

अनेक वेळा लुटमार झाली होती. १७६२-६३ मध्ये मुघलांनी पुण्यावर स्वारी करून ते उद्ध्वस्त केले होते. त्यानंतर पुण्याची पुनर्बांधणी करण्यासाठी माधवराव पेशव्यांना खास प्रयत्न करावे लागले होते.

नाशिक व धारवाड या शहरांच्या वाढीसाठी पेशव्यांनी खास सवलती दिल्या होत्या. नाशिक जवळीक चावडस गाव आनंदीबाईच्या खास आवडीचे होते. त्यामुळे या गावाचा विकास करून रघुनाथरावाने त्याला आनंदवल्ली हे नाव दिले होते. आनंदवल्लीची वस्ती वाढवून नाशिक शहरांपर्यंत नेण्याची त्यांची योजना होती. पेशव्यांप्रमाणे त्यांचे सरदारही आपल्या जहागीरीमधून नवी गावे व शहरे वसवीत असत. आनंदराव रास्त्यांनी ''वाई'' ला आधुनिक स्वरूप दिले होते. तेथे ब्राह्मणांची वस्ती वाढवण्यासाठी त्यांनी खास प्रयत्न करून वाईतील मुस्लिमांचे वाढलेले वर्चस्व समोपचाराने कमी केले होते.

माधवपुर, सांगली, झाशी इ. शहरे मराठ्यांनी वसवीली काही शहरांची उभारणी मराठ्यांनी मुस्लिम नगररचना शैलीच्या धर्तीवर केलेली दिसते.

**१७.५.२ इमारती** - शहाजी राजांनी मुरार जगदेवाच्या नांगराखाली गारद झालेले पुणे शहर पुन्हा आपल्या पायावर उभे करून 'पुणे-सुपे' ही जहागीर सावरण्याची कामगिरी छत्रपती शिवाजी राजांवर टाकली व त्यांच्या बरोबर दादोजी कोंडदेव व जिजाबाई यांनाही पाठविले. त्यांनी प्रथम कसल्याच्या गणपतीचे मंदिर पुन्हा बांधले. विठ्ठलवाडीच्या विठ्ठल मंदिराचे बांधकामही जिजाऊंच्या प्रेरणेने झाले. शिवाजीराजांसाठी लालमहालही बांधण्यात आला. त्यानंतर राजगड व रायगड येथेही मोठे प्रसाद, कुंड, तलाव बांधण्यात आले. मंदिरांप्रमाणे वाड्यांच्या बाबतीतही पारंपारिक कल्पना पत्करण्यात आलेल्या होत्या. मध्ये मोठा चौक, त्याभोवती आहेऱ्या आणखी त्याभोवतीही खोल्या, दिवाणखाने बांधलेले होते. सजावटीसाठी लाकडी कोरीव काम व रंग हीच मुख्य साधने होती.

१७३० नंतरच्या काळातील बऱ्याच वाड्यांची, राजवाड्याची नावे तत्कालीन साहित्यात आलेली आहेत. पुण्याचा शनिवारवाडा, शुक्रवार वाडा, विश्रामबागवाडा, नाशिकचा सरकारवाडा, कोपरगावचा रघुनाथरावांचा वाडा तसेच सातारकर छत्रपतींचे 'नवा' व 'जुना' असे दोन राजवाडे हे त्या काळातील प्रसिद्ध वाडे होते. सातारचे वाडे अद्याप चांगल्या स्थितीत उभे आहेत. नाशिक व कोपरगाव येथील वाड्यात नंतरच्या काळात खूपच बदल झालेले आहे. पुण्यातील शनिवारवाडा व शुक्रवारवाडा जवळजवळ नष्टच झालेले आहेत. नाशिकचा सरकारवाडाही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. वाई, टोके, श्रीगोंदे, पंढरपूर इ. अनेक ठिकाणी १८व्या शतकातील काही घरे उभी आहेत.

मराठे काळातील घरे कच्च्या व पक्क्या (भाजलेल्या) अशा दोन्ही प्रकारच्या विटांनी बांधलेली आढळतात. विटांच्या जोडीला लाकडी खांब, तुळ्या, पाट यांचा उपयोग गेला जात असे.

इमारतीच्या पायासाठी  घडीव दगड वापरीत असत. उत्तम घोटलेल्या चुन्याचे भिंतीना प्लास्टर करत असत. भिंतीची जाडी तीन फुट किंवा त्यापेक्षाही जाड असून खिडक्या आकाराने लहान व संख्येने कमी ठेवीत. छप्पर नळीच्या कौलांचेच असे.

पेशव्यांनी मराठ्यांच्या राज्याची राजधानी पुण्याला नेल्यानंतर तेथे अनेक सरदार व इनामदारांनी हवेल्या व वाडे बांधण्यास सुरूवात केली. या उपक्रमाची सुरूवात पहिल्या बाजीरावाच्या काळात झाली. शिंदे व होळकरांनी हवेल्या बांधल्या. सरदार घोरपडे यांनी पर्वतीच्या पायथ्याशी हवेली बांधली. नानासाहेबांनी १७५३ मध्ये साताऱ्याला एक वाडा बांधला. या वाड्यात पेशव्यांच्या वतीने सरदार पुरंदरे राहत असत.

**१७.५.३ मंदिरे** - अनेक मराठे सरदार, व्यापारी व सावकार यांनी आपल्या उत्पन्नातून श्रद्धेनुसार महाराष्ट्रात ठिकठिकाणी अनेक सुंदर व भव्य मंदिरांची निर्मिती केली. वाई येथे रास्त्यांनी, मिरज व सांगलीत पटवर्धनांनी, नाशिकला ओढेकरांनी व नारोशंकरांनी तसेच अहिल्याबाई होळकरांनी जवळजवळ सर्वच मोठमोठ्या क्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरे बांधलेली आढळतात. पेशव्यांनी पंढरपूर, थेऊर, चिंचवड, गंगापूर व आळंदी, पुण्यामध्ये पर्वतीच्या टेकडीवर, चास, करंजगाव वेरूळ या ठिकाणी जी मंदिरे बांधली आहेत. ती तत्कालिन वास्तुकलेची उत्कृष्ट प्रतिकेच आहेत.

विठ्ठल शिवदेव विंचूरकराने नरसिंहपूर येथे बांधलेले लक्ष्मी-नृसिंह मंदिर, बिवलकरांनी उरण येथे बांधलेले विष्णू मंदिर, नाना फडणीसाने वेळासला बांधलेले कालभैरवाचे मंदिर व भीमा शंकराचे मंदिर, काशी, सोमनाथ, घृष्णेश्वर, मथुरा, प्रयाग येथे अहिल्याबाई होळकरांनी बांधलेली मंदिरे, बायजाबाई शिंदेनी बांधलेली अनेक देवळे व धर्मशाळा या मराठेकालीन वास्तुकलेचे उत्कृष्ट नमुनेच आहेत. मजबुती व टिकाऊपणा ही वैशिष्ट्येच मराठ्यांच्या वास्तुकलेत दिसून येतात. पेशवाईत सुद्धा त्याच त्याच स्थापत्य शैलीचा समन्वय दिसून येतो. मराठेशाहीतील मंदिरांमध्ये हिंदू-मुस्लिम स्थापत्यशैलीचा बराच समन्वय झाल्याचे दिसून येते. मराठेशाहीतील मंदिरांची बांधणी, त्यावरील सजावट, त्यातील मेहराबी वगैरे सर्व काही हिंदू शैलीची होती मात्र कधी कधी मुसलमानी पद्धतीच्या साध्या कमानी महालात व मंदिरांमध्ये आढळून येतात. मंदिरांमध्ये स्थापन केल्या जाणाऱ्या मुर्ती परप्रांतातून आणल्या जात. त्या बहुधा काळ्या गंडकी पाषाणापासून तयार केल्या जात.

शिवकाळात बांधलेली मंदिरे ही यादव पद्धतीची होती. गुजराती शैलीतील मंदिरांच्या कोपऱ्यावर असलेले लोलक अत्यंत उठावदार दिसतात. मंदिरांवर कोरलेली कमळे उठावदार व उत्कृष्ट दिसतात. दरवाज्यांच्या चौकटींवर वेलबुट्टी कोरलेली आढळते. मध्यभागी ठेवलेल्या छोट्या कोनाड्यात गणेशाची लाकडी मूर्ती ठेवत असत.

**१७.५.४ किल्ले** - मराठ्यांचे किल्ले व गढ्या हे तत्कालिन वास्तुकलेचे श्रेष्ठ नमुने होते. वास्तुकलेच्या दृष्टीकोनातून किल्ल्याचे महत्त्व समजावून घेण्यासाठी मध्ययुगातील युद्धाचे तत्व व तंत्र लक्षात घेणे आवश्यक आहे. किल्ले हे मध्ययुगीन राजांचे आत्मे होते. किल्ल्यांचे महत्त्वविशद करणारे विचार रामचंद्रपंत अमात्य यांनी आपल्या आज्ञापत्रात व्यक्त केलेले आहेत. त्यांच्या मते किल्ले राज्याचे राखणदार असल्याने ते बांधण्याच्या जागा काळजीपूर्वक निवडल्या पाहिजेत, किल्यांच्या तटबंदीच्या सभोवताली लांबरूंद असा खंदक मुद्याम खणला पाहिजे, किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार भक्कम लाकडाचे असावे, अशा अनेक सुचना अमात्यांनी किल्ल्यांच्या बांधकामाविषयी केलेल्या आहेत. किल्ल्यांच्या भग्न अवशेषांवरून त्यांना सैनिकी अभियांत्रिकेचे सखोल ज्ञान असावे असा अंदाज करता येतो.

**१७.५.५ गढी –** किल्ल्या पेक्षा गढी ही लहान इमारत होती. संरक्षक तटबंदी असलेल्या गढ्या सरदारांचे निवासस्थान होते. तेथील वास्तव्य सुखावह व्हावे, या दृष्टीने सर्व प्रकारच्या प्रयत्न केला जात असे. गढीचा आकार व मजबूतपणा हा मालकाच्या सांपत्तीक स्थितीवर अवलंबून असे. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात अशा अनेक गढ्या महाराष्ट्रात बांधण्यात आल्या. गढीच्या मध्यभागी एक चौक असून त्याच्या भोवती राहण्यासाठी खोल्या बांधलेल्या असत.

**१७.५.६ नद्यांवरील घाट** - सामान्य हिंदुप्रमाणे मराठ्यांनाही नद्यांमध्ये स्थान करण्याची व त्यांच्या काठावर धार्मिक कृत्य करण्याची आवड होती. त्यासाठी नद्यांच्या काठावर अनेक पायऱ्यांचे घाट बांधण्याची पूर्वापार पद्धत होती. कृष्णा, गोदावरी, कोयना, चंद्रभागा इ. नद्यांच्या काठी असलेल्या अनेक शहरांत उदा. नाशिक, वाई, कराड, पंढरपूर, पैठण येथे पक्क्या बांधणीचे, दगडी, घाट बांधण्यात आलेले होते. नाशिक येथे तर घाट बांधण्यासाठी गोदावरी नदीचे पात्र सुद्धा बदलण्यात आले होते. अहिल्याबाई होळकरांनी महेश्वर व मंडळेश्वर या तीर्थक्षेत्र देशातील अनेक तीर्थक्षेत्री विशाल व सुंदर घाट बांधले होते, की जे घाट तत्कालीन स्थापत्यकलेचा उत्कृष्ट अविष्कारच आहे.

मराठे काळातील सर्वात प्रेक्षणीय घाट, गोदावरी व प्रवरा नद्यांच्या संगमावर टोके येथे आजही चांगल्या स्थितीत बघावयास मिळतात. येथे स्थापत्यातील आणखी एक पाऊल पुढे उचललेले दिसते. पाण्याच्या प्रवाहाने घाट निखळू नये म्हणून ठराविक अंतरावर भक्कम बुरूज सुद्धा बांधले आहेत की ज्यामुळे रचनेला भक्कमपणा आलेला आहे व घाटही उठून दिसतो.

**१७.५.७ पाण्याची व्यवस्था** - मराठेशाहीत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था चांगली होती. लोक नदी, तलाव, विहिरी व ओढ्याचे पाणी पिण्यासाठी वापरत असत. बहुधा घरोघरी लहानमोठ्या आकाराच्या खाजगी विहिरी असत. धार्मिक उद्देशानेही विहिरी बांधल्या जात होत्या. शहरानजीकच्या नदीवर बांध बांधून या बंधाऱ्याचे पाणी खापरांच्या नळांद्वारे आणून ते शहरातील ठिकठिकाणच्या मोठ्या हौदात एकत्र केले जात असे. अशा प्रकारच्या नळांद्वारे आणून ते शहरातील ठिकठिकाणच्या मोठ्या हौदात एकत्र केले जात असे. याद्वारे चार बांधांचे पाणी पुण्यात आणण्याची व्यवस्था पेशव्यांनी केली होती. पुण्याला पाणी आणण्यासाठी कात्रजजवळ एकाखाली एक अशी दोन धरणे बांधली होती. त्यातून भुयारी नळाने पाणी शहरात खेळविण्यात आले होते. पुष्करणी, सदाशिवाचा हौद, बाहुलीचा हौद असे लहानमोठे हौद गावात ठिकठिकाणी बांधून घेण्यात आले होते. कात्रजच्या तलावाचे पाणी सर्वसामान्य नागरिकांना मिळत असे. मोठ्या अधिकाऱ्यांच्या घरी खास नळ नेलेले होते व त्यातून बागाही फुलविण्यात आल्या होत्या तसेच कारंजेही तयार करण्यात आले होते.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. मराठेकालीन स्थापत्य कलेची माहिती सांगा.

## १७.६ सारांश

मराठ्यांच्या काळातील साहित्य, शिक्षण, कला व स्थापत्य क्षेत्राचा अभ्यास केल्यावर असे जाणवते की, मराठ्यांची या क्षेत्रातील कामगिरी बहुविध अशीच आहे. त्यांच्या विविध कार्यांतून नव्या पिढीला बोध घेण्यासारख्या खूप गोष्टी आहेत की ज्यातून अभिमान व विवेकाचे प्रकर्षाने दर्शन घडते.

## १७.७ प्रश्न

१) मराठेकालीन सांस्कृतिक जीवनाचा आढावा घ्या.

२) टीपा लिहा.

अ) मराठेकालीन साहित्य

ब) मराठेकालीन शिक्षण

क) मराठेकालीन कला

ड) मराठेकालीन स्थापत्य

## १७.८ संदर्भपुस्तके


१. प्रा. सावंत बी. एस. व प्रा. जाधव व्ही. के. – मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिसाह – विद्या प्रकाशन, नागपूर (१९९७)

२. डॉ. कोळारकर श. गो. – मराठ्यांचा इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर (२००३)

३. प्रा. तांबोळी, प्रा. पवार, प्रा. राजदेव, प्रा. रुपनवर – मराठ्यांचा इतिहास – निराली प्रकाशन पूणे (२००४)

४. डॉ. काळे म. वा. – मराठ्यांचा इतिहास – प्राची प्रकाशन मुंबई (१९९८)

५. कुलकर्णी आर. खरे ग. ह. – मराठ्यांचा इतिहास – कॉन्टिनेन्टल प्रकाशन पूणे (१९९७)

६. प्रा. महल्ले व प्रा. पाठक – मराठ्यांच्या इतिहास – विद्या प्रकाशन नागपूर (१९९७)


❖❖❖❖